सं०१९८२३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ७५५
REFBK-0002314

# हिंदी राजकारण

अर्थात्

## राष्ट्रीय सभेचा संकलित इतिहास.

---

**हिंदी राजकारण**

या पुस्तकाचा उत्तरार्ध फेब्रुआरी १९२४ नंतर एक-दोन महिन्यांत प्रसिद्ध होईल. तो मागविते वेळीं या कूपनचा उपयोग करावा; म्हणजे उत्तरार्धाला ट. ख. पडणार नाहीं ही सवलत फक्त त्या वेळीं आमचेकडून मागणी करणारासच राहील.

—व्यवस्थापक, प्रफुल्लता कचेरी, मुंबई २.

---


नवराज। [illegible]

**मुंबई.**

१९२३.

किंमत रुपया दीड.

सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन.

# प्रास्ताविक.

अगदीं परवा परवापर्यंत राष्ट्रीय सभेची किंवा तिच्या कामाची माहिती एका विशिष्ट वर्गाखेरीज फारशी कोणाला नव्हती; किंवा ती मिळविण्याची कोणी पर्वाहि केली नव्हती १९०७ साली सुरतेच्या राष्ट्रीय सभेचा फारच गवगवा झाला, म्हणून तेवढयापुरतें लोकांचें औत्सुक्य वाढलें होतें, परंतु तें प्रसंगोपातच असल्यामुळें अगदींच अल्पकाळ होतें. राष्ट्रीय सभेच्या ठरावांना बादशहांच्या हुकुमाहूनहि अधिक मान देण्याच्या (मँडेट थियरी) तत्वाचा अवलंब केला गेल्यापासून आणि विशेषतः हल्लींच्या सुधारणांच्या प्रभात कालापासून राष्ट्रीय सभेकडे सामान्य जनतेचें लक्ष अधिक वेधलें. सभेच्या कामाविषयीं लोकांच्या अंतःकरणांत एकांगी स्वरूपाची कां होईना, पण आस्था उत्पन्न करण्याचे, या काळांत पुढाऱ्यांकडून प्रयत्नहि चांगले झाले. परंतु पाण्यांत बुडी मारून एकदम कोठेंतरी वर डोकें काढावें, त्याप्रमाणें या बाबतींत बहुजनसमाजाची स्थिति झाली आहे. राष्ट्रीय सभेच्या पूर्वेतिहासाला आणि पूर्व परंपरेला अगदींच पारखा असलेला समाज आमच्या प्रवाहाबरोबरच वाहावत जाणें अपरिहार्य आहे. पण अशा तऱ्हेचा आंधळेपणा किंवा एकांगी स्थिति देशाच्या राजकीय प्रगतीला विघातक आहे असें कोणालाहि कबूल करावें लागेल.

या दृष्टीनें विचार करतां राष्ट्रीय सभेच्या साद्यंत आणि विस्तृत इतिहासाची आज जितकी जरूर भासत आहे; तितकी यापूर्वी कधीं भासली नव्हती. हल्लींच्या राजकारणांत शिरूं पाहणाऱ्या प्रत्येकाला या इतिहासाचा चिकित्सक बुद्धीनें आणि निर्विकार मनानें अभ्यास केला पाहिजे; व तसा तो करण्यास कांहींशी मदत व्हावी, हाच हें पुस्तक लिहिण्याचा उद्देश आहे. हा इतिहास विस्तृत नसून त्याचें सार आहे हें येथें सांगितलें पाहिजे. राष्ट्रीय सभेचा आद्य उद्देश, तिचें धोरण, तिचें काम, किंवा कार्यपद्धति यांची ठळक कल्पना देऊन या इतिहासाविषयीं लोकांत आस्था उत्पन्न झाली म्हणजे देखिल या पुस्तकानें पुष्कळ काम केलें असें होईल.

राष्ट्रीय सभेचा इतिहास समजून घेण्याची लोकांच्या अंतःकरणांतील जिज्ञासा दिवसेंदिवस वाढत आहे; याला प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे "प्रफुल्लते"तून क्रमशः चालू असलेल्या या लेखमालेला पुस्तकाचे स्वरूप देऊन, झालेला

भागच **पूर्वार्ध** म्हणून काढण्याची, वाचकांनीं अवश्यकता भासविली हें होय. राष्ट्रीय सभेनें आपल्या उत्क्रांतीची दुसरी अवस्था पार करीपर्यंतचा, म्हणजे मोर्ले-मिंटो सुधारणांनीं हिंदी राजकारणांत नवीन युगाचा आरंभ करीपर्यंतचा-- संक्षिप्त इतिहास या पूर्वार्धांत दिला असून, उत्तरार्धांत १९२३ अखेरचा इतिहास वाचकांना सादर करावयाचा आहे.

या विषयावर इंग्रजींत आणि मराठींत असलेल्या पुस्तकांचा आणि लेखांचा प्रस्तुत पुस्तक लिहित असतांना चांगला उपयोग झाला; व त्याबद्दल त्या त्या लेखकांचे आभार मानणें योग्य आहे. राष्ट्रीय सभेवर मराठींत वाङ्मय नाहींच ह्मटलें तरी चालेल. १९१५ च्या राष्ट्रीय सभेनंतर **विविधज्ञानविस्तारांत** रा. रा. अभ्यंकर यांनीं लिहिलेला एक विस्तृत लेख आणि लो. टिळक यांची होमरूल लीग स्थापन झाल्यापासून जीं कांहीं पॅंफलेट्स काढलीं तीं, एवढीच मराठींतील राष्ट्रीय सभेची सध्यांची संपत्ति आहे.

परंतु या सर्वांपेक्षांहि येथील इंदुप्रकाशचे संपादक रा. रा. **नरहर रघुनाथ फाटक**, बी. ए. यांनीं मला आरंभापासून हरएक बाबतींत जें साहाय्य केलें आहे, तें सांगून येण्यासारखें नाहीं, व त्याबद्दल त्यांचे उतराईहि होणें शक्य नाहीं त्यांची मदत आणि धीर नसता तर हें पुस्तक कदाचित लिहूनहि झालें नसतें; हें सांगितलें ह्मणजे त्यांनीं केलेल्या साहाय्याची बरोबर कल्पना होईल.

या कामीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें प्रोत्साहन देणारे 'प्रफुल्ल'चे चालक रा. रा. **पांडुरंग ना. जव्हेरी**; आणि आमचे मित्र रा. रा. **वामन ज. कुंटे** बी. ई यांचाहि येथें साभार उल्लेख केला पाहिजे. राष्ट्रीय सभेचा इतिहास आपल्या वाचकांना कळवावा ही रा. जव्हेरी यांची प्रबल इच्छाच प्रस्तुत पुस्तक लेखनाला विशेष कारणीभूत आहे, त्यांनीं हें लिहवून घेतलें नसतें तर, इच्छा असूनहि हें काम किती लांबणीवर पडलें असतें हें सांगणें कठीण आहे. तेव्हां पुस्तक प्रकाशनार्थ त्यांनीं दाखविलेल्या तत्परतेबद्दल मीं त्यांचा आभारी आहेच, पण वाचकवर्गहि त्यांचा आभारी होईल, यांत शंका नाहीं.

माटुंगा.
मुंबई ता. १।८।२३

**शिवराम श्री. वाशीकर.**

# प्रकाशकांची विज्ञप्ति.

मृदु-साहित्य--साप्ताहिकाची स्वभावेत असलेली उणीव अंशतः तरी दूर करण्याच्या उद्देशानें 'प्रफुल्लता' या मनोरंजक साप्ताहिकाचा जन्म झाला असल्यानें त्यांत 'हिंदी राजकारणा'सारखी प्रौढ व क्लिष्ट लेखमाला सुरू झालेली पाहून पुष्कळांस आरंभीं अचंबा वाटला. प्रफुल्लतेचें धोरण 'सात्विक करमणूक करून विविधप्रकारचें ज्ञान देण्याचें' असतांहि मनोरंजक वाङ्मयाशिवाय इतर वाङ्मयाचा तींत केलेला समावेश त्या वेळीं कित्येकांना आवडला नाहीं. पण 'हिंदी राजकारण' ही लेखमाला प्रचलित राजकारणाच्या ऊहापोहाचा किंवा चर्चेचा विषय नसून ऐतिहासिक सत्याची माहिती या दृष्टीनें तिचा फार उपयोग होणार आहे; व आपल्या भाषेत राजकारणाचा व राष्ट्रीय सभेचा संकलित इतिहास उपलब्ध नसल्यानें तोच या लेखमालेत ग्रथित होत आहे हें पाहून पूर्वीचा मतभेद उरला नाहीं व अशा प्रकारचें टिकाऊ व आवश्यक वाङ्मय प्रफुल्लतेंतून प्रसिद्ध झाल्यास बरें अशाच चोहोंकडून सूचना व अभिप्राय मिळूं लागले; व त्याच प्रोत्साहनानें त्या लेखमालेचा पूर्वार्ध आतां स्वतंत्र पुस्तक रूपानें लोकांपुढें येत आहे.

प्रफुल्लतेच्या धोरणाचा उल्लेख वर आलाच आहे; तेव्हां त्याला अनुसरून प्रफुल्लतेच्या द्वारा विविध व टिकाऊ; मनोरंजक व संग्राह्य असें वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें आम्हीं योजिलें असून आमच्या प्रयत्नांनीं महाराष्ट्र वाङ्मयांत यथाशक्ति भर घालण्याचा आमचा संकल्प आहे न तो सिद्धीस जाणें हें केवळ लोकाश्रयावर अवलंबून आहे. एकंदर अभिरुचि व परिस्थिती यांजकडे पाहिलें म्हणजे आमच्या संकल्पाला व प्रयत्नांना कितपत यश येईल याबद्दल आम्हीं तरी साशंक आहों. तरी पण—

हल्लीं प्रकाशकांचा धंदा फार बिकट होत चालला आहे. त्याला अनेक कारणें आहेत. त्यांत मुख्यतः कितीहि उपयुक्त व श्रेष्ठ प्रतीचें पुस्तक असो; पण तें

जर नामांकित किंवा लोकापुढें आलेल्या लेखकानें लिहिलें नसलें म्हणजे ते प्रत्यक्ष वाचण्यांत आल्याशिवाय लोकादरास प्राप्त होत नाहीं. व इकडून तिकडून मागवून आणलेलें पुस्तक एकदां वाचून झालें कीं स्वतंत्र विकत घेऊन संग्रह करणारे विरळा असा अनुभव आहे. तेव्हां 'हिंदी राजकारणा' सारख्या पुस्तकाला मताभिमानाची आडकाठी न येणें अपरिहार्यच असल्यानें सामान्य जनतेवर व वाचकवर्गावर जर इष्ट असा परिणाम झाला तर शेंकडा एखाद दुसरा हौसी मनुष्य अशा पुस्तकाचा संग्रह करण्यास धजावेल; पण जर कां या मताभिमानाचा उलट प्रकार घडला तर अशा पुस्तकाची कितीहि उपयुक्तता किंवा अवश्यकता भासत असली तरी मताभिमानाचें वारें संग्रहकर्त्यांच्या अंगीं संचरल्याशिवाय राहणार नाहीं व एकदां ही उलट जाहिरात सुरू झाली कीं अशा पुस्तकांना कोठारांत पडून राहिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पुष्कळ उपयुक्त व संग्राह्य पुस्तकें अनेक प्रकाशकांनी प्रसिद्ध केली आहेत पण वरील परिस्थितीच्या अडचणींमुळें ती पडून राहिली आहेत. यामुळें प्रकाशकांना नवीन पुस्तक प्रसिद्धीच्या बाबतींत उत्साह राहिलेला नाहीं आणि याच कारणानें पुष्कळ लेखकांचे प्रयत्न सुद्धां नुसत्या हस्तलिखितांतच पडून राहिले आहेत. मराठी वाङ्मयांत जशी अधिक वाढ व्हावयास पाहिजे तशी झालेली नाहीं. याचें कारणहि वरील गोष्टींत आहे हें विसरून चालणार नाहीं

तेव्हां महाराष्ट्र वाङ्मय-प्रेमी लोकांना एवढीच विनंति करावयाची कीं आम्हीं आरंभिलेल्या प्रयत्नाकडे दृष्टि ठेवून आमच्या—व त्याबरोबर इतरांच्याहि—प्रयत्नांचे चीज केल्याशिवाय त्यांनीं राहूं नये. वर आमचा संकल्प कळविलाच आहे व त्याला अनुसरून या व पुढील प्रयत्नाला सर्वांकडून भरपूर आश्रय मिळेल अशी आम्हाला आशा आहे.

---

# उपोद्घात.

हिंदी राजकारण असें व्यापक नांव देऊन राष्ट्रीय सभेच्या कामगिरीचा इतिहास सादर केल्याचें पाहून याच्या वाचकांपैकीं पुष्कळांना आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वाला वीस वर्षें होऊन, ती वयांत येण्याच्या सुमारास, तिच्या हातून एवढ्या अवधींत विशेष फलनिष्पत्ति झाली नाहीं असा आक्षेप १९०४ सालीं निघाला होता. राष्ट्रीय सभे-निमित्त सालोसाल प्रचंड खर्च होत असे, पण तिचें कार्य पाहावयाला जावें, तर सरकारची निष्फळ मनधरणी करणाऱ्या ठरावांशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं; अशा भावनेनें निराश होऊन जवळ जवळ वीस वर्षांमागें कित्येकांनीं राष्ट्रीय सभा व्यर्थ आहे, तिच्या कार्यांत कांहीं राम नाहीं, तिच्या हातून जोमदार दृश्य कार्य होण्यासाठीं कांहींतरी निराळा मार्ग स्वीकारला पाहिजे, नाहींतर ती कार्यशून्यतेमुळें ती मेलीच असे समजून तिचा अंत्यविधि करून टाकला पाहिजे, असे उद्वेगाचे जाहीर उद्गार काढले होते. हे उद्गार निघाल्यावर पुढें पंधरा वर्षेपर्यंत राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम पूर्ववत् अखंड चालू होता. १९२० सालीं महात्मा गांधींच्या प्रेरणेनें या कार्यक्रमाला कायमची मूठमाती देण्याचा यत्न झाला; परंतु पूर्वीचा कार्यक्रम साफ मोडला गेला नाहीं, व मेलाहि नाहीं, याचा प्रत्यय अलीकडे येऊं लागला आहे. राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत जो एक ठराव वारंवार दृष्टीस पडतो, त्या ठरावाची हेटाळणी करणारा संख्येनें बलाढ्य असलेला एक पक्ष सांप्रत हिंदुस्थानामध्यें उत्पन्न झालेला आहे. या पक्षाच्या अनुयायांना राष्ट्रीय सभेचा मुळापासून पाढा वाचणें म्हणजे आपल्या लेखनशक्तीच्या व तिच्या पाठीशीं असणाऱ्या मेंदूचा अपव्यय करणें होय, असें म्हटल्याशिवाय राहणार नाहीं. राष्ट्रीय सभा जन्मास आली त्या वर्षापासून, प्रतिवर्षी लोकमताचें राज्यकारभारांत प्राबल्य होण्यासाठीं कायदेकौन्सिलची घटना बदलण्याची सुधारणा करणें अवश्य आहे असें सरकारला बजावीत होती. ज्या कौन्सिलें निर्माल्यवत् आहेत, त्यांचा संबंध कोणीहि स्वतःस होऊं देतां कामा नये, असे विचार सर्वत्र पसरले आहेत.

या विचारांच्या पुरस्कर्त्यांना १९२० सालापासून राष्ट्रीय सभेनें पत्करलेल्या धोरणाचा इतिहास काय तो लिहिण्यासारखा व वाचण्याजोगा, असें वाटल्यास नवल नाहीं. कौन्सिलें म्हणजे देशहिताच्या दृष्टीनें अधःपाताचीं स्थळें होत, असें मानणाऱ्या पक्षाविरुद्ध एक नवा पक्ष उदयास आला आहे. पण हा पक्ष कौन्सिलांना अधःपाताचीं स्थानें समजून निदान लोकांस तसें भासवून—त्यांचा नायनाट करण्याच्या जाहीर प्रतिज्ञा उच्चारीत कंबर बांधून उठला आहे. त्यालाहि कदाचित् राष्ट्रीय सभेचा जुना इतिहास गुंडाळून कचऱ्याच्या टोपलींत फेंकण्याच्या लायकीचा वाटेल. तथापि राष्ट्रीय सभा एक वेळ कौन्सिलांच्या द्वारें स्वराज्याचें ध्येय हस्तगत करण्याच्या खटपटींत होती ही ऐतिहासिक वस्तुस्थिति असल्यानें कोणी तिच्याबद्दल कितीहि नाकें मुरडलीं तरी इतिहासदेवता त्यांची गय करणार नाहीं हें ध्यानांत ठेवणें उचित आहे.

राजकारण या शब्दाची सर्व देशांत सर्वसमंत अशी एकच तर्कशुद्ध व्याख्या केली जात असते. राज्यकारभाराचें जें शास्त्र तें राजकारण हीच ती व्याख्या होय. ही व्याख्या पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं, म्हणून ते असा अपवाद काढतात कीं, हिंदुस्थानासारख्या परतंत्र बनलेल्या राष्ट्रामध्यें राजकारण निर्माण होणें अशक्य आहे, हिंदी राजकारण या शब्दाला कांहींच अर्थ नाहीं, हा केवळ भ्रामक शब्दसमूह आहे असें ते ठासून प्रतिपादन करण्यास कचरत नाहींत. राजकारणांत परराष्ट्रीय उलाढालींचा अंतर्भाव झालाच पाहिजे या अज्ञानमूलक कल्पनेला बळी पडल्यामुळें त्यांच्या तोंडून वरच्यासारखा आक्षेप निघतो. या आक्षेपाला कै. गोपाळराव गोखले यांनी आपल्या १९०४ सालच्या एका भाषणांत चोख उत्तर दिलें आहे. स्वदेशाला सुखी, समृद्ध, व बलाढ्य बनवून सोडणारी राज्यकारभाराची घडी कशी बसवितां येईल या एकाच गोष्टीची चिंता प्रत्येक देशांतील कर्तबगार राजकारणी पुरुष वाहत असतात. परदेशांतल्या घडामोडी जर स्वदेशाला हितावह होण्याचा संभव दिसेल तरच ते त्यामध्यें मन घालण्यास प्रवृत्त होतात, एरव्ही परदेशांकडे त्यांची दृष्टि जात नाहीं. परदेशस्थांच्या कारस्थानामुळें आपल्या देशावर परचक्र येऊं नये, यासाठीं प्रत्येक स्वतंत्र देशांतले राज्यकर्ते मुत्सद्दी डोळ्यांत तेल घालून खबरदारी

घेतात, पण सामान्यतः या खबरदारींत स्वसंरक्षणाहून जास्त हेतु नसतो. राजकारणाची शास्त्रीय व्याख्या व स्वतंत्र परराष्ट्रांतल्या राज्यकर्त्यांची वागणूक विचारांत घेतल्यास हिंदुस्थानाला राजकारण नाहीं असा आक्षेप काढणें किती वेडेपणाचें आहे हें वाचकांच्या गळीं उतरल्याशिवाय राहणार नाहीं. कोणत्याहि देशांतला राज्यकारभार पूर्णावस्थेस पोंचलेला नसून निर्दोषहि नाहीं; यामुळें जसें इतर सर्व देशांना अंतर्गत राजकारण आहे, तसेंच तें हिंदुस्थानाला देखिल आहे. मात्र हिंदुस्थानच्या राजकारणांत अडचणीं जास्त आहेत. परंतु ते इतर देशांच्या मानानें अतिशय उदात्त व पवित्र स्वरूपाचें असल्यानें अडचणींना घाबरणें हिंदुस्थानच्या राजकारणी पुरुषांना केव्हांहि शोभणार नाहीं. स्वराज्य व स्वातंत्र्य मिळविणें यापेक्षां अधिक उदात्त व पवित्र ध्येय माणसांपुढें कोणतें असूं शकणार ! हेंच ध्येय हिंदी जनतेसमोर व पुढाऱ्यांसमोर आहे; त्यामुळें त्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं आपलें सर्वस्व वेंचण्याचा अतुल स्वार्थत्याग केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. एवढ्या उदात्त ध्येयाच्या प्रेरणेचें ईश्वरी अधिष्ठान पाठीशीं असतांना हिंदुस्थानाला राजकारण नाहीं ही निराशेची कल्पना उराशीं बाळगून राजकीय आत्महत्येला तयार होणें हिंदी जनतेला व पुढाऱ्यांना कदापि शोभणार नाहीं, अशा आशयाचें उत्तर कै. गोपाळराव गोखले यांनीं आक्षेपकांना दिलें होतें. परक्या राज्यकर्त्यांच्या विरोधी सामर्थ्याशीं झगडणें व त्यासाठीं जनतेची सर्व बाजूंनीं तयारी करणें हेंच आज हिंदुस्थानचें राजकारण आहे, ही गोष्ट कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं.

हिंदी राजकारण हे शब्द निरर्थक नाहींत एवढा मुद्दा गळीं उतरल्यावर त्याचें उगमस्थान व स्वरूप समजून घेण्याची जबाबदारी आपोआपच हिंदी राष्ट्रभक्तांच्या शिरावर येऊन पडते. नदीच्या उगमस्थानीं पुष्कळदां अनेक लहान लहान अनिश्चित स्वरूपाचे ओहोळ असतात, परतु त्यांतील जो ओहोळ निश्चित स्वरूप धारण करून वाढत्या विस्तारानें पुढील मार्ग आक्रमण करतो त्यासच नदी हें नांव प्राप्त होतें. त्याप्रमाणें राष्ट्रीय सभा अस्तित्वांत येण्यापूर्वी प्रांतोप्रांतीं जन्मास येऊन अस्तित्वांत असलेल्या राजकीय उद्धाराच्या अस्पष्ट व कमकुवत प्रयत्नांचें राष्ट्रीय सभेंत एकीकरण होऊन जेव्हां तिच्या कार्याचा विस्तीर्ण ओघ

वाहूं लागला तेव्हां हिंदी राजकारणाचा अवतार झाला असा निष्कर्ष काढणें सयुक्तिक ठरतें. राष्ट्रीय सभेनेंच हिंदी राजकारणाला अव्यक्तांतून व्यक्त स्वरूपांत आणलें व कार्यक्षम करून सोडलें. राष्ट्रीय सभेच्या प्रारंभकालीन पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानाबाहेरच्या व खुद्द ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या देशांत राजकारणाला लागलेलें नवीन वळण पाहून त्याप्रमाणेंच हिंदी राजकारणाची दिशा आंखली. गेल्या शंभर दीडशें वर्षांमागें जगांत सगळीकडे राजकारणाचीं सूत्रें एकेकट्या व्यक्ति आपापल्या मर्जीवर हालवीत असत. पण हा प्रघात मागें पडून प्रजेच्या तंत्रानें राज्यकारभार चालविण्याचा नवा प्रघात उत्पन्न झाला. इंग्रजी आमदानींतल्या हिंदी राजकारणाला राष्ट्रीय सभेच्या जन्मदात्यांनीं या प्रघातास अनुसरूनच वळण लावलें. प्रजेच्या मतानुसार राज्यकारभार चालविण्याची कल्पना फार मोहक आहे. पण राज्यकारभाराला आपल्या इच्छेच्या अनुरोधानें गति देणाऱ्या प्रजेंत विशिष्ट प्रकारची व दर्जाची लायकी वास्तव्य व्हावी लागते, ती लायकी नसणाऱ्या प्रजेच्या हातीं राज्यकारभाराची दोरी गेल्यास माकडाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणें देशावर अनर्थ गुदरल्या वांचून राहत नाहींत हा मुद्दाहि राष्ट्रीय सभेच्या जन्मदात्यांच्या पूर्णपणीं लक्षांत होता. हिंदुस्थानच्या ऐतिहासिक राजकीय परंपरांचें अवलोकन केल्यास असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, या देशांत इंग्रजी आमदानीपूर्वी राजकारणाचा खेळ पराक्रमी व्यक्तीच खेळत असत अशा व्यक्तींच्या कच्छपीं लागणाऱ्या हजारो किंवा लाखो माणसांच्या झुंडी केवळ व्यक्तिपूजेच्या भरांत श्रद्धेनें अंधळ्या बनलेल्या असत. व्यक्ति महात्म्याचा पगडा त्यांच्या मनावर बसलेला असे. ध्येयनिष्ठेचा त्यांच्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता. त्यामुळें एक पराक्रमी पुरुष आणि त्याच्या जागीं त्याच्या कर्तृत्वानें अस्तित्वांत आलेल्या राजकीय परिस्थितीला समूळ उलथून टाकणारा दुसरा पराक्रमी पुरुष आल्यास पहिल्याचे भक्त या दुसऱ्याच्या आश्रयास जाण्याला बिलकूल मागें पुढें पाहत नसत. पराक्रमापुढें गोंडा घोळायचा, मग तो पराक्रम स्वकीयाचा असो वा अगदीं अनोळखी परकीयांचा असो अशी इतिहासकाळांत हिंदी जनतेची वृत्ति होती. आमचें हें विवेचन कडू व अप्रिय भासेल याची आम्हांस जाणीव आहे. परंतु शांत निर्वि-

कार व पूर्वग्रहशून्य चित्तानें इतिहासाचा अभ्यास केल्यास विचारान्तीं आमचें हें विवेचन अप्रिय असलें तरी सत्यास सोडून नाहीं असें कबूल करावें लागेल. एखाद्या समाजांत ध्येयनिष्ठा बद्धमूल झालेली असल्यास ध्येयप्रवर्तक पुढाऱ्याचा लोप झाल्यावर त्याच्या कार्याचा स्वहितासह उद्देश अंतःकरणांत बागवून त्याचे अनुयायी ध्येयाशीं बेइमानी करण्याला कधींहि तयार होत नाहींत. हिंदी जनतेला इतिहासाच्या हजारो वर्षांत ध्येयनिष्ठेचें शिक्षण मिळालेलें नसल्यानें तसें शिक्षण देण्याचा हेतु कांग्रेसच्या जन्मदात्यांनी आपल्या चित्तांत अढळ बाळगून तो सिद्धीस नेण्याचा उद्योग चालविला होता. हिंदी जनतेच्या राष्ट्रीय वाढीच्या आड येणारीं विघ्नें पुष्कळच आहेत व तीं हिंदुस्थान देशाच्या परवशतेहून निराळीं, म्हणजे देशाचा अवाढव्य विस्तार, अनेक भाषा, अनेक जाती, अनेक संप्रदाय अनेक धर्म, यांपासून उत्पन्न झालेलीं आहेत. शिवाय राष्ट्राभिमानादि गुणांचें बीजारोपण आणि संवर्धन इतिहासकाळीं केव्हांहि झालेलें नव्हतें, त्यामुळें एकराष्ट्रीयत्वाची भावना हिंदुस्थानांत पूर्वी कधीं नव्हती वगैरे गोष्टींचें अवधान ठेवूनच त्यांनीं आपली चळवळ चालविली होती.

राजकारण शब्दाचें वर एका ठिकाणीं जी व्याख्या दिली आहे, तिला अनुसरून सध्यांच्या दिवसांत राजकीय चळवळ करावयाची म्हटल्यास एकच मार्ग डोळ्यांसमोर येतो. राज्यकारभाराचीं तीन मुख्य अंगें समजलीं जातात न्याय खातें, अंमलबजावणी खातें व कायदेमंडळ हींच तीं तीन अंगें होत. यापैकीं कायदेमंडळ हें इतर खात्याहून श्रेष्ठ असल्यानें किंबहुना राज्यकारभारानें नियमन करणारें हेंच अंग असल्यानें त्यामध्यें लोकमताचा शिरकाव करून घेणें हें राष्ट्रीय सभेचें ध्येय आरंभीं ठरविण्यांत आलें. इंग्रजी राज्यकारभारांत वेळोवेळीं ज्या सुधारणा करण्यांत आल्या, त्या सुधारणांपैकीं कायदेमंडळाचा उत्पत्ति ही एक सुधारणा होती. परंतु कायदेमंडळांत जे हिंदी प्रतिनिधि घेतले जात ते प्रथम लोकांनीं निवडून दिलेले नसून सरकारनेंच पसंत करून नेमलेले असत. पुढें हिंदी प्रतिनिधींची संख्या थोडी व कर्तबगारी दाखविण्याची सवड थोडी, असा प्रकार सुरवातीस होता. राष्ट्रीय सभेच्याद्वारें हिंदी पुढाऱ्यांनीं कायदेमंडळासंबंधीं तंटा तसाच चालू ठेवून बरेच जास्त हक्क १९१९ च्या

राज्यसुधारणांच्या कायद्यानें मिळविले. ते सर्वस्वीं समाधानकारक आहेत असें कोणीच म्हणत नाहीं. अद्यापि कायदेमंडळाची सुधारणा होण्याला पुष्कळ अवसर आहे असेंच सर्व पक्षाचे पुढारी एकमतानें मानतात. हिंदुस्थानांत लोकसत्तेच्या तत्त्वाची अंमलबजावणी करण्याला कायदेमंडळाच्या सुधारणेची खटपट करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. राज्यकारभाराचा गाडा हाकण्याची जागा कायदेमंडळ हीच होय, अशी ज्या ज्या देशांत लोकसत्तेचे वर्चस्व आहे त्या त्या देशांत समजूत आहे. देशांतल्या विशिष्ट योग्यता असणाऱ्या बहुजन समाजाला मतदारीचा, अर्थात राज्यकारभारांत भाग घेण्यासाठीं प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क असावा हें जितकें खरें आहे; तितकेंच निवडलेल्या प्रतिनिधींना काम करण्याकरितां एक संस्था असावी हें देखिल खरें आहे. ती संस्था कायदेमंडळाशिवाय अथवा कायदेकौन्सिलाशिवाय दुसरी कोणती असणार ? कायदेमंडळ व मतदार संघ या दोन चाकांवरच लोकसत्तात्मक राज्यकारभाराचा गाडा चालतो.

कायदेमंडळाची सुधारणा करण्याच्या प्रश्नावर १९१९ सालापर्यंत हिंदी राष्ट्रीय सभेच्या चालकांनीं जोर कां दिला, त्याकरितां लागेल तो आयास कां सोसला व लागेल तितका पैसा कां खर्च केला याची कल्पना वाचकांस वरील विवरणानें येईल. पण नुसतेंच कायदेमंडळ सुधारून भागत नाहीं. तें कार्यक्षम होण्यास त्या मंडळांत काम करण्यासाठीं आपल्या विश्वासाचे प्रतिनिधि पाठविणारा मतदारांचा संघ देखिल चांगला समजदार पाहिजे. १९२० सालीं राष्ट्रीय सभेनें कौन्सिलावर बहिष्कार पुकारल्यानंतर हिंदुस्थानांत जी चळवळ झाली, त्या चळवळींत देशांतल्या बहुजनसमाजानें पुष्कळ भाग घेतल्याचा देखावा दिसला जिकडे त्या चळवळीचें वारें जाईल तिकडे त्याचें स्वागत करण्याला हजारो लोक तत्परतेनें उभे असत. या अनुभवावरून अनेक पुढाऱ्यांना आपला जम लोकांत उत्तम बसला आहे, आपण सांगूं ते लोक ऐकतील असा एक प्रकारचा आत्मविश्वास वाटूं लागला असल्यास व त्याप्रमाणें ते आत्मविश्वासाची भाषा बोलूं लागले असल्यास त्यांत मनुष्यस्वभावाला सोडून कांहींच नाहीं. ज्या ज्या वेळीं, हिंदी जनतेला राजकारणाचा गंधहि नाहीं,

धनगरानें शेळ्यामेंढ्या हाकाव्या तसाच संबंध लोकप्रिय पुढाऱ्याचा व जनतेचा आहे, असें कोणी प्रतिपादन करूं लागतात त्या त्या वेळीं हे पुढारी आपल्या लोकप्रियतेचा अर्थ न समजतां तिच्या प्राप्तीनें फुगून गेले असल्यामुळें असें उत्तर देतात कीं, जनता समंजस झाली आहे, तिला आपलें हिताहित कळूं लागलें आहे, त्या खेरीज ती पुढाऱ्यांचा गौरव कधीं करणार नाहीं, पुढारी सांगतील तें अमलांत आणण्याच्या भरीस पडणार नाहीं. पहिल्या शंकेचें हें समाधान पुढाऱ्यांच्या दृष्टीनें कदाचित् योग्य असेल, कारण ते जनतेच्या जागृतीचें व समंजसपणाचें मोजमाप, स्वतःच्या व्याख्यानाला किती माणसें जमलीं व कितीदां टाळ्या मिळाल्या या संख्येवरून करीत असतात. परंतु राजकारणाच्या गंभीर विचारांत असल्या शंका समाधानाला मान देणें ह्मणजे स्वतःची फसवणूक करून घेण्यासारखें आहे. विशिष्ट प्रसंगानें सभा भरतात व त्यामध्यें त्या प्रसंगानें उत्पन्न झालेल्या विचारांचेंच आविष्करण होत असतें. ते विचार अर्थात लोकांना तात्पुरते पटण्याकरितां सरकारच्या सकारण अगर निष्कारण नालस्तीनें नटविलेले असतात, असल्या प्रासंगिक विचारप्रदर्शनानें मतदार संघाला शिक्षण मिळतें व तसें शिक्षण १९२० नंतरच्या चळवळीमध्यें मतदारसंघाला मिळालें आहे, असें मानण्यांत येतें; पण हा समज सर्वस्वीं चुकीचा आहे. आपल्या राज्याची घटना कशी आहे, त्या घटनेनें लोकांना कोणतें हक्क ठेवले आहेत व त्या हक्कांच्या उपभोगासाठीं लोकांनीं कोणतीं कर्तव्यें करावयास पाहिजेत याचें ज्ञान कोणत्याहि पुढाऱ्यानें लोकांस आजवर करून दिलेलें नाहीं. १९१९ च्या राज्यसुधारणा अपुऱ्या आहेत, त्याज्य आहेत, त्यापासून लोकांचा कांहीं फायदा झालेला नाहीं, असें शहरा शहरांतून सांगत फिरल्यानें मतदारसंघाच्या प्रत्येक व्यक्तिमात्रापर्यंत तो उपदेश पोंचला असें समजणें देखिल चुकीचें आहे. मतदार संघ जिल्ह्याच्या, इलाख्याच्या व तालुक्याच्या शहरांतून सांठलेला नाहीं, तो देशभर पसरलेला आहे, याची जाणीव आपल्या लोकप्रियतेच्या जोरावर स्वतःच्या बडेजावीसंबंधीं वाटेल त्या कल्पना करून घेणाऱ्या पुढाऱ्यांना असल्याचें दिसून येत नाहीं. नुसत्या असंतोष पसरविणाऱ्या किंवा लोकजागृति करणाऱ्या सभा व वृत्तपत्रांतील लेख हीं साधनें, लोकांना त्यांचीं कर्तव्यें कोणतीं,

याचा बोध करून देत नाहींत. व्याख्यान ऐकतांना किंवा लेखवाचतांना फक्त त्यांना देशस्थितीचें अंशमात्र व तेंहि विशिष्ट प्रसंगाला अनुलक्षून ज्ञान होत असेल; पण नुसता असंतोष किंवा नुसती जागृति खऱ्या राष्ट्रसेवेला जन्म देण्यास असमर्थ असते. जागृतिमूलक असंतोषाला व्यक्त होण्यास जागा पाहिजे. तशी जागा करून देण्याचा यत्न म. गांधींच्या चळवळीमध्यें झाला, पण प्रत्यक्ष राज्यकारभाराला त्या चळवळीचा स्पर्श होत नसल्यानें लोकांचा उत्साह सदैव कायम टिकण्याला जी कारणपरंपरा अखंड लागते, ती कारणपरंपरा उत्पन्न झाली नाहीं व ही चळवळ मागसली तिनें लोकांत स्वतःसंबंधीं इतका अविश्वास पिकविला आहे कीं, त्याचें वर्णन करणें शक्य नाहीं. आतां हा राजकारणाचा अविश्वासाच्या चिखलांत रुतून बसलेला गाडा वर काढून कसाबसा चालू करून लोकांत आत्मविश्वासाचा जोम पैदा होण्यासाठीं बहकलेल्या राष्ट्रीय सभेंतलाच एक नवा पक्ष पुढें आला आहे. पूर्वींपासून कौन्सिलें कार्यक्षम आहेत असें मानून त्यांच्या कामकाजांत भाग घेणारा एक पक्ष आहेच, पण मागील निवडणुकीच्या वेळीं जी स्थिति अनुभवास आली, ती आतां येण्याचा संभव कमी दिसतो.

स्वतंत्र राष्ट्रांतून मतदार वर्ग आपल्या हिताविषयीं अतिशय जागरूक असल्याचें आढळतें. निवडणुकीसाठीं उभा राहिलेल्या उमेदवारापैकीं आपल्या खात्रीच्या उमेदवाराला मतें देण्यानें आपण राज्यकारभाराचीं सूत्रें परोक्षतः हातीं घेतो अशी त्याची भावना असते. राज्यकारभारांत हात असण्याच्या एका साधनालाच मताधिकार म्हणतात. मताधिकाराच्या उपयोगानें प्रजा, आपले प्रतिनिधी राज्यकारभाराची देखरेख करण्याकरितां पाठविते असा निवडणुकीचा अर्थ आहे कोट्यावधि लोकसंख्येच्या मोठ्या देशांत प्रत्येक माणसाला राज्यकारभारांत प्रत्यक्ष भाग देणें शक्य नसतें म्हणून ही निवडणुकीची योजना अस्तित्वांत आली आहे. पण हिंदुस्थानांत अद्यापि मताधिकारासंबंधीं मतदारांस स्पष्ट कल्पना नाहींत. लायक माणसाला मत देणें, ही एक परोपकाराची बाब नसून कर्तव्याची बाब आहे तें कर्तव्य दक्षतेनें न बजावलें बेसावध मतदार आपल्या हातानें आपलें अहित करून घेतात, हें मतदारीचें महत्त्व हिंदी मतदार वर्गाला अजून चांगलेंसें समजलेलें नाहीं १९१९ च्या

राज्यसुधारणापर्यंत मतदार संघ फार लहान होता. आतां तो विस्तृत झाला आहे, तथापि एकंदर लोकसंख्येच्या मानानें तो अत्यल्प मानल्याखेरीज गत्यंतर नाहीं हेंहि येथें कबूल करणें भाग आहे. तीस कोटि प्रजेंत सुमारें साठ लाख मतदार हें प्रमाण निराशाजनक आहे खरें, पण या लहानशा प्रमाणाची संतोषावह वृद्धि होण्यास असलेल्या मतदार संघानें आपली कामगिरी चोख रीतीनें सिद्धीस नेली पाहिजे. आज मताधिकार व प्रतिनिधित्व याविषयीं लोकांच्या ज्या कल्पना आहेत त्यांचें विवरण केल्यास, लोकांना मताधिकार व प्रतिनिधित्व या दोन्ही गोष्टी परस्परसंमानाच्या आहेत असें वाटत असल्याचें नजरेस पडतें. जो कोणी आपल्या विशेष पुढें पुढें करील; किंवा ज्याबद्दल दुसऱ्या कांहीं गोष्टीविषयीं आपणास विशेष प्रेम वाटते अशा माणसाला निवडून दिलें कीं, आपलें काम संपलें असें मतदार संघाला वाटतें व येन केन प्रकारेण निवडून घेण्यात उमेदवाराला इतिकर्तव्यता वाटते; अशी आजची शोचनीय स्थिति आहे. मतदार संघाचें व्यक्तीवरील प्रेम जेव्हां राजकीय कल्याणाच्या तत्त्वाकडे झुकेल तेव्हांच निवडणुकीचें तत्व मतदारांना समजलें असें म्हणतां येईल. कौन्सिलांत जाऊन आपलें राजकीय दैव उघडण्याकरितां जो गृहस्थ चातुर्यानें समंजसपणानें जिवापाड झटेल अशी खात्री आहे, त्यालाच निवडून देणें मतदारांचें कर्तव्य आहे. पण या कर्तव्याची जाणीव जशी मतदारांना असल्याचें दिसत नाहीं; तशीच उमेदवारांनाहि आपल्या कर्तव्याची जाणीव नाहीं. निवड होऊन एकदां कौन्सिलदारीचा शेंदूर लागला कीं आपलें कर्तव्य संपलें, अशी कौन्सिलरांची बुद्धि असते. कौन्सिलांतला प्रवेश म्हणजे कर्तव्याची 'इतिश्री' नसून 'श्रीगणेशा' आहे याची कल्पना अनेक कौन्सिलरांना स्वप्नांत देखिल शिवत नाहीं. त्यांतून जोंवर निवडलेल्या उमेदवारांना पांच हजार पगाराच्या दिवाणगिरीची लालूच नव्हती तोंवर त्यांच्या स्वार्थबुद्धीला कांहीं तर आळा होता. आतां दिवाणगिरीचें आमिष पुढें असल्यानें त्यासाठीं बरेच कौन्सिलर कर्तव्याला अर्धचंद्र देऊन सरकारला खूप ठेवण्याच्या खटपटींत गुंतल्याचें आढळून आल्यास नवल नाहीं. योगीजनांना मोहांत घालून योगभ्रष्ट करणाऱ्या जशा अष्टसिद्धि तशाच राजकीय कर्तव्यापासून कौन्सिलरांना पराङ्मुख

करणाऱ्या दिवाणगिरी, सरकारची मर्जी, इंडिया आफिसमधील नेमणूक, एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरची जागा, साम्राज्य परिषदेतलें प्रतिनिधित्व वगैरे हिंदी राजकारणांतल्या सिद्धि आहेत. यापैकीं एखाद्या सिद्धीची माळ गळ्यांत पडून तिच्या घडेजावींत देशकल्याणाविषयीं अनास्था उत्पन्न झालेले राष्ट्रीय सभेचे अनेक कर्तबगार पुढारी दाखवितां येतील. मतदार संघ जर आपल्या कर्तव्याच्या तीव्र जाणिवेनें सदैव जागरूक राहणारा असता तर राजकारणांतल्या सिद्धींना वश होऊन देशाशीं निमकहरामी करण्याला प्रवृत्त होणाऱ्या इसमाला निवडून देण्याची चूक त्यानें केली नसती व चुकीनें कोणी निवडला गेलाच असतां तर त्याची कर्तव्यभ्रष्टता नजरेस येतांच धिक्कारून राजकीय क्षेत्रांतून त्याची हकालपट्टी केली असती. पण निवडणुकीच्या धामधुमीनंतर मतदार संघ निस्सीम उदासीन बनतो. त्याच्यांत व त्यानें निवडून दिलेल्या उमेदवारांत जिव्हाळ्याच्या निकट संबंधानें अस्तित्वांत येणारा अखंड विचारविनिमय कधींच दृष्टीस पडत नाहीं. ही स्थिति लवकरच पालटेल अशीं अतिशय अस्पष्ट चिन्हें आज दिसत आहेत. या बाबतींत जर कोणाचा अधिक दोष असेल तर तो पुढाऱ्यांचा आहे. मतदार संघाचा दोष पुढाऱ्यांच्या मानानें दर्यामें खसखस म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

राष्ट्रीय सभेनें राज्यसुधारणा घडवून आणण्याचें ध्येय सुरुवातीस पुढें ठेवलें. कालान्तरानें राज्यसुधारणेचें अंतिम स्वरूप जें स्वराज्य त्याचा स्पष्ट उच्चार करून त्याचा सालोसाल तिनें घोष चालविला; पण राष्ट्रीय सभा म्हणजेच स्वराज्य असें प्रतिपादन करण्याचें धाडस १९१९ च्या अमृतसर येथील बैठकीपर्यंत कोणत्याहि पुढाऱ्यानें केलें नव्हतें. राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं अमेरिकेच्या कॉंग्रेसची कल्पना पुढाऱ्यांच्या डोक्यांत असली व तिला अनुसरूनच राष्ट्रीय सभेचें इंग्रजी नामकरण झालें असलें, तरी सर्व पुढाऱ्यांत प्रतिनिधि या नात्यानें जमणाऱ्या लोकांना आपलीं राजकारणांतील सुख दुःखें जगजाहीर रीतीनें मांडण्याचा राष्ट्रीय सभा हा एक चव्हाटा आहे, अशीच सर्वांची समजूत १९१९ च्या बैठकीपर्यंत होती. या चव्हाट्यावर वर्षांतून एकदां जमून

आपली सर्व गाऱ्हाणीं प्रायः मतैक्यपूर्वक व कधीं कधीं बहुमतानें ठराव करून सरकारच्या कानावर घालावयाची असा राष्ट्रीय सभेचा क्रम होता. या क्रमाला फाटा देऊन राष्ट्रीय सभा म्हणजेच सरकार व हें अधिकारशून्य नामधारी सरकार जे ठराव करील ते हुकूम समजून त्यांची अंमलबजावणी सगळ्या जनतेनें करावी हें खूळ १९१९ नंतर निघालें व त्याच्याच परिणामांपैकीं एक परिणाम कौन्सिलबहिष्कारांत दिसून आला. फौज फांटा, पोलीस, न्यायमंदिरें, तुरुंग वगैरे राज्याच्या बंदोबस्ताचीं सर्व साधनें ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या हातांत असतां व त्या राज्यकर्त्यांचें वर्चस्व पूर्वीप्रमाणें वर्तनानें मान्य करीत असतां जनतेवर हें दुसरें सरकार लादलें गेल्यामुळें देशांत कसा गोंधळ उडाला तो लोकांच्या ताज्या आठवणींतला विषय असल्यानें त्याचें सविस्तर वर्णन देण्याची गरज नाहीं, निराशेच्या भरांत भलतेंच कर्तृत्व गाजविण्याच्या अट्टाहासाला बळी पडल्यानें कोणते अनर्थ ओढवणें शक्य आहे, याचा अनुभव राष्ट्रीय सभेला सरकार मानल्यामुळें उत्तम प्रकारें आला आहे. हें नकली सरकार निर्माण करणारानें अनत्याचाराचें कडक पथ्य पाळण्याविषयीं लोकांना आणभाक घातल्यामुळें अनर्थांचा अतिरेक टळला, पण त्याच्या आस्वादाची कटुता समजण्याइतका अनर्थांचा अनुभव आला, आणि या सरकाराच्या आद्य प्रवर्तकाला तुरुंगांत टाकून त्याच्या हालचालींना पक्का खोडा घातल्यावर या सरकाराच्या दुसऱ्या तिसऱ्या प्रतीच्या अनुचरांपैकीं पुष्कळांचे डोळे उघडून कौन्सिलांत जाण्यामध्यें देशकल्याण आहे असें त्यांच्या ध्यानांत आलें. राष्ट्रीय सभेच्या रूपांतरानें हिंदुस्थान देश राजकारणांत किती मागसलेला आहे याची सर्व दृष्टिवंतांना ओळख पटली व वाईटापोटीं चांगलें अशा न्यायाचा हा एक फायदाच झाला.

१९१९ नंतरच्या गोंधळानें आणखी एका मुद्याची उत्कृष्ट छाननी करून टाकली आहे. हिंदुस्थानांत नाना जाति, नानाधर्म आहेत, व ते एकमेकांना अनुकूल नसून परस्परविरोधी आहेत. हिंदु व मुसलमान असे दोन समाज व धर्म प्रमुख मानून मुसलमानांना संख्येच्या मानानें जास्त हक्क १९११ सालीं राज्य सुधारणांत मिळाले. १९१६ सालींहि राजकारणांत राष्ट्रीय सभा आणि मुसलमान यांचा एकोपा दिसून आला. या एकोप्याच्या इतिहासांत शाब्दिक

मारामारीचे प्रसंग बरेच आहेत, व त्याचें स्मरण दोन्ही समाजाच्या हृदयांत जिवंत आहे. तथापि बाहेरून सर्वांना एकोप्याचें दर्शन घडलें. हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीमधील एक जबरदस्त घोंड निघाली याचा आनंद राष्ट्रीय सभेंत भाग घेणारांनीं कांहीं काळ भोगला. हा एकोपा निव्वळ राजकारणांपुरताच नव्हता. धर्मकारणासाठीं तो तात्पुरता घडून आलेला होता. सर्वांत चमत्काराची गोष्ट ही कीं, ज्या इस्लामी धर्मकारणाचा हिंदुस्थान देशाशीं अर्धाअर्धी संबंध नाहीं त्या धर्मकारणाच्या बचावाची जबाबदारी राष्ट्रीय सभेच्या शिरावर लादण्यांत आली. मुसलमानांचा सलोखा संपादन करावा असा त्यांत हेतु होता. एक प्रकारें घरचें खाऊन व पदरमोड करून लष्कराच्या भाकरी भाजण्यासारखाच हा अव्यापारेषु व्यापार होता. प्रस्तुत व्यापार देशाभिमानाला पोषक नसून उलट हानिकारक आहे ही साधी गोष्ट देखिल खिलाफतबचावाच्या इस्लामी धर्मकारणाचे लोढणें हिंदी राजकारणाच्या गळ्यांत अडकवितांना १९१९ नंतरच्या राष्ट्रीय सभेच्या चालकांनीं लक्षांत ठेविली नाहीं. देशाभिमानाच्या अस्खलित, अप्रतिहत आणि अखंड प्रवाहाऐवजीं जात्यभिमानाची, धर्माभिमानाची लहान लहान डबकीं, १९११ सालीं मुसलमानांना सवता सुभा दिल्यानें उत्पन्न झालीं होतीं. इस्लामी धर्मकारणाला महत्व मिळाल्यानें या डबक्यांचा खोलपणा वाढला, आणि सांप्रत तर हिंदी राजकारण त्या डबक्यांतील पाण्यांत जातिशः आकंठ बुडालेलें पाहावयास सांपडत आहे. परदेशांच्या स्वातंत्र्य संपादनाच्या इतिहासांतील दाखले घेण्यांत राष्ट्रीय सभेचे चालक पहिल्यापासूनच पटाईत आहेत. पण सुरवातीच्या चालकांमध्यें, कोणते दाखले घ्यावेत व कोणते दाखले निरर्थक अगर बुद्धिभेदकारक म्हणून टाकावेंत यांचें चांगलें तारतम्य ज्ञान असल्यानें, त्यांच्या हांतून लोकांना अनिष्ट प्रोत्साहन मिळालें नाहीं. १९१९ नंतरच्या चालकांनीं हें तारतम्य सोडून, फार काय पण कित्येकदां परदेशच्या ऐतिहासिक दाखल्यांचा बुद्धिपुरस्सर विपर्यास करून, त्यांनीं आपल्या राजकीय कर्तबगारीचा धुमाकूळ चालविला होता. त्या धामधुमींत जात, गोत, परिवार, आणि अखेरीस धर्मसुद्धां देशकल्याणापुढें कनिष्ट समजावा लागतो याची जाणीव त्यांना राहिली नाहीं. देशांतील समाजांना जातिविशिष्ट किंवा धर्मवि-

शिष्ट हक्क मागण्याची व उपभोगण्याची चटक लागली म्हणजे जातीपलीकडे किंवा धर्मापलीकडे न जाण्याइतकी त्यांची दृष्टि अधू, संकुचित व स्वार्थी बनते हा सिद्धांत हे राष्ट्रसभा चालक विसरले आणि त्यांनीं परधर्मसहिष्णुतेचा अतिरेक स्वदेशाच्या चतुःसीमा पुरताच राहूं न देतां तो ताणीत ताणीत देशांतल्या एका जातीनें हजारो मैलावर असलेल्या ना ओळख ना देख अशा प्रकारच्या लोकांना स्वजन झाटल्यामुळें, त्यांवर सहानुभूतीचा निष्कारण वर्षाव करण्यापर्यंत व त्यांचें सुखदुःख तें आपलें सुखदुःख मानून निष्फळ कालक्षेप होऊं देण्यापर्यंत त्याची मजल नेली. या बाबतींत जपानचें उदाहरण सदैव दृष्टीसमोर ठेवण्याजोगें आहे. त्या देशांत सतराव्या शतकांमध्यें धर्मप्रसारक ख्रिस्ती साधूंच्या धाडी पडून पुष्कळशा प्रजेला ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करावा लागला. त्या प्रजेचीं तीर्थस्थानें पॅलेस्टाइनमध्यें आहेत. हिंदुस्थानांतल्या मुसलमानासारखीच तंतोतंत त्यांची स्थिति आहे. परंतु ही प्रजा आपण जपानी आहो हें कधींहि विसरली नाहीं. रशिया हें ख्रिस्ती राष्ट्र जपानच्या स्वाहाकाराची हाव धरून उत्तर चिनाचा समुद्र किनारा व प्रदेश गट्ट करीत सुटलें, तेव्हां लढाईच्या मैदानांत गांठून त्याच्या अजस्र राज्यकारभाराचे टाके न् टाके ढिले पडण्यासारखा मार चिमुकल्या जपानानें त्यास दिला. त्या वेळीं अनेक जपानी ख्रिस्ती स्वदेशाकरितां रणांगणांवर गेले त्यावेळीं जपानी सेनापति धर्मानें ख्रिस्तीच होता व जपानांतल्या ख्रिस्त्यांनीं जर रशियाविषयीं ख्रिस्ती म्हणून प्रेम धरलें असतें व त्या विरुद्ध लढण्यास सिद्ध झालेल्या जपानी सरकारशीं तंटे आरंभले असते, तर ज्या जपानचा आज साऱ्या आशियाखंडाला अभिमान वाटत आहे, तो अभिमान उत्पन्न होण्याची आशाच समूळ नाहींशी झाली असती. जपानप्रमाणें आणखीं बऱ्याच राष्ट्रांची अशी स्थिति आहे. देशाच्या हितापुढें सारे स्वार्थ रद्द व टाकाऊ अशी भावना प्रत्येक व्यक्तिमात्रांत झाल्याखेरीज देशांचा उद्धार होत नाहीं, या तत्वाची जपमाळ घेऊन त्याची अंमलबजावणी हिंदी जनता जितकी करील तितकी आजच्या स्थितीला थोडीच आहे. पण दुर्दैवानें, गेल्या तीन वर्षांत धर्माला महत्व दिलें जाऊन बाकीच्या सर्व गोष्टी मागें पडल्या. ज्या देशहिताच्या नांवाखालीं व ज्याकरितां हा सारा खटाटोप चालला होता तें

देशहित पडलें एका बाजूस व दुसरीच अनर्थावह परिस्थिति उत्पन्न झाली आहे. तुर्कांच्या खिलाफतीसारखीं विकत श्राद्धें स्वीकारून हिंदुस्थानचें कोणतें कल्याण होण्याचा संभव आहे हें समजण्याला, जरी या श्राद्धानिमित्त कराव्या लागलेल्या सव्यापसव्याचा उपयोग झाला तरी, देशाभिमानवृद्धीच्या दृष्टीनें झालेली हानि अगदींच व्यर्थ गेली नाहीं, असें दुःखांत समाधान मानतां येईल.

राष्ट्रीय सभेचा प्रारंभ १८८५ सालीं झाला. तेव्हांपासून १९०७ सालापर्यंत स्वपरबलाबल ओळखून सावधगिरीनें तिचें कार्य चालविलें गेलें. आपल्या शक्तीचा अंदाज न ठेवतां अनत्याचारी आडदांडपणाचे उपाय अंमलांत आणल्यानें देशहिताची प्रगति झपाट्यानें होईल अशी कल्पना त्यापुढें उद्भवली. त्या कल्पनेला मूर्त स्वरूपास नेण्याचा प्रयत्न कांहीं अंशीं अंतस्थ दोषांनीं व कांहीं अंशीं सरकारी दडपशाहीसारख्या बाह्य कारणांनीं सिद्धीस गेला नाहीं.

ब्रिटिश सरकारालाच कधीं अंजारून गोंजारून तर कधीं त्याच्या स्वभावांतले उत्तम गुण जागृत करून, कधीं त्यानें दिलेल्या आश्वासनांची जाणीव देऊन, कधीं त्यावर ब्रिटिश जनतेच्या मताचें दडपण घालून, आणि नेहमीं त्याजकडून मिळालेल्या लहान मोठ्या देणग्या पचनीं पाडूनच आपल्या राजकीय हक्कांच्या विस्ताराचा झगडा चालविला पाहिजे हा सिद्धांत पुनः एकदां राजकारणी पुढाऱ्यांच्या मनावर बिंबला, परंतु पंजाब प्रकरणासारखे निराशेचे प्रसंग येतांच आळवावरच्या पाण्याप्रमाणें हा सिद्धांत एकदम अचानक गळून पडला व फिरून एकवार जुने मार्ग सोडून नवे मार्ग तुडविण्याची प्रवृत्ति बळावली आणि या सर्व उलाढाली व घडामोडी राष्ट्रीय सभेच्या द्वारेंच झाल्या. राजकारणाचा खेळ खेळण्यासाठीं ही संस्था निर्माण झाली व तिनें हिंदी राजकारणाच्या उंच सखल प्रदेशाचें, केव्हां सरळ तर केव्हां आड वाटेनें आक्रमण केलें असल्यामुळें तिचा इतिहास अत्यंत मनोरंजक व बोधप्रद वाटेल यांत संदेह नको. हिंदी राजकारणाच्या अभ्यासास हा इतिहास अतिशय उपयोगी आहे. वृत्तांतरूपानें आजपर्यंतची सारी कथा पुढच्या भागांत दिली आहे. सारनिर्णयाच्या दृष्टीनें थोडा ऊहापोह करणें अवश्य असल्यामुळें तो या उपोद्घाताच्या पहिल्या प्रकरणांत यथामति केला आहे.

---



राजा राममोहन राय.

राजकिय हक्कांची जाणीव उत्पन्न करणारे
व त्याकरितां झटणारे प्रथम हिंदी.

मं २
२३९४

# हिंदी राजकारण.

## प्रकरण १ लें.

### बीजारोपण.

१८५७ सालच्या शिपायांच्या बंडाला कारणें कांहींहि असोत; पण त्या वेळीं ब्रिटिश लोकांविषयीं हिंदुस्थानांत तीव्र असंतोष माजला होता हें खरें आहे. ब्रिटिश सत्तेला उलथून पाडण्याचा हिंदुस्थानानें त्या वेळीं अगदीं शेवटचा ह्मणून निकराचा प्रयत्न केला; आणि तितक्याच निकरानें ब्रिटिश सत्ता खंबीर करण्याचा इंग्लिशांनी प्रयत्न केला. त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला, त्यांच्या यशानें, हिंदुस्थानचें नशीब आजपर्यंत सारखें हेलकावे खात होतें तें, पारतंत्र्याच्या खांबाला जखडलें गेलें. ब्रिटिश हिंदुस्थानचा आजचा नकाशा लॉर्ड डलहौसीनेंच तयार केला होता, तरी त्यावर अखेरचा साफसुफीचा हात फिरवून (finishing touches) कायमचें स्वरूप देण्याचें काय, सत्तावनच्या बंडानें केलें. असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. बंडानें हिंदुस्थानचें नशीब ठरविल्यावर, ह्मणजे राणीच्या जाहीरनाम्यानंतर हिंदी राजकारणाला एकप्रकारचें निश्चित स्वरूप आलें, तरी हिंदी लोकांच्या अंतःकरणांत राजकीय विचारांची जागृति फार पूर्वीं झाली होती. १८३२सालची राजा राममोहनरायांची हौस ऑफ कॉमन्सच्या कमिटीपुढें झालेली साक्ष, ह्मणजेच आजच्या राजकीय हक्क मिळविण्यासाठीं चालू असलेल्या संघटनात्मक सनदशीर चळवळीचा आरंभ होय. त्या वेळीं हिंदुस्थान राजकीय बाबतींत पूर्ण अज्ञान होता. आपले जन्मसिद्ध हक्क मिळविण्याविषयीं देखिल तो अगदीं बेफिकीर होता; किंवा आपले हक्क काय याची तरी त्याला जाणीव होती कीं नाहीं याची शंकाच आहे. राजकारणांत त्या वेळचें हिंदुस्थान ह्मणजे काळ्या दगडांचा एक अफाट असा खडकाळ प्रदेश होता; अर्थात

राजा राममोहनरायांच्या अंतःकरणांतून राजकीय जागृतीची निघालेली ही फणगी खडकावर आदळल्यामुळें तिनें मुळींच पेट घेतला नाहीं; एवढेंच नव्हे तर तीं तशीच विझून जाणार कीं काय अशीहि भीति वाटत होती. पण सुदैवानें ही भीति, लवकरच खोटी ठरली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत पाश्चात्य शिक्षणाचें वारें कांहींसें जोरानें वाहूं लागल्यावर त्यानें ही विझत चाललेली फुणगी लोकांच्या विचारजागृतीच्या गंजीवर उडवून हळूहळू फुलविण्यासहि प्रारंभ केला.

हिंदी लोकांच्या अंतःकरणांत राजकीय कल्पना आतां अधिक पेट घेऊं लागली याचें जणूं स्पष्ट चिन्हच कीं काय, देशांत कोठें कोठें संघ स्थापन होऊं लागले. १८५१ च्या सुमारास बंगाल्यांत डॉ० राजेंद्रलाल; प्रसन्न कुमार टागोर प्रभृतींच्या नेतृत्वाखालीं ब्रिटिश इंडियन असोसिएशनची स्थापना झाली. मुंबईसहि याच वेळीं हिंदुस्तानचे पितामह आणि राजकीय ऋषी, दादाभाई नवरोजी, जगनाथ शंकरशेट प्रभृतींच्या नेतृत्वाखालीं बॉम्बे असोसिएशन स्थापन झालें. मद्रास मात्र या बाबतींत बराचसा मागासलेला होता. तेथें या पूर्वींच मद्रास नेटिव्ह ॲसोसिएशन नांवाची एक संस्था अस्तित्वांत आली होती; तरी तिचे कर्णधार सरकारी अधिकारी असल्यामुळें ती त्या वेळीं लोकमत-निदर्शक होती असें ह्मणतां येत नाहीं. मद्रास प्रांतांत हिंदी लोकांच्याच हिताच्या दृष्टीनें राजकीय विचारांची खरी जागृति, आनंदा चार्लू; वीर राघवचारी प्रभृतींनी १८७८ त हिंदू पत्राची स्थापना करून त्याच्या द्वारें केली.

१८५१च्या सुमारास मद्रास प्रांत मुंबई, बंगालच्या मानानें कांहीं मागासलेला होता तरी याच सुमारास इंग्लंडांत, हिंदुस्थानच्या परिस्थितीवर विचार करण्यासाठीं बसलेल्या पार्लमेंटरी कमिटीपुढें हिंदुस्थानतर्फे या तीनहि असोसिएशन्सनीं आपल्या सादर केलेल्या मागण्या पाहिल्या ह्मणजे त्या वेळच्या हिंदुस्थानांतील राजकीय विचारजागृतीचें स्वरूप चांगलें लक्षांत येतें. हौस ऑफ कामन्सच्या रेकॉर्डमध्यें नमूद करून ठेविलें आहे:—

"Faintly, and from far across the seas, was heard the first demand for representation from the people of India. The Madras Native Association and the

Native Inhabitants of the Presidency of Madras suggested that the Council of Madras be composed of officials and non-officials in equal number six or seven of each; the former to be nominated by the Government on taking their place at the Council Board, in virtue of their office, the Advocate General being one, and the later to be selected by the Government out of a list of eighteen or twenty one presons chosen by the vote of the ratepayres in Madras and of persons eligible to serve on the grand and petty Juries or in such manner as your Honourable House may deem preferable. That as the official members in conjunction with the casting vote of the Government when requisite could always carry any point of absolute importance there could be no hindrance to the safe-working of the sugsested plan while a sufficiency of information on all subjects would be afforded."

"The members of the Bombay Association and other Netive Inhabitants of the presidency of Bombay submitted that the time has arrived when the Natives of India are entitled to a much larger share, than they have hitherto had in the administration of the affairs of the Country and that Councils of Local Governments should in matters of General policy and legislatation be opened so as to admit of respectable and intelligent natives taking a part in the discussion of matters of general interest of the country as suggested by Lords Ellenborough, Elphinstone and others."

"The members of the British Indian Association and other Native Inhabitants of the Bengal Presidency submitted for the consideration of Parliament the propriety of constituting a legislative Council at Calcutta composed of seven members, three selected from among the most respectable and qualified native Inhabitants of each Presidency to represent the natives thereof one member appointed by the Government of each Presidency from among senior civil officers on its establishment to represent the Government and one member appointed by the Crown."

( *India in the Victorian Age* ).

पुण्यास रावबहादूर कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, सिताराम हरि चिपळूणकर प्रभृतींच्या खटपटीनें १८७० सालीं सार्वजनिक सभा स्थापन झाली. या वेळीं देशांतल्या विशेष महत्वाच्या राजकीय संस्था ह्मणून एवढ्याच नमूद करीतां येतील. त्या संख्येनें कमी, आणि दगांनीं भरून गेलेल्या अफाट आकाशांत कोठें तरी मध्येंच एखादा तारा दिसे वा त्याप्रमाणें, एक येथें, तर एक शंभर कोस दूर अशा पसरलेल्या होत्या; तरी त्या तेजस्वी होत्या. त्यांनीं आपापल्या मर्यादेंत राजकीय चळवळीचें कार्य जोमानें आणि उत्साहानें चालविलें होतें. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें हानिकारक असें एखादें कृत्य सरकारच्या हातून झालें, किंवा तसा एखादा कायदा पास होऊं लागला तर या संस्थांनीं टीकेच्या रूपानें सरकारची कानउघाडणी करण्यास कमी केलें नाहीं हें खरें; तथापि राजकीय विचारांची प्रगति करण्यास चांगला साहाय्यभूत होईल असा एखादा विधायक कार्यक्रम अझून कोणत्याच संस्थेनें आखला नव्हता. एकराष्ट्रीयत्वाची भावना पूर्णपणें बिंबून सगळ्या राष्ट्राचें एकच राजकीय ध्येय ठरविणें, आणि तें साध्य करण्यासाठीं सर्वांनीं एकाच दिशेनें शक्तिसर्वस्व आणि बुद्धिसर्वस्व खर्च करणें; ही विशाल राजकीय दृष्टि आणि प्रगल्भ मन त्या वेळीं नुकत्याच जन्म पावलेल्या हिंदी राजकारणाच्या अर्भकाला नव्हतें; यांत आश्चर्य नाहीं. तरी त्या वेळीं त्यानें ज्या उड्या मारिल्या

त्या, त्या काळाच्या आणि परिस्थितीच्या मानानें कौतुकास्पद होत्या; एवढेंच नव्हे तर जन्मल्याबरोबर सूर्यावर झडप घालणाऱ्या मारुतीप्रमाणें तेजस्वी आणि त्याच्या भावी पराक्रमाच्या द्योतकहि होत्या असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

हिंदुस्थानच्या सुदैवानें, येथें नुकत्याच रुजूं पाहणाऱ्या या राजकीय जागृतीच्या अंकुराला सहानुभूतीच्या आणि उत्साहाच्या पाण्याचा शिंपडा देऊन वाढीला लावण्यांत ज्यांचे ज्यांचे श्रम विशेष कारणीभूत झाले आहेत, त्या सर्वांत इंग्लंडच्या पार्लमेंटांत हिंदुस्थानचा कैवार घेऊन भांडणाऱ्या उदारमनस्क इंग्रजी मुत्सद्यांना अग्रमान देणें जरूर आहे. पार्लमेंटच्या बहुमताचा पाठिंबा नाहीं, आणि ज्या ३३ कोट लोकांचा कैवार घेऊन भांडावयाचें त्यांचाहि पाठिंबा नाहीं, अशा निव्वळ एकाकी आणि एकांगि परिस्थितींत ज्यांनीं जोराचा झगडा केला त्यांना हिंदुस्थानानें आपले दोस्त ह्मणून त्यांचे सदैव ऋणी राहणें हें योग्यच आहे. कंपनी सरकारचा आरंभापासून सगळाच कारभार रयतेच्या हितानहिताकडे पूर्ण दुर्लक्ष ठेवून, जितकें गिळंकृत करतां येईल तितकें करावयाचें या पायावर उभारलेला होता. तिच्या या अनियंत्रित सत्तेखालीं, आणि सांपत्तिक दृष्टीनें कृश झालेल्या हिंदुस्थानच्या अंगाचे लचके तोडण्याच्या तिच्या दिवसानुदिवस बळावतच चाललेल्या प्रवृत्तीखालीं दडपून गेलेल्या निःसाहाय्य ३३ कोट लोकांची कींव करुन कंपनीला खडसून जाब विचारणारा एडमंड बर्क नंतर साधारणपणें १८५३ पर्यंत कोणताहि वीर पुढें सरसावला नव्हता. ब्रिटीश लोकांच्या आणि पार्लमेंटाच्या या बेमुर्वत आणि बेफिकीर वर्तनाची चीड येऊन ज्यांनीं त्यांचे कान जोरानें उपटले त्यांत मि. जॉन ब्राइटचें नांव पहिलें घेतलें पाहिजे. १८५३ सालीं सर चार्लस वुडच्या इंडिया बिलाला विरोध करतांना मि. जॉन ब्राइटनें, कंपनी सरकारच्या हिंदुस्थानांतील बेलगामी राज्यकारभारावर आणि या बाबतींतील पार्लमेंटच्या बेफिकीरीपणावर जोराची टीका केली होती. The Government of India was a Government of secrecy and irresponsibility to a degree that should not be tolerated या एकाच वाक्यानें त्याच्या टीकेचें सारस्वरूप लक्षांत येण्यास कांहीं हरकत नाहीं.

णांतील राजकीय जागृतीचा अंकुर किती झपाट्यानें वाढीला लागला होता, हें स्पष्ट होतें. या द्रव्यसाहाय्यानें फॅसेटला लवकरच पार्लमेंटांत प्रवेश करतां आला. तो पार्लमेंटांत जातो न जातो तोंच, निःसाहाय्य हिंदुस्थानला हात देण्याचा प्रसंग त्याच्यापुढें वाढून ठेवलाच होता.

१८७५ सालीं लॉर्ड सॅलिसबरींनीं टर्कीच्या सुलतानाला हिंदुस्थानच्या खर्चानें एक जंगी बॉल दिला होता, हें प्रसिद्धच आहे. या बॉलचा थाट उडवून ब्रिटिश वैभवानें सुलतानाचे डोळे दिपवून टाकण्याचें श्रेय लॉर्ड सॅलिसबरींनी संपादन केलें असेल, परंतु हलवायाच्या घरावर तुळसीपत्र ठेवून वैकुंठ गांठण्याच्या या लॉर्ड सॅलिसबरींच्या संभावित हलकटपणाला (Magnificent meanness) फॅसेटनें खडखडीत जाब विचारला कीं, इटालीच्या सुलतानाची इंग्लंडांत सरबराई राखण्यासाठीं होणारा खर्च हिंदुस्थानच्या डोक्यावर लादणें, हा लॉर्ड सॅलिसबरींनीं कोठला न्याय काढला. अबीसिनीयन युद्धाचा सगळा खर्च हिंदुस्थानच्या खिशांतून उपटण्याचा इंग्लंडचा कावा हाणून पाडला मि. फॅसेटनें; तरी अर्धा खर्च आमच्या बोकांडीं बसलाच. एडिनबर्गच्या ड्यूकनें हिंदु राजांना दिलेले नजराणे, आणि युवराजांची हिंदुस्थानाला झालेली भेट यांचेहि खर्च हिंदुस्थानच्याच तिजोरींतून काढले, तेव्हांहि मि. फॅसेटनें त्यास जोराचा विरोध केला आणि या प्रत्येक विरोधाचे वेळी, हिंदुस्थानचा कांहींतरी फायदाच झाला आहे. लिटनशाहींत, देशांत भयंकर दुष्काळ पडलेला असतांना दिल्लीच्या दरबारासाठीं व्हाइसरायांनीं जी उधळपट्टी केली त्याचा फॅसेटनें तीव्र निषेध केला. लॉर्ड लिटनच्या अफगाण युद्धाच्या धोरणावरहि फॅसेटनें जोराच्या टीका केल्या, आणि १८७९ त त्यानें पुन्हां हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यास हौस ऑफ कॉमन्सचीं एक सिलेक्ट कमिटी मागून घेतली.

हिंदुस्थानच्या हितासाठीं या वेळच्या तुटणाऱ्या इंग्लीश अंतःकरणांत तिसरें महत्वाचें नांव मि. चार्लस ब्रॅडलाचें आहे. १८८३ च्या इल्बर्ट बिलापासून मि. ब्रॅडलाचें लक्ष हिंदुस्थानाकडे अधिक वेधलें.

या तीन प्रमुख नांवाखेरीज हिंदुस्थानाविषयीं सहानुभूति बाळगणारे सर जेम्स केर्ड, सर विल्यम हंटर, लॉर्ड डलहौसी, मि. रीड, मि. स्लॅग, मि. वॅक्स्टर



ऑ० जगन्नाथ शंकरशेट.

पहिले राजकीय हक्क मिळविणारे व बाम्बे असोसिएशनचे अध्यक्ष ( १८५१ ).



सर जमशेटजी जीजीभाई.

नॅशनल लीगचे स्थापक.

प्रभृतींसारखे कांहीं इंग्लीश लोक तेथें होते. तथापि यांत आणखी एक विशेष महत्वाचें नांव घालावयाचें राहिलें आहे. तें नांव मिसेस ॲनी बिझांट हें होय. बिझांट आणि ब्रॉडला हे परस्पर स्नेही असून एक विचारानें काम करणारे होते. मिसेस बिझांटचे हिंदुस्थानाविषयींचे पहिलें कार्य ह्मणजे १८७८ सालांत इंग्लंड, इंडिया, आणि अफगाणिस्थान नांवाचें एक पुस्तक कडक भाषेत लिहून हिंदुस्थानांतील अंदाधुंदीच्या राज्यकारभाराकडे ब्रिटिश जनतेचें लक्ष जोरानें ओढणें हें होय.

इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि आमच्या सुदैवानें अधिकारावर असलेल्या कांहीं इंग्लीश विभूति आमची कड घेणाऱ्या होत्या. पंजाबांत मि. ए. ओ. ह्यूम (राष्ट्रीय सभेचे जनक), बंगाल्यांत सर हेन्री कॉटन आणि मुंबईत सर विल्यम वेडरबर्न, हीं त्यांत प्रमूख नांवें घेतां येतील.

मि. जॉन ब्राइट, मि. फॉसेट, मि. चार्लस ब्रॉडला प्रभृतींच्या प्रयत्नांचें दृश्य फल असें त्या वेळीं कांहींच दिसून आलें नाहीं; तरी हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं तरी सडलेला भाग असून त्याची घाण उत्तरोत्तर अधिक तीव्र होऊं लागली आहे व त्या नासलेल्या भागाकडे अजूनहि डोळेझांक केली तर त्याचा संसर्ग आपल्यालाहि बाधेल ही जाणीव उत्पन्न करून ब्रिटीश लोकांचें लक्ष हिंदुस्थानाकडे वेधण्याचें कार्य त्यांनीं केलें. हिन्दी लोकांच्या अंतःकरणांत नुकत्याच उद्भूत झालेल्या राजकीय चळवळीच्या अंकुराचीं मुळें अधिक खोल घालविण्याचें विशेष महत्वाचें काम त्यांनींच केलें आहे. आपण संघशक्ति निर्माण करून, आपल्या अडचणीं किंवा दुःखें एकमुखानें पुढें मांडलीं तर आपल्याला साहाय्य करण्यास पार्लमेंटांत आणि पार्लमेंटाच्या बाहेरहि थोडे तरी ब्रिटीश लोक तयार आहेत; आपण अगदींच एकाकी नाहीं, अशी येथील कार्यकर्त्या लोकांची खात्री होऊन त्यांना आपलें कार्य नेटानें चालविण्यास अधिक हुरूप आला तो त्यांच्याच प्रयत्नांनीं होय.

या राजकीय विचारांचीं मुळें अधिक खोल रुजविण्यास, लोकांस राष्ट्रीय चळवळीचें शिक्षण पद्धतशीर देण्यास, आणि त्यांचा देशभर विस्तार करण्यास या वेळीं आणखी एका विशेष गोष्टीनें महत्वाचें साहाय्य केलें. ती गोष्ट

म्हणजे वर्तमानपत्रें होत. आरंभी आरंभींचीं देशीं वर्तमानपत्रें राजकीय बाबतींत मन घालींतच नसत म्हटलें तरी चालेल; त्या वेळीं त्यांच्या अंगांत एवढें धैर्य नव्हतें हें साहजिकच आहे. मधून मधून राज्यकारभारावर टीका करण्याचें साहस करून इतर देशी वर्तमानपत्रांना हा बाणेदार धडा घालून देण्याचें पुढारीपण, राजा राममोहनरायांच्या संवाद कौमुदीनें घेतलें. हिंदुस्थानांत पहिलें वर्तमानपत्र, कलकत्त्यास १७८०च्या सुमारास 'बंगाली ग्याझीट' हें इंग्लीशमध्यें निघालें. साधारणपणें १८३४ पर्यंत वर्तमानपत्रांवर सरकारची अतीशय करडी नजर होती. या काळांत राज्यकारभारावर टीका केल्यामुळें कित्येक युरोपियन संपादकांवर सरकारची खप्पा मर्जी होऊन त्यांना, आजच्या मि० हॉर्निमनसारखें विलायतेंत जाऊन बसावें लागलें होतें. १८३५ सालीं सर चार्लस् मेटकाफ यांनीं, वर्तमानपत्रांना, कांहींसे स्वातंत्र्य देऊन लोकमताला थोडासा मान देण्याचें पुण्य संपादलें. म्हणजे हिंदुस्थानांत वर्तमानपत्रांना खरा जन्म दिल्याचें सर्व श्रेय सर मेटकाफलाच दिलें पाहिजे. त्या वेळेपासून हिंदी वर्तमानपत्रांची प्रगति झपाट्यानें होऊं लागली. निव्वळ राजकारणाचीच चर्चा करण्यास जन्म घेतलेलें हिंदुस्थानांतलें पहिलें देशी पत्र म्हणजे ईश्वरचंद्र गुप्तांचें "प्रभाकर" हें होय. १८५८ सालीं हिंदी वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावर आणखी एक टोला बसला. ५७ सालच्या बंडानें देशांत बरीच खळबळ उडवून सोडल्यामुळें, लार्ड कॅनिंगनें वर्तमानपत्रांच्या मुस्कुटदाबीचा एक कायदा पास केला. परंतु त्याची अंमलबजावणी वर्तमानपत्रांच्या अस्तित्वावर किंवा प्रगतीवर कुऱ्हाडच घालण्यासारखी कडक नव्हती; आणि जी होती ती देखिल साधारण धामधुमीच्या एका वर्षापुरतीच असल्यामुळें त्या कायद्याचें अस्तित्व देखिल फारसें जाणवलें नाहीं.

बंगाल्यांतील हिंदु पॅट्रिऑट; इंडियन मिरर; अमृतबझार पत्रिका, बंगाल पब्लिक ओपिनियन; बेंगाली; रईस आणि रयत; स्वयंप्रकाश; नबाभीमकर; सुलभसमाचार; संजीवनी; हितवादी; वगैरे पत्रें; महाराष्ट्रांतील रास्तगोफ्तार; मुंबई समाचार; जामेजमशेट; इंदुप्रकाश; ज्ञानप्रकाश; मराठा; केसरी आणि मद्रासेंतील हिंदु स्टँडर्ड; स्वदेशमित्र वगैरे वजनदार पत्रें, लोकमत निद-

र्शक आणि राजकीय विचारांचा फैलाव करणारीं पत्रें त्याच काळानंतरचीं आहेत. १८७५ च्या सुमारास अशा देशी पत्रांची संख्या ४७८ होती. आपल्या देशाच्या राज्यकारभारांत भाग घेण्यास हिंदी लोकांना विशेष धीट करण्याचें पुष्कळसें श्रेय या पत्रांनाच आहे. १८७८ सालीं लॉर्ड लिटननें पुन्हां देशी वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारा कायदा केला. अप्रतिहत सत्ताप्रिय किंवा साम्राज्यवादी गव्हर्नरांचे थोडें तरी रक्त काढण्यासारखे चिमटे घेण्याचा हिंदी लोकांत धीटपणा त्या वेळीं आला होता हें यावरून सिद्ध आहे; आणि असे घेतलेले चिमटे पाण्यांतल्या बेडकावर दगड फेकण्यासारखा कांहीं तरी पोरखेळ नसून त्यांत तथ्य आहे; राज्यकारभारांतील दोष दाखविण्याची हिंदी लोकांची पात्रता आहे; असें सिद्ध करण्याकरितांच की काय १८८२ सालीं लॉर्ड रिपननीं तो कायदा रद्द करून हिंदी वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य पुन्हां त्यांना परत दिलें.

# प्रकरण २ रें.

## जोपासना

झाड कलम केल्याखेरीज त्याच्या वाढीला जोर येत नाहीं. जमीन नांगरून वीं पेरलेलें असलें, तरी वारंवार कोळपणीं करून ती भुसभुशीत केल्याखेरीज रोपटीं मुळें धरीत नाहींत, व कदाचित् धरलींच तर त्यांच्यांत जीव नसतो. तेव्हां चांगलें जोरदार पीक येण्यास, किंवा झाडाची वाढ झपाट्यानें होण्यास, कळकळीचा शेतकरी किंवा माळी, जमीन वारंवार कोळपणें किंवा झाड कलम करणें, ह्मणजे त्यांची जोपासना करणें हें आपलें अवश्य आणि पहिलें कर्तव्य समजतो. पण एवढ्यानेंच भागत नाहीं. रोप्यांची पूर्ण वाढ होण्यास मनुष्याची जोपासना पाहिजे; तसेंच कडकडीत ऊन्ह आणि शीतल छाया, निस्तब्ध रात्र आणि प्रभात सूर्याचीं कोंवळीं किरणें यांचीहि अत्यंत जरूरी असते. हिंदी लोकांच्या मनांत रुजलेल्या राजकीय जागृतीच्या रोपट्याचें कलम करून आणि वारंवार त्याच्या भोंवतालची जमीन कोळपून त्याची योग्य, आणि सृष्टिनियमानुसार जोपासना करण्याचें पुष्कळसें श्रेय लॉर्ड लिटनना आणि त्यांच्या सरकाराला देणें जरूर आहे. हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्याचें रोपटें आज जें इतकें जोमांत दिसतें त्याला पहिल्यापासून तशीच जोपासना मिळाली हें विसरतां कामा नये. लॉर्ड लिटनसारखी नोकरशाही हिंदुस्थानांत त्या वेळीं गाजली नसती तर आमच्या राजकीय प्रगतीचें पाऊल आणखी किती रेंगाळलें असतें हें सांगणें कठीण आहे.

१८५८ सालीं महाराणीनें हिंदुस्थानचा कारभार कंपनीकडून आपल्या हातांत घेतांनां 'ज्या आपल्या इच्छा" लोकांना सांगितल्या होत्या त्या ऐकून हिंदी लोकांच्या तोंडाला बरेंच पाणी सुटलें. कंपनीच्या कारकीर्दींतली हेस्टिंग्जशाही सहसा अनुभवायास मिळणार नाहींच; कदाचित् अकबरच्या वेळचें सुराज्य तरी भोगण्यास मिळेल अशी महाराणीनें लोकांत आशा उत्पन्न केली; परंतु राणीच्या जाहिरनाम्यामागें धांवतां धावतां अगदीं थकून गेल्यावर, तें मृगजळ आहे अशी हिंदी

लोकांची खात्री झाली. इतकेंच नव्हे, तर चालू काळ मागच्या काळाला बरें ह्मणवितो, या नेहमींच्या व्यवहारांतील अनुभवाप्रमाणें, राणीच्या कारभारापेक्षां कंपनीचाच कारभार शतपटीनें बरा असें ह्मणण्याची पाळी, हिंदी लोकांवर आली. कंपनी विलायतसरकारची अंकित असल्यामुळें तिच्या धाकानें २० वर्षांनीं तरी एकवार कंपनीचे डायरेक्टर हिंदुस्थानांतील कारभाराकडे, वेडीवाकडी कां होईना, नजर फिरवीत; पण, 'खुद्द' नीं मुखत्यारी घेतल्यामुळें त्यांच्यावर कोणाचाच धाक राहिला नाहीं.

१८६१ सालीं कौन्सिल आक्ट पास करून हिंदुस्थान सरकारला एक पांच मेंबरांचें निर्जीव कार्यकारी कौन्सिल दिलें; शिक्षणाच्या प्रसारासाठीं तीन मुख्य इलाख्यांत विद्यापीठें स्थापिलीं, न्यायखात्यांत कांहींशी सुधारणा झाली; तरी राजकीय दृष्ट्या हिंदुस्थानच्या पदरांत कांहींच पडलें नाहीं; राज्यपद्धतींतले ठळक ठळक दोषहि जसेच्या तसेच कायम होते. कंपनीच्या कारभाराला एखादे वेळीं तरी दाबण्यास विलायतेंत डायरेक्टरांचा बोर्ड होता. परंतु आतां हिंदुस्थानासाठीं नवीन नेमलेल्या स्वतंत्र स्टेट सेक्रेटरीच्या, अरेरावी आणि बेलगामी सत्तेला कोणीच विचारता राहिला नाहीं; अर्थात्च येथली नोकरशाही ह्मणेल ती पूर्वदिशा असा प्रकार झाला होता. जी हां करणाऱ्यांना या नोकरशाहीच्या पंखांची कांहींशी ऊब क्वचित् मिळे; नाहीं असें नाहीं. परंतु एवढ्यानें राज्यकारभारापासून हिंदी लोकांना चार हात लांब ठेवण्याच्या नोकरशाहीच्या, चालू वहिवाटींत कांहीं फरक झाला असें मुळींच नाहीं. राणीच्या जाहीरनाम्यानें उत्पन्न केलेली आशा नष्ट होऊन लोकांची मनें अस्वस्थ होऊं लागलीं आणि ही अस्वस्थता लॉर्ड लिटनच्या बेदरकार आणि उधळपट्टीच्या राज्यपद्धतीनें कळसाला पोंचविली.

लॉर्ड लिटन पक्के साम्राज्यवादी होते. मोगल साम्राज्याची इमारत ढांसळून पाडणारा औरंगजेब आणि लॉर्ड लिटन एकाच माळेचे मणी होत. औरंगजेबानें जनतेवर कधींहि विश्वास टाकला नाहीं. लॉर्ड लिटननाहि जनतेवर विश्वास टाकणें साम्राज्यविघातकच वाटलें. ब्रिटिश साम्राज्याच्या सुदैवानें गव्हर्नरांच्या हातांत राज्यसूत्रें ठेवण्याची मर्यादा पांचच वर्षांची ठेविली गेली असल्यामुळें 'साम्राज्य घातकी' हा काळाकुट्ट डाग, इतिहासांत अजून लॉर्ड लिटनसारख्या

कोणा व्हाइसरायाच्या पाठीमागें ठेवण्याचा प्रसंग, इतिहासकारांना आलेला नाहीं; परंतु ती मर्यादा नसती तर औरंगजेबाप्रमाणेंच साम्राज्याचें आयुष्य, पाण्यावरच्या बुडबुड्यासारखें घटका दोन घटका करण्याचें श्रेय लॉर्ड लिटन-सारख्यांनीं केव्हांच संपादन केलें असतें. बंगालचे ले. गव्हर्नर सर फ्रेडरिक हेलिडेसारख्या कांहीं उदार मनस्क मुत्सद्यांनीं, इंग्रजी उच्च शिक्षणाचा येथें पाया घालतांना, हिंदी लोकांत या शिक्षणानें स्वराज्याची पात्रता उत्पन्न करा-वयाची ( The schools whould promote one of the leading purposes of the British rule which was to *prepare the people for self-Government.*) हें जें धोरण ठेविलें होतें, त्याची लॉर्ड लिटनसाहेबांनी हेटाळणी करून शिक्षणसंस्थांची Educational hotbeds and forcing houses असल्या-शेलक्या शब्दांत थट्टा उडविली. सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेचे दरवाजे कायमचे बंद करावेत, त्याचें हिंदी लोकांना दर्शन देखिल होऊं नये; अशाबद्दल लिटनसाहेबांनीं जंगी खटपट चालविली होती; परंतु पार्लमेंटनें कांहींसें उदार धोरण दाखवून लिटनसाहेबांच्या इच्छेला ‘ जी हां ’ असेंच केलें नाहीं, तरी ती वयोमर्यादा १९ वर आणून अप्रत्यक्षपणें हिंदीं लोकांना त्या परीक्षेचे दरवाजे बंदच केले होते. फक्त पार्लमेंटच्या या धोरणानें हिंदी चळवळीचा मार्ग कांहींसा सुलभ करून ठेवला होता एवढेंच.

१८७७ च्या भयंकर दुष्काळानें देशाला आग लागली असतांना राणीला कैसर-ई-हिंद पदवी बहाल करण्यासाठीं दिल्लीला थाटाचा दरबार भरविणें; काबूलची स्वारी, अफगाणची दुसरी लढाई, भयंकर लष्करी वाढ, सरहद्दीवरील निष्कारण अवाढव्य खर्च, लोकांना अक्षरशः निःशस्त्र करणें; देशी पत्रांची मुस्कटदाबी; लँकेशायरच्या चंदींत भर घालण्यासाठीं कापडाच्या आयातीवरील करांची वाढ; दिवाळें काढणारें अंदाज पत्रक; वगैरेसारख्या कृत्यांनीं देशांतला असंतोष परमावधीला पोंचविला होता. हें असंतोषाचें दुःख आतां पूर्ण पिकलें होतें; आणि त्याला कोठून तरी तोंड फुटणें हें निसर्गतःच अत्यावश्यक झालें होतें. आणि कित्येक ठिकाणीं जाहीर सभा भरून तें फुटलेंहि.

आज २०।२५ वर्षे लोकांच्या मनांत रुजलेला राजकीय जागृतीचा किंवा राजकीय चळवळीचा कोंब बाहेर पडण्यास आतां अगदीं तयार झाला होता. फक्त त्याच्यावरील भीडमूर्वत किंवा भीति यांची असलेली थोडीशी माती बाजूला करणाराच कोणी तरी निमित्तमात्र पाहिजे होता, आणि हें कार्य, त्याच सुमारास सरकारच्या इतराजीला बळी पडून नोकरींतून निघालेल्या ( आतां ऑ०सर) सुरेंद्रनाथ बानर्जींनीं केलें. १८७६ च्या जुलै महिन्यांत त्यांनीं "इंडियन असोसिएशन " नांवाची एक संस्था स्थापिली. ही संस्था ह्मणजे बंगाल्यांतील सुशिक्षित लोकांचें एक मध्यवर्ती मंडळच होतें. देशाला आतां राजकीय ऐक्याची जरूरी आहे हें लोकांच्या मनांत बिंबवून कांहीं तरी विधायक कामगिरी करणारा कार्यक्रम हातीं घेण्याचा या संस्थेचा उद्देश होता. आणि पुढच्याच वर्षी लॉर्ड सॅलिसबरीनीं सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेची वयोमर्यादा १९ वर आणून सुरेंद्रनाथांच्या या संस्थेला आपलें कार्य करण्याची नामी संधि दिली. लॉर्ड सॅलिसबरीच्या या कृत्यानें देशभर खळबळ उडविली. प्रत्येक प्रांतांतून त्याचा जोरानें निषेध होऊं लागला. याच वेळीं इंडियन असोसिएशननें कलकत्त्याच्या टौन हॉलमध्यें सभा भरविली आणि तींत, अशाच चहूंकडे निषेधपर सभा भरवून या प्रश्नावरील हिंदुस्थानचें एकमत सरकारला कळविण्यासाठीं दौरा काढण्याचें ठरविलें. दौऱ्यावर जाण्याचें काम सर सुरेंद्रांनीं स्वतःवर घेतलें. राजकीय स्वातंत्र्याच्या हिंदुस्थानच्या लढ्यांतील अशा तऱ्हेची मोहीम हीच पहिली होय. हा दौरा या वेळीं फक्त उत्तर हिंदुस्थानांतच झाला; पण तो इतका यशस्वी झाला कीं, हिंदुस्थानांतील लोक, मग ते, हिंदु असोत, मुसलमान असोत, पारशी असोत किंवा अन्यधर्मी असोत, राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत खांद्याला खांदा भिडविण्यास तयार आहेत हें या दौऱ्यानें स्पष्ट केलें.

१८७८ सालीं सुरेंद्रनाथांनीं आपल्या सिव्हिल सर्व्हिसच्या प्रश्नांवरील मोहीम, दक्षिण हिंदुस्थानांत केली. सुरत, अहमदाबाद, मुंबई, पुणें, मद्रास वगैरे मुख्य मुख्य शहरीं सभा भरवून ही मोहीम पूर्ण केल्यावर लवकरच सिव्हिल सर्व्हिस प्रश्नावरील " ऑल इंडिया मेमोरियल " हौस ऑफ कॉमन्सकडे रवाना केलें. राष्ट्रकार्यासाठीं आणि राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं हिंदुस्थानच्या

कोणत्याहि मताचे लोक एकत्र होऊन एक विचारानें वागतील ही खात्री या मोहिमेनें अधिक दृढ झाली हेंहि कांहीं कमी महत्वाचें नाहीं.

लॉर्ड लिटनसाहेबांचीच अरेरावीची पण हिंदुस्थानच्या राजकीय जागृतीची कांहींशी मशागत करणारा कारकीर्द १८७९ साली संपली, आणि या गोपच्छ्यांत प्रभातकालीन सूर्याच्या कोंवळ्या किरणांनीं नवजीवन ओतणारी लॉर्ड रिपनची कारकीर्द १८८० च्या जानेवारीपासून सुरू झाली. लॉर्ड लिटनसारख्या वेगुमान व्हाइसरायानंतर लागलींच लॉर्ड रिपनसारख्या उदारबुद्धि आणि प्रगतिप्रिय गृहस्थाचीच, व्हाइसरायाच्या जागीं अचुक नेमणूक होणें, म्हणजे मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यांत जोराची वृष्टि होऊन सहारा वाळवंटाची एका रात्रींत सुपीक जमीन होण्यासारखीं ईश्वरी चमत्काराची, कल्पनातीत गोष्ट घडून येणें होय. पण मि. ग्लॅडस्टनसारख्या विचारी आणि दूरदृष्टि मुत्सद्याच्या दृष्टीनें, ती अवश्य आणि साहजिकच होती. या वेळीं इंग्लंडांत मि. ग्लॅडस्टनसाहेबांचा उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ होता; म्हणूनच लॉर्ड रिपन हिंदुस्थानच्या वाट्याला आले, हें म्हणणें खरें असलें; तरी हें कांहीं प्रमुख कारण म्हणतां येणार नाहीं. लॉर्ड लिटनच्या कारकीर्दीनें उत्पन्न केलेल्या असंतोषाची तीव्रता ग्लॅडस्टनसाहेबांना चांगलीच जाणवली असली पाहिजे. हिंदुस्थानांतील राजकीय जागृतीचें आणि तिला येत चाललेल्या संघटनात्मक स्वरूपाचें यथार्थ ज्ञान, सिव्हिल सर्व्हिसच्या प्रश्नावरील ऑल इंडिया मेमोरियलनें त्यांना दिलेंच होतें. लिटनशाहींत हिंदी लोकांच्या असंतोषाची दोरी किती ताणली आहे हें बरोबर दाखविणारें पुण्याच्या सार्वजनिक सभेचें मेमोरियल त्यांच्या डोळ्यापुढें होतें; तेव्हां ती दोरी अधिकच ताणणारा एखादा लॉर्ड लिटन पुन्हां व्हाइसराय म्हणून पाठवला तर प्रसंगीं ती तुटण्याचीहि भीति मि० ग्लॅडस्टनसारख्या शांत डोक्याच्या माणसाला वाटणें स्वाभाविक आहे. लॉर्ड रिपननीं मुंबई बंदरांत पाऊल ठेवण्याबरोबर "मी आतां आश्वासनात्मक कांहीं शब्द उच्चारले तर त्याच्यावर तुमचा विश्वास बसणें शक्य नाहीं आणि मी तसा आग्रहहि धरीत नाहीं. माझी परीक्षा माझ्या आतांच्या शब्दांवरून न करितां माझ्या कृतीवरून करा" ( Judge me by my acts, and not by my

words. ) असें उद्गार काढले होते. यावरूनच लिटनसाहेबानीं खवळलेल्या वातावरणाला कांहींसें शांत करण्याची आवश्यकता ब्रिटिश प्रधानमंडळाला किती वाटत होती, हें समजून येण्यासारखें आहे आपल्या जाहीरनाम्यावरून उडत चाललेला विश्वास लॉर्ड रिपनसारख्याच्या नेमणुकीनें पुन्हा प्रस्थापित केल्याबद्दल महाराणीनें त्या वेळीं मि. ग्लॅडस्टनसाहेबांचे आभारच मानले असले पाहिजेत.

इंग्लंडांत लोकमताला कांहीं तरी मान आहे, याची हिंदी लोकांत जाणीव उत्पन्न करून त्यांच्याविषयीं सक्रीय साहानुभूति दाखविण्याचें इंग्रजी राज्यांतलें पहिलें प्रमुख उदाहरण म्हणजे लॉर्ड रिपनची व्हाइसरायांच्या जागीं नेमणूक हें होय. संघटनात्मक चळवळीची शक्ति आणि तिचें पडणारें वजन याची खरी किंमत बहुजनसमाजाच्या मनांत ठसवून हिंदी लोकांना ती शक्ती वाढविण्यास विशेष उत्तेजन दिलें मि. ग्लॅडस्टनसाहेबांच्या या विचारपूर्ण व्हाइसरायांच्या निवडीनें आणि लॉर्ड रिपनच्या प्रत्यक्ष कृतीनें होय, यांत शंका नाहीं.

लॉर्ड रिपनचें अगदीं पहिलें महत्वाचें कार्य ह्मणजे अफगाण युद्धाचा शेवट करून, आधुनिक साधन सामुग्रीनें सरहद्दीच्या संरक्षणासाठीं चाललेल्या बेसुमार खर्चाला एकदम आळा घालून हिंदुस्थानच्या पैशाची कोट्यावधी रुपयांनीं बचत करणें हें होय. खैबर आणि बोलन मार्ग कडेकोट करण्यापेक्षां अफगाण अमीराशीं दोघांचीहि इभ्रत वाढविणारा तहच करणें हें अधिक मुत्सद्दीपणाचें होतें. हिंदुस्थानचें संरक्षण सरहद्दीच्या बंदोबस्तावर नसून देशांतल्या प्रगतीच्या मार्गावर असलेल्या लोकांचा मार्ग अधिक सुलभ करणें, त्यांना संतोषी ठेवणें, त्यांच्याशीं सहकारितेनें वागणें, किंवा त्यांना उपकारबद्ध करून ठेवणें यांवरच विशेष अवलंबून आहे ही खूणगांठ, लॉर्ड रिपननी आपल्या मनाशीं पक्की घातली होती. या दृष्टीची हिंदी राज्यकारभारांतील त्यांची पहिली कृति, ह्मणजे कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्राला लाजिरवाणी असणारी जी गोष्ट, लॉर्ड लिटननें आपल्या कृत्याच्या जगभर होणाऱ्या डंक्याला आळा घालण्यासाठीं, प्रेस आक्टानें देशीवर्तमानपत्रांची तोंडें जखडलीं होतीं, तीं एकदम मोकळीं करणें ही होय. लोकांच्या प्रगतीचा मार्ग सुलभ करून सरकार आणि रयत यांच्या परस्पर प्रेमाची ग्रंथी

अधिक दृढ करणारी आणि लोकमताला अनुसरून राज्यकारभार करण्याच्या लोकमतानुवर्ती ( Parliamantary ) पद्धतींतील अगदीं पहिली आणि महत्वाची गोष्ट जी स्थानिक स्वराज्य, तें लॉर्ड रिपननीं सर्व देशांत सुरू केलें.

लॉर्ड रिपन, लॉर्ड लिटनच्या ऐवजीं आले होते, हिंदुस्थानच्या सिंहासनावरील एकच व्यक्ति बदलली होती; पण त्यांच्या भोंवतींची नोकरशाहीची प्रभावळ जशीच्या तशीच कायम होती. हिंदू लोक बेअकली, ब्रिटिशांचे खुषमस्करे ही भावना वर्षानुवर्षे बिंबलेली, आणि लॉर्ड लिटननें दिल्ली दरबारांत राजेरजवाडेसुद्धां सर्व हिंदी प्रजा ब्रिटिश सत्तेला तीनवार मुजरा करून पायाशीं पडून राहणारी शुद्ध गुलाम आहे अशी खात्री करून दिलेली इंग्रजी नोकरशाही लॉर्ड रिपनच्या भोंवतीं सक्त पाहरा करीत होती. असल्या नोकरशाहीला लॉर्ड रिपनचे हे " वेडेचार " पाहून तिच्या अंगाचा तिळपापड उडून गेला असेल, पण हा वेळपर्यंत मनांतल्या सगळ्या रागद्वेषाच्या भावना दाबून तिनें लॉर्ड रिपनचा, व्हाइसराय, म्हणून कांहीं मुलाजा राखला होता. पण लॉर्ड रिपनच्या ' वेडा ' नें देशाला लागलेल्या राजकीय सुधारणेच्या आगीची फुणगीच नव्हे, तर थोडासा जळजळीत वारा आपल्या अंगावर येणार अशीं चिन्हें दिसतांच हें पारडें एकदम फिरून नोकरशाहीचें खरें स्वरूप आणि तिची कारवाई चव्हाटयावर आली. नोकरशाहीशीं नेहमीं परिचित असलेल्या हिंदुस्थानाला या वेळीं आश्चर्य वाटलें असेलच पण, लॉर्ड रिपनला आश्चर्याबरोबर नोकरशाहीच्या या अप्रतिहत सत्तेबद्दल दुःखहि खास झालें असलें पाहिजे. फौजदारी कायद्यांतील वर्णभेद नाहींसा करण्यासाठीं, म्हणजे ब्रिटिश न्यायदेवतेचें तोंड अधिक उज्वल करण्यासाठीं लॉर्ड रिपननीं जोराचा प्रयत्न केला. पण हा प्रयत्न हिंदुस्थानांत करणें म्हणजे भयंकर धाडसाचें आणि वेळीं प्राणघातकहि आहे अशीं त्या वेळीं लॉर्ड रिपनची आणि हिंदी लोकांची पुरी पुरी खात्री झाली.

१८८२ सालीं मि. बी. एल्. गुप्तांनीं फौजदारी कायद्यांतील हा वर्णभेद काढून टाकण्यासंबंधीं एक जोरदार नोट लिहिली होती. तिच्यावर १८८३ च्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या बैठकींत सरकारचे लॉ. मेंबर ऑ. मि. सी. पी.

इलबर्ट यांनीं एक बिल आणलें. या बिलानें हिंदुस्थानांतल्या सर्व अधिकारी, बिन अधिकारी आंग्लो-इंडियनांचें पित्त एकदम खवळून, जणूं आपल्या अस्तित्वावर आणि हिंदुस्थानांतल्या ब्रिटीश साम्राज्यावर आकाशांतली कुऱ्हाडच कोसळली अशा दृढ भावनेनें त्यांनीं त्याचा जोरानें प्रतिकार करण्याचा विडा उचलला. कमांडर-इन्-चीफसुद्धां सगळ्या कौन्सिलनें या बिलाला झुगारून पाडलें. खुद्द लॉर्ड रिपन आणि अंशतः, बिलाचे जनक ऑ. मि. इलबर्ट, व मेजर बेरींग ( लॉर्ड क्रोमर ) या तिघांखेरीज बिलाला उचलून धरणारा तेथें कोणीहि नव्हता. या इलबर्ट बिलानें त्या वेळीं आंग्लो-इंडियन आणि नोकरशाही किती खवळून गेली होती ह्याची बरोबर कल्पना येण्यास मि. बक्लंड यांचे शब्द पुरे आहेत. ते म्हणतात " कलकत्त्यांतल्या कित्येक लोकांनीं एक गुप्त कटच केला होता. हें बिल पास करण्याचा सरकारनें हट्टच धरला तर गव्हर्नमेंट हौसवर हल्ला करून व्हाइसरायाची हिंदुस्थानांतून उचलबांगडी करावयाची, अशी त्या कटांतल्या प्रत्येक मनुष्यानें शपथ घेतली होती." हा कट बंगालचा लेफ्टनंट गव्हर्नर आणि एक बडा अधिकारी यांना पूर्ण माहित होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या बिलाला पद्धतशीर विरोध करण्यासाठीं एक 'आंग्लोइंडियन डिफेन्स' नांवाची संस्थाहि तावडतोब स्थापन होऊन तिनें आपलें कार्य जोरानें चालू केलें होतें.

आंग्लो इंडियनांचा कौन्सिलांतील आणि कौन्सिला बाहेरील झालेला हा संघटनात्मक विरोध पाहिला, तर बिलाला हिंदी लोकांकडून मिळालेला पाठिंबा अगदींच कुचकामाचा होता असें ह्मणावें लागतें. बिलाचें महत्व आणि आंग्लो-इंडियनांच्या विरोधानें संताप येऊन, त्याला तितक्याच जोराच्या विरोधाचें उत्तर दिलें फक्त बंगालनें आणि मुंबईनें; मद्रास, पंजाब, वायव्य प्रांत तर अगदीं स्वस्थ झोपा घेत पडले होते.

हें बिल अर्थातच फेटाळलें गेलें हें सांगण्याची आवश्यकता नाहीं; पण लॉर्ड रिपनच्या ' हट्टा'मुळें डि. माजिस्ट्रेटस् आणि सेशन जज्जीस यांच्यापुढील खटल्यांतून त्यांनीं ' तपशील नाकबूल ' असला तरी ' तत्व कबूल ' अशा तऱ्हेनें वागण्याचें ठरलें. तुपाच्या ऐवजीं, हें रस्त्यावर फेकून देण्यासारखें घाणेरडें तेल

घेऊन बेवकूब समेट करण्यास बंगालचे लोक मुळींच कबूल नव्हते; आणि इरेस पडून दुणावलेली त्यांची ही असंतुष्टता, आधींच आंग्लो-इंडियनांनीं नाजूक केलेली लॉर्ड रिपनची परिस्थिति अधिक नाजूक आणि कठीण करणार, आंग्लो इंडियनांनीं त्यांच्या मानेवर ठेवलेल्या तीक्ष्ण सुरीवर हिंदी लोकांचीहि सुरी आदळणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं; पण मुंबईच्या मुत्सद्दी दृष्टीला हें वेळींच दिसून आलें आणि तापडतोब पुढाऱ्यांनीं एक मॅनिफेस्टो काढून, या वेळीं सर्व देशानें लॉर्ड रिपननाच पाठिंबा दिला पाहिजे हें लोकांच्या मनांत बिंबवलें. सुदैवानें त्याचा इष्ट परिणाम झालाहि.

विस्तवानें अंग भाजतें हें पक्कें माहीत असलें, तरी त्यानें होणाऱ्या वेदनांची यथार्थ कल्पना, प्रत्यक्ष अंग भाजल्याखेरीज होत नाहीं; व त्याच्या प्रतिकारार्थ अवश्य ती काळजी घेण्याची तोंपर्यंत तितकी प्रवृत्तीहि होत नाहीं, हा जो मनुष्य स्वभाव आहे, तो येथेंहि पूर्णपणें प्रत्ययाला आला. संघटनात्मक प्रयत्नांची शक्ति अजब असते, ह्मणून आपलें कार्य संघटनात्मक केलें पाहिजे हें तत्व आह्मांला समजलें होतें, या प्रयत्नांनीं दुसऱ्यांचें यशस्वी होत असलेलें कार्य आह्मी पाहत होतों; व ती शक्ति आपल्याहि अंगीं आणण्याची जाणीव आमच्यांत या वेळीं उत्पन्न झाली होती; परंतु इलबर्ट बिलानें संघशक्तीच्या अभावी अंग चांगलें पोळून निघेपर्यंत तिची यथार्थ कल्पनाच, आह्मांला नव्हती असें ह्मटलें पाहिजे. व्हाइसरायासारखा अधिकारी अनुकूल आणि पाठिंबा देणारा असून ईलबर्ट बिल एकमतानें फेटाळलें गेलें तें आंग्लो इंडियनांच्या संघटनात्मक विरोधानेंच होय, हें झणझणीत अंजन डोळ्यांत पडल्यावर आम्हांला आमची राजकीय प्रगति करून घ्यावयाची असेल तर आगोदर राष्ट्राला संघटनात्मक स्वरूप देणें जरूर आहे, ही पूर्वीची अस्पष्ट कल्पना आतां जोरानें उसळली; इतकेंच नव्हे तर त्या दृष्टीनें प्रयत्नहि कसून सुरू झाले. राष्ट्राची एक मध्यवर्ती संस्था स्थापून राष्ट्राचें एकच ध्येय ठरवून ते गाठण्याचे मार्ग व प्रयत्न संघटनात्मक स्वरूपांतच केले पाहिजेत; या स्वराचा प्रतिध्वनि आतां सर्व देशभर दुमदुमूं लागला.



मि. चार्लस् ब्राडला.

हिंदुस्थानचे कैवारी व राष्ट्रीय सभेचे हितचिंतक.



मि. ए. ओ. ह्यम.

राष्ट्रीय सभेचे आद्य जनक व हिंदुस्थानचे कैवारी.

# प्रकरण ३ रें.

( अंकुरोद्भव )

## राष्ट्रीय सभेचा जन्म

लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीनें, देशांतल्या राजकीय विचारांना जोराचें चालन दिलें; एवढेंच नव्हे, तर प्रमुख राजकारणी लोकांच्या अंतःकरणांत नवीन विचारांचें आणि नवीन जोमाचें जीवन ओतलें. पूर्वीच्या राजकीय संस्था आणि त्यांचें कार्य हल्लींच्या बदललेल्या परिस्थितीला आणि काळाला अनुसरून अगदींच मेंगेपणाचें आणि मिळमिळीत ठरूं लागतांच त्यांना मूठमाती देऊन आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सिद्ध झालेल्या सरकाराला तोंड देण्यास समर्थ होतील अशा नव्या जोमाच्या आणि सिद्धतेच्या राजकीय संस्था निर्माण होऊं लागल्या. बंगाल्यांतील 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' चे आधारस्तंभ सर जितेंद्रनाथ टागोर यांच्या नेतृत्वाखालीं १८८४ सालीं "नॅशनल लीग" स्थापन झाली. त्याच सालीं मद्रासची " मद्रास नेटिव्ह असोसिएशन " नामशेष होऊन, तिच्या जागीं " मद्रास महाजन सभा " स्थापन झाली. मुंबईची जुनी पुराणी आणि अगदीं टेंकीस आलेली " बॉम्बे असोसिएशन " ही जुन्या काळांत दडपून १८८५ सालीं ऑ. बद्रुद्दीन तय्यबजी, सर फेररोजशहा मेथा, न्या. काशिनाथ त्रिंबक तेलंग, सर दिनशा एदलजी वाच्छा प्रभृतींनीं, सर जमशेटजी जिजीभाई यांच्या अध्यक्षतेखालीं नागरिकांची एक जाहीर सभा बोलावून फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटच्या हॉलमध्यें हल्लींच्या " बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन "ला जन्म दिला.

ज्या निरनिराळ्या परिस्थितींतून राष्ट्रीय सभेची निर्मिती झाली, त्या परिस्थितीचें सर्वसाधारण ज्ञान देणारें वर्णन वर आलेंच आहे. एखादा मनुष्य पाण्यांत पडल्यावर तो पोहणारा नसला तरी अंतःप्रेरणेनें प्राण रक्षणार्थ त्याचे हातपाय स्वभावतःच हालले जातात व तोहि नंतर अधिक हालविण्याविषयीं धडपडतो; परन्तु कड गाठीपर्यंत आपल्याला किती, आणि कोणत्या कोणत्या

अडचणी येतील, व त्यांतून कसें निभावतां येईल हें अगदीं नवख्या आणि अकस्मात् प्रसंगानें भांबावलेल्याला सुचणें कठीण आहे; व तशा स्थितींत विचारहि करणें अशक्य आहे. तो धीट आणि दमाचा मनुष्य असेल तर येईल त्या अडचणीला तोंड देण्यास माघार घेणार नाहीं हें खरें आहे; पण कल्पनातीत प्रसंगांना तोंड देणें वेगळें आणि संभवनीय प्रसंगांची अटकळ बांधून तयारीने तोंड देणें वेगळे. पहिल्यांत आणि दुसऱ्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. पहिल्यांत बावरगाग आणि निधडा देखिल गलितधैर्य होण्याचा संभव पुष्कळ, तर दुसऱ्यांत अकुशल आणि साधारण देखिल तरण्याचा संभव पुष्कळ. हिंदी लोकांच्या मनांत एक मध्यवर्ती राष्ट्रीय मंडळ निर्मून राजकीय ऐक्य घडविण्याची कल्पना उद्भूत झाली होती विशिष्ट विशिष्ट परिस्थितींनी, आज ज्या तऱ्हेच्या राजकीय ऐक्याची आणि राष्ट्रमंडळाची आवश्यकता उत्पन्न झाली होती; ती तऱ्हा हिंदू लोकांना अननुभूत होती, पार्लमेंट सिनेट, काँग्रेस, राष्ट्रीय सभा, किंवा इतर कोणत्याहि लोकनियुक्त संस्थेकडून राज्यकारभार करवून घेण्याची पद्धत हिंदु लोकांना अगदींच नवीन होती हीच पद्धत आम्हांला स्वीकारली पाहिजे हें आम्हांला परिस्थितीनें शिकविलें होतें, व आम्ही शिकलोंहि होतों. परंतु या बाबींत पाण्यांत पडणाऱ्या आणि पोहतां न येणाऱ्या अगदीं नवख्या मनुष्याप्रमाणेंच आमची स्थिति होती, हें नाकबूल करतां येणार नाहीं. म्हणजे परिस्थितीनें आम्हांला धीट केलें होतें, एखाद्या अकल्पित अडचणीला तोंड देण्याइतका दमदारपणा अंगीं आला होता; परंतु हा अगदींच नवा मार्ग सुखा आहे कीं, खडकाळ आहे याची अटकळ बांधण्याची दूर दृष्टी आह्मांला आली नव्हती हें खास. परंतु आमचें भाग्य थोर होतें, राष्ट्रीय सभेसारखी संस्था काढून तिच्या द्वारें हिंदी सुशिक्षितांना कोणतें कार्य करावें लागेल याची समग्र आणि स्पष्ट कल्पना, त्या काळीं उभ्या हिंदुस्थानांत कोणाहि व्यक्तीला नव्हती, असें मात्र मुळींच नाहीं. सभोंवार पसरलेल्या आणि क्षणोक्षणीं आघात प्रत्याघातांनीं परिवर्तन पावणाऱ्या परिस्थितीचें पर्यवसान कोणत्या धोरणानें होण्याचा संभव आहे, किंवा तिला कोणत्या धोरणानें इष्ट वळण लावितां येईल हें अचुक ओळखणारा एक विशाल मेंदू, हिंदु-

स्थानच्या महद्भाग्यानें त्या काळच्या पिढीला लाभला होता. तो विशाल आणि खरा मुत्सद्दी मेंदू म्हणजे न्या. माधव गोविंद रानडे हा होय. १८७७ सालीं लिटनसाहेबांच्या दिल्लीदरबारचे वेळीं पुण्याच्या सार्वजनिक सभेमार्फत जें मेमोरियल गेलें आहे, तें न्या. रानडे यांच्या हातचें असून त्यांत भावि राष्ट्रीय सभेचें जे अक्षरश: चित्र रेखाटलें आहे तें पाहिलें म्हणजे त्यांच्या विशाल बुद्धीची, आणि परिस्थितीचें समग्र आकलन करून तिच्या भावि परिणामांची बरोबर अटकळ बांधण्याची त्यांच्या मुत्सद्दी दृष्टीची यथार्थ कल्पना येते. हिंदी प्रजा राजनिष्ठ आहे एवढेंच नव्हे, तर ती सरळ वृत्तीची आणि भावडी आहे. तिला राजकारणी डावपेच किंवा ब्रिटिश राजकारणांतले छक्के पंजे यांचा गंधहि नाहीं; लहान मूल, खऱ्या खोट्याची, किंवा शक्याशक्यतेची कल्पनाहि मनांत न आणतां जसें कोणाच्याहि गोड शब्दांवर भाळतें तशीच हिंदी लोकांची स्थिति आहे. विलायत सरकारनें वेळोवेळीं दिलेल्या आश्वासनावर आणि राणीच्या जाहीरनाम्यावर हिंदी प्रजा भाळली होती. परंतु दिलेलीं आश्वासनें सरकारनेंच फोल ठरविल्यामुळें आणि हिंदी जनतेंत जणूं मनुष्यपणाच नाहीं अशा समजुतीनें तिचा पदोपदीं चालविलेला अपमान इत्यादि कारणांनीं त्यांच्यांत उचंबळणाऱ्या कार्योन्मुख राजकीय वृत्तींचें यथार्थ ज्ञान, या मेमोरियलनें सरकारला दिलें होतें. देशांत उत्पन्न झालेल्या राजकीय जागृतीला क्षुद्रार्थ समजून तिकडे डोळेझांक केली, आणि सरकारनें कालानुरूप आपल्या धोरणांत कांहीं फरक न करतां घमेंडानें आजपर्यंतचेंच धोरण दडपून सुरू ठेविलें, तर लोकांतील आज कांहींशा अस्पष्ट स्वरूपांत दिसत असलेल्या जागृतीला कसकसें स्वरूप येत जाईल, व त्याची परिणति कशांत होईल हेंहि त्या मेमोरियलनें लिटनसाहेबांना आणि पर्यायानें ब्रिटिश मुत्सद्यांना स्पष्ट दाखविलें होतें. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे तें मेमोरियल राष्ट्रीय सभेची पत्रिकाच होती; आणि ती तयार करणारा हा राजकीय ज्योतिषी आपल्या विद्येंत पूर्ण वाकबगार आणि अनुभवी असल्यामुळें त्या पत्रिकेवरून वर्तविलेलें भविष्य, पुढें तंतोतंत प्रत्ययाला आलें. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अशा प्रकारें एक मध्यवर्ती राजकीय संस्था काढून राष्ट्राची संघशक्ति निर्माण करण्यास १८८५ सालीं देशाची सर्व बाजूंनी तयारी झाली होती. आजच्या

भव्य, जोमदार, आणि लोकमतनिदर्शक राष्ट्रीय सभेची इमारत उभारण्याचें सर्व साहित्य त्या वेळीं सिद्ध होतें. त्यांत आतां कोणत्याहि प्रकारचें न्यून राहिलें नव्हते. परंतु सर्व सामग्री किंवा तयारी हाताशीं असली तरी तिची योग्य जुळणी करून इमारत उठविणारा कारागीरहि कुशलच असावा लागतो. आणि हिंदुस्थानच्या सुदैवानें या राष्ट्राच्या इमारतीचा पाया भक्कम करून त्यावर आजची टोलेजंग इमारत उठविणारा कारागीर त्यावेळीं लाभलाहि. तो कारागीर म्हणजे हिंदी राष्ट्रीय सभेचा जनक याच नांवानें प्रसिद्ध असलेला मि. ए. ओ. ह्यूम हा होय. मि. ह्यूम हे आरंभीं हिंदुस्थान सरकारच्या होम डिपार्टमेंटचे सेक्रेटरी होते. आणि नंतर रेव्हेन्यू, अॅग्रिकल्चर आणि कॉमर्स डिपार्टमेंटसेच सेक्रेटरी होते. ते हिंदुस्थानची राजकीय प्रगति तीक्ष्ण, पण सहानुभूतीच्या नजरेनें पाहत होते. एखादी मध्यवर्ती राजकीय संस्था निघून हिंदी राजकारणाला व्यवस्थित स्वरूप मिळणें जरूर आहे येथपर्यंत हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीनें मजल मारतांच त्यांनीं आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला, ( १८८२ ) आणि लिटनशाहीनें देशांत उत्पन्न केलेल्या असंतोषाच्या भयंकर लाटेला परतविण्यासाठीं हिंदुस्थानच्या मूठभर राजकारणी पुरुषांनीं चालविलेल्या अस्ताव्यस्त प्रयत्नांना निश्चित स्वरूप देण्याकडे त्यांनीं आपलें सर्व लक्ष गुंतविलें. इंग्लंडांत रॅडिकल पार्टीला जन्म देणाऱ्या मि. ऑक्टेव्हन ह्यूमचे ते चिरंजीव होते. राजकीय चळवळीला संघटनात्मक रूप देऊन तिला सनदशीर अशाच मळलेल्या मार्गानें आणि रुळलेल्या पद्धतीनें कसें न्यावें, हें, त्यांना अवलोकनानें आणि अनुभवानें पूर्ण अवगत होतें. हिंदी लोकांच्या स्वभावाची आणि सरकारच्याहि स्वभावाची व वर्तनाची त्यांना पूर्ण ओळख होती. किती ताणलें तर सहन होतें आणि किती ताणलें तर तुटतें, याचें त्यांना अनुभवजन्य ज्ञान होतें. तेव्हां दोघांनाहि कल्याणप्रद होणारा मार्ग काढून हिंदी राष्ट्राच्या राजकीय चळवळीची इमारत भक्कम पायावर उभारण्यास त्या वेळीं मि. ह्यूमखेरीज कोणींहि योग्य मनुष्य मिळणें शक्य नव्हतें.

ब्रिटीश सरकाराशीं राजनिष्ठ राहून, पार्लमेंटनें वेळोवेळीं आखून दिलेल्या राज्यपद्धतीला, इंग्लंडांतल्या असो, किंवा हिंदुस्थानांतल्या असो कोणत्याहि

दर्जाच्या अधिकाऱ्यानें, धाब्यावर बसवून स्वतःचेंच वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न केला तर त्याला सनदशीर मार्गांनीं हाणून पाडण्यासाठीं, मि. ह्यूम प्रभृतींच्या प्रयत्नांनीं १८८४ च्या अखेरी अखेरीस "इंडियन नॅशनल युनियनची" स्थापना झाली; आणि १८८५ च्या मार्चमध्यें त्यांनीं याच युनियनतर्फे त्या सालच्या नाताळच्या सुट्टींत सर्व राष्ट्राच्या प्रतिनिधींची एक परिषद् बोलाविण्याचें नक्की ठरविलें. पुणें हें शहर मध्यवर्ती आणि सर्वांना विशेष सोइस्कर असल्यामुळें तेथेंच ही परिषद् भरवावी असें ठरून युनियननें एप्रिल महिन्यांत खालील मॅनिफेस्टो काढिला.

पुणें येथें १८८५ डिसेंबरच्या २५ ते ३१ तारखेपर्यंत "इंडियन नॅशनल युनियन"ची परिषद् भरविण्यांत येईल.

परिषदेंत बंगाल, मुंबई आणि मद्रास प्रांतांच्या सर्व भागांतील प्रमूख राजकारणी गृहस्थांचा, प्रतिनिधी म्हणून समावेश होईल. मात्र त्यांना इंग्लीश भाषा उत्तम अवगत पाहिजे.

( १ ) राष्ट्रीय प्रगतीसाठीं मनोभावानें प्रयत्न करणाऱ्या सर्व देशभक्तांत परस्पर विचारांची देवघेव व्हावी ( २ ) आणि येत्या वर्षी कोणता राजकीय कार्यक्रम हातीं घ्यावा या प्रश्नावर भवतीनभवती करून विचार निश्चित करणें; हे दोन, या परिषदेचे, मुख्य उद्देश होत.

ही परिषद् म्हणजे " हिंदी राज्यसभे " ( Native Parliament ) चा अप्रत्यक्ष पायाच आहे; आणि ही मुत्सद्दीगिरीनें ( if properly conducted ) अशीच यशस्वी होत गेली, तर थोड्याच दिवसांत कोणत्याहि प्रातिनिधिक संस्थांना हिंदुस्थान अद्याप अगदींच अपात्र आहे या राज्यकर्त्यांच्या भ्रामक समजुतीला विनतोड उत्तरच होईल. दुसरी परिषद् पुण्यांतच भरवावी कीं, ब्रिटिश असोसियेशनप्रमाणें प्रत्येक वर्षाची परिषद् देशांतल्या निरनिराळ्या मध्यवर्ती शहरांतून भरवावी हें या पहिल्या परिषदेंत ठरविलें जाईल.

या वर्षी परिषद् पुण्यास भरविण्याचें निश्चित झालें असल्यामुळें सार्वजनिक सभेच्या चिपळूणकर प्रभृतींनी स्वागतकमिटीचें काम आपल्या शिरावर

घेतलें आहे. अर्थातच सर्व स्थानिक व्यवस्था त्यांच्याकडे राहील. पर्वती-नजीक असलेल्या पेशव्यांच्या बागेंतच परिषदेची बैठक भरविण्याचा आणि प्रतिनिधींच्या राहण्याची व्यवस्था केली आहे. सर्व प्रतिनिधींनीं आपल्या सोई-प्रमाणें शहरांत निरनिराळ्या ठिकाणीं राहण्यापेक्षां अशातऱ्हेनें एकाच ठिकाणीं रहाण्यांत परस्परांतील स्नेहवर्धनाला पोषक असे प्रसंग फार येण्याचा संभव आहे, हें लक्षांत घेऊन वरील व्यवस्था मुद्दाम केली आहे.

प्रतिनिधींनीं पुण्यास येण्याजाण्याचा खर्च स्वतःच्या जबाबदारीवर करा-वयाचा आहे. परंतु पुणें स्टेशनवर प्रतिनिधी दाखल झाल्यापासून तों तो परत गाडींत बसेपर्यंत, गाडीघोड, राहण्यानिजण्याची व्यवस्था, जेवणखाण वगैरे सर्व मोफत दिलें जाईल.

हा होणारा सर्व खर्च 'पूना असोसिएशन' नें उभारलेल्या स्वागत फंडांतून केला जाईल; परंतु कोणा प्रतिनिधीनें या फंडाला कांहीं वर्गणी दिली तर तिचा स्वीकार करण्यांत येईल. या वर्गणींतून खर्च वगैरे वजा जातां कांहीं शिल्लक राहिली तर ती पुढील वर्षाच्या स्वागत फंडांत जमा केली जाईल

मुंबई इलख्यांतून ( सिंध, वऱ्हाड, पुणेंसुद्धां ) सुमारें २० प्रतिनिधी परिष-दला हजर राहतील; मद्रास इलाख्यांतून २०; आणि वायव्य प्रांत, अयोध्या आणि पंजाब यांतून साधारण १० प्रतिनिधी परिषदेला हजर राहतील असा अंदाज दिसतो "

येथील नोकरशाही, किंवा आंग्लो इंडियन यांच्या स्वभावाची, मि. ह्यूम यानां चांगलीच ओळख होती. राजकीय चळवळींत हिंदुस्थानचे पाय स्थिर होत आहेत असें दिसतांच त्यांचा कपाळशूळ उठेल आणि नाहीं नाहीं त्या कंड्या पिकवून या नवीनच जन्म पावणाऱ्या राष्ट्रीय सभेबद्दल, सरकारचें आणि ब्रिटीश जनतेचें मन कलुषित करण्यास ते मुळींच कमी करणार नाहींत, ही मि. ह्यूम यांना खात्री होती. ह्मणून पुढचें संकट टाळण्यासाठीं त्यानीं स्वतः इंग्लंडला जाण्याचा निश्चय केला होता. इंग्लंडला जाण्यापूर्वी त्यांनीं लॉर्ड डफरिनची ( हिंदुस्थानचे त्या वेळचे गव्हर्नर जनरल ) गांठ घेऊन त्यांना या नवीन संस्थेच्या कार्याची रूपरेखा समजावून दिली. लॉर्ड डफरिनची या कार्याला सहानुभूति होती, एवढेच

नव्हे, पण अशा तऱ्हेचा प्रयत्न करण्यास मि. ह्यूमना त्यांनींच प्रोत्साहन दिलें होतें. प्रांताप्रांतांच्या पुढाऱ्यांना एकत्र करून सामाजिक विषयांची चर्चा करावी आणि परस्परांत स्नेहभाव वाढवावा एवढाच हेतु राष्ट्रीय सभा भरविण्यांत मि. ह्यूमसाहेबांचा होता. परतु हिंदुस्थानांतले रीतिरिवाज, धर्म, रूढी आणि जाति हीं लक्षांत घेतलीं तर लोकांत सामाजिक एकवाक्यता होणें अशक्य आहे, असा लॉर्ड डफरीननीं आपला अभिप्राय व्यक्त करून, या राष्ट्रीय सभेंत राजकीय विषयां-चीच चर्चा करावी अशी त्यांनीं सूचना केली. लोकांच्या आकांक्षा काय आहेत हें राज्यकर्त्यांना समजणें आजच्या परिस्थितींत अगदींच अशक्य आहे; तेव्हां हिंदु-स्थानचें खरें मत सरकारला वेळोवेळीं समजेल अशी एखादी जबाबदार राज-कीय संस्था अस्तित्वांत येणें, हें सरकारच्या आणि लोकांच्याहि हिताचें आहे, ह्मणून देशांतल्या सर्व राजकारणी पुरुषांनीं वर्षांतून एकदां परिषद् भरवावी आणि राज्यपद्धतींत कोठें दोष आहेत व ते हिंदी लोकहिताच्या दृष्टीनें कसे सुधारले पाहिजेत हें त्यांनीं सरकारला दाखवून द्यावें, हें आपलें मत लॉर्ड डफरीननीं मि. ह्यूमजवळ बोलून दाखविलें होतें. किंबहुना राष्ट्रीय सभेच्या संस्थापनेच्या प्रत्यक्ष कार्याला लॉर्ड डफरीनची मदत आणि सल्ला विशेष कारणीभूत झाली असें ह्मणण्यास आधार आहे.

राष्ट्रीय सभेची ही आरंभीची येथवर सर्व तयारी करून मि. ह्यूम इंग्लंडला गेले तेथें त्यांनीं लॉर्ड रिपन, मि. जॉन ब्राईट, मि. आर. टी. रीड, ( लॉर्ड लोरबर्न ) लॉर्ड डलहौसी ( हिंदुस्थानच्या गव्हर्नरजनरलचा मुलगा. ) मि. बॅक्स्टर, मि. स्लॅग प्रभृति पार्लमेंटच्या सभासदांच्या आणि इतरांच्या भेटी घेऊन त्यांना हिंदुस्थानची परिस्थिति समजावून दिली. राष्ट्रीय सभेची संस्थापना आणि तिच्याकडून होणारें सनदशीर कार्य, याची त्यांना यथार्थ कल्पना करून देऊन तिच्या जन्माबरोबर तिला भेदरून सोडण्याकरितां आंग्लो इंडियनांकडून आणि हिंदुस्थानांतील गोऱ्या नोकरशाहीकडून कसें वादळ उठविण्यांत येईल याचीहि त्यांना बरोबर कल्पना करून दिली. मि. रीडच्या साहाय्यानें मि. ह्यूमनीं हौस ऑफ कॉमन्सच्या साधारण १५० सभासदांच्या भेटी घेऊन पार्लमेंटांत हिंदी प्रश्नांना विशेष चालन देण्याचें त्यांच्याकडून कबूल करून घेतलें. कांहीं

लिबरल पत्रांकडून युनियनचें वारंवार येणारे संदेशहि प्रसिद्ध करण्याची त्यांनीं व्यवस्था केली होती.

हिंदी राष्ट्रीय सभेवर आंग्लो इंडियनांकडून आणि नोकरशाहीकडून होणारा भयंकर हल्ला परतविण्यासारखा कोट इंग्लंडांत तरी भक्कम करून मि. ह्यूम नोव्हेंबरमध्यें हिंदुस्थानाला परत आले. त्या वेळीं परिषदेची सर्व तयारी जय्यत असून या नवीन राष्ट्र मंडळाला नांव काय द्यावें एवढाच वाद चालला होता. नॅशनल युनियन, नॅशनल कॉन्फरन्स, नॅशनल लीग, नॅशनल असेंबली, नॅशनल कॉंग्रेस, वगैरेसारखीं साधारणतः एकाच अर्थाची अनेक नांवें लोकांपुढें होती. यापैकीं आमच्या राष्ट्र मंडळाला कोणतेंहि नांव दिलें असतें तरी, कार्याच्या दृष्टीनें नफानुकसान कांहींच नव्हतें; परंतु पोषाखावरून देखिल मनुष्याची पारख करतां येते, त्याप्रमाणें नांवावरून देखिल संस्थेची पारख करणारे लोक जगांत आणि हिंदुस्थानांतहि होते. संस्थेचा उद्देश आणि तिच्या कार्याची दिशा, हीं तिचें नांव ऐकण्याबरोबर चटदिशीं ध्यानांत यावीं असें नांव योजण्यास योजकहि तशाच योग्यतेचा व सर्वव्यापी दृष्टीचा लागतो. हिंदी राष्ट्रीय सभेला नॅशनल "कॉंग्रेस" नांव देण्याची कल्पना न्या. माधव गोविंद रानडयांची आहे. कॉंग्रेस हें नांव अमेरिकेच्या प्राथमिक राष्ट्र मंडळाचें होतें. बाकीचीं सर्व नांवें टाकून अमेरिकेकडे धांव घेण्यांत, हिंदी लोकांच्या डोळ्यांपुढें एक अप्रतिम उदाहरण ठेवणें; आणि या संस्थेच्या कार्याचें स्वरूप सरकारला सहज समजावणें हीं दोन्हीं कार्यें. हिंदी राष्ट्रमंडळाला " कॉंग्रेस " हें नांव देण्यानें झालीं. अमेरिकेंतील ब्रिटिश सत्तेचा इतिहास तंतोतंत आमच्या इतिहासारखा नसला तरी त्यांत पुष्कळ साम्यता आहे. येथें राज्य करणारे ब्रिटिश आणि अमेरिकेंत राज्य करणारे ब्रिटिश एकच होते; अर्थात् परिस्थित्यनुरूप त्यांच्या, एथल्या राज्यपद्धतींत आणि तेथल्या राज्यपद्धतींत डावा उजवा प्रकार होता तरी त्यांचा जन्मस्वभाव थोडाच पालटला होता! अमेरिकेंतील त्या वेळची ब्रिटिश राज्यपद्धती कांहींशी वसाहतींतील राज्यपद्धतीच्या स्वरूपाची होती. तरी जेते या घमेंडींत जितांवर वरचढपणा राखण्यासाठीं किंवा त्यांना जरबेंत ठेवण्यासाठीं होणारे जुलूमजबरदस्तीचें प्रकार येथल्याप्रमाणें तेथेंहि कांहीं कमी केले जात नसत. त्याचाच परिणाम अमेरिकेची कॉंग्रेस



न्या. मू. महादेव गोविंद रानडे.

राष्ट्रीय सभेचे आद्य संस्थापक व प्रवर्तक.

ब्लॉक 'नवयुग' कडून.



न्या. मू. काशिनाथ त्रिंबक तेलंग

राष्ट्रीय सभेचे एक प्रवर्तक.

ब्लॉक 'महाराष्ट्र सारस्वता'कडून.

निर्माण होण्यांत झाला होता. त्या कॉंग्रेसच्या इतिहासांत खोलपर्यंत शिरण्याची येथें जरूर नाहीं; पण मुद्याची गोष्ट एवढीच कीं, आपलें स्वातंत्र्य मिळविण्यास ब्रिटिशांशीं दोन हात करतांना अमेरिकेनें अगोदर आपलें राष्ट्रमंडळ स्थापलें; आणि आरंभीं आरंभीं या मंडळाला अडचणी येऊन ब्रिटिशांचीच सरशी होत होती; तरी अखेर अमेरिकेच्या या राजकीय जागृतीपुढें ब्रिटिश सत्तेला नमावेंच लागलें. जेत्यांना गुलामाप्रमाणें वागविण्याच्या अतिरेकामुळें इतर भेदभाव विसरून राष्ट्र एक बनतें हें, आणि अमेरिकेनें उदाहरण देऊन ही संघटनात्मक राजकीय चळवळीची अजब शक्ति, दोघांच्याहि निदर्शनास " कॉंग्रेस " या नांवानें आणिली.

पहिल्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष स्थान लॉर्ड रे यांनीं स्वीकारावें असें ठरविलें होतें; पण एखाद्या वडया अधिकाऱ्यानें राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष होणें, हें वेळीं सरकारला आणि लोकांनाहि धोक्याचें आहे. सरकारी अधिकाऱ्यादेखत सरकारी कृत्यांवर टीका करण्यास, किंवा त्याचे दोष त्यांच्या तोंडावर बोलून दाखविण्यास लोकांना संकोच वाटेल, असें लॉर्ड डफरीनचें मत पडल्यामुळें तो विचार रहित झाला; परंतु राष्ट्रीय सभेला आरंभीं व्हाइसरायासारखा कांहीं उदार मनस्क वडया अधिकाऱ्यांची पूर्ण सहानुभूति होती हें यावरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे.

१८८५ चा नाताळ जवळ जवळ येत चालला. राष्ट्रीय सभेच्या बैठकीची सर्व तयारी अगदीं जय्यत झाली होती. परंतु त्याच सुमारास पुण्यांत कॉलऱ्याचा जोरानें उद्भव झाल्यामुळें राष्ट्रीय सभेच्या पहिल्या बैठकीचें स्थळ पुण्याहून मुंबईस बदलावें लागलें. पुणें हें राजकारणाचें केंद्रस्थान होतें. ब्रिटीश अमदानी पूर्वीचें महाराष्ट्राचें राजकारण पुण्यासच चाले, आणि ब्रिटिश अमदानींतहि न्या. रानडे प्रभृती राजकारणी पुरुषांनींहि पुणें हेंच राजकारणाचें केंद्रस्थान बनविलें होतें; आणि आतां सर्व हिंदुस्थानचें राजकारण चालविणाऱ्या राष्ट्रीय सभेलाहि जन्म देऊन आपल्या राजकीय वैभवावर सोनेरी कळस चढविण्याची अमूल्य संधि पुण्यासच मिळाली होती. परंतु पुण्याच्या दुर्दैवानें ती संधि मुंबईनें हिसकून घेतली.

हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांतला अत्यंत महत्वाचा दिवस, हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षांना सनदशीर स्वरूप देऊन अप्रत्यक्षपणें सरकारचें

मन अस्वस्थ करणाऱ्या आणि हिंदी शक्तीचें केंद्रस्थान बनविणाऱ्या संस्थेला जन्म देणारा दिवस, हिंदुस्थानचें बिनसरकारी पार्लमेंट अस्तित्वांत येण्याचा मंगल दिवस म्हणजे डिसेंबरची २८ तारीख उजाडली. राष्ट्रीय सभेसाठीं मुक्रर केलेल्या गोकुळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या इमारतींत २७ तारखे-पासूनच गडबड उडाली होती. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून आलेल्या प्रति-निधींनीं गोकुळदास तेजपाळ कॉलेज फुलून गेलें होतें. हिंदुस्थानची राजकीय शक्ति एकवटण्यास अगदीं अतुर झालेला प्रत्येक प्रतिनिधी हा उत्साहाची तेजस्वी मूर्तिमंत प्रतिमाच दिसत होता. त्या दिवशीं संध्याकाळीं सर्व प्रतिनिधींचें आणि या राष्ट्र कार्याला आपली सहानुभूति, व अप्रत्यक्षपणें पाठिंबा आहे असेंच सांग-ण्यासाठीं आलेल्या ऑ. सर विल्यम वेडरबर्न, जस्टिस जॉर्डिन, कर्नल फिलिप्स, प्रो. वर्डस्वर्थ प्रभृतींचें राष्ट्रीय सभेच्या स्वागत मंडळानें थाटाचें स्वागत केलें.

दुसरे दिवशीं म्हणजे सोमवार ता. २८ रोजीं दोनप्रहरीं १२ वाजतां गोकु-ळदास तेजपाळ कॉलेजच्या भव्य दिवाणखान्यांत पहिल्या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली* त्या वेळीं मि ए ओ. ह्यूम, न्या. माधव गोविंद रानडे. न्या. काशिनाथ त्रिंबक तेलंग, दादाभाई नवरोजी, सर दिनशा एद-लजी वाच्छा, मि, डी. एस्. व्हाइट ( युरेशियन असोसिएशनचे अध्यक्ष ), दिवाण बहादूर रघुनाथराव, नरेंद्रनाथ सेन, उमेशचंद्र बानर्जी, आपटे, आगरकर, सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, सर फेरोजशहा मेथा, सर नारायण गणेश चंदावरकर, चिपळूणकर, नूलकर, मि. रहिमतुल्ला सयानी, प्रो. रंगया नायडू, ( मद्रास महाजन सभेचे अध्यक्ष ) एस. सुब्रह्मण्य अय्यर, वीर

---

* पहिल्या राष्ट्रीय सभेत एकंदर ७२ प्रतिनिधी हजर होते. त्यांची वर्गवारी अशी आहे—कलकत्ता ३. मुंबई १८, मद्रास ८, कराची २, विरमगांव १, सुरत ६, पुणे ८, आग्रा २, बनारस, १ सिमला १, लखनौ ३, अलहाबाद १, लाहोर १, अंबाला, १, आमदाबाद ३, बहिरामपूर ( मद्रास ) १, मच्छलीपट्टण १, चिंगलपट १, तंजावर २ कुंभकोण १, मदुरा १, तिनवेल्ली १, कोईमतूर १, सेलम १, कडाप १, अनंतपूर १, आणि बल्लारी १.

राघव चारीअर, पी. आनंदा चार्लु वगैरे वगैरे प्रमूख मंडळी हजर होती. ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, सार्वजनिक सभेचें त्रैमासिक, मराठा, केसरी, इंडियन मिरर, हिंदुस्थानी ट्रायब्यून, इंडियन युनियन, इंडियन स्पेक्टेटर, हिंदू क्रीसेंट, इत्यादि प्रमुख पत्रांचें संपादकहि हजर होते.

मि. ए. ओ. ह्यूम यांनी मि. उमेशचंद्र बानर्जी यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें असा ठराव आणिला. त्याला ऑ. सुब्रम्हण्य अय्यर आणि न्या. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांनीं अनुमोदन व पुष्टी दिल्यावर अध्यक्ष मि. बानर्जी स्थानापन्न झाले.

अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत राष्ट्रीय सभेचे हेतु खालीलप्रमाणें सांगितलें

( १ ) देशांतल्या निरनिराळ्या भागांत राष्ट्रोन्नतीकरितां अंतःकरणपूर्वक झटणाऱ्या विभूतींत सलोखा आणि प्रेम वाढावें. ( २ ) अशा सहवासानें राष्ट्रभक्तांमधील जात, धर्म, पंथ, किंवा स्थानिक बाबतींतील मतभेद दूर करून सर्वांत ऐक्यभावाची वृद्धि करावी आणि लॉर्ड रिपन यांच्या संस्मरणीय कारकीर्दीनें उद्भूत झालेली एक राष्ट्रीयत्वाची भावना दृढतर व्हावी (३) देशांतील सामाजिक प्रश्नांवर चर्चा करून सुशिक्षित लोकांचीं मतें निश्चित करून तीं एकत्र करणें; आणि ( ४ ) पुढील वर्षीं राष्ट्रोन्नतीसाठीं राष्ट्रभक्तांनीं कोणतें काम करावें हें ठरविणें. नंतर त्यांनीं आपल्या छोट्याशा भाषणांत हिंदुस्थानच्या राजकीय जागृतीची प्रगति थोडक्यांत सांगून, येथील राज्यपद्धति इंग्लंडच्या राज्यपद्धतीप्रमाणें ठेवण्याचे ध्येय असावें व त्याला अनुसरून लोकांना राज्यकारभारांत योग्य भाग द्यावा या मुद्यांवर जोर दिला होता.

या पहिल्या राष्ट्रीय सभेंत एकंदर नऊ ठराव पास झाले. " हिंदुस्थानच्या राज्य व्यवस्थेची चौकशी करण्यास एक रॉयल कमिशन नेमण्याचें सरकारनें ठरविलें होतें त्याप्रमाणें कमिशन नेमून चौकशी व्हावी " हा पहिला ठराव मद्रासच्या " हिंदू " पत्राचे संपादक मि. जी. सुब्रह्मण्य अय्यर यांनी पुढें आणला. ईस्ट इंडिया कंपनी २० वर्षांनीं अशी एकवार चौकशी करीत असे, परंतु १८५८ सालीं महाराणीनें आपल्या हातांत राज्यकारभाराचीं सूत्रें घेतल्यापासून अजून

अशा तऱ्हेची चौकशी केली नाहीं; हा मुद्दा त्यांनीं आपल्या भाषणांत विशेष तऱ्हेनें मांडला.

" हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीस हल्लीं जें कौन्सिल देण्यांत आलें आहे, तें अजीबात काढून टाकावें " हा दुसरा ठराव सार्वजनिक सभेचे मि. चिपळूणकर यांनीं पुढें आणला. आमच्यावर महाराणी राज्य करीत नसून येथून नोकरी करून गेल्यावर वृद्धापकाळीं हिंदुस्थानचें पेनशन खात बसलेले आंग्लो इंडियनच राज्य करीत आहेत, हें त्या कौन्सिलाचें यथायोग्य वर्णन त्यांनीं आपल्या ठरावावरील भाषणांत केलें. याच ठरावावर मि. आनंदाचार्लू, न्या. माधव गोविंद रानडे, सर फेरोजशहा मेथा यांचीं भाषणें होऊन ठराव पास झाला.

" वरिष्ठ व प्रांतिक कौन्सिलांचे हक्क वाढविण्यांत यावेत, लोकनियुक्त सभासदांची संख्या अधिक असावी, सर्व अंदाज पत्रकांचा विचार या कौन्सिलांनी करून मंजूरी द्यावी सरकारच्या राज्यकारभाराविषयीं चौकशीप्रश्न करण्यास सभासदांना अधिकार असला पाहिजे, पंजाब आणि वायव्य प्रांत येथें कौन्सिलें स्थापन व्हावीं, आणि हौस ऑफ कॉमन्सची एक कायमचीच कमेटी नेमून येथील सरकारविरुद्ध कौन्सिलानें बहुमतानें एखादी तक्रार केली तर तिचा तिनें योग्य विचार करावा " हा तिसरा ठराव ऑ. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांनीं पुढें आणला. या ठरावाला ऑ. एस. सुब्रह्मण्य अय्यर आणि दादाभाई नवरोजी यांनीं अनुमोदन पुष्टी दिल्यावर तो पास झाला.

" वरिष्ठ प्रतीच्या नोकरींकरितां, इंग्लंडांत आणि येथें एकाच वेळीं परीक्षा घेण्यांत याव्यात, सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेस बसण्याची वयोमर्यादा किमान पक्षीं २३ असावी, आणि सिव्हिल सर्व्हिसकरतांच राखून ठेवलेल्या जागा खेरीज करून बाकीच्या सर्व जागा येथेंच परीक्षा घेऊन भराव्यात " हा चवथा ठराव; ऑ. दादाभाई नवरोजी यांनीं पुढें आणला, आणि मि. डी एस. व्हाइट यांनीं पुष्टी दिली. ठराव एकमतानें पास झाला.

" दिवसेदिवस वाढत्या लष्करी खर्चाला आळा घालावा " आणि " आयात मालावर जकात बसवून आणि मोठमोठ्या पगारांच्या सरकारी नोकरांवर इनकमटॅक्स बसवून लष्करी खर्च भागवावा " हे ५ व ६ ठराव मद्रा



ना. दादाभाई नवरोजी.

अध्यक्ष २ री राष्ट्रीय सभा, कलकत्ता सन १८८६,
९ वी राष्ट्रीय सभा लाहोर सन १८९३. व २२ वी
राष्ट्रीय सभा कलकत्ता सन १९०६.



बाबु उमेशचंद्र बानर्जी.

अध्यक्ष, १ ली राष्ट्रीय सभा मुंबई सन १८८५.

व ८ वी राष्ट्रीय सभा अलाहाबाद सन १८९२.

सच्या मद्राजन सभेचे अध्यक्ष मि. रंगय्या नायडू यांनीं पुढें आणले. सरकारनें हल्लींचें लष्करी धोरण बदलून देशी लष्कर सुधारण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे; आणि हिंदी लोकांना स्वयंसेवक म्हणून नांवें नोंदविण्यास उत्तेजन दिलें तर इंग्लीश सोल्जरांची जरूरच लागणार नाहीं हा त्यांचा महत्वाचा मुद्दा होता. या ठरावावर पुष्टीदाखल बोलतांना मि. दि. ए. वाच्छा यांनीं आजपर्यंतच्या सरकारच्या लष्करी धोरणाचें सिंहावलोकन करून हिंदुस्थानच्या डोक्यावर लादलेली ही धोंड किती अन्यायाची आणि बोजड आहे हें त्यानीं विशद केलें. हाहि ठराव एकमतानें पास झाला.

" उत्तर ब्रम्हदेश खालसा करूं नये आणि केलाच तर तो हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांत न ठेवतां ती स्वतंत्र कॉलनी करावी " हा सातवा ठराव होता.

" राष्ट्रीय सभेचीं परंपरा कायम ठेवण्यासाठीं या सभेंत पास झालेले ठराव देशांतल्या राजकीय संस्थांकडे पाठवून द्यावे व त्यांनीं आपल्या प्रांतांत, या खल झालेल्या प्रश्नांचा लोकांत फैलाव करावा हा आठवा ठराव होता.

" पुढची राष्ट्रीय सभेची दुसरी बैठक कलकत्यास भरवावी " हा नववा आणि शेवटचा ठराव पास झाल्यावर पहिल्या राष्ट्रीय सभेचें काम संपलें.

# प्रकरण ४ थें.

## उत्क्रांतीची पहिली अवस्था.

ग्रहांची दशा किंवा साडेसाती प्रत्येकाच्या पाठीमागें अवश्य लावून ठेवण्यांत मनुष्याला निष्कारण त्रास देऊन घटकाभर आपली करमणूक करावी, असला बालीश उद्देश, परमेश्वराचा नसून त्याहून कांहींतरी दुसरा उदात्त आणि मनुष्याचें निरंतर कल्याण करण्याचा त्याचा उद्देश त्याच्या मुळाशीं असतो. सोनें चांगलें तावून सुलाखून निघाल्याखेरीज त्याची खरी पारख होत नाहीं त्याप्रमाणें निरनिराळ्या बऱ्या वाईट प्रसंगांतून टक्के टोणपे खाऊन पार पडल्याखेरीज मनुष्याच्या बुद्धीची आणि शक्तीची पारख होत नाहीं. मनुष्याची शक्ति आणि आत्मविश्वास वाढविणाऱ्या, अशा बऱ्या वाईट प्रसंगांना ज्योतिषशास्त्राच्या भाषेंत ग्रहदशा म्हणतात आणि त्यालाच व्यवहारांत साडेसाती हा व्यंजक शब्द योजतात. ग्रहदशा प्रत्येकाला असते, याच त्रिकालबाधित सिद्धांताचें रूपांतर वाङ्मयाच्या गंभीर भाषेंत "प्रगतीचा मार्ग नेहमीं संकटांनीं भरलेला असतो" असें करण्याची रूढी आहे सर्वांचा आशय आणि अर्थ एकच. ग्रहदशा असो, साडेसाती असो, किंवा संकटें असोत; बल आणि आत्मविश्वास वाढविण्यास तीं अवश्य आहेत, हें जगाच्या अनुभवानें वज्रलेप करून ठेविलें आहे. म्हणजे याचाच निराळ्या शब्दांत अर्थ करावयाचा झाला तर आपल्याला ग्रहदशा येणें किंवा आपल्या मार्गांत संकटें येणें हें भाग्याचेंच लक्षण आहे असें म्हटलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें तर हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म अत्यंत शुभ वेळीं झाला; तिचे सर्व जन्मग्रह उच्चीचेच होते असें म्हणावें लागतें.

मुंबईस भरलेल्या सभेनें हिंदी राष्ट्रीयसभेला जन्म दिला तरी तिला खरें प्रातिनिधिक स्वरूप आलें कलकत्त्याच्या १८८६ च्या दुसऱ्या राष्ट्रीयसभेपासून. या परिषदेला आलेले ४०६ प्रतिनिधी त्या त्या प्रांतांतील राजकीय संस्थांनीं किंवा जाहीर सभा भरवून लोकांनीं आपले विश्वासू म्हणून निवडलेले असे होते. प्रतिनिधींचें स्वागत करण्यास एका जबाबदार मनुष्याच्या

नेतृत्वाखालीं स्वतंत्र स्वागत मंडळ नेमण्याची आणि स्वागताध्यक्षानें स्वागत-पर भाषण करण्याची पद्धत याच बैठकीपासून सुरू झाली. कलकत्त्याच्या या बैठकीचे स्वागताध्यक्ष ब्रिटिश इंडियन असोशिएशनचे आधारस्तंभ आणि प्रेसिडेंट डॉ० राजेंद्रलाल मित्र हे होते; व अध्यक्षाच्या स्थानीं दादाभाईंची योजना झालेली होती. या बैठकींत मुंबईच्या बैठकीपेक्षां अधिक उत्साह आणि कार्यबाहुल्य दिसून येत होतें आणि तें साहजिकहि आहे. न्याय आणि अमल बजावणी हीं खातीं वेगळी वेगळीं असावींत आणि न्याय कोर्टांतून ज्यूरीची पद्धत सुरू करावी; हे या बैठकींतले नवीन आणि विशेष महत्त्वाचे ठराव होते. या ठरावावरील चर्चाहि मुद्देसूद आणि सांगोपांग झाली पब्लिक सर्व्हिस-सारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर तज्ज्ञांची कमिटी नेमण्याचा उपक्रम याच बैठकी-पासून झाला. राष्ट्रीय सभेला आणि राजकीय चळवळीला पोषक होणारी, या वर्षांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे, प्रांतिक कमिटया स्थापन होणें ही होय. बैठ-कीचें काम संपल्यावर लॉर्ड डफरीननी अध्यक्षांच्या नेतृत्वाखालीं गेलेल्या शिष्ट-मंडळाची मुलाखत घेतली; हाहि या बैठकीचा एक विशेष आहे.

राष्ट्रीयसभेची मद्रासची तिसरी बैठक उत्साह आणि कार्य या दोन्ही दृष्टींनीं पहिल्या दोनहि बैठकीहून अधिक महत्त्वाची झाली. या बैठकीचे स्वाग-ताध्यक्ष राजा सर टी माधवराव असून अध्यक्षस्थानीं बद्रुद्दीन तय्यबजींची योजना झाली होती. हिंदु मुसलमानांच्या ऐक्याला आज जोराचें चालन मिळाल्यामुळें तो प्रश्न विशेष डोळ्यापुढें येतो; एवढेंच हें राजकीय ऐक्य राष्ट्रीयसभेच्या पहिल्या बैठकीपासून आहे हें, त्या वेळीं हजर असलेल्या प्रतिनिधींकडून आणि तिसऱ्या बैठकीच्या अध्यक्षांच्या योजनेवरून स्पष्ट होण्या-सारखें आहे. या वेळीं राष्ट्रीय सभेसाठीं स्वतंत्र मंडप उभारला होता, याला तामीळ भाषेंत 'पेंडाल' म्हणतात आणि तोच शब्द पुढें राष्ट्रीयसभेच्या मंडपाला रूढ झाला. या बैठकीला प्रतिनिधींची संख्या सहाशेंहून अधिक होती.

हल्लींच्या विषयनियामक कमिटी ( Subject Committee ) चा जन्म मद्रासेस झाला, हा या बैठकीचा विशेष आहे. राष्ट्रीय सभेची घटना तयार करण्यास या राष्ट्रीय सभेंत एक कमिटी नेमली. राष्ट्रीय सभेला ज्या भावि संक-

टांना तोंड द्यावयाचें होतें, त्यांची अस्पष्ट छाया मद्रासेसच दिसून आली होती; तरी मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड कॉनेमरा यांनीं राष्ट्रीयसभेच्या शिष्टमंडळांना भेट आणि पाहुणचार देऊन हिंदी लोकांच्या राष्ट्रीय चळवळीविषयीं आपली सहानुभूति दाखविल्यानें, लोकांच्या मनावर तिचा परिणाम कांहींच झाला नाहीं. पुढील संकटाचें तें एक चिन्ह आहे ही जाणीव देखिल त्या वेळीं कोणाला उत्पन्न होणें शक्य नव्हतें. करांची वाढ आणि शिक्षण हे दोन ठराव या बैठकींत अधिक होते.

परंतु शिजत असलेलें दिसलें नाहीं, तरी शिजून तयार झाल्यावर त्याच्या वाफा कधीं दडून राहत नाहींत. मुंबईस भरलेल्या पहिल्या राष्ट्रीय सभेनें हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षांचें आणि राजकीय विचारजागृतीचें नुसतें केंद्रीकरण केलें, कलकत्त्याच्या बैठकीनें त्यांना सनदशीर आणि संघटनात्मक असें व्यवस्थित स्वरूप दिलें व मद्रासच्या तिसऱ्या बैठकींत तिचा खरा राष्ट्रीयपणा आणि लोकांच्या वाढत्या उत्साहानें तिला येणारा खंबीरपणा हीं स्पष्ट दिसून आलीं. हिंदी राष्ट्रीय सभा अस्तित्वात येणें हेंच मुळीं येथल्या नोकरशाहीला चीड आणणारें होतें, त्यांत तिला राष्ट्राचें प्रातिनिधीत्व आणि स्थायिकपणा येणार असें दिसतांच त्यांच्या अंतःकरणांत धुसफुसणाऱ्या ज्वालांचे वाफारे बाहेर पडूं लागावेत हें साहजिकच आहे. दुसऱ्याच बैठकीच्या वेळीं लंडन टाईम्सनें "राष्ट्रीयसभा ह्मणजे हिंदुस्थानांतल्या असंतुष्ट आणि देशांत ज्यांना काडीचीहि किंमत नाहीं अशा मूठभर लोकांची आहे (Merely an affair of discontented place-seekers-men of straw, with little or no stake in the country) अशा तऱ्हेचे उद्गार काढून येथल्या अप्रतिहत सत्तेला चटावलेल्या नोकरशाहीचें आणि इंग्लंडांतल्या, जगांतील ब्रिटिश सत्ता ह्मणजे फक्त इंग्लंडांतील लोकांच्याच उन्नतीसाठीं आणि सुखसोईसाठीं परमेश्वरानें निर्माण केली आहे असें ह्मणणाऱ्या साम्राज्यवादी पक्षाचें मत बरोबर दाखविलें होतें.

दगडाला देवपणा आणण्यासाठीं टाकीचे घाव घालणारा गवंडी निष्ठुरच असावा लागतो. राष्ट्रीयसभेला अगदींच बाल्यावस्थेंत येथल्या नोकरशाहीशीं



ना. बद्रुद्दीन तय्यबजी.

अध्यक्ष, ३ री राष्ट्रीय सभा मद्रास सन १८८७.

J.A.P.W.



**मि. जॉर्ज यूल.**

अध्यक्ष, ४ थी राष्ट्रीय सभा अलाहाबाद सन १८८८.

तोंड देण्याची दैवी शक्ति प्राप्त करून देणारा हा निष्ठुर गवंडी परमेश्वरानें आधींच निर्माण करून ठेविला होता तो गवंडी म्हणजे संयुक्त प्रांताचे त्या वेळचे ले. गव्हर्नर सर ऑकलंड कॉलव्हीन हे होत.

चवथी राष्ट्रीय सभा आलहाबादेस भरण्याचें ठरलें होतें. हिंदुस्थानच्या संघटनात्मक राजकीय चळवळीला भेदरून जाऊन तिच्या अंगांत स्वतःच्या पायावर उभें राहण्याची ताकत आली नाहीं तोंच तिला गाडून टाकण्याची सर ऑकलंडनें, म्हणजे पर्यायानें येथल्या नोकरशाहीनें निश्चय केला. पण त्यांची कल्पना साफ चुकली होती, हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीचें मूळ खुडण्यास एखादा बोंथट चाकूच पुरे आहे, अशा समजुतीनें ते सरसावून पुढें आले होत. पण अखेर त्यांना राष्ट्रीयसभेबरोबर युद्धच पुकारावें लागलें; आणि नोकरशाहीच्या शस्त्रांचे घाव सोसण्याइतकी राष्ट्रीयसभेची, आणि राष्ट्रभक्तांची तयारी झाली आहे हें, पहिल्याच चकमकींत, अलाहाबादच्या राष्ट्रीयसभेचे स्वागताध्यक्ष पंडित अयोध्यानाथ यांनीं सिद्ध केलें.

अलाहाबादेस राष्ट्रीयसभेची बैठकच भरूं द्यावयाची नाहीं; असा सर ऑकसाहेब यांचा डाव होता. राष्ट्रीयसभेचा मंडप उभारण्यासाठीं स्वागत मंडळानें आरंभीं खुसरू बागेची योजना केली होती; तिला सरकारनें हरकत घेऊन फोर्टजवळ उघड्या मैदानांत त्यांना जागा दिली; परंतु चार महिन्यांनीं सर ऑकलंडांनीं तेथूनहि त्यांची हाकलपट्टी केली. तेव्हां स्वागत मंडळानें आपल्या कांहीं स्नेह्याचींच घरें घेऊन तेथें राष्ट्रीयसभा पार पाडण्याचें ठरविलें. ह्या खासगी जागेंत तरी सरकारला कांहीं करतां येणार नाहीं अशी पंडित अयोध्यानाथांची समजूत होती, परंतु तूं नाहीं तर तुझ्या बापानें म्हणण्यास तयार असलेल्या सर ऑकलंडाना येथूनहि राष्ट्रीयसभेची उचलबांगडी करण्यास संधि मिळाली. हीं घरें ‘ पायोनियर ’ ऑफीसलगत असून शिवाय कॅन्टोनमेंटच्या हद्दींत होतीं. पायोनियरला या ‘ काळ्या ’ सभेच्या गलबल्याचा भयंकर त्रास सहन होण्यासारखा नव्हताच; त्यांत आणखी लष्करी अधिकाऱ्यांची डोकीं उठणारच होतीं; तेव्हां येथूनहि आपला तळ हलविण्यास राष्ट्रीय सभेच्या स्वागत मंडळाला हुकूम मिळाला. डिसेंबर तर अगदीं जवळ येत चालला होता, आणि सभेची तर

कांहींच तयारी नाहीं. सर ऑकलंडसाहेब आणि त्यांचें सरकार आतां आपला डाव साधणार या घमेंडीत चिमलेल्या चाटोत होते, तोंच त्यांच्या विजयाला दरभंग्याचे महाराज सर लक्ष्मेश्वरसिंग यांनीं जोराची थप्पड दिली. त्यांनीं ताबडतोब गव्हर्नमेंट हौस समोरच असलेला 'लोदर कॅसल' खरेदी करून राष्ट्रीय सभेच्या कार्यासाठीं पंडित अयोध्यानाथांच्या स्वाधीन केला; आपण अधिकारानें मिळविलेला जय अशा ऐन वेळीं एका राष्ट्रभक्तानें हिसकून घेतला एवढेच नव्हे तर आपल्या नाकावर टिचण्यासाठींच कीं काय, आपल्या तोंडासमोर राष्ट्रीयसभा भरणार हें पाहून राष्ट्रीयसभेच्या थोडें आधीं दूरच्या निमित्तानें सर ऑकलंडानीं अलाहाबाद सोडलें.

आपल्या तडाख्यांत सांपडलेल्या या राष्ट्रीयसभेला सतावण्याचा एवढाच उपाय करून सर ऑकलंड राहिले नाहींत. राष्ट्रीयसभा म्हणजे देशांत असंतोष पसरवणाऱ्या अराजक बंडखोरांची टोळी आहे असें ते वर्तमानपत्रांतून उघड उघड प्रतिपादूं लागले. हिंदी राजकीय चळवळीविषयीं आधींच अनुदार असलेल्या आणि तिचें ओरखडें काढण्यास टपून बसलेल्या अँग्लो इंडियन पत्रांनीं त्यांची तळी चांगलाच उचलून धरली मि. ए. ओ. ह्यूम यांनीं सर ऑकलंडच्या प्रत्येक आक्षेपाचें निरुत्तर हाण्यासारखें खंडन केलें होतें. इलबर्ट बिलाला हाणून पाडण्यासाठीं आंग्लो इंडियनांनीं तावडतोब आपल्या संस्था स्थापल्या होत्या; तशाच याहि चळवळीला दडपून टाकण्यासाठी त्यांनीं ऍन्टी-कॉंग्रेस संस्था अस्तित्वांत आणल्या. लॉर्ड रिपनसारखा खंबीर ममाचा आणि नोकरशाहीची मर्जी खप्पा झाली तरी बेहत्तर, पण हिंदी लोकांच्या न्याय्य आणि सनदशीर चळवळीला पाठिंबा द्यावयाचा अशा निश्चयाचा व्हाइसराय त्या वेळीं येथें असता तर त्याची उचलबांगडी करणारा गुप्त कटहि अस्तित्वांत आला असता. राष्ट्रीयसभेला लॉर्ड डफरीन साहेबांची किती विलक्षण सहानुभूति होती हें त्यांच्या मि. ह्यूम साहेबाशीं झालेल्या संभाषणावरून चांगलेंच व्यक्त होतें. कलकत्त्याच्या दुसऱ्या बैठकीच्या वेळीं त्यांनीं राष्ट्रीयसभेच्या शिष्टमंडळाला 'सन्मान्य' पाहुणे म्हणून गार्डनपार्टी देण्यानेंहि त्या सहानुभूतीला उजाळा दिला होता. प्रांतिक अधिकारी देखिल या चळवळीकडे सहानुभूतीनें पाहत होते, हें मद्रासच्या बैठकीच्या

वेळीं मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड कॉनेमरा यांनीं राष्ट्रीयसभेच्या शिष्टमंडळाची मुलाखत घेऊन लोकांच्या निदर्शनास आणलें होतें. विलायतेंतहि मि. ग्लॅडस्टनसाहेबांनीं हिंदी लोकांच्या या राजकीय महत्वाकांक्षांकडे डोळेझांक करून किंवा त्यांचा उपहास करून भागणार नाहीं ( It will not do for us to treat with contempt or even with indifference the rising aspirations of this *great people*) असे उद्गार काढून या चळवळीविषयींचें आपलें उदार धोरण जाहीर केलें होतें. राष्ट्रीयसभेच्या तीन बैठकी होईपर्यंत तिला लहानमोठ्या अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीचा पोषक असा वारा मिळाला; पण चवथ्या बैठकीपासून या वाऱ्याची दिशा पश्चिमेकडून एकदम पूर्वेकडे कां झाली याची कारणपरंपरा फार खोल नाहीं.

कांहीं विशिष्ट प्रगतिप्रिय आणि उदारमनस्क अधिकाऱ्यांखेरीज सगळेच आंग्लोइंडियन या चळवळीला पाण्यांत पाहत होते. तिच्यावर घाव घालण्यास ते एखाद्या चांगल्याशा संधीची वाटच पाहत होते. सर ऑकलंडसारख्या बड्या अधिकाऱ्यांनीं या चळवळीवर हल्ले करण्याचें धुरीणत्व पत्करण्याबरोबर बाकीच्यांनीं त्यांना मिळून या हल्ल्यांना इतका रंग चढविला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. नोकरशाहीनें देखिल बरीच कारवाई केली. एकट्या पंजाबांत त्या एका सालीं ५१६ हजार लोकांकडून शांतता राखण्याबद्दल जामीन मागितले होते. लॉर्ड डफरीनसारख्या राष्ट्रीय सभेच्या पूर्ण पुरस्कर्त्याला आपल्या गोटांत ओढलें आणि लॉर्ड डफरीनहि त्यांच्या जाळ्यांत सापडून त्यांनीं कलकत्यास सेंट अँड्र्यूजच्या डिनरच्या वेळीं आपल्या भाषणांत राष्ट्रीय सभेवर सर ऑकलंड प्रभृतींनीं केलेल्या आरोपांचा सूर ओढला; परंतु ती त्यांच्यावर नोकरशाहीची सक्तीच झालेली असावी असें दिसतें. कारण, लंडन टाइम्सनें त्यांच्या भाषणाचा रिपोर्ट प्रसिद्ध केला होता, तो वाचून मि. चार्लस ब्रॉडलॉच्या अंगाचा संताप झाला, आणि त्यांनीं लागलींच लॉर्ड डफरीनसाहेबांची चांगलीच खरडपट्टी काढली. मि. चार्लस ब्रॉडलॉनीं आपल्या भाषणांत लॉर्ड डफरीनसाहेबांचा राष्ट्रीय सभेवरील प्रत्येक आरोप इतक्या मुद्देसूद रीतीनें खोडून काढला होता कीं, त्यांना उत्तर देण्याला जागाच राहिली नव्हती. आपली बाजू समर्थन करण्यासाठीं लॉर्ड डफरीननीं

चार्लस ब्रॅडलॉना जें पत्र लिहिलें त्यांत ते म्हणतात "राष्ट्रीय सभेबद्दल गैरसमज उत्पन्न करण्यासारखें मी कांहीं बोललों नाहीं; तिच्याबद्दल माझी पूर्ण सहानुभूति आहे. हिंदी लोकांना अधिकाराच्या जागा मिळाव्यात अशी माझी खटपट आहे. ( याच उद्देशानें त्यांनीं इंडियन सिव्हिल सर्व्हिस कमिशन नेमलें होतें. ) आणि प्रांतिक कौन्सिलें पूर्ण लोकनियुक्त झालीं पाहिजेत असेंच माझेंहि मत आहे."

राष्ट्रीय सभेचा सर ऑकलंड कॉलव्हीन यांनीं इतका पाठपुरावा केला तरी सुरेंद्रनाथ बानर्जींनीं त्यांचे भरसभेंत आभारच मानले. ही भावि यशाची पूर्व-चिन्हें आहेत, असाच त्यांनीं सर ऑकलंडांच्या या विरोधाचा अर्थ केला आणि तो खराहि आहे. सरकारला झोंबणाऱ्या कोणत्याहि नवीन चळवळीला आणि तिच्या जनकाला किंवा पुरस्कर्त्यांना राजद्रोही, बंडखोर, देशघातकी, वगैरे शेलकीं विशेषणें लावण्याचीं पद्धत सगळ्या जगाचीच आहे. आज सुधारणेच्या शिखरावर जाऊन बसलेल्या इंग्लंडला देखिल हा कडू अनुभव नाही असें नाहीं. रेफॉर्म बिल, कॅथॉलिक इमॅन्सिपेशन बिल, ॲन्टी स्लेव्हरी ॲजिटेशन, ॲन्टी कॉर्न लॉ लीग, वगैरेसारख्या प्रसिद्ध चळवळींचा इतिहास असाच आहे. त्यांच्या जनकांना आणि पुरस्कर्त्यांना अशाच प्रकारच्या संकटांना तोंडें द्यावीं लागलीं आहेत. देशद्रोही, किंवा बंडखोर ह्मणून त्यांनाहि तुरुंगवास पत्करावे लागले आहेत; पण प्रत्येक चळवळ धिमेपणानें कां होईना यशस्वीच झाली आहे. आपल्या हातांतील सत्ता सोडण्याला नाखूष असलेल्या सरकारनें या चळवळयांना दडपून टाकण्यास जे जे उपाय योजले, त्यांनीं त्यांच्या कार्यांत कांहींसा अडथळा झाला एवढेंच; पण त्या अडथळयांनींच त्यांच्या कार्याला नवा जोम आणला हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. जगांतल्या चळवळींचा हाच इतिहास हिंदुस्थानांत लिहिण्यास सर ऑकलंड कॉलव्हीन यांनीं सुरवात केली असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.

सर ऑकलंडसाहेबांच्या विरोधानें तर या बैठकीला फारच रंग आला होता. प्रत्येक प्रतिनिधीचा उत्साह दसपटीनें वाढला होता. कलकत्त्याच्या युरोपियन व्यापारी मंडळींचे पुढारी आणि व्यापारी संस्थांचे आधारस्तंभ मि. जॉर्ज यूल हे अध्यक्षांच्या स्थानीं विराजमान झाले होते. त्यांनीं आपल्या भाषणांत,



सर विल्यम वेडरबर्न.

अध्यक्ष, ५ वी राष्ट्रीय सभा मुंबई सन १८८९.




सर फेरोजशाह मेथा.

अध्यक्ष ६ वी राष्ट्रीय सभा कलकत्ता सन १८९०

सरकार ३० वर्षांपूर्वी जें हिंदी राष्ट्राला देऊं इच्छीत होतें तेंच राष्ट्रीय सभा आज मागत आहे, या मुद्यावर जोर दिला होता. कामाच्या वैचित्र्यानेंहि या बैठकीला महत्व आलें होतें. पोलीसांच्या दंडुकेशाहीला आळा घालण्यास विनंति करणारा ठराव या बैठकींत आला. शिवाय मद्यपान निषेध, कायम धारापद्धति, आणि मिठावरील कराची वाढ या संबंधाचे ठराव होते. लाला लजपतरायांचे राष्ट्रीय सभेंतील पहिलें भाषण याच बैठकींत झालें.

१८८९ सालीं मुंबईस सर विल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या ५ व्या बैठकीला मि. चार्लस ब्रॅडला यांच्या आगमनानें विशेष महत्व आलें. पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या वतीनें हिंदी प्रश्नांना नेहमीं चालन देणारे मि. ब्रॅडला त्या वर्षी हिंदी आकांक्षांची आणि त्यांच्या योग्यतेची प्रत्यक्ष ओळख करून घेण्यास येथें मुद्दाम आले होते. आपल्या या निस्वार्थ दोस्ताचें हिंदुस्थाननें अपूर्व स्वागत करून त्यास एक मानपत्र अर्पण केलें. या बैठकीला "ब्रॅडला बैठक"च म्हणतात. या बैठकींतहि राष्ट्रीय सभेच्या घटनेचा विचार झाला नाहीं; फक्त प्रतिवर्षी प्रतिनिधींच्या वाढत्या संख्येला मर्यादित करण्यासाठीं "प्रत्येक स्टँडिंग कॉंग्रेस कमिटीनें दर १० लाख लोकांस ५ प्रतिनिधी निवडून आपल्या भागांत त्यांची वाटणी करावी." अशा आशयाचा एक ठराव पास केला. याच वर्षी पंडित अयोध्यानाथ यांना जॉइंट जनरल सेक्रेटरी नेमलें आणि सेक्रेटरींच्या ऑफिस खर्चाकरितां म्हणून पांच हजार रुपयांची मंजूरी दिली. या बैठकींतली आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे, हिंदी राजकारणांत पुढें प्रामुख्यानें तळपणारे, पण परस्पर विरोधी, आणि हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत अजरामर झालेले ना. गोपाळ कृष्ण गोखले आणि लो० बाळ गंगाधर टिळक हे दोघेहि याच वेळीं राष्ट्रीय सभेमध्यें पहिल्यानदां आले, ही होय.

कलकत्त्यास १८९० सालीं सर फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या ६ व्या बैठकीला पूर्वीच्या सगळ्या बैठकींहून अग्रमान दिला पाहिजे. राजकीय चळवळ ह्मणजे बंड करणें नव्हे; किंवा राष्ट्रीय सभा ह्मणजे बंडखोरांचा अड्डा नव्हे हें सरकारला कबूल करण्यास लाविलें याच

बैठकीनें. या बैठकीवरहि चौथ्या बैठकीची बरीच छाया पडली होती. संयुक्त प्रांताचे ले. गव्हर्नर सर ऑकलंड कॉलव्हीन यांनीं राष्ट्रीय सभेच्या ४ थ्या बैठकीला ज्या तऱ्हेचा त्रास दिला त्याच तऱ्हेचा त्रास बंगालचे ले.गव्हर्नर सरचार्लस इलियट यानीं दिला नाहीं; पण प्रवृत्ति आणि हेतू दोघांचेहि एकच. हिंदी राजकीय चळवळीला आणि राष्ट्रीय सभेला गाडून टाकण्याचा दोघांचाहि हेतू एकच; फक्त दोघांनीं उपाय मात्र वेगळे वेगळे योजिले. सर ऑकलंडसाहेबांचा उपाय ह्मणजे झाडाच्या फांद्या तोडून झाड वाळविण्यासारखा होता. पण फांद्या तोडण्यानें झाड वाळण्याऐवजीं दुप्पट जोमानें वाढीसच लागलें हें त्यांच्या लक्षांत येतांचं बंगालाधिपतीनीं झाडाच्या मुळावरच घाव घालण्याचा असुरी उपाय योजला. तो घाव परतविण्याखेरीज राष्ट्रीय सभेला गत्यंतरच नव्हतें. ऑकलंडसाहेबांनीं राष्ट्रीय सभेशीं उघड लढाई चालविली होती, दोहों बाजूंच्या शौर्यादि आणि युद्ध कौशल्यावरच त्या लढाईतला जय अवलंबून होता; तो राष्ट्रीय सभेनें मिळविला. परंतु या वेळीं बंगालच्या गव्हर्नरांनीं कपटनीतीचा आश्रय करून शत्रू झोपीं गेला असतांना एकदम त्याच्या गोटांत शिरून त्याच्या मानेवर सुरी ठेवण्याचाच प्रकार केला. बैठकीच्या अगदीं एनवेळीं, बंगाल सरकानें आंग्लोइंडियन पत्रांतून एक सर्क्युलर प्रसिद्ध करून सरकारी नोकरांना राष्ट्रीय सभेंत प्रेक्षक ह्मणून देखिल हजर राहण्याची सक्त मनाई केली. ही मनाई हिंदुस्थान सरकारकडून करण्यांत आली आहे असाहि त्यांत खुलासा होता.

लोकमत तयार करणें किंवा कोणत्याहि चळवळीला योग्य मार्गानें नेण्याचे कार्य, सुशिक्षित वर्गानेंच करावें लागतें. त्या वेळचा हिंदुस्थानांतला बहुतेक सर्व सुशिक्षित वर्ग सरकारी नोकरींत अडकला होता. न्या. माधवराव रानडे, न्या. तेलंग वगैरेसारखे राष्ट्रीय सभेचे केवळ आधारस्तंभच सरकारचे नोकर होते. माधवराव रानडे तर राष्ट्रीय सभेचे जीवन होते. दोनचार वर्षांच्या अगदीं अल्पकालांत, तिनें आपल्या कायदेशीर आणि सनदशीर मागण्यांनीं हिंदुस्थान सरकारावर जो एवढा दरारा बसविला त्याला माधवरावांचेच श्रम आणि बुद्धि विशेष कारणीभूत आहे. राष्ट्रीय सभेला राजद्रोही ह्मणणें, बंडखोरांच्या टोळीचा अड्डा ह्मणणें, किंवा शिकारी कुत्र्याप्रमाणें तिचा पाठलाग करणें हें ऑकलंड, इलियट-

सारख्या अधिकाऱ्यांनीं चालविलें होतें; परंतु एखाद्या अध्यक्षाच्या, किंवा ठराव मांडणाऱ्याच्या भाषणांतील एखादा "राजद्रोहाचा तुकडा" काढून कोणाला तुरुंग दाखविल्याचें उदाहरण नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आरंभींचीं कांहीं वर्षें, सभेच्या अध्यक्षांचीं भाषणें, ठरावाचे मसुदे किंवा त्यावरील भाषणें, स्वतः माधवराव तयार करीत, किंवा दुरुस्त करीत; एवढेंच नव्हे तर ते ठराव कोणी आणावेत आणि त्यांना अनूमोदन पुष्टि कोणी द्यावी, यासाठीं देखिल योग्य मनुष्याची निवड तेच करीत; ही गोष्ट अगदीं गुप्त नसून, पुष्कळांना माहित आहे. अर्थात् ज्यांना ही गोष्ट माहीत आहे त्यांना बंगालसरकारच्या वरील सर्क्युलराचें आश्चर्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदी राजकीय चळवळीला गाडून टाकण्यास सरकारला या उपायाखेरीज दुसरा उपायच नव्हता, ह्मणून तिची शक्ति आपल्या आटोक्याबाहेर वाढली नाहीं, तोंच तिचा शिरच्छेद करण्यासाठीं सरकारनें हें ब्रह्मास्त्र तिच्या अगदीं बालपणींच योजिलें होतें. परंतु सरकारची ही कल्पना अगदीच भ्रामक होती. राष्ट्रीय सभेची शक्ति किती वाढली आहे, हें सर ऑकलंडसाहेबांच्या नजरेस आणतांना "उद्यां, राष्ट्रीयसभेचे प्रमुख प्रमुख असे दहा हजार पुढारी हद्दपार केलेत तरीं राजकीय चळवळ किंवा राष्ट्रीयसभा मरणार नाहीं इतकीं तिचीं मुळें आतां लोकांच्या अंतःकरणांत खोल रुजलीं आहेत; एवढेंच नव्हे, उलट तिच्यांत दहा हजारपटीनें अधिक जोम येईल." असें रिपोर्टांत स्पष्ट ह्मटलें होतें. सरकारला त्या वेळीं ती निव्वळ थट्टा वाटली असेल, किंवा लोकांच्या फाजील आत्मविश्वासाची ती दर्पोक्ति वाटली असेल; परंतु बंगाल सरकारच्या या वरील सर्क्यूलरानें, अधिकाऱ्यांचाहि हा भ्रम दूर केला आणि लोकानांहि आपली दर्पोक्ति किती यथार्थ आहे, किंवा आपल्या राजकीय चळवळींचें सामर्थ्य किती वाढलें आहे हें अजमावण्याची आणखी एक संधि मिळाली.

या सरक्युलरावर राष्ट्रीय सभेंत कडाक्याचा वाद झाला. मि. जॉर्ज यूल हे शांत डोक्याचे; पण तेहि सरकारच्या या अन्याय्य कृत्यानें संतापून गेले होते. शेवटीं राष्ट्रीय सभेनें एक ठराव करून या बाबतींत हिंदुस्थान सरकारकडून खुलासा मागविला. हा खुलासा करतांना, त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड

लॅन्सडौन यांनीं राष्ट्रीय सभा आणि तिची चळवळ पूर्ण कायदेशीर (Perfectly legitimate in itself) आहे असें स्पष्टपणें जाहीर केलें. खासगी लोकांनीं राष्ट्रीय सभेशीं संबंध ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं. फक्त सरकारी अधिकाऱ्यांनीं तिच्याशीं कोणत्याहि प्रकारें संबंध ठेवणें योग्य नाहीं. राष्ट्रीय सभा ही यूरोपांतील प्रगमनशील लिबरल पक्षासारखी आहे; परंतु देशांत एक कॉन्झरवेटिव पक्षहि आहे; तेव्हां या दोनहि पक्षाशीं अगदीं तटस्थ वृत्तीच धारण करावी हें सरकारला इष्ट वाटतें. असा सरकारनें खुलासा केला होता.

सरकारच्या या खुलाशानें, संघशक्तीपुढें राजसत्तेला नमावें लागतें हें हिंदी लोकांना स्पष्ट करून दाखविलेंच; परंतु त्यांची चळवळ, किंवा त्यांच्या मागण्या पूर्ण कायदेशीर आहेत हें सरकारनें कबूल केल्यामुळें, तिला राजद्रोही, बंडखोर म्हणणाऱ्या फाजील राजनिष्ठ आंग्लो-इंडियनांना परस्पर थप्पड मारली व लोकांना आपली चळवळ सुरू ठेवण्यास हुरूप दिला. राष्ट्रीय सभेला जन्म घेऊन अवघीं पांचच वर्षें झाली होती. येवढ्या अल्पावधींत तिनें कायदेशीरपणाचा अधिकार प्राप्त करून घेऊन उत्क्रांतीची पहिली अवस्था पार केली.



मि. आल्फ्रेड वेब.

अध्यक्ष, १० वी राष्ट्रीय सभा मद्रास सन १८९४.



**ना. मि. पी. आनंदाचार्लु.**

अध्यक्ष, ७ वी राष्ट्रीय सभा नागपूर सन १८९१.

# प्रकरण ५ वें.

## मधलीं चौदा वर्षें.

एखादा सर्कसवाला प्रोफेसर, आपल्या चाबकाच्या धाकाखालीं, सिंहाच्या पिलांना एका नियमित रंगणांत खेळवितो, म्हणून त्याच्या अंगीं सिंहाशीं झुंज खेळण्याचें धैर्यहि नसतें आणि शौर्यहि नसतें. एखादे वेळीं तो अधिक गुर-गुरूं लागला. तर चाबूक, पलितें, किंवा पिस्तुलें यांनीं सज्ज असलेला तो सर्कस-वाला घाबरून, भेदरूनच जातो. वन्य पशूंना धाकांत ठेवण्याचें किंवा त्यांना आपल्या हुकमतींत खेळविण्याचें त्याचें अपूर्व कौशल्य अशा वेळीं कुचकामा-चेंच ठरतें. राष्ट्रीय सभेला आणि हिंदी राजकीय चळवळीला अधिकारी–चाब-काच्या धमकावणीनें आपल्या धाकाखालीं दडपूं पाहणाऱ्या, कॉलव्हीन आणि इलियट या सर्कसवाल्या प्रोफेसरांचीहि स्थिति अशीच झाली. त्यांच्या बेकायदा धमकावण्यांना राष्ट्रीय सभेनें मुळींच भीक घातली नाहीं. सत्ताधारी ह्मणून त्यांच्या हातीं असलेल्या पोलीस, लष्करांच्या पलीत्यांना किंवा धाक दपट-शांच्या पिस्तुलांना भेदरून त्यांच्या नियमित रंगणांत ती खेळत राहिली नाहीं. पूर्ण कायदेशीरपणाचें सिंहतेज तिच्यांत वास करीत होतें, संघशक्तीचा सिंह-पराक्रम तिच्या अंगीं मुसमुसत होता, आणि म्हणूनच तिच्या ह्या तेजस्वी पराक्रमाच्या गर्जनांपुढें, कॉलव्हीन इलियट सारख्यांना आपली तीक्ष्ण शस्त्रें टाकून आपापल्या घरांत (Government houses) दडी मारून बसावें लागलें होतें. सत्तेपुढें दुर्बलांचें शाहणपण चालत नाहीं म्हणतात: सत्तेवर शाह-णपणानें किंवा सत्ताधाऱ्यांच्या अरेरावीवर न्यायानें मात करणें हें अगदीं अशक्य नसलें तरी तितकें सुलभ नाहीं, म्हणून अपूर्व आहे.

राष्ट्रीय सभेनें येथल्या नोकरशाहीवर हा अपूर्व विजय मिळविल्यावर तिचीं १९०४ पर्यंतचीं म्हणजे चौदा वर्षें साधारणपणें चालचलावूच गेलीं. कांहीं विशेष मेहनतीचें, किंवा महत्वाचें कार्य पार पाडलें म्हणजे हायसें वाटून थोडी सुस्ती यावी हा निसर्गच आहे, असाच प्रकार राष्ट्रीय सभेच्या बाबींत

झाला. कांहीं विशिष्ट विशिष्ट गोष्टींनीं मधल्या कित्येक बैठकींना महत्व आलें होतें, तरी तें विशिष्ट विशिष्ट प्रसंगांपुरतेंच असल्यामुळें त्यांना राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें तितकेंसें महत्व नाहीं.

१८९१ सालीं नागपुरास रावसाहेब पी. आनंदाचार्लू यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सातव्या राष्ट्रीय सभेला, कॉमन्स सभेंतील हिंदुस्थानचे खरे दोस्त मि. चार्लस ब्रॅडला यांच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करण्याचा प्रसंग आला. कलकत्याच्या सहाव्या राष्ट्रीय सभेंत, ९२ सालीं विलायतेंत एक राष्ट्रीय सभेची बैठक भरवावी अशी सूचना आली होती, तीवर आणि अशी बैठक भरविण्यापासून फायद्यातोटयावर भवती न भवती होऊन तो प्रश्न या बैठकीनें तूर्त तरी लांबणीवर टाकला: आणि पुढेंहि त्याला कधीं चालन मिळालें नाहीं.

१८९२ सालची राष्ट्रीय सभेची ८ वी बैठक अलहाबादेस बाबू उमेशचंद्र बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. यावर्षी बंगालाधिपति सर चार्लस इलियटनीं ज्यूरी नोटिफिकेशन प्रसिद्ध करून बंगालमध्यें, आणि पर्यायानें सर्व देशांत खळबळ उडविली होती. राष्ट्रीय सभेनें या प्रश्नावर बराच जोर दिला होता. त्याचा परिणाम सरकारला ज्यूरी कमिशन नेमून नोटिफिकेशन परत घ्यावें लागलें आणि पूर्वीचीहि ज्यूरीसिस्टीमची मर्यादा अधिक करावी लागली.

१८९३ सालीं राष्ट्रीय सभेच्या लाहोरास भरलेल्या नवव्या बैठकीला दादाभाई नवरोजींच्या विलायतेहून झालेल्या आगमनानें उत्साह आला होता. सेंट्रल फिन्सबरी संघातर्फे हौस ऑफ कॉमन्समध्यें ते निवडून आले होते. ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदी सभासद निवडून आलेला हाच पहिला होय. दादाभाईनीं, पार्लमेंटांत प्रवेश करण्याबरोबर २ जूनला सिव्हल सर्व्हिसच्या समकालीन परीक्षेवर ठराव आणला. या बैठकीचे अध्यक्ष दादाभाईच होते. त्यांनीं येतांना आयरिश मजूर वर्गातर्फे हिंदुस्थानला सहानुभूतिपरच नव्हे तर आयरिश लोकांचा हिंदींना त्यांच्या कार्यांत पाठिंबा आहे असें सांगणारा (Every one of the Ireland's Home Rule members in Parliament is at your back in the cause of the Indian People ) निरोप

आणला होता. त्यांनीं आपल्या अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत हौस ऑफ कॉमन्समध्यें इंडियन पार्लमेंटरी कमिटी स्थापण्याची किती आवश्यकता आहे हें स्पष्ट केलें होतें. या बैठकींत सिव्हिल मेडिकल सर्व्हिसवर एक महत्वाचा ठराव पास झाला. मिलिटरी मेडिकल सर्व्हिसशीं तिचा कांहीं एक संबंध असूं नये, व दुसऱ्या सुधारलेल्या राष्ट्रांत ज्या पायावर ही सर्व्हिस उभारली आहे त्याच पायावर येथेंहि उभारावी, असा त्याचा आशय होता. न्याय आणि अंमल-बजावणी हीं खाती वेगळीं वेगळीं असावींत असे राष्ट्रीय सभेनें आजपर्यंत फक्त ठरावच केले होतें; पण या बैठकींत तिनें या बाबतींत एक योजना तयार करण्यासाठीं कमिटी नेमली. लोकांनीं चांदी दिल्यावर सरकार आपल्या टांक-शाळेत आजपर्यंत नाणें पाडून देत असे, परंतु तें बंद करून, अप्रत्यक्षपणें नवीन कर बसविणारा आणि हिंदी व्यापाराला जायबंदी करणारा एक कायदा हिंदुस्थान सरकारनें पास करून घेतला होता; त्याचा या बैठकीनें जोराचा निषेध केला.

१८९४ सालीं राष्ट्रीय सभेची १० वी बैठक मद्रासेस मि. आलफ्रेड वेब एम्. पी. यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. हिंदुस्थानसरकारच्याहि विरोधाला न जुमानतां लँकेशायरवाल्यांच्या भिडेला भरी भरून स्टेट सेक्रेटरीसाहेबांनीं, आधींच करांच्या भाराखालीं वाकून गेलेल्या हिंदुस्थानावर, येथें उत्पन्न होणाऱ्या कापडावर आणखी कराचा बोजा लादला होता, त्याचा या बैठकींत निषेध झाला. सरकारच्या एकाच जाळ्यांत अपराधी, निरपराधी न पाहतां सरसकट भरडून काढणाऱ्या जादा पोलीसांच्या कराचा भरहि त्याच सालीं पडली होती. पहिला कर हिंदुस्थानसरकारच्या इच्छेविरुद्ध म्हणून अस्मानी, तर दुसरा खुद्दांच्या सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून लादलेला म्हणून सुलतानी. मिळून मध्यें बिचाऱ्या हिंदुस्थानची हाडें चांगलींच खिळखिळीं होत होतीं. खाणारच तर पायांकडून तरी खा असें म्हणण्याची पाळी आतां हिंदुस्थानावर आली होती. जादा पोलीसासारखे तात्पुरते कर एकदां सोडून दोनदां दिलेले पुरवले, पण देशी उद्योग-धंद्यांना मूठमातीच देणारे देशी कापडावरील करासारखे कर नकोत असें हिंदुस्थानाला झालें होतें.

१८९५ सालीं पुण्यास, सुरेंद्रनाथ बानर्जींच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या ११ व्या राष्ट्रीय सभेला निराळ्याच प्रसंगानें महत्व आलें. राष्ट्रीय सभेला जन्म देऊन, आज कित्येक पिढ्या राजकारणाचें केंद्रस्थान बनून राहिलेल्या पुण्यालाच इंग्रज शाहींतल्या सर्वच तऱ्हेनें नव्या अशा संघटनात्मक राजकारणी संस्थेचें जनकत्वहि पतकरून आपल्या परंपरेवर कळस चढविण्याचें लाभलेलें भाग्य, दुर्दैवानें हिरकून घेतल्यापासून आज १० वर्षे उलटून गेलीं होतीं. या १० वर्षांच्या काळांत राष्ट्रीय सभेनें आपल्या अंगीं बरेंच स्थैर्य आणि कार्यक्षमता आणली होती. तीची पूर्व तयारी करण्यांत व तिला मूर्त स्वरूप आणण्यांत बंगालचे श्रम आणि लॉर्ड रिपन व लॉर्ड डफरीनसाहेबांची सहानुभूति विशेष कारणीभूत झाली हें खरें, तरी या सर्व श्रमांचा पुष्कळसा वांटा अप्रत्यक्ष रीतीनें पुण्याचाच आहे. बीज जमीनींत पुरलेलें असल्यामुळें तें दिसत नाहीं, परंतु त्याची प्रत्यक्ष मशागत करणारा आणि त्या मशागतीनें फोफावलेला वृक्ष मात्र दिसतो. अशीच स्थिति राष्ट्रीय सभेची आहे. मशागत करणारा बंगाल आणि त्याचा वाढलेला वृक्ष दिसत होता तरी पुण्यानें पेरलेलें त्याचें बीं दिसत नव्हतें हें साहजिकच आहे. तिला प्रत्यक्ष जन्म देण्याचें भाग्य मुंबईस लाभलें असलें तरी तिची खरी जननी पुणेंच आहे फार दिवस दूर राहिलेल्या आणि मानमरातब मिळवून, पहिल्यानदांच घरीं येणाऱ्या अपत्याचें स्वागत, त्याच्या जननीकडून किती प्रेमानें आणि उत्साहानें होतें याचा प्रत्येकाला थोडाना थोडा तरी अनुभव आहेच. त्याच उत्साहानें, आणि त्याच अलोट प्रेमानें पुण्यानें, १० वर्षांनीं आपल्या घरीं येणाऱ्या या राष्ट्रीय सभेचें स्वागत केलें. पण या अपूर्व उत्साहांत आणि प्रेमांत तिळभर न्यूनता आणणारी एक गोष्ट घडून आली. ती गोष्ट ह्मणजे, सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरवावी कीं न भरवावी याविषयीं उत्पन्न झालेला आणि पुणेंकरांनीं तो विकोपाला नेलेला वाद होय.

वास्तविक राष्ट्रीय सभा आणि सामाजिक परिषद् यांचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नाहीं. आज अस्पृश्योद्धारानें हिंदी-राजकारणांत प्रमुख स्थान पटकावलें आहे तरी १८९५ सालीं किंवा त्याच्याहि आधीं प्रौढ विवाहाला किंवा विधवा विवाहाला हिंदी-राजकारणांत काडीचीहि किंमत नव्हती. राष्ट्राची सामाजिक



MR. SURENDRA NATH BANERJEA.

**सर सुरेंद्रनाथ बानर्जी.**

अध्यक्ष, ११ वी राष्ट्रीय सभा पुणे सन १८९५

व १८ वी राष्ट्रीय सभा अहमदाबाद सन १९०२.



मि. महमद रहीमतुल्ला सयानी.

अध्यक्ष, १२ वी राष्ट्रीय सभा कलकत्ता सन १८९६.

किंवा धार्मिक उन्नति आणि राजकीय उन्नति या परस्परांचें जीवनच आहेत, किंबहुना राष्ट्रीय उन्नतीच्या गाड्याची हीं चाकेंच आहेत. यांतील एक नसलें तर गाडा सुरळीत चालत नाहीं, हें मूळतत्व त्या वेळच्या पुढाऱ्यांना माहीत नव्हतें असें नाहीं. सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा यांचें परस्पर महत्व आणि अवश्यकता किती आहे हें सामाजिक परिषदांच्या प्रास्ताविक भाषणांतून न्या. रानडे यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. परंतु हिंदुस्थानांतील नाना जाती आणि नाना धर्म व राजकीय परिस्थिति यांचा विचार केला तर सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा या, येथें हातांत हात घालून जाणें शक्य नव्हतें. अर्थात्च हिंदी-राजकारणाची चर्चा करणारी राष्ट्रीय-सभा, ही एकजात हिंदुस्थानची ठेविली होती ( United India ). ज्यांच्या सामाजिक चालीरीति किंवा रूढी परस्परांहून अगदींच भिन्न आहेत, अशा हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन सर्वांचीच ती होती; अर्थात् तिच्या कार्यक्रमांत एखाद्या विशिष्ट समाजाचा प्रश्न घुसडून शालजोडीला पोतेऱ्याचें ठिगळ लावण्याचा हट्ट धरणारा गेरमुत्सद्दी त्या वेळीं, राष्ट्रीयसभेच्या पुढाऱ्यांत कोणीहि नव्हता. किंवा हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्यासाठींच आपलें शक्तिसर्वस्व खर्चणाऱ्या न्या. रानडे, तेलंग, नामजोशी, वि. ह. चिपळूणकर, नूलकर प्रभृतींनी, सामाजिक बाबतींत इतकें खोलपर्यंत लक्षहि कदाचित् घातलें नसतें; परंतु शठं प्रति शाठ्यं या न्यायानें, पुष्कळदां दाखवायाचे दांत वेगळे आणि खाण्याचे दांत वेगळे असें केल्याखेरीज गत्यंतर नसतें. हिंदुस्थानच्या वाढत्या राजकीय आकांक्षांना आणि पदोपदीं नडणाऱ्या संघशक्तीला जायबंदी करण्यासाठीं "सरकारी नोकरांनीं राजकारणांत वाटा उचलणें हें राजद्रोही आहे" असें सरकार पुढें मागें जाहीर करणार, हे स्वप्न माधवराव रानड्यासारख्या राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना, तिच्या कल्पनेबरोबरच पडलें होतें; आणि तें पुढें ६ वर्षांनीं सर ऑकलंडसाहेबांनीं खरेंहि केलें. राष्ट्रीय सभेचे सर्व प्रांतांतील आधारस्तंभ बहुतेक सरकारी नोकरच असल्यामुळें सरकारच्या या प्रहाराला तितक्याच जोराचा प्रतिप्रहार करून राष्ट्रीय सभेचा होणारा कपाळमोक्ष वांचविण्यास कांहीं-तरी उपाय योजणें हें तिच्या पुढाऱ्यांचें पहिलें कर्तव्य होतें. राजकारणाची

चर्चा करणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत सरकारी नोकरांनीं कोणत्याहि प्रकारचा भाग घ्यावयाचा नाहीं, एवढेंच नव्हे तर तेथें प्रेक्षक म्हणूनहि जावयाचें नाहीं, असें सरकारनें जाहीर केलें तर राष्ट्रीय सभेच्या या आधारस्तंभांना सभेची बैठक होईल त्या गांवीं जाण्याचें तरी काय कारण राहणार ? ही आपत्ति टाळण्यासाठींच सामाजिक परिषदेला जन्म देण्याची कल्पना काढिली. सामाजिक परिषदेला जाण्याच्या निमित्तानें राष्ट्रीय सभेलाहि हजर राहतां येऊन तिच्या कार्यांत अप्रत्यक्ष रीतीनें या सरकारी नोकरांना मदत करतां येत होती. म्हणजे सामाजिक परिषद् ही राष्ट्रीय सभेलाच चार हात दूर राहून मदत करणारी तिची एक सहचारिणी होती, असेंहि म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

१८८६ सालीं कलकत्यास दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या दुसऱ्याच बैठकींत सामाजिक परिषदेचा प्रश्न निघाला. या परिषदेचा आणि राष्ट्रीय सभेचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष कोणत्याहि प्रकारचा संबंध राहणार नाहीं; ( National congress must confine itself to questions in which the *entire* Nation has a ***direct*** participation and it must leave the adjustment of social refcrms and other class questions to class congresses ) हे परिषदेचें धोरण अध्यक्षांनीं अगदीं पहिल्यापासूनच मुकर केलें होतें. पुढच्या वर्षीं म्हणजे १८८७ सालीं मद्रासेस बद्रुद्दिन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभेची बैठक झाली, त्या चवेळी सामाजिक परिषदेची पहिली बैठक भरली होती. सामाजिक परिषदेंत प्रत्यक्ष भाग घेणारे पुष्कळसे लोक राष्ट्रीय सभेचेच प्रतिनिधी आणि पुढारी असल्यामुळें ही परिषद् राष्ट्रीय सभेचें काम संपल्यावर तिच्याच मंडपांत भरविण्याची वहिवाट पडली होती.

१८९० सालींच या वादाचा आरंभ झाला होता असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्या सालीं पुणेंकर शास्त्र्यांनीं एक सभा भरवून, सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरवूं नये असा ठराव करून तो राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाकडे पोंचविण्याचें काम लो. टिळकांकडे सोंपविलें होतें. पुणेंकर शास्त्र्यांचे हें मत लो.

2398

टिळकांना पसंत नव्हतें, त्यांनी केसरींतून तें प्रसिद्धहि केलें आहे. परंतु अध्यक्षाकडे ठराव पोंचविण्याची कामगिरी मात्र पार पाडली. त्या वेळीं, लो. टिळकच विरुद्ध असल्यामुळें, त्या प्रश्नाला इतकें महत्व आलें नाहीं. सामाजिक बाबतींत प्रत्येक व्यक्तींचा मतभेद असणें संभवनीय आहे, सामाजिक परिषदेंतील सुधारकांचा आणि लो. टिळकांचा तीव्र मतभेद असल्यामुळें परस्परांत नेहमीं खटके उडत. अलीकडे अलीकडे लो. टिळकाच्या आंगीं परमतसहिष्णुता बाणली होती, तरी त्या वेळच्या त्यांच्या ताज्या रक्तांत ती नव्हती. आपला हेका खरा करणें किंवा आपलें ह्मणणें दुसऱ्यांना कबूल करण्यास भाग पाडणें, किंचित निराळ्या शब्दांत बोलावयचें तर आपल्या हुकमतींत दुसऱ्याला ठेवण्याची प्रवृत्ति असणें हा सळसळणाऱ्या ताज्या रक्ताचा स्वभावच आहे. अशा स्वभावाबद्दल लो. टिळक काय किंवा दुसरा कोणी काय निसर्गानें दोषी ठरणार नाहीं; उलट तें एक स्वाभिमानाचें लक्षणच आहे असें ह्मणतां येईल. परंतु समाजांत वावरतांना पुष्कळदां स्वतःला पड घ्यावी लागतें हें समजण्यास व त्याप्रमाणें वर्तन ठेवण्यास ह्मणजे परमत सहिष्णुता अंगीं बाणण्यास जगांत टक्केटोणपे खाऊन अनुभववृद्धच व्हावें लागतें. लो. टिळक त्यावेळीं अनुभववृद्ध नव्हतें. तेव्हां परिषदेंतील प्रश्नांच्या चर्चेंत बोलण्याच्या भरांत टिळकांकडून वैयक्तिक टीका स्वाभाविकपणें फार होत असे. कित्येकदां ती फारच विकोपाला जाई. पुष्कळदां अध्यक्षांनीं, लो. टिळकांना खालीं बसविण्यास लागे. नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं तर लो. टिळकांना सभा मंडपांतून घालवून ( Bodily removed ) देण्याच्या थरला गोष्ट आली होती. पुण्याला सामाजिक परिषदेचा तंटा इतक्या हमरीतुमरीवर येण्याचें मूळ कारण हेंच आहे. राष्ट्रीय सभेला पुण्यानें आमंत्रण दिल्यावर द्वेषाच्या भावनेनें असो, सूडाच्या भावनेनें असो, किंवा कोणत्याहि भावनेनें असो सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं द्यावयाची नाहीं, असा पुण्यांतल्या कांहीं मंडळींनीं निश्चय केला आणि त्यांच्या सुदैवानें आरंभीं विरुद्ध असलेले टिळक त्यांना अध्वर्यू मिळाले.

हा तंटा आपापसांत मिटण्याचीं चिन्हें दिसेनात तेव्हां हा प्रश्न राष्ट्रीयसभेच्या स्वागत मंडळानें किंवा स्टँडिंग कमेटीच्या बहुमतानें निकालांत काढावा

असें ठरलें; आणि या तिऱ्हाईत न्यायाला मान्यता देण्याचें लो. टिळकांनीं आपल्या केसरीच्या द्वारें जाहीरहि केलें. या वेळीं देशांत एकंदर ४८ स्टँडिंग कमिट्या होत्या. त्यांच्यापुढें हा प्रश्न आल्यावर २९ कमिट्यांनीं सामाजिक परिषद् पूर्व वहिवाटीप्रमाणें राष्ट्रीय सभेच्याच मंडपांत भरवावी असें आपलें मत दिलें. ९ कमिट्यांनीं ही पूर्वपार पद्धतच चालू ठेवण्यास आपली संमत्ति दिली होती, तरी पुणेकरांचा हट्टच असेल तर या वर्षापुरती परिषद् निराळी भरवून स्थानिक भांडण मिटवावें, व पुढें पहिल्याप्रमाणेंच वहिवाट ठेवावी असें आपलें मत दिलें; आणि १० कमिटयांनीं कोणतीच बाजू न घेतां तटस्थ वृत्ति स्वीकारिली होती. स्टँडिंग कमिटयांचे बहुमत, सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्याच मंडपांत भरवावी असें पडतांच स्टँडिंग कमिट्यांतून सुधारकांचाच भरणा अधिक आहे म्हणून मताधिक्य झालें ही सबब काढून तिचा न्याय अमान्य केला गेला. क्षुल्लक बाबीनें उत्पन्न झालेलें हें स्थानिक भांडण मिटवून समेट करण्यासाठीं एक जाहीर सभा भरवून सर्वच स्वागत मंडळ नवें निवडलें; त्यांत दोन्ही पक्षांचें दोन दोन सेक्रेटरी असावेत, मुंबईचे तीन असावेत आणि पुण्याचे सात असावेत असें ठरलें; पण वरच्याच सबबीवर लो. टिळकांना आणि त्यांच्या अनुयायांना हीहि व्यवस्था पसंत पडली नाहीं. पुण्याच्या स्टँडिंग कमिटीचे लो. टिळक हे त्या वेळीं सेक्रेटरी होते. कमिटींत इतर सभासदांशीं एकटयाचेंच दुमत झाल्यावर,एक स्वत: तरी पड खाणें किंवा आपल्या जागेचा राजीनामा तरी देणें हे दोनच मार्ग त्यांना उरले होते. पड खाणें हें अर्थातच बाणेदार स्वभावाला अनुचित होतें; म्हणून लो. टिळकांनीं आपल्या सेक्रेटरीपणाचाच राजीनामा दिला.(४ नव्हेंबर) हा डाव फसल्यावर, राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरविण्यास बहुजन समाजच विरुद्ध आहे असें पुणेकरांनीं प्रसिद्ध करून, त्याच्या पुष्ट्यर्थ ठिकठिकाणीं जाहीर सभा भरवाव्यात व अशा अर्थाचा ठराव करून अध्यक्षाकडे रवाना करावा अशा अर्थाचीं पत्रें व ठरावाचे मसूदे पुण्याहून रवाना झाले. यांतहि नागपूर वऱ्हाड खेरीज इतर प्रांतांनीं फारसें लक्ष घातलें नाहीं.

मताधिक्यानें माघार घ्यावी लागल्यामुळें तो पक्ष साधारण चिडल्यासारखा झाला, आणि राष्ट्रीय सभेच्या मंडपांतच सामाजिक परिषद् भरविली तर आम्हीं



सर शंकरन् नायर.

अध्यक्ष. १३ वी राष्ट्रीय सभा उमरावती सन १८९७.



बाबु आनंदा मोहन बोस.

अध्यक्ष, १४ वी राष्ट्रीय सभा मद्रास सन १८९८

मंडपाला आग लावून देऊं, वगैरे सारखे धमकीचे उद्गार, श्रीधर विठ्ठल दाते प्रभृतीकडून सभांतून आणि वर्तमानपत्रांतून जाहीरपणें निघूं लागले. प्रसंग पडल्यास निराळीच राष्ट्रीय सभा भरविण्याचेंहि घाटूं लागलें. हें स्थानिक भांडण इतक्या थराला येऊन पोंचलें तेव्हां त्या सालच्या राष्ट्रीय सभेचे नियोजित अध्यक्ष सर सुरेंद्रनाथ बानर्जींनी "स्थानिक तंटा मिटला नाहीं तर आपल्याला अध्यक्ष होतां येणार नाहीं," अशा अर्थाची न्या. माधवराव रानडयांना तार दिली. सगळाच गोंधळ माजवून पहिल्यानदांच पुण्यास येणारी राष्ट्रीय सभा उधळून लावण्यापेक्षां आपणच थोडी पड घेतलेली चांगली अशा पोक्त विचारानें माधवरावांनीं "सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत न भरवितां तिचा मंडप स्वतंत्र उभारला जाईल" असें जाहीर करून हा आणिबाणीचा प्रसंग निभावून नेला. हा क्षुल्लक प्रश्न पुण्यानेंच उपस्थित केला होता, आणि पुण्यापुरताच तो होता. पुण्यांतच त्याच्यावर रणें माजलीं, इतर प्रांतांत त्याचा मागमूसहि नव्हता, किंवा त्यांनीं या प्रश्नाला पुढेंहि कधीं चालन दिलें नाहीं; हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

हा तात्पुरता उत्पन्न झालेला वादाचा प्रश्न बाजूला ठेवला तर पुण्याच्या राष्ट्रीय सभेचें कार्य, उत्साह आणि कार्यक्रम या दोनहि दृष्टींनीं उत्तम तऱ्हेनें पार पडलें. पुण्याच्या स्वागत मंडळानें प्रतिनिधींचें स्वागतहि थाटाचें केलें होतें. राष्ट्रीय सभेचें काम संपल्यावर लो. टिळकांचे स्नेही श्री. बाबामहाराज यांनीं राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांना आणि प्रतिनिधींना एक थाटाची मेजवानी (At Home) दिली होती. लो. टिळकांनीं नुकत्याच सुरू केलेल्या श्रीशिवाजी उत्सवाबद्दलहि एक जाहीर सभा भरवून तींत सुरेंद्रनाथ बानर्जींचें उत्साहपूर्ण भाषण झालें. ह्या दोनहि प्रसंगीं दोन्ही पक्षांत दिलासफाई दिसत होती

हिंदी राष्ट्रीय सभेला जायबंदी करणारा आणखीं एक उपाय या वेळीं सरकारनें योजला होता. सुशिक्षित लोकांत वकील लोकांचा भरणा अधिक असून सामान्य जनसमूहाचे नेते तेच होते. देशांतील सर्व साधारण लोकांचे मत यांच्याच मुखानें बोललें जात असे; या वकील वर्गावर फक्त हायकोर्टाचाच ताबा असल्यामुळें ते अक्षरशः स्वतंत्र नव्हते, तरी सरकारची नोकरी पत्करल्यामुळें

सार्वजनिक आयुष्यांत जी गुलामगिरी आपोआपच उत्पन्न होत असे, त्या गुलामगिरीपासून हा वर्ग पुष्कळसा अलिप्त होता. स्थानिक अधिकाऱ्यांना यांच्या गळ्यांत आपल्या हातांतील कायद्यांचा फास टाकणें मुष्किलीचें होतें. त्यांची ही स्वतंत्रता हिसकून घेण्यासाठीं नोकरशाहीच्या कारवाईनें १८९४ सालीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत १८७९ च्या लीगल प्रॅक्टिशनर्स आक्टांत दुरुस्ती करण्याचें बिल आलें होतें. या बिलानें प्रांतांतील सगळे वकील, डिस्ट्रीक्ट जज्जीस आणि रेव्हेन्यू कमिशनर्स, यांच्या प्रत्यक्ष हुकुमतीखालीं येणार होते या बिलाला विरोध करण्यास राष्ट्रानें एकजात कंबर बांधली. सगळ्या हायकोर्टांनींहि आपला भरपूर पाठिंबा देऊन राष्ट्राचीच बाजू उचलून धरिली होती. सरकारच्या या प्रतिगामी धोरणाला हाणून पाडण्यासाठीं हा संघटनात्मक विरोध पुण्याच्या याच राष्ट्रीय सभेनें जाहीर केला. या एकजात विरोधापुढें म्हणजे, राष्ट्रीय संघशक्तीपुढें सरकारला नमणेंच भाग पडलें. वकील वर्गाच्या पायांत गुलामगिरीची बेडी घालण्याचा, थोडें निराळ्या शब्दांत बोलावयाचें तर आपल्या घरचें खाऊन तिसऱ्याचीच टाळी वाजविण्यास वकील वर्गाला भाग पाडण्याचा सरकारचा हा कावा या वेळीं अगदीं सपशेल फसला; एवढेंच नव्हे तर १८७९ च्या कायद्यांतहि दुरुस्ती करून वकीलांच्या दर्जाला थोडा उजाळाच द्यावा लागला. जें कांहीं होतें तें आपल्या बऱ्याकरितांच होतें असाच अनुभव या बिलानें हिंदी लोकांना आणून दिला.

१८९६ सालची १२ वी राष्ट्रीय सभा कलकत्यास मि० रहीमतुल्ला सयानी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. न्याय आणि अंमलबजावणी हीं खातीं वेगळीं वेगळीं असावींत या मागणीला हिंदुस्थानसारखाच इंग्लंडांतीलहि लोकांचा पाठिंबा आहे यांबद्दल या सभेनें आपलें समाधान व्यक्त करून या सहानुभूतीच्या पुढचा पायरी म्हणजे या अवश्य वाटणाऱ्या सुधारणा प्रत्यक्ष अमलांत आणण्यास हिंदुस्थान सरकारला आणि भारतमंत्र्यांना पुन्हां एकदां विनंति केली.

१८९७ सालीं पुण्याच्या सरदार नातू-बंधूंना मुंबई सरकारनें त्यांची रीतसर चौकशी न करितां किंवा त्यांच्यावर आरोप तरी काय आहे हें लोकांना कळूं न देतां, १८२७ च्या २५ व्या बॉम्बे रेग्यूलेशन कायद्याच्या आधारें हद्दपार

केलें. २७ चा हा २५ वा कायदा म्हणजे रौलेट कायद्याचीच हुबेहुब प्रतिमा होती. सरकारच्या इच्छेला येईल त्या वेळीं आणि इच्छेला येईल त्याला चौकशीशिवाय अलग उचलून टाकणारे, म्हणजे ब्रिटिश न्यायदेवतेचें नाक आपल्या इच्छेनुरूप कापणारे हें भयंकर शस्त्र नोकरशाहीच्या हातांत होतें. प्रत्येक प्रांताच्या सरकारला हें शस्त्र मिळालेलें होतें. १८१८ चा ३ रा बंगाल रेग्यूलेशन आणि १८१९ चा २ रा मद्रास रेग्यूलेशन हे तिन्ही कायदे एकाच साच्यांतले. मॉंटफर्ड सुधारणांनीं मिळालेल्या कौन्सिलांत ना. शास्त्र्यांनीं जुलमी कायदे रद्द करण्याचा ठराव आणून एक सिलेक्ट कमिटी मागून घेतली व ज्या कमिटीच्या शिफारशीवरून वरील तिन्ही कायदे रद्द केल्याचे नुकतेंच जाहीर झालें आहे, तेच हे कायदे ताबडतोब रद्द करावेत, असा, नातू बंधूंच्या हद्दपारीचा, म्हणजे पर्यायानें या भयंकर शस्त्राचा वेळीं अवेळींहि वाटेल तसा उपयोग करण्यास चटावूं पाहणाऱ्या नोकरशाहीचा तीव्र निषेध करतांना, १८९७ सालीं, सर शंकरन नायर याच्या अध्यक्षतेखालीं उमरावतीस भरलेल्या तेराव्या राष्ट्रीयसभेनें आग्रह धरला होता. याच वर्षी इंडियन पिनल कोडाच्या १२१ ( अ ) कलमांत दुरुस्ती करून सभाबंदीच्या कायद्याची धार अधिक तीक्ष्ण केली. शांततेचा भंग होऊं नये, नागरिकांच्या हक्कांना बाध येऊं नये, किंवा राजनिष्ठांना अराजकांपासून कोणत्याहि तऱ्हेचा उपसर्ग होऊं नये, म्हणून हिंदी लोकांचें भाषणस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य यांचा सरकारनें वेळों-वेळीं कायदेशीर अपहार करून राजनिष्ठ हिंदी लोकांत जी अनेकदां खळबळ उडविली, तिचा श्रीगणेशा म्हणजेच ही दुरुस्ती होय. आपल्या जन्मसिद्ध हक्कांची लोकांना यथार्थ जाणीव देणाऱ्या, आणि तें मिळविण्यास सनदशीर मार्गाचाच उपदेश करणाऱ्या वक्त्यांना आणि वर्तमान-पत्रांच्या संपादकांना अस्सल बदमाष लोकांच्या पंक्तीला नेऊन बसवणारी दुरुस्ती ती हीच. घरंदाज, किंवा संभावित लोकांकडून, केवळ ते वक्ते किंवा संपादक आहेत एवढयाचमुळें "चांगल्या वर्तणुकी" साठीं डि. माजिस्ट्रेटाला जामीन घेण्याचा अधिकार याच दुरुस्तीनें मिळाला. नोकरशाहीला या दुरुस्तीनें सभाबंदीचा कायदा परजूं दिल्याबद्दल उमरावतीच्या राष्ट्रीय सभेनें निषेध केला. राष्ट्राच्या अशा तऱ्हेच्या एकमुखा

स्वराला सरकारनें अनेकदां वाऱ्यावर सोडलें आहे. तरी त्या स्वराचे जे अखंड-रत आघात त्यांच्या अंत:करणावर पडले आहेत त्यांनीं, हिंदी लोकांच्या प्रसंगानुप्रसंगानें आणि दिवसानुदिवसानें वाढणाऱ्या राजकीय आकांक्षांची आणि संघशक्तीची जाणीव चांगलीच उत्पन्न केली आहे, हें कधींहि विसरून चालणार नाहीं.

१८९८ सालची १४ वी राष्ट्रीय सभा मद्रासेस मि. आनंदा मोहन बोस यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सरकारचें प्रतिगामी धोरण आणि दडपशाहीचें स्वरूप या वर्षी अधिकच उग्र झालें होतें. राष्ट्रीय सभेच्या सुरवातीच्याच दिवशीं हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर झालेल्या, महाराणीच्या जाहीरनाम्याला 'अशक्य सनद' ठरविणाऱ्या आणि आपल्या कृतीनें पुढें "हिंदी कैसर" ही पदवी मिळवलेल्या लॉर्ड कर्झनसाहेबांनीं हिंदुस्थानचे व्हाइसराय ह्मणून मुंबई बंदरावर पाय ठेविला होता. सरकाराच्या आतांपर्यंतच्या दडपशाही आणि प्रतिगामी धोरणाला आळा घालून लॉर्ड कर्झनसाहेब देशांत कांहींशी शांतता प्रस्थापित करतील अशा आशेनें मद्रासच्या राष्ट्रीय सभेनें त्यांचें अंत:करणपूर्वक स्वागत केलें होतें.

१८९९ सालीं लखनौ येथें भरणाऱ्या १५ व्या राष्ट्रीय सभेला आंग्लो इंडियनांनीं खूप अडथळे आणि संकटें आणलीं. परंतु त्या वेळचे तेथील लें० गव्हर्नर सर अँटनी मॅकडोनेल यांच्या उदार धोरणानें, आणि हिंदी राष्ट्रीय चळवळीविषयीं त्यांच्या असलेल्या सहानुभूतीनें आंग्लो इंडियनांच्या द्वेषमूलक प्रयत्नांना कडू फळें आलीं नाहींत. या राष्ट्रीयसभेचें अध्यक्षस्थान मि. रमेशचंद्र दत्त यांनीं सुशोभित केलें होतें. इचा विशेष ह्मणजे या बैठकींत राष्ट्रीय सभेच्या घटनेबद्दल कांहीं नियम मंजूर झाले.*

---

*सभेच्या घटनेचे नियम:—(१) हिंदी लोकांची उन्नती सनदशीर मार्गांनीं करावी हा राष्ट्रीय सभेचा उद्देश आहे. (२) आदल्या वर्षी राष्ट्रीय सभेच्या बैठकींत ठरविलेल्या जागीं आणि वेळीं राष्ट्रीय सभेची बैठक भरविण्यांत येईल; परंतु प्रसंग विशेषीं इंडियन कॉंग्रेस कमिटीस अशी ठरविलेली वेळ आणि



बाबु रमेशचंद्र दत्त.

अध्यक्ष, १५ वी राष्ट्रीय सभा लखनौ सन १८९९.

I.A P.W.



सर नारायण गणेश चंदावरकर.

अध्यक्ष, १६ वी राष्ट्रीय सभा लाहोर सन १९००.

विसाव्या शतकांतील पहिली ह्मणजे १९०० सालची १६ वीं राष्ट्रीय सभा न्या. नारायण गणेश चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं लाहोरास, हिंदुस्थानचे दिलजान दोस्त मि. चार्लस ब्रॅडला यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या ब्रॅडला हॉलमध्यें भरली होती. इंग्लंडांतील ब्रिटीश ( कॉंग्रेस ) कमिटी आणि हिंदी राष्ट्रीय सभेचें इंग्लंडांतील मुखपत्र इंडिया यांच्या खर्चासाठीं या राष्ट्रीय सभेनें तीस हजार रुपयांची मंजूरी दिली.

---

जागा बदलतां येईल. तशीच जरूर असल्यास (Case of emergency) इंडियन कॅांग्रेस कमिटीस जादा बैठक (Extraordinary Meeting) बोलविण्याचा अधिकार आहे. ( ३ ) राजकीय संस्थांनीं किंवा जाहीर रीतीनें सार्वजनिक सभांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचा या सभेंत समावेश केला जाईल. ( ४ ) राष्ट्रीय सभेचीं सर्व कामें " इंडियन कॉंग्रेस कमिटी " पाहील. या कमिटींत राष्ट्रीय सभेनें निवडलेल्या ४५ सभासदांचा समावेश होणार असून ४० सभासद निरनिराळ्या प्रांतिक कॅांग्रेस कमिट्यांनीं किंवा राष्ट्रीय सभेस हजर असलेल्या त्या त्या प्रांताच्या सभासदांनीं निवडून द्यावयाचे आहेत. कमिटींतील प्रांतवार सभासद असे राहतील:-बंगाल आसाम ८; मुंबई (सिंध-सह) ८; मद्रास ( शिकंदराबादसुद्धां ) ८; वायव्यप्रांत ६; पंजाब ४; वऱ्हाड ३; मध्यप्रांत ३; ( ५ ) इंडियन कॅांग्रेस कमिटीच्या बैठकी वर्षांतून निदान ३ होतील. राष्ट्रीय सभेच्या बैठकीबरोबर एक होईल, जून आणि आक्टोबर यांच्या दरम्यान कधीं तरी एक, आणि राष्ट्रीय सभेची दुसरी बैठक भरण्याच्य पूर्वीं एक ( ६ ) इंडियन कॅांग्रेस कमिटीचें काम करण्यास एक ऑ. सेक्रेटरी आणि एक पगारी असिस्टंट सेक्रेटरी व जरूरीप्रमाणें इतरहि नोकर दिले जातील. कमिटीच्या ऑफिस खर्चासाठीं ५००० रुपयांची रक्कम दरसाल मंजूर करण्यांत येईल. राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी हेच या कमिटीच्या ऑ. सेक्रेटरीचें काम पाहतील. ( ७ ) प्रत्येक प्रांतांत प्रांतिक कॅांग्रेस कमिटी स्थापण्यांत यावी. व अशा स्थापन झालेल्या कमिट्यांनीं देशांत राजकीय ज्ञानाचा फैलाव करावा, प्रांतिक परिषदा भरवाव्या, व त्यांनीं आपल्या कामाचा रिपोर्ट प्रत्येक वर्षी राष्ट्रीय सभेस द्यावा. ( ८ ) अध्यक्ष निवडणें, ठरावांचा खर्डा तयार करणें,

१९०१ ची १७ वी राष्ट्रीय सभा सर दिनशा एदलजी वाच्छा यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास भरली होती. या राष्ट्रीय सभेला, हिंदुस्थानाला ५८ सालच्या जाहीरनाम्यानें मॅग्नाचार्टा देणाऱ्या महाराणी व्हिक्टोरिया, आणि राष्ट्रीय सभेच्या कल्पनेचे आद्य जनक न्या. माधव गोविंद रानडे यांच्या मृत्युबद्दल दुःख प्रदर्शित करण्याचा प्रसंग आला होता. आसामांतील चहाच्या मळ्यांतील मुदतबंदी मजुरांचा प्रश्न या राष्ट्रीय सभेनें विशेष विचारांत घेतला. इंग्लंडांतील इंडिया पत्र आणि ब्रिटीश कॉंग्रेस कमिटी यांचा खर्च भागविणें बरेंचसें जड जाऊं लागल्यामुळें या परिषदेनें प्रतिनिधींची फी १० रु. होती ती २० रुपये केली.

१९०२ सालची १८ वी राष्ट्रीय सभा अहमदाबादेस सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. या सालीं लॉर्ड कर्झनसाहेबांचे शिक्षण कमिशन बसलें.

१९०३ सालची १९ वी राष्ट्रीय सभा मद्रासेस मि. लालमोहन घोस यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. राणीच्या जाहीरनाम्याला "अशक्य सनद" ठरविणाऱ्या कृत्यांपैकीं पब्लिक सर्व्हिसच्या उच्च जागांवरून हिंदी लोकांची हाकालपट्टी करणें व त्या जागा एकजात गोऱ्यांना देणें, व काळा अदमी अक्ष-

---

प्रतिनिधींच्या निवडणुकीचे नियम करणें, वक्त्यांची निवड करणें आणि राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम आखणें हीं सर्व कामें कॉंग्रेस कमिटीनें करावयाचीं आहेत. ( ९ ) प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनींच सभासदांच्या निवडीसाठीं किंवा आपल्या कार्यक्रमासाठीं, नियम, पोटनियम करावयाचे आहेत; परंतु या सर्व नियमांना आणि पोट नियमांना राष्ट्रीय सभेची मंजुरी पाहिजे. ( १० ) हिंदी राष्ट्रीय सभेचे उद्देश सिद्धिस नेण्यासाठीं इंग्लंडांत ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी नांवाची संस्था स्थापण्यांत येऊन, तिला लागणारा खर्च राष्ट्रीय सभेनें मंजूर करावा. ( ११ ) हिंदी राष्ट्रीय सभेचें कार्य करण्यास एक फंड उभारण्याची कॉंग्रेस कमिटीनें खटपट करावी; व हा फंड प्रत्येक प्रांतानें निवडून दिलेल्या अशा ७ ट्रस्टींच्या ताब्यांत द्यावा.

रशः भाकरीच्या तुकड्याचाच—तोहि मोठ्या मुष्किलीनें आणि मेहेरबानीनें दिलेला—घनी करणें हें लॉर्ड कर्झनसाहेबांचे पहिलें कृत्य त्या सालीं झालें होतें. त्याचा तीव्र निषेध या राष्ट्रीय सभेनें केला. बंगालच्या फाळणीचा पाया लॉर्ड कर्झनसाहेबांनीं याच सालीं घातला होता.

१९०४ सालची २० वी राष्ट्रीय सभा मुंबईस सर हेन्री कॉटन यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सर हेन्री कॉटन यांच्या नेतृत्वाखालीं गेलेल्या शिष्टमंडळाची मुलाखत घेण्याचें लॉर्ड कर्झनसाहेबांनीं साफ नाकारलें. शिक्षण संस्थांना सरकारच्या मुठींत घेणारा कर्झनसाहेबांचा प्रसिद्ध युनिव्हर्सिटि आक्ट याच वर्षी पास होऊन सुरतेच्या बखेड्याच्या पायाचा पहिला दगड घातला गेला.



# प्रकरण ६ वें.

## बंगालची फाळणी.

चांगल्याची उत्पत्ति नेहमीं वाइटांतूनच होते. म्हणजे चांगल्या गोष्टींच्या पोषणार्थ वाईट गोष्टींतील पोषक रस अवश्य असतो. मनुष्यांच्या रक्ताचा सडा आणि मांसाचा चिखल यांतूनच जगांतले मोठमोठे विजय निर्माण झाले आहेत. धान्याची किंवा फळांची चांगली निपज होण्यास शेण राखाडी-सारख्या वाईट जिनसांचेंच खत घालावें लागतें. कोणत्याहि राष्ट्राच्या राष्ट्रोन्नतीचा वृक्ष, अधिकाऱ्यांच्या लोकक्षोभकारक वाईट कृत्यांचेंच खत मिळाल्यावर फोफावला आहे असें इतिहास सांगतो. हिंदी राजकारणांतहि याच इतिहासाची पुनरावृत्ति झाली व होत आहे यांत कांहीं आश्चर्याचें किंवा अपूर्व नाहीं. परंतु वाईट गोष्टींच्या बजबजपुरीनें किंवा त्यांच्या हिडिस स्वरूपानें मन भेदरावें हा मनुष्य स्वभावच आहे. क्षोभकारक गोष्टींनीं क्षोभ झाला नाहीं, तर तो मनुष्यपणाच नाहीं. संताप आणणाऱ्या गोष्टींचा, स्वतःच्या निर्बलतेमुळें प्रतिकार करतां आला नाहीं, म्हणजे निराश होऊन त्याकडे पाठच फिरवून बसणें हाहि मनुष्य स्वभावच आहे. मनुष्याच्या किंवा राष्ट्राच्या अंगांतील सामर्थ्य किंवा मनाचा खंबीरपणा अशाच वेळीं कसोटीला लागतो. रक्ताच्या सडयाचें किंवा मांसाच्या चिखलाचें भेसूर स्वरूप पाहून गलितधैर्य झाल्यावरहि लढाई करण्यास लोकांच्या अंगांत उत्साह आणणाराच वीर विजयी होतो; शेण राखाडीचा किळस न करितां पिकाची निगा राखणाराच शेतकरी चांगलें पीक काढूं शकतो.

लॉर्ड लिटनसाहेबांच्या लोकक्षोभकारक कारकीर्दीनें हिंदी राजकारणाच्या वृक्षाला खत मिळून तो पुढें इतका जोमदार झाला कीं, सर ऑकलंड कॉलव्हीन सारख्यांनीं आपल्या अधिकाराच्या वाऱ्यानें तो उन्मळून पाडण्याचा प्रयत्न केला, तरी तो पडला नाहीं; एंवढेंच नव्हे, तर त्याच्या आजूबाजूची माती उकरून त्याचीं मुळें अधिकच खोल घालविण्याचें कार्य त्यानें केलें. पुढें १४।१५



सर दिनशा एदलजी वाच्छा.

अध्यक्ष, १७ वी राष्ट्रीय सभा कलकत्ता सन १९०१.



बाबु लाल मोहन घोस.

अध्यक्ष, १९ वी राष्ट्रीय सभा मद्रास सन १९०३.

वर्षांच्या दीर्घ कालानंतर हेंच कार्य लॉर्ड कर्झन साहेबांनीं पुन्हां एकवार केलें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. लॉर्ड लिटनसाहेबांवरहि ताण करणारी, लोकमताविषयीं बेदरकार आणि प्रतिगामी अशी लॉर्ड कर्झनसाहेबांची कारकीर्द १८९९ पासून सुरू झाली. लॉर्ड रिपनसाहेबांनीं लावलेल्या, आणि त्या वेळे-पासून जोपासलेल्या स्थानिक स्वराज्यावर या, साम्राज्य भक्ताच्या कुऱ्हाडीचा पहिला जोराचा घाव बसला. अकस्मात् आग लागून ती एकदम भडकली ह्मणजे साधारण मनुष्य भांबावून जातो, व ती अधिकाधिकच भडकूं लागली ह्मणजे तो निराश होतो; असाच अनुभव येथेंहि आला. लॉर्ड कर्झनसाहेबांची प्रतिगामी राज्यपद्धतीची आग, दिवसेंदिवस जशी भडकूंच लागली तसतशी हिंदी लोकांची निराशाहि वाढूं लागली. १९०४।५ च्या सुमारास तर या निराशेचा अतिरेक झाला. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या दडपशाहीच्या सोटयानें हिंदी राज-कारणी पुरुषांना ग्लानि येऊन अंधुक झालेल्या त्यांच्या दृष्टीला चार हातांपली-कडचेंहि कांहींच दिसेनासें झालें. कर्झनसाहेबांची सत्ता आणि लोकांची संघशक्ति यांच्या चाललेल्या या चकमकींत सत्तेचाच तात्पुरता तरी वरपगडा होऊन संघशक्तीला कांहींशी माघार घ्यावी लागली. सत्तेनें संघशक्तीला एक पाऊल मागें रेटल्यामुळें लोकांचा या शक्तीवरील विश्वास डळमळूं लागला. संघशक्तीनें आपल्याला आपली राजकीय प्रगती करून घेतां येईल, हा मनांत बाणलेला आजपर्यंतचा दृढ विश्वास ह्मणजे, एखाद्या गुलामानें स्वप्नांत राजसिं-हासनावर बसल्यामुळें, प्रहर दिवसापर्यंत खुशाल झोपीं जावें; पण त्याच्या गुलामगिरीची जाणीव देणारे धन्याचे कांटेरी कोरडे पाठीवर बसतांच स्वप्नां-तील राजेपण विसरून चकित मुद्रेनें पण अश्रुपूर्ण नेत्रांनीं, आपल्या सालडें निघालेल्या अंगाकडे पहाणें होय; असें आतां लोकांना वाटूं लागलें. राष्ट्रीय सभा आणि राष्ट्रीय चळवळ हें निव्वळ खूळ आहे, शिष्ट ह्मणविणाऱ्या देशां-तल्या चार संभावितांचा चकाट्या पिटण्याचा तो एक अड्डा आहे, अशी राष्ट्रीय सभेची आणि राष्ट्रीय चळवळीची उघड उघड थट्टा, देशांत चहूंकडे होऊं लागली. १८।१९ वर्षांच्या कालांत राष्ट्रीय सभेनें किंवा राष्ट्रीय चळवळीनें काय दिग्वि-जय लाविले आहेत, असल्या शेलक्या शब्दांनीं तिला सर्व लोक हिणवूं लागले.

राष्ट्रीय चळवळीसारखी निष्फळ चळवळ सुरू करून १८।१९ वर्षं व्यर्थ दवडलीं त्यापेक्षां हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीसाठीं चळवळ केली असती, तर आज कांहींतरी दृश्य फल दिसलें असतें; आतां तरी राजकीय चळवळीचें खूळ टाकून औद्योगिक उन्नतीकडे अधिक लक्ष द्या; असा उपदेश चहूंकडून आणि सर्व दर्जाच्या लोकांकडून ऐकूं येऊं लागला.

संघशक्तीला जायबंदी करणारीं, लोकमताला कवडीचीहि किंमत न देणारीं, हिंदुस्थानाला त्याच्या गुलामगिरीची पुरेपूर जाणीव देणारीं, हिंदी लोकांचा क्षोभ अतिरेकाला नेऊन, होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करतां येत नाहीं ह्मणून, हिंदी जनतेला संतापयुक्त निराशेनें वैतागण्यास लावणारीं, आणि ब्रिटिशांच्या स्वातंत्र्यप्रिय बाण्याला किंवा इभ्रतीला कालिमा लावणारीं कर्झनसाहेबांच्या अरेरावीचीं जीं कांहीं कृत्यें आहेत, त्यांत बंगालची फाळणी हें शेवटचें आहे. या फाळणींत राज्यव्यवस्थेची सोय हें दाखविण्यांत आलेलें प्रमुख कारण निव्वळ ढोंगीपणाचें आहे. जोमानें वाढीस लागलेल्या हिंदुस्थानच्या राजकीय जागृतीच्या वृक्षावर जोराचा घाव घालावा हाच त्या फाळणींतला अंतस्थ हेतू, आणि मुख्य उद्देश होता. बंगाल्यांत सुशिक्षित आणि संपन्न लोकांचा भरणा अधिक, राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या लोकांत बंगालीच विशेष, राजकीय चळवळीचा प्रत्यक्ष आरंभ बंगालनेंच केला होता, आणि हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि भागापेक्षां बंगाल्यांत राजकीय जागृति अधिक तीव्र स्वरूपांत असून राजकीय ऐक्यहि चांगलेंच जाणवण्यासारखें होतें. बंगाल ह्मणजे राजकीय चळवळींचें माहेरघर (Centre of political disturbances) असें सरकार नेहमीं समजत असे, एवढें सांगितलें ह्मणजे बंगालवरील सरकारची दृष्टि कशा स्वरूपाची होती हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. सुधारलेलें सरकार प्रत्यक्ष युद्धाला भीत नाहीं; पण राजकीय जागृती उत्पन्न झालेल्या सुशिक्षित वर्गाशीं धर्मयुद्धाचे दोन हात करण्यास तें भ्याडाहून भ्याड असतें. तोफांच्या गोळ्यांचा पावसासारखा वर्षाव झाला, तरी हें सरकार डगमगणार नाहीं, पण सनदशीर चळवळींच्या धक्काबुक्कीला देखिल तें अगदीं भेदरून जातें, शत्रूचीं हजारों विमानें आपल्याभोंवतीं घिरट्या घालीत असलीं तरीहि हें

सरकार स्वस्थ झोंप घेईल; परंतु एकाद्याच सदनशीर चळवळ्याची नजर सरकारी कृत्यांवर फिरूं लागली तर ती फोडून टाकण्यास तें, अंगीं असेल नसेल तें सामर्थ्य खर्ची घालतें. हा पदोपदीं नडणारा सुशिक्षित वर्गाचा संघ मोडावा, सरकारी कृत्यांवर सनदशीर चळवळ्यांची घारीसारखी फिरणारी ही दृष्टि फोडावी, राजकीय आकांक्षा तृप्त करण्यासाठीं एकवटूं पहाणाऱ्या हिंदुस्थानच्या या एका शक्तीचे तुकडे करावेत, व आपल्या अप्रतिहत राज्यकारभारांतील एक मोठा दगड दूर फेकावा, एवढाच या फाळणीचा हेतू होता. वास्तविक हा फाळणीचा प्रश्न निव्वळ प्रांतिक असून त्यानें आसेतुहिमाचल सर्व हिंदुस्थान दणाणून सोडला याचें कारण हेंच आहे. राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं खानदेशाचे, पूर्व पश्चिम असे दोन भाग आहेत; कर्नाटकाचे उत्तर दक्षिण दोन तुकडे केले आहेत; महाराष्ट्रहि दोन तीन ठिकाणीं विभागला आहे; परंतु या कोणत्याहि विभागणीच्या वेळीं लोकांनीं सरकारला विरोध केला नाहीं, किंवा विरोधी चळवळीची कल्पनाहि त्यांना शिवली नाहीं. बंगालच्याच फाळणीच्या वेळीं एकजात हिंदुस्थानानें चळवळ केली, आणि निव्वळ स्थानिक, किंवा प्रांतिक प्रश्नाला राष्ट्रीय स्वरूप दिलें, तें केवळ आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या फोंफावणाऱ्या वृक्षावर घाव घालण्याचाच कर्झनसाहेबांचा हेतू होता ह्मणून होय.

ह्या फाळणीच्या कल्पनेची जननी लॉर्ड कर्झनसाहेब नसून, तिचें बाळंतपण करणारी अपेशी हाताची ती सुईण आहे. बंगालच्या फाळणीचा पाया १८७४ सालींच पडला होता. नैर्ऋत्य सरहद्दीवरील कचर आणि सिलहट हे दोन जिल्हे, राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं आसामला जोडले. त्या वेळीं राजकीय जागृतीचा, किंवा संघशक्तीचा श्रीगणेशा देखिल सामान्य जनसमूहाला मिळाला नव्हता. आपलें राजकीय हिताहित कशांत आहे हें पाहण्याची दूरदृष्टि त्या वेळच्या लोकांत नव्हतीच म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत बंगालचे हे दोन जिल्हे हिसकून आसामला दिले त्या वेळीं लोकांचें तिकडे मुळींच लक्ष गेलें नाहीं, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पुन्हां १८९१ सालीं बंगालचे ले. गव्हर्नर, ब्रह्मदेश आणि आसाम या दोन्हींचे चीफ कमिशनर्स आणि कांहीं लष्करी अधिकारी यांची एक लहानशी परिषद् भरून तींत या नैर्ऋत्य सरहद्दीच्या संरक्षणाचा प्रश्न

विशेष पुढें आला; व त्यासाठीं लुसाई हिल्स आणि चित्तगांग हे असामला जोडण्याची या परिषदेनें जोराची शिफारस केली. १८९६ साली त्यावेळेचे आसामचें कमिशनर सर विल्यम वार्ड यानीं या परिषदेच्याहि पुढें एकदम चार पावलें टाकिलीं. वरील परिषदेच्या शिफारशींत आणखी डाक्का, व मैमनसिंग या बंगालच्या दोन महात्त्वाच्या जिल्ह्यांचाहि समावेश करून हा एक मोठा तुकडा आसामला द्यावा अशी त्यांनीं मागणी केली. परंतु बंगाली लोकांच्या किंवा सरकारच्याच सुदैवानें म्हटलें तरी चालेल, ही बंगालच्या विभागणीची योजना पुढें मांडल्यावर लागलीच सर विल्यमसाहेबांची कारकीर्द संपली, आणि त्यांच्या जागी, हिंदी लोकांविषयीं व त्यांच्या राजकीय चळवळींविषयीं नेहमीं सहानुभूति बाळगणाऱ्या, न्याय आणि नि:पक्षपातीपणा यांचा थोडातरी बोज ठेवणाऱ्या, बंगाल आणि बंगाली लोक यांच्या स्वभावाची, त्यांच्या सनदशीर चळवळींची पूर्ण माहिती असलेल्या सर हेन्री कॉटन यांची नेमणूक झाली. त्यांनीं सर विल्यम वार्डसाहेबांच्या या योजनेला कसून विरोध केला. त्यांच्या विरोधानें बंगाली लोकांचें आजचें मरण उद्यांवर ढकललें व सरकारलाहि कांहीं वेळ स्वस्थता दिली. सर विल्यमसाहेबांची व १८९१ सालच्या परिषदेची योजना सर हेन्री कॉटन यांनीं फेटाळली आणि फक्त रानटी लोकांनीं भरलेल्या लुसाई हिल्स तेवढ्या आसामला दिल्या. नंतर लॉर्ड कर्झनसाहेबांची चिरस्मरणीय कारकीर्द सुरू झाली. वास्तविक आतां त्या प्रश्नाचें महत्व नव्हतें; पण आपल्या पूर्वींच्या व्हाइसरायांनीं राज्यकारभारांत ठिकठिकाणीं घोडचुका करून सगळी घाण केली आहे, अशी कर्झनसाहेबांनीं आपली पक्की समजूत करून घेतली होती, व ती घाण उसपून काढण्याच्या इराद्यानेंच ते हिंदुस्थानांत आले होते. (Twelve problems in his pocket) त्यांनीं राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातांत घेतली न घेतलीं तोंच स्थानिक स्वराज्यवर आणि शिक्षणसंस्थांवर गदा आणून ही घाण उसपण्यास आरंभ केला होता.

१९०३ च्या डिसेंबर महिन्यांत त्यावेळचे, सरकारच्या होम डिपार्टमेंटचे सेक्रेटरी सर हरबर्ट रिस्ले यांनीं, या बंगालच्या फाळणीच्या (चित्तगांग, डाक्का,

आणि मेमनसिंग हें आसामला तोडून देणें ) प्रश्नाचा पुन्हां विचार करण्याचें सरकारनें ठरविलें आहे, असें जाहीर केलें. कर्झनसाहेबांच्या या अकल्पित ठरावानें बंगल्यांत विलक्षण खळबळ उडवून सोडली. चहूंकडून जोराचा विरोध होऊं लागला; हिंदू मुसलमान या सरकारी कृत्याचा धि:कार करूं लागले. हा विरोध इतक्या तीव्र स्वरूपाचा झाला कीं, कर्झनसाहेबासारखा लोकमताविषयीं बेदरकार आणि अरेराव व्हाइसराय देखील वरमला. लोकमताला मान वाकवावी लागणार अशीं चिन्हें दिसूं लागतांच कर्झनसाहेबांना अधिक चीड आल्यासारखें झालें. बंगालची फाळणी करावयाची हा तर निश्चयच, पण लोकांपुढें छातीठोक उभें राहून तसें म्हणण्याची त्यांची प्राज्ञा नव्हती. बंगालच्या फाळणीची एकदां जुजबी योजना लोकाच्या माहितीसाठीं व त्यांची मनःप्रवृति अजमावण्यासाठीं प्रसिद्ध केल्यावर, लोकांचा कल समजतांच पुढील योजना आणि सरकारचे विचार लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केले नाहींत. नंतरचा सगळा कारभार आणि बेत, अंधारांत अगदीं गुप्त रीतीनें चालले होते. सगळी योजना तयार करून स्टेट सेक्रेटरसाहेबांची मंजूरी मिळवीपर्यंत फाळणीच्या बाबतींत सरकारचे काय बेत चालले आहेत, याची कर्झनसाहेबांनीं लोकांना दाद देखील दिली नाहीं. मोडकळीस आलेलें घर, पोकळ वाशाचा आधार सुटून एकदम कडाडावें त्याप्रमाणें १९०५ च्या जुलैच्या ग्याझेटांत “स्टेट सेक्रेटरीसाहेबांच्या मंजुरीनें ता. १६ आक्टोबर १९०५ पासून बंगालची फाळणी केल्याचें” हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें.

बंगालच्या फाळणीच्यावेळीं लोकमत जितकें प्रक्षुब्ध झालें होतें, व सरकारला जितका विरोध केला गेला होता, तितका विरोध यापूर्वी कधींहि झाला नव्हता, लोकाविषयीं इतकी बेपर्वाहि पूर्वी कधीं विकोपाला गेली नव्हती. फाळणीचा प्रश्न उपस्थित झाल्यापासून एकटया बंगाल्यांत निषेधप्रदर्शक सभा २०००हून अधिक भरल्या व प्रत्येक सभेला ५०० ते ५०००० लोक जमत. आरंभीं आरंभीं तर बंगातल्यांतील एकजात मुसलमानहि सरकारला विरोध करण्यास सरसावले होते. नंतर कर्झनसाहेबांच्या इच्छेला वळी पडलेले डाक्काचे नवाब सर सलीमुल्ला यांनीं सरकारच्या या योजनेला Beastly

arrangement असें उघड संबोधिलें होतें. पुढें कर्झनसाहेबांच्या कारवाईनें कांहीं अदूरदर्शी मुसलमान सरकारला मिळाले, परंतु बंगाल्यांतील सर्वच मुसलमान कर्झनसाहेबांच्या या विषमिश्रित गुळाच्या खड्याला भाळले नाहींत. १९०६ सालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेंत डाकाच्या नबाबसाहेबांचे बंधू नवाबजादा ख्वाजा अटिकुल्ला यांनीं राष्ट्रीय सभेला स्पष्ट सांगितलें कीं, कांहीं स्वार्थसाधू मुसलमानांखेरीज या फाळणीला कोणाचीहि संमति नाहीं. कलकत्त्याच्या "सेंट्रल महामेडन असोसियेशननें" तर याला विरोधच केला होता. सर जितेंद्र मोहन टागोर, सर गुरुदास बानर्जी राजा प्यारीमोहन मुकरजी, डॉ. राशबिहारी घोस, कासीमबझारचे महाराज, मैमनसिंगचे महाराज, वगैरेसारख्या कित्येक लोकांनीं राजकारणांतून अंग काढून घेतले होते, परंतु यावेळीं त्यांनीं देखील या चळवळींत उडी घेतली. हिंदुस्थान सरकारला आणि स्टेट सेक्रेटरीला लोकमत कळविणारे हजारो विनंति अर्ज पाठविले. एका अर्जावर तर ७०,००० हून अधिक सह्या होत्या. ता. ११ मार्च १९०५ ला कलकत्त्याच्या टौन हॉलमध्यें नागरिकांची एक जंगी जाहीर सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं डॉ. राशबिहारी घोस हे होते. या सभेंत कर्झन साहेबांच्या सर्व कारकीर्दीचें सिंहावलोकन करून या औरंगजेबी व्हाइसरायाचा, लोकांनीं ठराव रूपानें धिक्कार केला. ( Vote of Censure ) व्हाइसरायासारख्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्याचा, किंबहुना हिंदुस्थानच्या सार्वभौम बादशहाचा हिंदी जनतेनें पहिल्यानदां जाहीर धिक्कार केला, याच वेळीं.

या सर्वांला न जुमानतां कर्झनसाहेबांनीं स्वतःच्या, निव्वळ एकट्याच्या हट्टानें बंगालची फाळणी लोकांवर जबरीनें लादली; त्यावेळीं, शांत, धीर, राष्ट्रीय चळवळींवर आणि आपल्या ध्येय साधनाच्या सनदशीर मार्गावर पूर्ण विश्वास असलेल्या लोकांचीं मनें देखील संतापयुक्त निराशेने व्यापिलीं होतीं. ही कर्झनशाही अशीच आणखी कांहीं दिवस चालली असती तर आजच्या असहकारितेचा जन्म त्याच वेळीं झाला असता; व कदाचित् त्याचे जनकत्व, आजच्या असहकारितेच्या जनकाच्या गुरूकडेच आलें असतें. या बंगालच्या फाळणीनें

कर्झनी प्रकृतीच्या नोकरशाहीशीं सहकारिता करण्यास ना. गोखल्यासारख्यांचीहि मनें पूर्ण विटलीं होतीं. १९०५ सालीं बनारस येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष पदावरून ना. गोखले ह्मणतात.

If all Indians are to be treated as no better than dumb driven cattle, if men, whom any other country would delight to honour, are to be thus made to realize the utter humiliation and helplessness of their position in their own, then...... "*Good bye to all hope of Co-operating in any way with the bureaucracy*.

१९०५ च्या जुलैंत बंगालची फाळणी होणार हे वज्रलेप शब्द कानीं पडतांच बंगालच्या तोंडचें पाणी पळालें; तरी त्यानें अगदींच हातपाय गाळले नाहींत. लोक करणार करणार तें काय करणार, एकदां फाळणी केल्यावर फार झालें तर १०।२० बेफाम भाषणें ( Angry speeches ) करतील आणि आपोआप सरकारी इच्छेच्या सुरीला मान देतील ही कर्झनसाहेबांची घमेंड जिरवून, ह्या अन्यायाचें परिमार्जन होईपर्यंत ही चळवळ थांबवावयाची नाहीं; असें कर्झनसाहेबांना निक्षून सांगणारी, आणि स्वदेशीच्या चळवळीला जन्म देणारी नागरिकांची जंगी सभा आगस्टच्या ७ तारखेला भरली. सरकारच्या या कृत्याचा तीव्र निषेध करण्यासाठीं परदेशी मालावर बहिष्कार घालण्याचा उपदेश मि. कृष्णकुमार मित्रांनीं आपल्या " संजीवनी " पत्राच्या द्वारें आधींपासूनच सुरू केला होता. त्यालाच व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं बंगालच्या पुढाऱ्यांनीं "इंडियन असोसियेशन"मध्यें चर्चा करून वरील सभा बोलाविली होती.

लोकक्षोभ अतिरेकाला नेणारी ही बंगालची फाळणी करण्यास ब्रिटिश प्रधान मंडळ देखील नाखूषच होतें. चिडलेल्या खुनशी व्हाइसरायांनीं, आपल्या योजनेला मंजुरी घेतांना, हिंदुस्थानाविषयीं, हिंदी राजकारणाविषयीं, आपल्या अंतस्थ हेतूविषयीं, फाळणीच्या युक्तायुक्ततेविषयीं, आणि परिणामदुष्परिणामाविषयीं पूर्ण

अज्ञान असलेल्या स्टेट सेक्रेटरीच्या डोळ्यांत निव्वळ धूळ फेकली असे म्हटलें पाहिजे. सत्तर हजार लोकांच्या प्रचंड अर्जानें, आणि मि. हरबर्ट राबर्टस यांच्या प्रश्नानें पार्लमेंटांत या प्रश्नावर वाद झाला होता. या बाबतींतील सरकारची योजना पार्लमेंटपुढें येऊन तिच्यावर वादविवाद झाल्याखेरीज ती अंमलांत येणार नाहीं, असें त्यावेळचे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. ब्राडरिक यांनीं हौस ऑफ कॉमन्समध्यें मि. रॉबर्टस यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना आश्वासन दिलें होतें. म्हणजे पुढच्या वर्षी पार्लमेंटची बैठक सुरू होऊन तींत या योजनेवर वादविवाद होईपर्यंत तरी ती योजना अंमलांत येणार नाहीं अशी स्टेट सेक्रेटरीसाहेबांनीं लोकांत आशा उत्पन्न केली होती. परंतु बंगालची फाळणी करून एक प्रकारें सूडच उगाविण्यास उतावीळ झालेल्या कर्झनसाहेबांनीं इकडे फाळणी झाल्याचें सरकारी ग्याझेटांत जाहीर देखील करून, ब्रॉडरिकसाहेबांचे पार्लमेंटांत चांगलेच दांत पाडले. पुढें कर्झनसाहेब परत गेल्यावर पार्लमेंटांत देखील कर्झनसाहेबांची छी थू होऊं लागली. हौस ऑफ लॉर्डस्‌मध्यें, वृद्ध रिपन साहेब त्यांचें कान उपटूं लागले, कर्झनसाहेबांना कोठेंच थारा मिळेना; तेव्हां हें अपेशाचें खापर कर्झननीं लॉर्ड ऍंपथिलच्या डोक्यावर फोडावें आणि लॉर्ड ऍंपथिलानी मि. ब्रॉडरिकच्या डोक्यावर फोडावें असा कांहींतरी खेळखंडोबा करून वेळ मारून न्यावी लागली.

बंगालच्या फाळणीला आंग्लो इंडियन देखील विरुद्धच होते. सरकारच्या कोणत्याहि कृत्याला उचलून धरणाऱ्या ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ ‘ पायोनियर ’ ‘ इंग्लीशमन ’ ‘ स्टेट्समन ’सारख्या येथील आंग्लो इंडियन वृत्त पत्रांनीं फाळणीचा तीव्र निषेधच केला. सरकारच्या गळ्यांतलें अगदीं ताईत, आणि या फाळणीपासून ज्यांच्या जातभाईंचा फायदाच होता, असे सिव्हिलियन्स देखील या फाळणीचा आणि ती जबरीनें लादू पहाणाऱ्या कर्झनसाहेबांचा निषेधच करीत होते. न्यायाचा कांहींतरी बोज ठेवणारे हायकोर्टाचे सगळे न्यायाधीश विरोधी होते. इंग्लंडमधल्या “ डेली न्यूज ” सारख्या वृत्तपत्रांनीं या प्रश्नावर अग्रलेख लिहून, आंधळें दळतें आणि कुत्रे पीठ खावें, असला प्रकार होऊं देऊं नये असें ब्रॉडरिकसाहेबांना वेळीच बजावलें होतें.

या सगळ्या परिस्थितीचा विचार केला म्हणजे, आपले ह्मणणारे देखील आपली पाठ राखायला तयार नाहींत हें दिसत असूनहि, आपला हेका खरा करणाऱ्या कर्झनसाहेबांची मनोरचना कशी असावी, त्यांचे धैर्य कोणत्या प्रकारचे असावे याची कल्पना होते. बंगालची फाळणी केल्याचे ग्याझीटात जाहीर केल्याबरोबर लॉर्ड कर्झनसाहेबांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला, हें लक्षांत धरण्यासारखें आहे. वास्तविक राजीनामा दिल्यावर त्यांचा राज्यकारभाराशी कांहीं संबंध राहिला नव्हता. पण फाळणी केल्याचें नुसतें जाहीर केल्यानेंच त्यांचें समाधान झालें नाहीं. आपल्यामागून येणाऱ्या व्हाइसरायावर लोकांचें वजन पडेल, कदाचित् पार्लमेंटचेहि पडेल, व तो, ही फाळणी रद्द करील अशी त्यांना भीति वाटली असावी,–आणि ती अगदींच निराधार नव्हती असें ह्मणण्यास जागा आहे—ह्मणून आपण जाण्याच्या आधीं घाईघाईनें सिमल्यास लेजिसोटिव्ह कौन्सिलमध्यें तो कायदा पास करून घेतला. बंगालचे झालेले दोन तुकडे पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घेतल्यावर मग कर्झनसाहेबांनीं हिंदुस्थानांतून पाय काढला.

बंगालच्या फाळणीला हिंदी जनता विरुद्ध होती, ब्रिटिश जनता विरुद्ध होती, पार्लमेंट विरुद्ध होते, येथले आंग्लो इंडियन विरुद्ध होते, योजनेला मंजुरी देणारे स्टेट सेक्रेटरी मि. ब्रॉडरिक हेहि नाखूषच होते, योजना तयार केली कोणी आणि लादली कोणी याबद्दलहि, कर्झन, ऍंपथिल, ब्रॉडरिक यांच्यात लठ्ठालठ्ठी झाली, इतकें असूनहि इंग्लंडांत उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ झाला, आणि लॉर्ड मोर्लेसाहेब हिंदुस्थानच्या वाट्याला स्टेट सेक्रेटरी ह्मणून आले, पण ब्रिटिश राज्याच्या इभ्रतीसाठीं (Prestige) लॉर्ड कर्झनसाहेबांची फाळणी, लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं ब्रह्मलिखितच(Settled fact)करून टाकली. सरकारच्या या विचित्र प्रेस्टिजखालीं बंगाल्याला सात वर्षें दडपून रहावें लागलें. बंगालनें चळवळीची चिकाटी मात्र सोडली नाहीं. सर हेन्री कॉटन, मि. हरबर्ट पॉल, मि. कीर हार्डी वगैरेसारख्या हिंदुस्थानच्या कैवाऱ्यांनीं पार्लमेंटमध्येंहि कर्झनसाहेबांच्या या अन्यायाची जळती ज्योत प्रज्वलित ठेविली होती. पण मोर्लेमिंटो कारकीर्दीत सुधारणांसारखा अकल्पित घास हिंदुस्थानच्या तोंडांत पडला, तरी या अन्यायाचें

परिमार्जन करण्यापुरतेंच ब्रिटिश प्रेस्टिज आडवें आलें. पुढें लॉर्ड मोर्लेसाहेबांच्या मागून लॉर्ड क्यू स्टेट सेक्रेटरीच्या जागीं आले, तेव्हां कलकत्याच्या 'इंडियन असोसिएशन'नें मि. भूपेंद्रनाथ बसूना, या फाळणीची सर्व हकीकत, नव्या स्टेट सेक्रेटरींना समजून देण्याकरितां, बंगालचे शिष्ट म्हणून पाठविले. त्यांनीं लॉर्ड रे साहेबांच्या मदतीनें लॉर्ड क्यू साहेबांची मुलाखत घेऊन त्यांना सर्व परिस्थितीचें यथार्थ ज्ञान करून दिलें. १९०५।०६ सालीं ना. गोखले विलायतेस गेले होते त्यावेळींच त्यांनीं, ब्रिटिश कॅबिनेटच्या सहानुभूतिची जमीन बरीच नांगरून या प्रश्नाच्या फेरतपासणीचें बीं पेरून ठेविलें होतें. त्याला भूपेंद्रांच्या शिष्ठाईनें योग्य वेळीं पाणी देऊन अंकूर उत्पन्न केला. लॉर्ड क्यू साहेबांनीं या सर्व प्रश्नाचा अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें. हिंदुस्थानाला लॉर्ड रिपनसारख्या लाभलेल्या व्हाइसरायांत लॉर्ड हार्डिंज एक आहेत. त्यानीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें यावेळीं नुकतींच हातीं घेतलीं होतीं. त्यांनीहि या प्रश्नाचा सहानुभूतीपूर्वक फेरविचार करण्याचें बंगालला आश्वसन दिलें होतें. अन्यायावर पडणारे इभ्रतीचें वजन कमी करणारा अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीचा वारा आतां चहूकडून वऱ्याच सोसाट्यानें वाहूं लागला; अर्थातच बंगाली लोकांत आशेचा अंकूर जोरानें उद्भवण्यास कारण झालें.

डिसेंबर १९११ ला हल्लींच्या बादशहांचा येथील राज्यारोहण समारंभ दिल्लीस होणार होता. त्यासाठीं बादशहा हिंदुस्थानाला निघण्याच्या पूर्वी इंग्लंडांतील ब्रिटिश कॉंग्रेस कमेटीचे सेक्रेटरी सर विल्यम वेडरबर्न यांच्या अटोकाट प्रयत्नांनीं आणि लॉर्ड क्यू वगैरे प्रधानमंडळाच्या सहानुभूतीनें, कॅबिनेटमध्यें फाळणीच्या फेरतपासणीचा प्रश्न वादाकरितां निघाला. या वादाच्या वेळीं, कर्झन साहेबांची फाळणी कायम केलेल्या लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं देखील विरोधाचें एक अक्षरहि उच्चारलें नाहीं, हें लक्षांत धरण्यासारखें आहे.

अखेर सात वर्षांनीं या अन्यायाचें परिमार्जन होण्याची वेळ आली. दिल्लीदरबार भरण्याची १९११ डिसेंबरची १२ वी तारीख उजाडली. दिल्लीच्या महालावरून हिंदुस्थानचे बादशहा बंगालची फाळणी रद्द केली, असें जाहीर कर-

तील अशा दृढ विश्वासानें बंगालचे बरेच पुढारी दिल्ली दरबारला हजर होते. आणि बादशहांनींहि अन्यायाचें परिमार्जन करून हिंदी लोकांत आपला बोज राखला. अगदीं अखेरी अखेरीस कर्झन साहेबांची फाळणी रद्द केल्याचे बादशहांनीं जाहीर केलें. हिंदुस्थानची राजधानी आजपर्यंत कलकत्ता होती ती दिल्ली केली, बंगालला ले. गव्हर्नरच्या ऐवजीं, स्वतंत्र गव्हर्नर दिला, बिहार ओरिसा, आणि छोटा नागपूर यांना ले. गव्हर्नर दिला; आणि आसामला पूर्वीसारखाच चीफ कमिशनर दिला. हिंदी लोकांच्या असंतोषाच्या आणि साम्राज्यांतील तीव्र निषेधाच्या अत्यंत अशुभ ग्रहांखालीं जन्म पावलेलें कर्झनसाहेबांचें हें मरतुंगडें पोरटें प्रेस्टिजच्या एकाच शुभ ग्रहाच्या जोरावर सात वर्षें जीव धरून होतें; तरी पंचमजॉर्ज बादशहाच्या हांतून माती मिळण्याइतकें तें भाग्यशाली होतें असें म्हटलें पाहिजे.

कर्झन साहेबांनी स्थानिक स्वराज्य, शिक्षण, गोऱ्या सोल्जरांच्या जुलमांची तरफदारी वगैरे आपल्या इतिहासप्रसिद्ध कृत्यांनीं, हिंदी जनतेच्या राष्ट्रैक्याची भावना प्रदीप्त केली, आणि बंगालच्या फाळणीनें तिची परीक्षा घेतली. परीक्षक विद्यार्थ्यांचा मुलाजा न ठेवणारा न्यायनिष्ठुर असला तरच खरी पारख होते. फाळणींत फोडा आणि झोडा (divide and rule) या तत्वाचा पूर्ण अंगीकार केला होता. मुसलमानांना बगलेंत मारून त्यांना सवता सुभा करून देण्यानें व त्यामुळें त्यांच्या राजकीय, धार्मिक, औद्योगिक उन्नतीचा मार्ग अगदीं सिधा करण्याचें आमिष दाखविलें होतें. कांहीं विचारी, आणि दूरदृष्टि मुसलमान, या आमिषाला भाळले नाहींत; त्यांनीं तें आमिष धिःकारलेंच तरी त्यांच्यातल्या अज्ञ बहुजन समाजावर, या मद्याच्या उग्र दर्पानें अंमल चढविलाच. अविभक्त कुटुंबांतून फुटून राजाराणीसारखा चुटकेबाज संसार करण्यास अधीर झालेल्या अविचारी तरुणांप्रमाणें, हा बहुजन समाज कर्झन साहेबांना बळी पडला. पण दारू पाजून बेफाम सोडलेला घोडा आवरतां आवरतां धन्यालाच नाकी नवू येतात, तसाच प्रकार, मुसलमानांना जातिवैमनस्याची दारू पाजून बेफाम सोडलेल्या सरकारचा या बाबींत झाला. फाळणीनंतर पूर्व बंगालचे झालेले पहिले ले. गव्हर्नर मि. बामफील्ड फुल्लर साहेबांनीं मुसलमानांना सर-

कारची ' लाडकी राणी ' ( Beloved wife ) म्हणून मोठ्या कौतुकानें संबोधलें. पण पुढें हीच लाडकी राणी डोक्यावर मिरीं वाटूं लागली. आप- त्याला सरकारचा पाठिंबा आहे, अशा दृढ विश्वासानें पूर्व बंगाल्यांतील हिंदु मुसलमानांचे रक्त सांडलें नाहीं असें ६।७ सालांत फारच क्वचित झालें. कर्झन, बामफील्डांच्या या लाडक्या राणीला आवरून धरण्यासाठीं लॉर्ड मिंटो- साहेबांनीं दडपशाहीचें अस्त्र काढलें. (The Bureaucracy marched from one repression to another.) किंवा त्यांना तें काढणें भाग पडलें. हिंदुमुसलमानांनीं चालविलेल्या या रक्तपातांत सरकारी गुरख्यां- च्याहि अत्याचारांचें रक्त मिसळून, त्याचें स्वरूप अधिकच उग्र झालें. हिंदु- स्थानांत बॉंब गोळ्यांची कल्पना आणि उत्पत्ति झाली ती याच वेळीं. सरका- रच्या दडपशाहीला पूर्वी कधींहि आलें नाहीं, इतकें उग्र स्वरूप आलें याच वेळीं, पोलीस, सार्वजनिक सभा उधळूं लागले, पुढाऱ्यांचे अपमान करूं लागले, पंजा- बच्या लाला लजपतराय अजितसिंह आणि बंगालच्या नऊ पुढाऱ्यांना हद्दपार केलें, सर सुरेंद्रनाथ बानर्जी आणि भूपेंद्रनाथ बसू यांनाही हद्दपार करण्याचें घाटत होतेंच, राजद्रोही खटल्यांना ऊत आला, लोकांनीं सरकारकडे साशंक आणि द्वेष दृष्टीनें पहावें आणि सरकारनेंहि लोकांकडे तितक्याच किंबहुना अधि- कच साशंक आणि द्वेष दृष्टीनें पहावें, लोकांना चीडविणारीं कृत्यें सरकारनें करावीं व सरकारला चिडविणारीं, कृत्यें लोकांनीं करावी असला गोंधळ देशांत, विशेषतः बंगाल्यांत सरसहा माजून राहिला होता.

खवळलेला समुद्र शांत झाल्यावर त्यांतील कांही रत्नें बाहेर येऊन पडतात त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या या खवळलेल्या राजकीय समुद्रांतूनहि एक अमूल्य रत्न हिंदी लोकांच्या हातीं लागलें. हिंदुस्थानांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना बंगा- लच्या फाळणीनें दृढमूल केली; राष्ट्रैक्याची ज्योत प्रज्वलीत केली. आजपर्यंत प्रत्येकजण आपापल्याच पायापुरतें पहात असे. एका प्रांताला झालेल्या दुःखात आपलाहि सूर मिळवून त्याचें सांत्वन करण्याची किंवा त्याला मदत करण्याची, परस्पर प्रेमांतील वृद्धि करणारी सहानुभूति अझून हिंदुस्थानांत उत्पन्न झाली नव्हती, ती यावेळीं जोरानें उद्भवली, एकाच्या पायाला काटा लागला तर



सर हेनरी कॉटन.

अध्यक्ष, २० वी राष्ट्रीय सभा मुंबई सन १९०४



ना. गोपाळ कृष्ण गोखले.

अध्यक्ष, २१ वी राष्ट्रीय सभा बनारस सन १९०५.

हिंदुस्थानचें आपादमस्तक दुःखानें कळवळेल असें हिंदबंधुत्व यावेळींच प्रत्येकाच्या नसानसांत बाणलें. पंजाब आजपर्यंत शेळपट मेंदरासारखा स्वस्थ पडून राहिला होता. हिंदी राजकारणांतील पंजाबी सिंहाची पहिली आणि जोराची झाप याच वेळीं पडली. किंवा पंजाबच्या आधुनिक हिंदी राजकारणाला पहिल्यानदा खरा आरंभ याचवेळीं झाला असें म्हटलें तरी हरकत नाहीं. लॉर्ड लिटनसाहेबाच्या कारकीर्दींत हिंदी राजकारणाचें पाऊल मागें ओढलें गेलें; पण लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत, स्थानिक स्वराज्य, शिक्षण सुधारणादि कृत्यांनीं तें तितकेंच पुढें पडलें. कर्झन साहेबांच्याहि प्रतिगामी आणि जुलमी कारकीर्दीनंतर मोर्ले–मिंटो सुधारणांनीं हिंदी राजकारणांत कर्झनी प्रकृतीच्या लोकांचे डोळे दिपविण्याइतकें पुढें पाऊल टाकलें. जबाबदार राज्यपद्धतीला हिंदी लोक लायक नाहींत, हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्व नाहीं, नाना जाति, नाना धर्म, आणि नाना पंथ यांच्यामुळें त्यांच्यांत एकी नाहीं, असेंच ठरविण्याच्या इरायानें कर्झन साहेबांनीं घेतलेल्या हिंदुस्थानच्या परिक्षेचा जो निकाल, मोर्ले–मिंटो सुधारणांनीं, आणि खुद्द बादशहांनीं दिल्लीच्या तक्तावरून जाहीर केला, त्यांत हिंदुस्थान शंभर पैकीं, शंभर मार्कांनीं पास झाला असेंच आहे.

# प्रकरण ७ वें.

## सुरतेचा बखेडा.

समोरासमोर उभे राहणाऱ्या प्रत्यक्ष शत्रूंपेक्षां हितशत्रूच विशेष हानिकारक असतात, हें त्रिवारी सत्य सर्वकाळ आणि सर्व ठिकाणीं प्रत्ययाला येतें; व या शत्रूंच्या फेकींना तोंडहि नसतें. आपल्याच दांतांनीं आपलेच ओंठ चावल्या-वर शिक्षा कोणाला करावयाची ? दांतांच्या मगरमिठींत सांपडल्याबद्दल ओंठ कापून काढावयाचे कीं, दांतांनीं चावा घेतल्याबद्दल दांत पाडावयाचे ? हे दोन्हीहि प्रकार आत्मघातकीच असल्यामुळें शांत मनुष्याला रक्तबंबाळ तोंडानेंच दिवस काढावे लागतात. नोकरशाहीच्या जबरदस्त पुण्याईनें आणि हिंदी राष्ट्राच्या खड-तर दुर्दैवानें राष्ट्रीय सभेच्या बाबतींत असाच प्रकार घडून आला. १८८५ सालीं मुंबईस उगम पावलेली संघटित हिंदी राजकारणाची नदी अधिकाऱ्यांच्या क्रुद्ध दृष्टीचा भेद करीत नोकरशाहीच्या लवचिक कायद्यांच्या खडकाळ प्रदेशांतून विजयाची गर्जना करीत करीत सुरतेच्या तुटलेल्या कड्यावरून तिनें जोराची उडी घेतली. मूठभर रत्नें आणण्याकरितां खवळलेल्या समुद्रांत उडी घेणारा धाडसी, रत्नें तरी आणतो किंवा स्वत: तरी प्राणास मुकतो; हिंदी राष्ट्रपुरुषांतील मतभेदाच्या खवळलेल्या समुद्रांतून समेटाचें रत्न काढ-ण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें सुरतेच्या कड्यावरून उडी घेतली, परंतु तिच्या पूर्व-जन्मीच्या पापामुळें, त्या रत्नाच्या ऐवजीं राष्ट्रैक्याचा कपाळमोक्ष मात्र तिच्या हातीं लागला.

हिंदी लोकांच्या अज्ञानामुळें, विशेषतः त्यांच्या निस्साहाय्यतेमुळें मन मानेल तसें वागण्यास सवकलेल्या आणि अप्रहित सत्तालोलुप नोकरशाहीला हिंदी लोकांची राजकीय जागृति आणि त्यांच्या राजकीय आकांक्षा याबद्दल कधींच सहानुभूति नव्हती. त्यांच्याबद्दलचा आपला द्वेष, आणि त्या हाणून पाडण्याची, ब्रिटिश अंतःकरणाला आणि लौकिकाला लाजिरवाणी दुष्ट बुद्धि, यांचे सक्रिय प्रदर्शन करण्याची ज्या ज्या वेळीं लहानमोठी संधि आली त्या त्या

वेळीं ती तिनें चुकूनसुद्धां वाया दवडली नाहीं. हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यावर लॉर्ड डफरीन किंवा लॉर्ड लॅन्सडौन यांच्यासारखे, हिंदी राजकीय आकांक्षांविषयीं कांहींशी सहानुभूति बाळगणारे, खंबीर व्हाइसराय येथें अधिकारावर होते तरी, राष्ट्रीय सभा आणि हिंदी वर्तमानपत्रें यांच्या मुखानें बोलल्या जाणाऱ्या लोकमताला तोंडच्या वाफेचीच किंमत देणाऱ्या, किंबहुना, त्याचा उपहास करून अधिकाराच्या गुर्मीत लोकांची चीड किंवा तेढ अधिकाधिक वाढविणाऱ्या नोकरशाहीनें त्यांच्या डोक्यावर नाचण्यास कमी केलें नाहीं. मग प्रधानजींना राज्याचा बंदोबस्त विचारून पुढें केलेल्या कागदांवर सह्या करणाऱ्या लॉर्ड एल्जीनच्या कारकीर्दीत प्रधानजींचा घोडा मोकाट सुटावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं. घोडयाच्या लगामाला हात घालण्याची एल्जीनसाहेबांची छाती नव्हती; म्हणजे हिंदी लोकमताचा उपहास करण्याची अधिकाऱ्यांची प्रवृत्ति या वेळीं विशेषच वाढली. पुढें लॉर्ड कर्झनसाहेब आले. नोकरशाही बरी पण कर्झनशाही नको असें म्हणण्याची पाळी हिंदी लोकांवर त्यांनीं आणली. नोकरशाहीच्या अस्वली गुदगुल्या आणि कर्झनसाहेबांनीं, हिंस्र पशूसारखे तोडलेले काळजाचे तुकडे यांनीं हिंदी जनता अगदीं हैराण झाली होती. या मगरमिठींतून सुटण्यासाठीं धडपडत असतां ती अधिकच घट्ट होत होती, हें पाहून देशांत चहूंकडे निराशेचे ढग आकाशभर फिरूं लागले, ब्रिटिश राज्यावर किंवा त्या लोकांवर विश्वास ठेवणें म्हणजे वाघासारख्या वन्य पशूंवर विश्वास ठेवण्यासारखें आहे असा समज दृढ झाला. यांतून सुटण्यासाठीं चाललेले राष्ट्रीय सभेचे प्रयत्न निष्फळ आहेत अशी खात्री झाली; आणि चहूंकडे असंतोष, अस्वस्थता माजून राहिली. बंगालच्या फाळणीनें लोकांची निराशा आणि संताप अतिरेकाला नेऊन पोंचविला, मनगटांत जोर असल्याखेरीज दादाबाबा करून गोडीगुलाबीनें, स्वतःच्या हिताहिताचें देखिल संरक्षण करणें अशक्य आहे, असें कर्झन साहेबांनीं दाखवून दिल्यामुळें, सामान्य लोकांची निराशातिरेकानें अत्याचाराकडे प्रवृत्ति झाली व सुशिक्षितांतहि खळबळ उडून कांहीं तरी सरकारचें लक्ष वेधणारा कार्यक्रम हातीं घेतला पाहिजे असा त्यांचा कल दिसूं लागला. याच सुमारास इंग्लंडांत

उदार मतवादी पक्ष अधिकाराूढ होऊन, मोर्लेसाहेब हिंदुस्थानच्या वाटयाला स्टेट सेक्रेटरी आले. या सर्व तऱ्हेनें बदललेल्या परिस्थितींत हिंदुस्थानचा कांहीं तरी फायदा होईल, राष्ट्रीय सभेच्या आजपर्यंतच्या प्रयत्नांना रसाळ फळ न आलें तरी, फूल तरी येईल असा एकंदर लक्षणांवरून कयास बांधणारा विचारवृद्ध जुन्या रक्ताचा एक पक्ष, आणि ही आशा व्यर्थ आहे, तलवारीचे वार चुकविण्यास बुद्धिवाद कुचकामाचा असून त्याला तशीच तीक्ष्ण तलवार आणि जोरदार मनगट पाहिजे असें म्हणणारा नव्या रक्ताचा एक पक्ष,—प्रागतिक आणि राष्ट्रीय,—आंग्लो इंडियनांच्या उपहासात्मक भाषेत, मवाळ आणि जहाल—असे हिंदी राष्ट्रीय शक्तीचे दोन तुकडे कर्झनसाहेबांच्या कारकीर्दीत १९०४।५ च्या सुमारास पडले. या दोन पक्षांतील मतभेदाचें किंवा कार्यपद्धतीच्या भेदांचें पहिलें दिग्दर्शन, १९०५ सालीं बनारस येथें, ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेंत तीव्रपणें झालें. राष्ट्राच्या एकमुखी विरोधाला न जुमानतां कर्झनसाहेबांनीं केलेल्या बंगालच्या फाळणीबद्दल संताप आणि निषेध व्यक्त करण्यासाठीं, स्वदेशी आणि इंग्लंडच्या मालावर बहिष्कार हें, निःशस्त्र लोकांच्या हातांतील पाणीदार, आणि ब्रिटिशांचें अंतःकरणच भेदणारें तिखट शस्त्र बंगालनें परजलें होतें. हेंच शस्त्र आसेतुहिमाचल सर्व हिंदी राष्ट्रानें घेऊन ब्रिटिशांवर एकजात हल्ला करावा असें राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें होतें. लो. टिळक प्रभृतींना, या राष्ट्रीय सभेनें स्वदेशी आणि बहिष्कार हा ठराव पास करावा असें वाटत होतें. ना. गोखल्यांनीं आपल्या अध्यक्षाच्या भाषणांत स्वदेशी आणि बहिष्कार यांना पूर्ण पाठिंबा देऊन हें लोकांच्या हातांतील एक कायदेशीर राजकीय शस्त्र आहे. (Political weapon) असें जाहीर केलें. परंतु स्वदेशी आणि बहिष्कार एकदम सर्व हिंदुस्थानांत सुरू करणें हें कितपत हितावह, न्याय्य किंवा शक्याशक्य आहे, याचा अजून राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं विचार केला नव्हता, तेव्हां राष्ट्रीय सभेच्या शिक्कामोर्तबासह असा ठराव पास करूं नये, असें गोखले प्रभृतींना वाटत होतें. ठराव पास करावा असें म्हणण्यांत, महाराष्ट्र, मद्रास आणि बंगाल या तीन प्रांतांतील कांहीं जहाल लोक होते. ज्या प्रांतानें हं

राष्ट्रीय सभा बोलविली होती तो संयुक्तप्रांत स्वदेशी आणि बहिष्कार स्वीकारण्यास तयार नाहीं असें पं. मालवीयांनीं सांगितलें होतें. बंगालचा सिंह, बंगालच्या फाळणीनंतर लोकांनीं राज्याभिषेक केलेला, बंगालचा अनभिषिक्त राजा सर सुरेंद्रनाथ बानर्जी आणि भूपेंद्रनाथ बसू हेहि स्वदेशी बहिष्काराचा ठराव राष्ट्रीय सभेनें करूं नये अशा मताचे होते. या राष्ट्रीय सभेंत स्वदेशी आणि बहिष्काराचा ठराव पास झाला नाहीं; परंतु राष्ट्रांतल्या दुफळीचें आणि सुरतेच्या बखेडयाचें बीं मात्र पेरून ठेविलें.

१९०६ सालीं कलकत्त्यास दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभा भरली, त्या वेळींहि हा वाद बराच माजला होता. विषयनियामक कमिटींत दोन्ही पक्षांची खूप खडाजंगी उडाली. एकदां सर फेरोजशहा मेथा कमेटींतून उठून गेले आणि एकदां लोक. टिळक प्रभृति सोळा लोक उठून गेले. परंतु प्रकरण विकोपाला जाऊं नये म्हणून दोघांत समेट होऊन कलकत्त्याच्या या राष्ट्रीय सभेनें स्वदेशी आणि बहिष्कार हे दोन ठराव स्वतंत्र पास केले. या बैठकींतले आणखी दोन महत्वाचे ठराव म्हणजे स्वराज्य ( Self Government ) आणि राष्ट्रीय शिक्षण हे आहेत. तलवार पेलतां पेलतां ती आपल्याच अंगावर पडावी किंवा मार्गदर्शक म्हणून घेतलेला दिवा स्वतःच्याच हातांत उपडा होऊन अंग होरपळून निघावें, असाच प्रकार कलत्त्याच्या या चार ठरावांनी केला. सुरतेची राष्ट्रीय सभा उधळली जाण्यास, किंवा राष्ट्रीय आणि प्रागतिक यांच्यांतील मतभेदांचें, हाडवैरांत परिवर्तन होण्यास जीं प्रमुख कारणें आहेत त्यांत कलकत्त्याच्या या चार ठरावांना—निदान कागदोपत्रीं—तरी पहिलें स्थान दिलें आहे. हिंदी राजकारणी झालीतेव्हां पुरुषांत दोन तट राष्ट्रीय सभेंत प्रागतिकांचे वजन फार होतें. सभेची सूत्रें हालविणारा सूत्रधार न्या. माधव गोविंद रानडे दिवंगत झाल्यावर हें सूत्रधारत्व--राष्ट्रीयांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे राष्ट्रीय सभेचा अरेराव (Autocrat of the Congress)—सर फेरोजशहा मेथांकडे आलें होतें. आणखीहि थोडया उपहासात्मक भाषेंत बोलावयाचें तर, राष्ट्रीय सभा प्रागतिकांच्या मुठींत होती; प्रागतिकांचें मताधिक्य असल्यामुळें

राष्ट्रीयांना पुष्कळदां नमावें लागे, किंवा त्रागा तरी करावा लागे; हें १९०५ आणि १९०६ सालच्या राष्ट्रीय सभेवरून, कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. तें मताधिक्य काढून आपलें मताधिक्य करावें, प्रागतिकांच्या मुठींतली राष्ट्रीय सभा आपल्या मुठींत घ्यावी, तिचा सूत्रधार–अरेराव, किंवा Autocrat of the Congress मेथा आहे तो टिळक करावा हें या सर्वांचें अंतर्बीज आहे. राष्ट्रीय पक्षाचें मताधिक्य होण्यास, त्या वेळीं सर्व दृष्टींनीं मध्य प्रांतच अनुकूल होता म्हणून कलकत्त्यास राष्ट्रीय सभेस पुढील सालचें ( १९०७ चें ) आमंत्रण नागपूरकरांनीं दिलें; व कॉंग्रेसनें स्वीकारलें.

१९०७ च्या जानेवारींत नागपूरास स्वागत मंडळाची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेच्या अधिकारी मंडळांत प्रागतिक पक्षांतील लोकांचाच भरणा विशेष असल्यामुळें या स्वागत मंडळांतहि प्रागतिक पक्षाचेंच मताधिक्य होतें. याच सुमारास म्हणजे या सालच्या आरंभीं ना. गोखले राष्ट्रीय सभेच्या तत्वांचा प्रसार करण्यासाठीं उत्तर हिंदुस्थानांत फिरत होते. त्यांच्या "सनदशीर" या एकाच शब्दावर केसरीनें जोराचे हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. बाबू अश्विनी कुमार यांनीं आपल्या 'सोशॅलॅजिस्ट' पत्रांतून केसरीवरहि कडी करणारी ज्वलज्जहाल लेखमाला सुरू केली. राष्ट्रांतल्या दुफळीचे ढग आकाशांत झपाट्यानें फिरूं लागले आणि नागपूरच्या स्वागत मंडळांतील पक्षभेदाच्या तंट्यांनीं त्यांला अधिकाधिक भीषण स्वरूप येत चाललें. प्रागतिक पक्षाची निंदा आणि नाचक्की करून आपला पक्ष भक्कम करण्याचें कार्य लो. टिळकांनीं जानेवारीपासूनच जोरानें चालविलें होतें. दादासाहेब खापर्ड्यांनींहि नागपुरास याच वेळीं एक भाषण करून प्रागतिक पक्षाला "The most debased of humankind म्हणून टिळकांची साथ केली होती. त्यांच्या या प्रयत्नांना इच्छित फळें येऊन, प्रत्यक्ष मुलानें बापाचा देखिल मुलाजा न ठेवण्याइतकीं उच्छृंखल तरुणांची डोकीं, जहाल विचारांनीं भडकून गेलीं. फेब्रुवारींत कार्यकारी कमिटी स्थापण्यासाठीं बोलावलेल्या स्वागत मंडळाच्या बैठकींत या दोन पक्षांतील वैमनस्याचें आणि तरुणांच्या बेफाम वृत्तीचें चांगलेंच प्रदर्शन

झालें. सुरतेच्या सभेंत फेकल्या गेलेल्या जोडयाची रंगी तालीमच या बैठकींत झाली. प्रागतिक पक्षांतील वृद्ध वामनराव कोल्हाटकरांवर भर सभेंत जोडा फेकला गेला. सभेचे अध्यक्ष डॉ. गौर यांना पत्रांतून ज्वालाग्राही पूड पाठविली गेली. ही सभा उधळली गेलीच. मंडळांच्या कार्यकारी कमेटींत प्रागतिक पक्षांचें मताधिक्य असल्यामुळें, स्थानिक व्यवस्थेचा, आणि विषय नियामक कमेटीपुढें मांडल्या जाणाऱ्या ठरावांच्या मसुद्यांचा विचार करण्यासाठीं जमणाऱ्या मंडळाच्या बैठकींत राष्ट्रीय पक्षाला माघार घ्यावी लागली. सप्टेंबरची दुसरीहि बैठक अशीच हमरीतुमरीवर येऊन उधळली गेली. प्रकरण फारच विकोपाला गेलें, व तें याहींपेक्षां विकोपाला जाणार असा रंग दिसूं लागला तेव्हां राष्ट्रीय सभा नागपुरास भरवणें कदाचित् हानिकारक होईल असें कार्यकारी कमेटीला वाटूं लागलें. परंतु आपापसांत दुही माजून नागपूरची सभा दुसरीकडे न्यावी लागणें, हें अर्थात्च मध्यप्रांताला विशेषतः नागपूरकरांना लांछनास्पद आणि अब्रू घालविणारें होतें; प्रागतिक पक्षाला देखिल सभेची जागा, असल्या कारणासाठीं बदलणें कांहीं कमी लाजिरवाणें नव्हतें; म्हणून झालेला प्रकार दोघांनींहि विसरून जाऊन, डॉ. मुंजे (जॉइंट जनरल सेक्रेटरी), डॉ. गौर वगैरेंच्या मध्यस्थीनें त्या वेळीं समेट घडून आला. परंतु या समेटानें नागपूरच्या अब्रूचें आजचें मरण उद्यांवर ढकललें एवढेंच. ताज्या आणि सळसळणाऱ्या रक्तांत अत्याचाराचें शिरलेलें विष समेटाच्या औषधानें उतरलें नाहीं. कार्यकारी कमेटीच्या तिसऱ्या बैठकीच्या वेळीं देखिल असाच प्रकार होऊन सभा उधळली गेली. सभा उधळून लावण्याची नागपूरकरांनीं जडलेली ही संवय मोडण्याचें कांहींच लक्षण दिसेना; तेव्हां घरांतलीं भांडणें जगापुढें येऊन होणारी छीः थूः—राष्ट्रीय सभेची बैठक उधळली जाऊन, मध्यप्रांताच्या, नागपूरच्या, किंबहुना सर्व हिंदी राष्ट्राच्या अब्रूचे निघणारे धिंडवडे वाचवावेत अशा उद्देशानें नागपूरच्या स्वागत मंडळांतील कार्यकारी कमेटीनें ऑल इंडिया काँग्रेस कमेटीला सर्व परिस्थिति कळवून राष्ट्रीय सभेची बैठक नागपुरास भरविणें इष्ट वाटत नाहीं, अशा अर्थाचें एक रिप्रेझेंटेशन पाठविलें.

या रिप्रेझेंटेशनचा विचार करण्यासाठीं मुंबईस नव्हेंबरच्या दहाव्या तारखेस ऑल इंडिया काँग्रेसकमेटीची बैठक भरली. नागपूरनें बोलविलेली राष्ट्रीय सभा तेथें भरविणें इष्ट नसल्यामुळें दुसरीकडे कोठें तरी भरविण्याची सूचना ऑल इंडिया काँग्रेस कमेटींत विचारासाठीं आली, त्या वेळीं फक्त दादासाहेब खापर्डे यांनीं नांवालाच या सूचनेला विरोध केला. लो. टिळक या बैठकीला हजर होते, परंतु त्यांनीं त्या वेळीं विरोधाचा एक चकारशब्दहि काढला नाहीं हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नागपूरची राष्ट्रीय सभा दुसरीकडे कोठें तरी नेली पाहिजे हें ऑ. इं. काँ. कमेटींत बहुमतानें ठरल्यावर सुरतेच्या काँग्रेस कमेटीनें मुंबईस शिष्ट मंडळ पाठवून सभेस, सुरतेला आमंत्रण दिलें.

नागपूरची राष्ट्रीय सभा सुरतेला नेण्यांत कमेटीचा सद्धेतु होता हें लो. टिळकांना कबूल होतें. असें ठिकाण बदलण्यास त्यांची अंतःकरणपूर्वक मान्यता नव्हती असें धरलें, तरी त्यांची आडकाठी तरी नव्हती हें स्पष्टच आहे. परंतु पुण्यास गेल्यावर त्यांनीं राष्ट्रीय सभा सुरतेला नेण्यांत मवाळांचा कावा असून कांहीं तरी विशेष अंतःस्थ हेतु आहे असें लोकांना भासविण्याचा केसरींतून प्रयत्न केला. महाराष्ट्रांत राष्ट्रीय आणि प्रागतिक यांच्यांत कायमचें वैमनस्य पडण्यास केसरींतील वस्तुस्थितीचा विपर्यास करून लोकांची दिशाभूल करणारे लेख विशेष कारणीभूत झाले आहेत, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. याच सुमारास (११ नव्हेंबर) लाला लजपतराय आणि अजीतसिंग सुटून आले होते. बैठक बदलण्याच्या जोडीला लो. टिळकांनीं अध्यक्षाच्या निवडणुकीचा वाद उपस्थित केला. या बैठकीचे अध्यक्ष डॉ. रासबिहारी घोष हे योजिले होते. सुरतेच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान डॉ. रासबिहारींस न देतां लाला लजपतरायांना दिलें पाहिजे हा या वादांतला मुद्दा होता. परंतु गेल्या सालीं कलकत्यास झालेल्या नवीन नियमांप्रमाणें अध्यक्षाची निवड सगळ्या स्टँडिंग काँग्रेस कमेट्यांनीं करावयाची असून, जो बहुमतानें निवडून येईल त्याचें नांव, ज्या प्रांतानें राष्ट्रीय सभा बोलाविली असेल त्यानें जाहीर करावयाचें होतें. डॉ. रासबिहारी घोस हें बहुमतानें निवडून आलेले होते, फक्त एकट्या वऱ्हाडचेंच मत विरुद्ध होतें. महाराष्ट्रहि डॉ. रास बिहारींना अनुकूल होता. सुरतेस स्वागत

मंडळाच्या कार्यकारी कमेटीची बैठक होईल त्या वेळीं लाला लजपतरायांना अध्यक्षस्थान देण्याची सूचना आणून या वादाला बरेंच गंभीर स्वरूप आणण्याचें काम सुरतेच्या चार तरुण मुसलमान राष्ट्रीयांनीं पत्करलें होतें. कार्यकारी कमेटींतील बहुमत डॉ. रासविहारींना असल्यामुळें लजपतरायांची सूचना आणून ती बहुमतानें फेटाळली जावी, म्हणजे लजपतरायासारख्या देशभक्ताची उघड उघड विटंबना करावी हें राष्ट्राच्या आणि माणुसकीच्याहि दृष्टीनें लाजिरवाणें होतें; शिवाय लजपतरायांना विनचौकशीनें हद्दपार करण्यांत सरकारनें जो अन्याय केला आहे, त्याबद्दल त्याच्याशीं भांडण्यांत किंवा सरकारच्या असल्या क्षोभकारक कृत्यांबद्दल राष्ट्राची नापसंती व्यक्त करण्यास लजपतराय अध्यक्ष नसल्यानेंच विशेष जोर येईल असा ना. गोखल्यांचा सूर वहात होता. ही सर्व परिस्थिति समजाऊन दिल्यावर सुरतेच्या त्या मुसलमान राष्ट्रीयांनीं, लजपतरायांच्या अध्यक्षाची सूचना सभेंत आणून त्यांची होणारी विटंबना वाचविण्याचें ठरविलें. इतक्यांत स्वतः लजपतरायांनींच आपण अध्यक्षपद स्वीकाणार नाहीं असें जाहीर केल्यामुळें, या सर्व वादाच्या मुळावरच कुऱ्हाडीचा घाव बसल्यासारखें झालें. पण लजपतराय अध्यक्ष होण्यास राजी नसले तरी दुसरा " कोणीतरी " पाहिजे अशी कुरकूर चाललीच होती. पण तिला फारसें स्वरूप आलें नाहीं.

नागपूरची राष्ट्रीय सभा सुरतेला आणण्यांत मवाळांचा कावा आहे या बहाण्यानें महाराष्ट्र, कांहींसा मध्यप्रांत आणि अगदींच थोडा बंगाल यानांच कांहीं वैषम्य वाटलें असेल तें असेल. त्यानें सर्व देशांत खळबळ उडविली नाहीं; आणि लजपतरायांना अध्यक्षस्थान देण्याचाहि खडा हुकला तेव्हां गेल्या सालीं कलकत्यास पास झालेले " स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण " हे चार ठराव यंदाच्या सभेपुढें आणण्याचा प्रागतिकांचा बेत नाहीं, आणि आणलेच तर ते अगदींच निर्जिव स्वरूपांत आणणार आहेत, अशी हूल उठविली गेली. यानें मात्र चहूंकडे बरीच खळबळ उडवून सोडली. वास्तविक या बातमींत कांहींच अर्थ नव्हता. डिसेंबरच्या २२ तारखेस मुंबईस लाला लजपतराय आणि ना. गोखले यांची भेट झाली होती. त्या भेटींत लजपतरायांनीं गोखल्यांना

या उठलेल्या बातमींत कितपत तथ्य आहे हें विचारलें होतें, व गोखल्यांनीं ही बातमी अगदींच निराधार आहे; हें कलकत्त्याचे चारहि ठराव, फक्त संदिग्ध शब्द स्पष्ट करून राष्ट्रीय सभेपुढें येणार आहेत असें निश्चयपूर्वक सांगितलें होतें. या संभाषणाचा गोषवारा लाल लजपतरायांनीं लो. टिळक प्रभृतींना सांगितलेला होता. डिसेंबरच्या २४ तारखेस, उमरावतीच्या रा० मुधोळकरांनीं कित्येक प्रतिनिधींसमोर याचाच पुनरुच्चार केलेला होता, तरी देखिल ह्याच दिवशीं सुरतेस भरलेल्या राष्ट्रीय मंडळींच्या सभेंत लो. टिळकांनीं, या राष्ट्रीय-सभेनें हे चारहि ठराव वगळले आहेत असेंच श्रोत्यांना बजाविलें. अर्थात्च लो. टिळकांच्या या भाषणानें प्रतिनिधींत चलबिचल आणि असंतोष उत्पन्न झाला ही बातमी समजतांच मि. चुनीलाल गांधींनीं सेक्रेटरी या नात्यानें ताबडतोब एक प्रेसनोट काढून लो. टिळकांनीं केलेलें विधान अक्षरशः खोटें आहे असें जाहीर केलें. मि. गांधींनीं ही प्रेसनोट काढली त्याच दिवशीं ह्मणजे २५ तारखेस रा. मुधोळकरांनीं रा. न. चिं. केळकर यांना या बातमींत कांहीं अर्थ नाहीं; व ती बातमी खरी धरून राष्ट्रीय मंडळींनीं गोंधळ माजवूं नये; असें सांगितलें होतें. त्याच दिवशीं काँग्रेस कँपमध्यें (मद्रास टेंट) ना. गोखल्यांनीं सर्व खुलासा करून हे चारहि ठराव सभेपुढें येणार आहेत, एवढेंच नव्हे, तर ठरावांची भाषा देखिल स्पष्ट सांगितली होती. या वेळीं सुमारें २०० प्रतिनिधी, रा. र. पां. करंदीकर ( सातारा ) आणि लो. टिळकांचे बरेच स्नेही हजर होते.

दुसरे दिवशीं ह्मणजे ता. २६ रोजीं अडीच वाजतां राष्ट्रीय सभेच्या कामाला सुरवात होणार होती. मंडप सात हजार लोक बसतील एवढा प्रचंड होता, व तो प्रतिनिधी--प्रेक्षकांनीं त्या दिवशीं खेचून भरला होता. अध्यक्ष येण्यापूर्वीं प्रेक्षक आणि प्रतिनिधी आपापल्या जागीं जाऊन बसले होते. ‘ कलकत्याचे चार ठराव या वर्षीं राष्ट्रीय सभेनें घेतले नाहींत तर टिळक अध्यक्षाच्या निवडणुकीला विरोध करणार आहेत’ असें नाशिकचे जहाल रा. खरे हे आपल्या जहाल अनुयायांना सांगत फिरत होते. तेथील क्षोभक्षम (Excitable) प्रेक्षकांना चेतविण्याचा उद्योग कांहीं बेजबाबदार आणि तमासगीर पुढारी करीतच होते. त्या वेळीं राष्ट्रीय मंडळीच्या उत्तान भावनांनीं खळबळलेलें वातावरण आणि प्रागतिकांच्या

भीतीयुक्त चिंतेनें आलेली स्तब्धता यांनीं राष्ट्रीय सभेच्या मंडपाला एक प्रकारचें भीषण स्वरूप प्राप्त झालें होतें.

नियोजित अध्यक्ष डॉ० रासबिहारी घोस हे, सर फेरोजशहा मेथा यांच्याबरोबर मंडपांत आले, त्या वेळीं प्रतिनिधींनीं, व प्रेक्षकांनीं टाळयांच्या प्रचंड गजरांत त्यांचे स्वागत केलें; त्यांत ' शेमशेम 'चा ध्वनीहि मिसळत होता. डॉ. रासबिहारी घोस आपल्या जागीं जाऊन बसल्याबरोबर स्वागत मंडळाचें अध्यक्ष मि. त्रिभुवनदास मालवीय यांचें भाषण झालें. मधून मधून ' हिस् हिस ' आणि ' नो नो ' चाललेंच होतें. त्यांच्या भाषणानंतर दिवाणबहादूर अंबालाल साकरलाल देसाई हे अध्यक्ष सुचविण्यास उभे राहिले. त्यांच्या तोंडून डॉ. घोसचें नांव बाहेर पडतांच " नो नो " शब्दांनीं गोंगाट केला. नंतर सर सुरेंद्रनाथ बानर्जी हे सूचनेला दुजोरा देण्याकरितां उठले. सुरेंद्रनाथांचें तरी भाषण ऐकून घेतलें जाईल अशी आशा होती; परंतु त्यांना एक अक्षर देखिल उच्चारूं द्यावयाचें नाहीं असा जहाल पक्षानें निश्चयच केलेला दिसला. दंग्याचें प्रमुख उगमस्थान, पुढच्याच रांकेंत, मद्रास आणि दक्षिणी प्रतिनिधींच्या ब्लॉकमध्यें होतें. त्यांच्यांतल्या विशेष आतताई लोकांनीं सभेचें कामच चालूं न देण्याचा कसून प्रयत्न चालविला होता. टिळक आणि लाला लजपतराय बोलण्यास येऊंदेत अशी त्यांनीं सारखी ओरड चालविली होती. सुरेंद्रनाथांनीं बोलण्याची आपल्याकडून शिकस्त केली; परंतु त्यांचे भाषण, या जहालांनीं चालविलेल्या गोंगाटामुळें पहिल्या रांकेवर देखिल ऐकूं येईना. हे लोक बहुधां ३० हून अधिक नसावेत त्यांत मद्रासची संख्या अधिक होती. पण त्यांनीं इतका गोंधळ उडवून सोडला कीं, शेवटीं स्वागताध्यक्षांना सभा तहकूब ठेवणें भाग पडलें. सभा तहकूब झाल्याचें जाहीर होतांच, विजयाच्या आरोळ्यांनीं आणि जहालांनीं, मवाळांना व मवाळांनीं जहालांना चालविलेल्या "शेम शेम" च्या आरोळ्यांनीं सभामंडप दणाणून गेला. ( स्टेट्समन ता. २६।१२।०७ )

दुसरे दिवशीं ( ता. २७ ) दोनप्रहरीं १ वाजतां पुन्हां बैठकीच्या कामाला सुरवात झाली. ( बैठक सुरूं होण्याची नोटीस अगाऊ प्रसिद्ध केली होती. )

नियोजित अध्यक्ष मंडपांत आले त्या वेळीं प्रतिनिधींनीं त्यांचे अपूर्व स्वागत केलें. तोंच " अध्यक्षांच्या निवडणुकीला दुजोरा देण्याचें मि. बानर्जींचें भाषण झाल्यावर, सभा तहकूब ठेवण्याची मी उपसूचना मांडणार आहे, " अशा अर्थाची मि. टिळकांच्या सहीची नोट, एका स्वयंसेवकानें स्वागताध्यक्षांच्या हातीं दिली. स्वागताध्यक्षांना सभेच्या तहकुबीची यावेळीं दिलेली ही सूचना नियमबाह्य आहे असें वाटलें. नंतर काल तहकूब झाल्यापासून बैठकीच्या कामाला सुरवात झाली. मि. सुरेंद्रनाथ बानर्जींनीं अध्यक्षांच्या सूचनेला दुजोरा देण्याचें भाषण संपविल्यावर स्वागताध्यक्षांनीं पं. मोतीलाल नेहरूंना पुष्टी देण्यास सांगितलें. त्यांनीं पुष्टी दिल्यावर स्वागताध्यक्षांनीं या ठरावावर मतें घेतलीं. बहुतेक प्रतिनिधींनीं " ऑल, ऑल " असें ओरडून प्रचंड बहुमत दर्शविलें. मधून मधून "नो नो"च्याहि आरोळया ऐकूं येत होत्या. ठराव पास झाला असें स्वागताध्यक्षांनीं जाहीर केलें. डॉ. घोस टाळयांच्या कडकडाटांत अध्यक्षस्थानापन्न झाले. टाळयांचा गजर चालूलाच होता. त्या गजरांतच अध्यक्ष आपलें भाषण वाचण्यास उठले. तोंच मि. टिळक व्यासपीठावर येऊन " अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधीं मी उपसूचना मांडणार आहे, स्वागताध्यक्षांना अशी अगाऊ नोटीस दिली होती ती मी मांडणार " असें ते म्हणाले. दिलेली नोटीस 'अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधीं' नसून ' सभा तहकूब ' ठेवण्यासंबंधीं दिली होती, हें स्वागताध्यक्षांनीं टिळकांच्या नजरेस आणून, " या वेळीं अशी नोटीस देणें नियमबाह्य असें आमचें मत असून आतां अध्यक्षांची निवडणूक रीतसर झाली असल्यामुळें त्यांच्या निवडणुकीबद्दल उपसूचना मांडतां येणार नाहीं" असें सांगितलें. मि. टिळक अध्यक्षाशीं वाद घालूं लागले. डॉ. घोसनीं त्यांना सर्व स्थिति समजावून देऊन अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधीं उपसूचना मांडतां येणार नाहीं असा निर्णय दिला. यावर मि. टिळक म्हणाले. " अशानें मी हार घेणार नाहीं. याचा निर्णय प्रतिनिधींनी लाविला पाहिजे" ("I will not submit to this. I will now apeal from the President to the delegates") यापूर्वीच मि. टिळकांच्या अनुयायांकडून ओरडा ओरडीस सुरवात

झाली होती, त्यांत अध्यक्षांचें भाषण त्यांच्या अगदीं जवळ बसलेल्यांना देखिल ऐकूं येत नव्हतें. उपसूचना मांडणारच असा मि. टिळक हट्ट घेऊन बसले होते. बैठकीचें काम पुढें चालूंच देईनात. अध्यक्षांच्या निवडणुकीबद्दल आपला तीव्रतम विरोध व्यक्त करून त्यांनीं आपल्या जागेवर जावें असें अध्यक्षांनीं मि. टिळकांना वारंवार सांगितलें. पण आपल्याला जबरीनें घालविल्याशिवाय (Bodily removed) आपण येथून हलणार नाहीं; असें ते उत्तर देत. प्रत्येक वेळीं अध्यक्षांच्या शब्दाला धाब्यावर बसविल्यामुळें प्रेक्षकांत मि. टिळकांविषयीं बराच अनादर उत्पन्न झाला. कांहीं वेळ " शेम शेम "च्या आरोळ्यांखेरीज कांहींच ऐकूं येईनासें झालें होतें. मि. टिळक व्यासपीठावर येऊं लागले त्याच वेळीं हातांत काठ्या घेतलेल्या त्यांच्या अनुयायांपैकीं कांहीं स्वयंसेवकांना बाजूला सारीत व्यासपीठाकडे येत होते. आपलें भाषण वाचणें किंवा मि. टिळकांना आपल्या जागेवर जाण्यास परोपरीनें विनविणें हीं दोन्हीहि निरर्थक झालीं, आणि काठ्यानीं सज्ज असलेले मि. टिळकांचे अनुयायी व्यासपीठावर अधिकाधिकच लगट करूं लागले, तेव्हां अध्यक्षांनीं निकरानें आणि अखेरचें म्हणून, मि. टिळकांची उपसूचना नियमबाह्य आहे, असें पुन्हां एकदां जाहीर करून त्यांनीं आपल्या जागीं जावें अशी सूचना दिली. मि. टिळकांनीं याहि वेळीं अध्यक्षांच्या आज्ञेला मान दिला नाहीं. याच वेळीं, प्रेक्षकांमधून एक जोडा फेंकला गेला तो. सर फेरोजशहा मेथा आणि सुरेंद्रनाथ बानर्जी या दोघांनाहि लागला. खुर्च्या देखिल व्यासपीठाकडे फेंकल्या जाऊं लागल्या मि. टिळकांचे अनुयायी हातांतल्या काठ्या बेफामपणें फिरवीत व्यासपीठावर घुसूं लागले. कांहीं प्रतिनिधींनीं त्यांना अडथळा करण्याचा प्रयत्न केला. हें येथें नमूद करणें जरूर आहे कीं, मि. टिळकांच्या या बेफाम वर्तनानें कांहीं प्रतिनिधींना चीड येऊन त्यांनीं त्यांना जबरीनें सभागृहाबाहेर घालविण्याची परवानगी मागितली होती; परंतु तशी ती मुळींच दिली नाहीं.*

---

*प्रागतिक पक्षांतील कांहीं लोक संतापाच्या भरांत लो. टिळकांवरहात टाकण्यास सरसावत होते, व्यासपीठावरील एका संभावीत गृहस्थांनीं त्यांच्या अंगावर

दंगा अधिकच वाढला व वाढूं लागणार अशी चिन्हें दिसूं लागली तेव्हां अध्यक्षांना राष्ट्रीय सभेची बैठक अनिश्चित तारखेपर्यंत तहकूब करणें भाग पडलें. स्त्री प्रतिनिधींना सुरक्षित-पणें बाहेर जाऊं दिल्यावर बाकीची मंडळी जाऊं लागलीं, परंतु दंग्याचें स्वरूप फारच भयंकर झाल्यामुळें पोलीस आंत शिरले आणि सर्व हॉल मोकळा केला. ( ऑफिशियल स्टेटमेंट ता. २७।१२।०७ )

मि. टिळकांच्या अनुयायांनीं व्यासपीठावर घुसून प्रत्येकाला आपल्या हातांतील काठीनें झोडपण्यास सुरवात केली. कांहीं लोकांना पकडलें होतें; परंतु स्वागत कमेटीनें पुढें काम चालविण्याचें नाकारल्यामुळें पकडलेल्या लोकांना पोलिसांनीं तावडतोब सोडून दिलें. ( सेट्समन. )

मद्रासच्या जहाल पुढाऱ्यांपैकीं एक मि. जी. सुब्रह्मण्य अय्यर यांनीं "हिंदू"त एक पत्र लिहून २६ तारखेच्या दंग्याचें आणि २७ तारखेच्या मारामारीचें खापर प्रागतिक पक्षावर फोडलें, त्याचें निराकारण करतांना रा. मुधोळकर म्हणतात. " पहिल्या दिवशीं मि. जी. सुब्रह्मण्य अय्यर हे अगदीं माझ्याचजवळ होते. सरसुरेंद्रनाथ बोलण्यास उठले त्या वेळीं कांहीं, नागपूरवाल्यांनीं, वऱ्हाडवाल्यांनीं, आणि मद्रास्यांनीं आरडाओरड करून त्यांना बोलूं दिलें नाहीं, तेव्हां ते रागानें म्हणाले."हें अगदीं हीनपणाचें आणि निर्लज्जपणाचें आहे. हें सर्व टिळक आणि खापर्डे यांच्यामुळें झालें. या धुडगुसाचें जनकत्व त्यांच्याचकडे आहे. हा सगळा प्रताप तुमच्या मध्यप्रांताचाच आहे. राष्ट्रीय सभेला आज कोणी गोत्यांत आणलें असेल तर तुमच्या नागपुरानें." त्यांचा तो उपहासात्मक टोमणा ऐकून घेणें भाग होतें, तरी "तुमच्या प्रांतांतले ८।१० मद्रासी देखिल या लोकांपेक्षांहि अधिक बेफाम झालेले नाहींत काय ? " असें विचारून त्यांचा टोमणा त्यांच्याच

---

मारण्यास खुर्चीहि उचलली होती; परंतु ना. गोखल्यांनीं, हा प्रसंग टाळला. लो. टिळकांना व्यासपीठावर रट्टे बसूं न देण्याचें किंवा मारामारीला सुरवात होऊं न देण्याचें सर्व श्रेय ना. गोखल्यांना दिलें पाहिजे; हें त्या वेळीं तेथें हजर असलेला कोणीहि कबूल करील. टिळकांना आपल्या पक्षाकडून मार बसूं नये म्हणून गोखले त्यांच्या शेजारीं शेवटपर्यंत उभे होते.

स्वरांत मला परत करतां आला. दुसरे दिवशीं देखिल ते माझ्यापासून फार दूर होते असें नाहीं. त्या दिवशींचेंहि सगळें खापर त्यांनीं कालच्याच लोकांवर फोडलें व दोन्हीं दिवशींचे त्यांचे उद्गार स्वयंस्फूर्तीचे होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

जोडा कोणी ( नागपूरकरांनीं ) फेकला हें प्रसिद्धच आहे. तो सर फेरोजशहा मेथावरच नेम धरून फेकला होता. तो मि. टिळकांवर फेकला म्हणणें म्हणजे सत्याचा धडधडीत खून करणें आहे. कांहीं प्रमुख जहालांनीं ठराविक इशारे देतांच मध्यप्रांतांतले आणि वऱ्हाडांतले प्रतिनिधी आणि प्रेक्षक म्हणून आलेले लोक, आपल्या हातांतील जाड आणि पल्लेदार काठ्या गरगर फिरवीत व्यासपीठावर घुसले, हे शेकडो लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. मि. टिळक मंडपांतून बाहेर गेले त्या वेळीं त्यांच्या सभोंवती, अशा काठ्यांनीं सज्ज असलेल्या ५० हून अधिक अनुयायांचा गराडा होता. जहालांच्या प्रतिनिधींत आणि प्रेक्षकांत वऱ्हाडमधील तालमींचे वस्ताद, पैलवान, फॅक्टरींतले मजूर, फिटर्स, तेली, वगैरेंचा भरणा होता. नागपूरचे हजाम देखिल प्रतिनिधी म्हणून हजर होते, हें येथें विशेष ध्यानांत धरण्यासारखें आहे. प्रतिनिधींची फी तर राहोच, पण प्रवासाचा देखिल खर्च करण्याची त्यांची ऐपत नव्हती. त्यांचा हा खर्च कोणी केला, ज्यांना इंग्रजीचा गंधहि नाहीं; किंवा राजकारण म्हणजे काय आणि तें कशाशीं खातात हें ज्यांना स्वप्नांतहि माहीत नाहीं, असे लोक राष्ट्रीय सभेला, प्रतिनीधी आणि प्रेक्षक म्हणून आणण्यांत उद्देश काय होता, हे प्रश्न येथें विचार करण्यासारखे आहेत. प्रेक्षकांतून, एक अध्यक्षावर तरी किंवा सर फेरोजशहावर तरी, नेम धरून फेकलेली खुर्ची मी मध्येंच अडविली आहे. त्या मनुष्यानें फेकण्याकरितां पुन्हां दुसरी खुर्ची उचलली होती, ती मीहि त्याच्या हातून हिसकून घेतली. हा मनुष्य वरील प्रांतांतून एक प्रेक्षक म्हणून आलेला होता. सर फेरोजशहा मेथा हे मागील प्रवेशद्वारानें बाहेर पडत असतां, मध्यप्रांतांतील कांहीं विद्वान गृहस्थ ( Graduates ) त्यांच्या अंगावर धांऊन जात होते. त्यांना मी बरेंच खडसावलें, तेव्हां ते म्हणाले " आमची तुमच्याबद्दल ( प्रागतिक ) कांहींच तक्रार नाहीं. या रास्कल पार्शीना चांगली अद्दल घडविली पाहिजे" जे जहाल

व्यासपीठावर मुद्दाम राखून ठेविलेल्या खुर्चीवर बसण्यास, अर्ध्याच तासापूर्वी, बाकारतात तेच आतां आपल्या हातांतला सोटा उभारून व्यासपीठावर मुसंडी मारतात याची संगति कशी लावावयाची ? माझ्याच क्वार्टर्समध्यें, अकोट तालुक्यांतले दोन पाटील उतरले होते. जहालांच्या कँपमध्यें असलेल्या त्या पाटलांच्या हितचिंतकांनीं २७ तारखेस दोनप्रहरीं त्यांना अशी वर्दी दिली कीं, "आज कालच्यापेक्षांहि भयंकर प्रकार होण्याचा संभव आहे, तेव्हां तुम्ही आजच्या सभेला तरी जाऊं नका, किंवा अगदीं पाठीमागच्या तरी खुर्च्यांवर बसा." याच गृहस्थांनीं मलाहि असाच उपदेश केला होता.

जिज्ञासूंसाठीं दोन्ही बाजूंचें म्हणणें खालीं सारांश रूपानें दिलें आहे.

## राष्ट्रीय पक्ष.

गेल्या वर्षी कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनें स्वराज्य, किंवा स्वयंसत्ताक वसाहतीं-प्रमाणें, स्वयंसत्ताक राज्य हिंदुस्थानास मिळवावयाचें हें आपलें धोरण एकमतानें ठरवून स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण, याविषयीं ठराव पास केले. त्या वेळीं (सर फेरोजशहा मेथा प्रभृति) मुंबईच्या प्रागतिकांनीं आपला विरोध दर्शविला नाहीं; पण हिंदी राजकारणाची गाडी, आपल्या जुन्या पुराण्या रूळावर आणण्यास ते अगदीं टपून बसले होते. सुरतेस भरलेल्या (एप्रिल) मुंबई-प्रांतिक परिषदेंत, सर फेरोजशहांनीं, आपल्या जोरावर बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण हे ठराव येऊं दिले नाहींत. नागपूरची राष्ट्रीय सभा सुरतेला आणण्यांत मुंबईच्या प्रागतिकांना आपला उद्देश तडीला नेण्यास चांगलीच संधि मिळाली. सुरतेच्या स्वागत मंडळांत सर फेरोजशहांच्या अनुयायांचाच भरणा भरलेला असल्यामुळें, मंडळाकडून डॉ. रासविहारींनाच राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडविणें हें ना० गोखल्यांना फार सोपें गेलें. लाला लजपतरायांचें नांव अध्यक्षपदाकरितां सुचविलें होतें, परंतु "या वेळीं सरकारशीं बेगुमानपणें वागणें शक्य नाहीं. अधिकाऱ्यांच्या मनांत येईल तर आमची चळवळ ते निमिषार्धांत नेस्तनाबूद करतील" या सबबीवर त्यांना तें स्थान देण्यांत आलें नाहीं. स्वागत मंडळाच्या या कृत्यानें देशांत साहजिक असंतोष उत्पन्न झाला. लाला लजपतरायांना संधि देण्याकरितां, डॉ. घोस यांनीं आपलें नांव परत घेण्यास त्यांच्याकडे शेकडो



लो. बाळ गंगाधर टिळक.

राष्ट्रीय पक्षाचे मुंबईचे पुढारी.



बाबु मोतीलाल घोष.

संपादक, अमृत बझार पत्रिका व बंगालचे राष्ट्रीय पुढारी.

तारा गेल्या. डॉ० घोसनी त्याला जुमानलें नाहीं, एवढ्यांत 'आपण अध्यक्षपद स्वीकारणार नाहीं' असें लजपतरायानींहि जाहीर केलें.

सुरतेच्या राष्ट्रीय सभेपुढें येणाऱ्या ठरावांचे मसुदे करण्याचें काम स्वागत मंडळानें ना० गोखल्याकडे सोंपविलें होतें. परंतु राष्ट्रीय सभेचें काम प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत या मसुद्यांची कॉपी कोणाहि प्रतिनिधीला मिळाली नव्हती. सभेच्या पूर्वी ८।१० दिवस सभेपुढें बहुशा येणाऱ्या ठरावांचें एक कच्चें टिप्पण प्रसिद्ध केलें होतें; त्यांत स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांचीं नांवें नव्हती. पुढें मि० टिळक सुरतेस आले; त्याच दिवशीं संध्याकाळीं जाहीर सभेंत, त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या या पिछेहाटीचा निषेध केला. दुसरे दिवशीं ( २४ डिसेंबर ) श्री० अरविंद घोस यांच्या अध्यक्षतेखालीं सुमारें ५०० राष्ट्रीय प्रतिनिधींची एक सभा होऊन तींत राष्ट्रीय सभेच्या पिछेहाटीला, सनदशीरपणें, जरूर पडल्यास अध्यक्षांच्या निवडणुकीलाहि अडथळा करावयाचा असें ठरलें.

तोंच मि. गांधींनीं, सेक्रेटरी या नात्यानें, "कलकत्याचे विशिष्ट ठराव या राष्ट्रीय सभेनें गाळले आहेत ही उठलेली अफवा अगदींच निराधार आहे" अशा अर्थाची एक प्रेस नोट काढिली; परंतु ठरावांच्या मसुद्यांची कॉपी मात्र कोणालाच दिली नाहीं. राष्ट्रीय सभेच्या घटनेसंबंधीं ना. गोखल्यांनीं तयार केलेल्या मसुद्याची एक कॉपी मि. टिळकांना डिसेंबरच्या २५ तारखेस सहज मिळाली; त्यांत, त्यांनीं "ब्रिटिश साम्राज्याचे इतर घटकावयव, (Members) ज्या स्वरूपाचें राज्य भोगीत आहेत त्याप्रकारचें स्वयंसत्ताक राज्य हिंदुस्थानानें मिळवावयाचें" हें राष्ट्रीय सभेचें ध्येय ठरविलें होतें. त्याच दिवशीं सकाळीं कॉंग्रेस कँपमध्यें मि. टिळकांनीं एक व्याख्यान देऊन स्वराज्य, बहिष्कार, आणि राष्ट्रीय शिक्षण या बाबींत मुंबईचे प्रागतिक कशी पिछेहाट करणार आहेत हें लोकांना समजावून देऊन, राष्ट्रीय सभेच्या होऊं पाहणाऱ्या घटनेंत तिच्या नवीन ध्येयानें स्वयंसत्ताक वसाहतींच्या राज्यपद्धतीला कसें लाथाडलें आहे हे स्पष्ट करून दाखविलें. यांत राष्ट्रीय पक्षाला, राष्ट्रीय सभेंतून हाकलून देण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न कसा आहे हेंहि सांगितलें. राष्ट्रीय सभेचा पाय मागें ओढण्याचा प्रयत्न केला जाणार नाहीं, अशी हमी मिळाली तर अध्यक्षांच्या निवड-

णुकीला आम्ही विरोध करणार नाहीं, असेंहि त्यांनीं सांगितलें. त्याच दिवशीं सकाळीं लाला लजपतराय सुरतेस आले होते त्यांनीं मि. टिळक आणि दादासाहेब खापर्डे यांची भेट घेऊन दोन्ही पक्षांतील कांहीं प्रमुख प्रतिनिधींची एक कमेटी नेमावी व तींत हा दोघांचा वाद मिटवावा अशी आपली इच्छा प्रदर्शित केली. मि. टिळक आणि खापर्डे, यांनीं, असा वाद मिटविण्यास आपली संमत्ति दिली. ( ता. २५ डिसेंबर ) परंतु दुसरे दिवशीं सकाळपर्यंत, त्यांनी सुचविलेल्या या संयुक्त कमेटीचे काय झालें हें कांहींच कळलें नाहीं, किंवा राष्ट्रीय सभेचा पाय मागें ओढला जाणार नाहीं अशी खात्री पटविणारा ठरावांचा मसुदाहि तोंपर्यंत कोणा प्रतिनिधीला मिळाला नाहीं.

२६ तारखेस सकाळी मि. टिळक, मि. खापर्डे, बाबू अरविंद घोस व आणखी कांहीं मंडळी मिळून बाबू सुरेंद्रनाथ बानर्जीकडे गेलीं होतीं—( १ ) ही राष्ट्रीय सभा ठरावांत कांहीं ढवळाढवळ करणार नाहीं, आणि ( २ ) लाला लजपतराय अध्यक्ष असावेत अशी जी लोकांची इच्छा होती, तिचा, अध्यक्षांच्या निवडणुकीच्या वेळीं, कोणत्याहि वक्त्यानें गौरव व आदरयुक्त उल्लेख करण्याचें कबूल केलें तर राष्ट्रीय पक्ष, अध्यक्षांच्या निवडणुकीला विरोध करणार नाहीं असें मि. टिळकांनीं बानर्जींना सांगितलें. अध्यक्षांच्या सूचनेला दुजोरा देणारे बाबू सुरेंद्रनाथच असल्यामुळें त्यांनीं दुसरी सूचना ताबडतोब मान्य केली; व मि. टिळकांनीं ना. गोखल्यांची किंवा मि. माळवी यांची गाठ घ्यावी असें त्यांना सांगितलें, त्याप्रमाणें लागलींच मि. मालवी यांच्याकडे एक स्वयंसेवक पाठविला; परंतु ते त्या वेळीं धार्मिक कृत्यांत गुंतले असल्यामुळें त्यांना येतां आलें नाहीं. पुढें मि. टिळक सभामंडपांत आल्यावरहि त्यांनीं मालवीयांची गाठ घेण्याची शिकस्त केली, परंतु त्यांचा कोठें पत्ताच लागला नाहीं. २-३० च्या ( सभेला सुरवात होण्याच्या ) थोडें पूर्वी मि. माळवी हें अध्यक्षांच्या कँपमध्यें आहेत असें समजलें म्हणून मि. टिळकांनीं त्यांना जवळच्याच तंबूतून उभाउभी भेटून जाण्याविषयीं निरोप पाठविला; परंतु अध्यक्षांची मिरवणूक निघाली असल्यामुळें आपल्याला येतां येत नाहीं

असा त्यांच्याकडून निरोप आला, तेव्हां नाशिकच्या मि. खऱ्यांनीं, मि. टिळकांचे समेटाचे प्रयत्न व्यर्थ झाले ही बातमी राष्ट्रीय प्रतिनिधींत फैलाविली.

## पहिला दिवस.

अध्यक्ष वगैरे मंडळी आपापल्या स्थानीं जाऊन बसल्यावर, बाबू सुरेंद्रनाथांनीं लाला लजपतरायांच्या अध्यक्षत्वासंबंधीं आपल्या भाषणांत कांहीं उल्लेख करूं नये अशा अर्थाची त्यांना मि० टिळकांनीं, एक नोट पाठवून मि० माळवी यांकडेहि ठरावांच्या मसुद्यांची एक कॉपी मागण्यास नोट पाठविली. ती कॉपी ३ वाजण्याच्या सुमारास मिळाली. तेच ठराव, त्याच संध्याकाळच्या ॲडव्होकेट ऑफ इंडिया ( मुंबई ) मध्यें आले. अर्थात् त्या बातमीदाराला ती कॉपी निदान एक दिवस तरी आधीं मिळाली असली पाहिजे.

मि० माळवी आणि दिवाणबहादूर अंबालाल साकरलाल, यांनीं अध्यक्षांच्या निवडणुकीचा ठराव आणि त्याला दुजोरा देणें हें आतां फक्त साचांतूनच निघायाचें आहे असें लोकांना बजावल्यामुळें, ठरावावर मतें घेण्याच्या अधिकारावर गदा आणण्याचा यांचा विचार आहे, अशी पुष्कळ प्रतिनिधींची समजूत झाली ह्मणून बाबू सुरेंद्रनाथ ठरावाला दुजोरा देण्यास उठले. त्या वेळीं लोकांनीं आरडा ओरडा करून त्यांना बसण्यास लावलें. असा दंगा करावयाचा हें अगोदर ठरलेलेंच होतें या ह्मणण्यांत कांहीं तथ्य नाहीं.

त्या दिवशीं सभेची बैठक तहकूब झाल्यावर संध्याकाळीं ( त्याच दिवशीं ) पुन्हां राष्ट्रीय पक्षाची सभा भरून समेटाचा पुन्हां एकदां प्रयत्न करावयाचा असें ठरलें; व तोहि फसला तर अध्यक्षांच्या निवडणुकीला उपसूचना आणून किंवा ठरावाला विरुद्ध मतें देऊन विरोध करावयाचा हें निश्चित केलें. रात्रीं आठांच्या सुमारास स्वागत मंडळाचे व्हाइस चेअरमन मि० चुनीलाल सरया यांनीं मि० टिळकांची भेट घेऊन, मि० टिळक आणि मि० गोखले व प्रमूख प्रतिनिधी यांची त्याच रात्रीं एक बैठक करवून हा वाद मिटवावा अशी आपली इच्छा प्रदर्शित केली. टिळकांनीं, याला आपली वाटेल त्या वेळीं एका पायावर तयारी असल्याचें मि० चुनीलालांना सांगितलें. परन्तु चुनीलालांकडून त्या संबंध रात्रींत कांहींच निरोप आला नाहीं.

## दुसरा दिवस.

दुसरे दिवशीं ( ता. २७ ) ११ च्या सुमारास मि. चुनीलालनीं पुन्हां मि. टिळकांकडे येऊन मि. खापर्ड्यांसह प्रो. गज्जरांच्या बंगल्यावर येण्याविषयीं विनंति केली. तेथें डॉ. रुदरफोर्ड हे दोघांच्या समेटाविषयीं प्रयत्न करणार आहेत असें त्यांचें ह्मणणें होतें. मि. टिळक आणि मि. खापर्डे हे प्रो. गज्जरांच्या बंगल्यावर गेले; परंतु डॉ. रुदरफोर्डना दुसऱ्या कांहीं कामामुळें येतां आलें नाहीं. तेव्हां मि. टिळकांनीं प्रो. गज्जरांना सांगितलें कीं, राष्ट्रीय सभेचा प्रत्येक पुढारी या बाबतींतील जबाबदारी आपल्या अंगावर घेण्यास टंगळमंगळच करीत आहे, यामुळें आपापसांत तडजोड झाली नाहीं, तर अध्यक्षांच्या निवडणुकीच्या सूचनेला दुजोरा दिल्यावर विरोधक उपसूचना आपल्याला आणणें भाग पडेल. सभेचें ( अध्यक्षांच्या निवडणुकीचें ) काम तहकूब करून प्रत्येक प्रांतांतील, एक प्रागतिक आणि राष्ट्रीय पुढारी, व डॉ. रुदरफोर्ड यांची एक कमिटी नेमावी, व तिनें दोघांतील वाद मिटवावा. कमेटीचा निकाल अखेरचा समजून मग कार्याला सुरवात करावी, असें या उपसूचनेचें स्वरूप राहिल. कमेटींत कोणते प्रतिनिधी असावेत हेंहि मि. टिळकांनीं प्रो. गज्जरांना सांगितलें होतें. प्रागतिक पक्षांतील नांवांत, त्यांनीं कांहीं फेरफार केला तरी आपली हरकत नाहीं असेंहि त्यांनीं सांगितलें होतें. प्रो. गज्जर आणि चुनीलाल यांनीं मि० टिळकांची ही योजना सर फेरोजशहा मेथा किंवा डॉ. रुदरफोर्ड यांना कळवून राष्ट्रीय सभेच्या मंडपांत त्यांना याचें उत्तर देण्याची व्यवस्था करण्याचें कबूल केलें. पुढें अर्ध्या तासानें प्रो. गज्जर आणि चुनीलाल सरया यांनीं समेट होण्याची आशा नाहीं, असें मि. टिळकांना येऊन सांगितलें.

वरील उत्तर मिळाल्यावर मि० टिळकांनीं स्वागताध्यक्षांना " अध्यक्षाच्या सूचनेला दुजोरा देऊन झाल्यावर प्रतिनिधींपुढें बोलण्याची माझी इच्छा आहे. विधायक योजनेसाठीं ( with a Constructive proposal ) सभातहकूबीची सूचना मी आणणार आहे. मेहेरबानीनें हें जाहीर करा " अशा अर्थाची एक नोट पाठविली.

बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी अध्यक्षांच्या सुचनेला दुजोरा देण्यास उठले तरी वरील चिठीचें उत्तर मिळालें नाहीं, तेव्हां मि० टिळकांनीं स्वागताध्यक्षांना

पुन्हां एकवार आपल्या चिठीचें स्मरण देऊन उत्तर मागितलें, त्यालाहि, त्याच्याकडून कांहींच जबाब आला नाहीं. बाबू सुरेंद्रनाथांचें भाषण सर्वांनीं शांतपणें ऐकून घेतलें. ते आपलें भाषण संपवून परत जाण्यास वळले तोंच मि. टिळक व्यासपीठावर जाण्यास उठले. त्यांना एका स्वयंसेवकानें अडथळा केला; परन्तु त्याला न जुमानतां ते व्यासपीठावर आले. त्या वेळीं डॉ. घोस अध्यक्षाच्या खुर्चीवर येण्यास उठले होते. मि० टिळक व्यासपीठावर आले त्या वेळीं, अध्यक्षांच्या निवडणुकीचा ठराव प्रचंड बहुमतानें पास होऊन टाळ्यांच्या कडकडाटांत अध्यक्ष स्थानापन्न झाले होते, व आपलें भाषण वाचण्यास उठले होते, असें ऑफिशियल नोट ह्मणते, तें खरें धरलें तर, प्रतिनिधींपुढें बोलण्याचा आणि अगाऊ दिलेल्या सूचनेप्रमाणें आपली उपसूचना मांडण्याच्या मि. टिळकांच्या हक्कावर गदा आणण्यासाठींच जाणून बुजून असला कांहींतरी सावळा गोंधळ करावा लागला असें ह्मणावें लागेल. स्वागताध्यक्षांनीं मि० टिळकांची चिठी आल्यावर त्यांचे नांव जाहीर तरी करणें अवश्य होतें किंवा ही सूचना नियमबाह्य आहे असें त्यांना वाटत होतें, तर त्यांनीं तसें जाहीर करून त्यावर प्रतिनिधींचीं मतें तरी घ्यावयाला पाहिजे होती. मि० टिळक व्यासपीठावर उभे राहण्याबरोबर स्वागतमंडळाच्या सभासदांनीं त्यांची हुर्यो करण्यास आरंभ केला व बाकीच्या प्रागतिकांनींहि त्यांचा सूर ओढला. डॉ० घोस हे रीतसर अध्यक्ष निवडून आले नसतांना ते मध्यें मध्यें तोंड घालूं लागले. स्वागताध्यक्षहि मि० टिळकाची उपसूचना नियमबाह्य आहे असें ह्मणूं लागले. स्वागताध्यक्षांचा हा निकाल ( Ruling ) बेकायदा असून उपसूचना मांडण्याचा आपला हक्क आहे असें मि० टिळक म्हणूं लागले. ही बाचाबाची बरीच विकोपाला गेली, व सभा मंडपांतहि गोंधळ माजला. डॉ० घोस आणि माळवी यांनीं टिळकांना व्यासपीठावरून उचलून ठेवण्यास हुकूम दिला, त्याप्रमाणें एक गृहस्थ पुढें सरसावले देखिल परन्तु ना० गोखल्यांनीं त्याला तसें करूं दिलें नाहीं.

व्यासपीठावर असा धुडकूस चालला असतांना प्रेक्षकांतून व्यासपीठावर एक जोडा फेकला गेला, तो सर फेरोजशहांच्या गालाला चाटून जाऊन बाबू सुरेंद्रांच्या अंगावर पडला. मि० टिळकांच्या अंगावर फेकण्यासाठीं खुर्च्याहि उच-

लल्या जाऊं लागल्या. डॉ० घोस आपलें भाषण वाचण्याचा प्रयत्न करूं लागले कीं, दंगा अधिक वाढत असे. सुरतेच्या स्वागतमंडळानें, आदले दिवशीं राष्ट्रीय-स्वयंसेवकांना काढून त्यांच्या जागीं त्या दिवशीं मुद्दाम मजुरी भरून मुसलमान गुंडांची भरती केली होती, हें येथें नमूद केलें पाहिजे. मंडपांत जागजागीं काठ्यांचे ढीग रचून ठेविले होते. मंडपांत वाढलेला दंगा आटोक्याबाहेर गेला तेव्हां सभेचें काम तहकूब करणें भाग पडलें.

त्या दिवशींच्या दंग्याला स्वागत मंडळाचे कांहीं सभासदच कारणीभूत आहेत. प्रागतिकांनीं तो दंगा केला नसता तर मि० टिळकांची उपसूचना बहुमतानें पास झाली असती व अध्यक्षांची निवड वगैरे पुढें सर्व शांतपणें पार पडलें असतें.

डॉ० घोसचें भाषण मंडपांत वाचलें गेलें नाहीं, तरी त्या दिवशीं संध्याकाळीं कलकत्याच्या वर्तमानपत्रांतून तें आलें. त्यांत राष्ट्रीयपक्षावर बरेच तोंडसुख घेतलें होतें; त्यामुळें तर राष्ट्रीय पक्षांत अधिकच चेव उत्पन्न झाला. तरी समेटाची आशा अगदींच सुटली नव्हती. बाबू मोतीलाल घोस, मि. मोइत्र, मि. चतर्जी, लाला हरकिसनलाल यांनीं समेट घडवून आणण्यासाठीं व राष्ट्रीय सभेची दुसरे दिवशीं बैठक करण्यासाठीं बरीच खटपट केली, मि. टिळकांशीं यासंबंधीं चर्चाहि केली. मि. टिळकांनीं त्यांना आपल्या पक्षातर्फे खालील आशयाचें लेखी उत्तर दिलें. "गेल्या वर्षाचे स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण हे ठराव जसेच्या तसेच पुन्हां पास करण्याची खात्री दिली; आणि राष्ट्रीय-पक्षाला झोंबण्यासारखे कांहीं प्यारे डॉ. घोसच्या भाषणांत असतील ते वगळले तर मी आणि माझा पक्ष मागचें सर्व विसरून डॉ. घोसच्या अध्यक्षत्वाला असलेला आमचा विरोध आह्मी परत घेऊं."

परंतु यालाहि कांहीं उत्तर आलें नाहीं. दुसरे दिवशीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत प्रागतिकांचें कन्व्हेन्शन भरलें. त्यांत राष्ट्रीय पक्षाला मज्जाव होता. ज्यांना राष्ट्रीय सभेची अधोगति होऊं नये असें वाटत होतें; त्यांनींहि त्या दिवशीं संध्याकाळीं पुढचा विचार ठरविण्यासाठीं आपली सभा भरविली होती. २३ व्या राष्ट्रीय सभेची हकीकत ही अशी आहे.

## ना. गोखल्यांचें उत्तर.

सुरतेस झालेल्या प्रकाराची राष्ट्रीय पक्षानें जी हकीकत प्रसिद्ध केली आहे ती सर्वस्वी चुकीची आहे; त्यांत माझ्या स्वतःवरच जे दोषारोप केले आहेत त्यांचे मी निराकरण करणार आहें.

लाला लजपतरायांना बाजुला सारून डॉ. घोसना अध्यक्ष स्थान देण्यांत मी कारवाई केली हा आरोप वृथा आहे. डॉ. घोसची योजना वऱ्हाडखेरीज सगळ्या प्रांतांनीं केली होती, स्वागतमंडळहि त्यांच्याच बाजूचें होतें. लजप-रायांचें नांव सुचविलें गेलें नाहीं तर नागपूरप्रमाणें हीहि सभा उधळून लावण्याचा जहालांचा विचार दिसत असल्यामुळें तसा प्रकार घडूं देऊं नये एवढ्याचसाठीं मी स्वागतमंडळाच्या त्या सभेला जॉ. जनरल सेक्रेटरी या नात्यानें हजर होतों. माझ्या जाण्याचा उपयोगहि झाला. माझ्या समजून सांगण्यामुळें लजपतरायांचें नांव पुढें करणारांची समजुत पडली. ही दोघांतली दिलसफाई आणि ऐक्य, नागपूराहून मि. टिळकांचा हेर येऊन त्यानें त्यांचीं मनें कलुषित करीपर्यंत, ह्मणजे सभेनंतर सुमारें एक आठवडाभर टिकलें होतें.

सुरतेच्या जहालांनीं लाला लजपतरायांचें नांव अध्यक्षासाठीं स्वागत मंड-ळाच्या सभेंत सुचवूं नये असा माझा आग्रह असण्यास तीन कारणें होतीं. एक स्वागत मंडळाला सर्व तयारी करण्यास जेथें ३।४ महिने लागतात तेथें सुर-तेच्या मंडळाला अवघा महिनाच राहिला होता. दुसरें, त्यांचें बहुमत होण्याचा संभव मुळींच नव्हता. आणि तिसरें; लजपतराय सुटून आले होते तरी त्यांना चौकशीविना हद्दपार करण्यांत जी न्यायाच्या तत्वावरच सरकारनें कुऱ्हाड घातली होती, ती आपल्याला अद्याप काढावयाची आहे, आणि ती काढण्यास सर्व राष्ट्राच्या या भावनैक्याचा पाठिंबा त्यांना असला पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या एखाद्या विशिष्ट पक्षानें, त्यांना आपल्या पक्षाचा उमेदवार ह्मणून पुढें करण्यांत ही भावना विभागली जाते. लाला लजपतरायांना अध्यक्ष करण्यांत 'सरकारची आह्मी पर्वा करीत नाहीं' एवढेंच सरकारला दाखवावयाचें असेल तर त्यांचें ह्मणणें ठीक होतें. माझ्या अशा प्रश्नावर सुरतेच्या जहालांनीं ह्मटलें. "आमच्या हांतून दुसरें कांहींच होत नाहीं तर निदान सरकारची आह्मी पर्वा ठेवीत नाहीं

हें तरी त्यांना दाखवूं" मी त्यांना उत्तर दिलें "असल्या वेपर्वाईच्या प्रदर्शनांत कांहीं राम नाही. सरकारच्या अन्याय्य कृत्यांचा राष्ट्रीय सभेनें निषेध करावा; परंतु यापेक्षां तिला दुसरें पुष्कळ महत्वाचें काम करावयाचें आहे. आज आपल्याला पुष्कळ बाबतींत सरकारच्या सहकारीतेशिवाय आणि मदतीशिवाय कांहीं करतां येणार नाहीं." यावर ते दोन तरूण म्हणाले "राष्ट्रीय सभेनें पूर्ण स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे आणि शक्य तितकें या परकी राज्याचा द्वेष करण्यास लोकांस शिकविलें पाहिजे." त्यावर मीं म्हटलें, "सरकारच्या शक्तीची तुम्हांला कल्पना नाहीं. तुमच्या सूचनांप्रमाणें आज राष्ट्रीय सभा लोकांना उपदेश करूं लागली तर सरकारला आमची चळवळ नाहींशी करण्यास पांच मिनिटें देखील लागणार नाहींत." या खासगी संभाषणांतला मागचापुढचा संदर्भ न देतां मधलींच दोन वाक्यें एकत्र करून राष्ट्रीय पक्षानें त्याचीं शेकडों रूपांतरें केलीं.

ता. २४ नव्हेंबरला भरलेल्या सुरतेच्या स्वागत मंडळानें राष्ट्रीय सभेपुढे येणाऱ्या ठरावांचे मसूदे करण्याचें काम ना. गोखल्यांकडे सोपविलें होतें हें ह्मणणें खोटें आहे. अशा प्रकारचा ठराव मुळींच झालेला नव्हता. डिसेंबरच्या आरंभीं मी मुंबईस आलों त्या वेळीं, सबजेक्ट कमेटीपुढें येणाऱ्या ठरावांचे मसुदे करण्याचें काम माझ्याकडें सोंपविण्याचें कार्यकारी कमेटीनें ठरविलें, असें स्वा० मं० चे एक सेक्रेटरी मि० मनूभाई यानीं मला सांगितलें. मला त्या वेळीं दुसरीं पुष्कळ कामें होतीं ह्मणून, तुम्ही स्वतः किंवा मि० गांधी यांनीं ते मसूदे तयार करावेत आणि जरूर तर मी त्यावरून मग हात फिरवीन असें सांगून त्यांना परत पाठविलें. परंतु आपल्याला वेळ मुळींच नाहीं, असें मि० गांधींचें उत्तर आल्यामुळें मि० मनूभाईनींच तें काम अंगावर घेऊन, त्याचें साहित्य गोळा करण्यास आरंभ केला. परंतु कामाच्या अतिरेकामुळें ठरावांचे मसूदे तयार करणें त्यांना अशक्य झाल्यामुळें १५ डिसेंबरला त्यांनीं ही सर्व जबाबदारी माझ्या एकटयावर टाकली.

२६ डिसेंबरच्या दोनप्रहरीं २॥ पर्यंत ( सभेचें काम सुरू होईपर्यंत ) ठरावांचे मसूदे मिळाले नाहींत याचें कारण तोपर्यंत छापील प्रति हातीं आल्या नव्हत्या हें होय. मुंबईस फक्त ठरावांचे मथळे तयार करून मसूदे करण्यासाठीं

मी १९ तारखेला पुण्यास गेलों. मसूदे तयार करणें हें कांहीं सोपें काम नाहीं. सगळ्यांत अतीशय त्रास दिला असेल तर, तो देऊ केलेल्या सुधारणांवरील ठरावानें होय. त्या ठरावाचा माझ्या मनासारखा मसूदा पुण्यास झालाच नाहीं. सुरतेस आल्यावर ( ता० २४ ) मी मि० गांधींकडे बाकीचे ठराव छापण्यासाठीं देऊन सुधारणांचा ठराव मग देतों असें सांगितलें. परंतु हजारो गोष्टींकडे लक्ष द्यावें लागत असल्यामुळें, मिळालेल्या वेळांत त्या दिवशींहि सुधारणांच्या ठरावावरील मसूदा मला तयार करतां आला नाहीं; तेव्हां तेवढयाच ठरावाची जागा कोरी ठेवून बाकीचे ठराव छापून आणण्यास गांधींना सांगणे भाग पडलें. ( ता० २५ ) सुरत हें कांहीं मद्रास, मुंबई किंवा कलकत्यासारखें शहर नव्हे. तेथें छापखान्यांची सोय चांगली नाहीं. ठरावांसाठीं छापखान्यानें एक सबंध दिवस खाल्ला. २६ तारखेस २॥ वाजतां मी सभामंडपांत गेलों त्याच वेळीं मसुद्याच्या छापील प्रति आल्या आहेत असें मि० गांधींनीं मला सांगितलें. जी पहिली प्रत माझ्या हातांत आली तीच मी मि० टिळकांना दिली. ज्यासाठीं हे मसूदे तयार करावयाचे असतात ती विषयनियामक कमिटी बसण्याच्या आधीं छापील प्रति आल्या, म्हणजे त्या अगदीं वेळेवरच आल्या असें ह्मणतात.

येथें तीन मुद्दे विशेष लक्षांत घेतले पाहिजेत. ( १ ) आजपर्यंत ज्या ज्या ठिकाणीं, सोय व सवड असेल त्या त्या ठिकाणीं ठरावांचे मसूदे अगोदर प्रसिद्ध केले आहेत; परंतु असें प्रत्येक ठिकाणीं आणि सर्वच वेळीं झालें आहे असें नाहीं. गेल्याच वर्षी कलकत्यास कांहीं ठरावांचे मसूदे अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत तयार नव्हते. ( २ ) या वर्षी सुरतेस ठरावांच्या मसूद्यांना जे अभूतपूर्व महत्व दिलें आहे तसें राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत पूर्वी कोणी कधीं दिल्याचें नमूद नाहीं. हे मसूदे ह्मणजे ठराव नसून, विषय नियामक कमेटीचें काम सुलभ करणारें एक साधन आहे, हें प्रत्येकाला चांगलें माहीत असतें. अशी एकहि राष्ट्रीय सभा झालेली नाहीं कीं, जिच्या विषय नियामक कमेटीनें सभेपुढें ठराव मांडण्याच्या पूर्वी त्यांच्या स्वागत मंडळानें केलेल्या मसूद्यांत कांहीं महत्वाचे फेरफार केलेले नाहींत. कित्येकदां तर सगळाच्या सगळा मसूदा फिरविलेला आहे.

राष्ट्रीय सभेपुढें येणारे ठराव स्वागतमंडळाचे नसून विषय नियामक कमेटीनेंच तयार केलेले असतात. ( ३ ) आजपर्यंत कोणत्याहि स्वागतमंडळानें मागच्याच राष्ट्रीय सभेच्या ठरावांची हुबेहुब नक्कल केलेली नाहीं. कलकत्त्यानें बनारसच्या ठरावांची कांस धरली नाहीं कीं, बनारसेनें मुंबईच्या ठरावांची पायधरणी केली नाहीं. प्रत्येक स्वागतमंडळ आपल्या सदसद्विवेक बुद्धीला बरें वाटेल असेच ठरावांचे मसूदे तयार करतें. सुरतेच्या मंडळानें हीच परंपरा कायम ठेविली होती.

मि. टिळकांना मिळालेला मसूदाच (छापील प्रत) त्या दिवशीं संध्याकाळीं मुंबईच्या 'ऍडव्होकेट ऑफ इंडिया' मध्यें आला होता, अर्थात, त्या पत्राच्या बातमीदाराला तो निदान एक दिवस तरी आधीं मिळाला असला पाहिजे; असा एक राष्ट्रीयांचा आक्षेप आहे. या बातमीदाराला मसूदा मिळण्यास दोनच मार्ग आहेत. एक, प्रति छापून येण्याबरोबर मि. गांधीकडून घेऊन त्यानें आपल्या पत्राला तार केली असली पाहिजे, किंवा छापखान्यांतून त्याला प्रूफ तरी मिळालें असलें पाहिजे; मी सभामंडपांत जाईपर्यंत छापील प्रत आलेल्या नव्हत्या हें मात्र खरें आहे.

दोघांचा समेट घडवून आणावा ह्मणून लाला लजपतराय, सुरेंद्रनाथ बनर्जी आणि मि. चुनीलाला सरय्या यांच्या मार्फत प्रयत्न केले असें राष्ट्रीय पक्षाचें ह्मणणें आहे. पैकीं मि. चुनीलालनीं तर या बाबतींत माझ्याशीं केव्हांहि बोलणें काढलें नाहीं. २५ तारखेस आह्मी स्टेशनवर अध्यक्षांच्या स्वागताकरितां गेलों होतों तेव्हां लाला लजपतरायांनीं मात्र प्रत्येक पक्षांतील पांच पांच मनुष्यांच्या निवडलेल्या कमेटीनें ठरावांची भाषा ठरवावी अशी मि. टिळकांची सूचना मला सांगितली होती. परन्तु ठरावांची भाषा निश्चित करण्याचें काम विषयनियामक कमेटीचें असून मि० टिळक सुचवितात तशा कमेटीचें नाहीं. व असें उदाहरणहि पूर्वीं कधीं झालेलें नाहीं, हें मी त्यांच्या नजरेस आणलें. उद्यां विषयनियामक कमिटीची बैठक भरेल तींत दोघांचा समेट झाला नाहीं, तर तुमची ही सूचना त्याच कमेटीपुढें मांडा, असेंहि मी त्यांना सांगितलें लजपतरायांना हें चांगलें पटलें.तेव्हां त्यांनीहि फार आग्रह धरला नाहीं. कलकत्त्याचे चारहि ठराव जसेच्या तसे पास होतील अशी ना.

गोखले आणि सर सुरेंद्रनाथ ग्वाही देतील तर आपण अध्यक्षांच्या सूचनेला विरोध करणार नाहीं, अशा अर्थाचे त्या दिवशीं सकाळीं मि. टिळकांचें सर सुरेंद्रनाथाशीं झालेलें भाषण सुरेंद्रांनी मला सभामंडपांत जाण्याच्या थोडें पूर्वी सांगितलें. मि. टिळकांनी आतांपर्यंत किती रंग बदलले आहेत हें मी सर सुरेंद्रांना सांगितलें. हे चारहि ठराव अॅजेंडा पेपरवर आहेत, अशी अनेकदां खात्री दिली गेली, तेव्हां ते अगदीं जसेच्या तसेच पास झाले पाहिजेत असा त्यांचा नवीनच हट्ट निघाला. असें कांहींतरी खुस्पट काढून दंग्याची भीति घालणें हा निव्वळ आततांईपणा आहे. जें काम विषयनियामक कमेटी, ह्मणजे १६०० प्रतिनिधींच्या संमतीनें राष्ट्रीय सभा करणार, तें एखाद दुसऱ्या प्रतिनिधीकडून आह्मी करूंच करूं अशी ग्वाही मि. टिळक कशी मागतात हें समजत नाहीं. सुरतेस आल्यावर मि. टिळकांनीं मला भेटण्याचा तीन वेळ प्रयत्न केला आणि प्रत्येक वेळीं त्यांना भेटण्याचें मी नाकारलें हें त्यांचे ह्मणणें अक्षरशः खोटें आहे. सुरतेस आल्यावर मला भेटण्याची मि. टिळकांची असलेली इच्छा त्यांनीं मला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याहि तऱ्हेनें कळविली नाहीं. मी राहात असे त्या ठिकाणीं ते केव्हांहि आले नाहींत, आणि माझ्या समजुतीनें दुसरीकडे कोठें भेटण्याचा त्यांनीं प्रयत्नहि केला नाहीं.

सभेचें काम तहकूब करण्याची उपसूचना मांडाव्यास मि. टिळक व्यासपीठावर आले त्या वेळीं मि. माळवी, मि. टिळक आणि डॉ. घोस व मि. टिळक यांच्यामध्यें झालेल्या प्रकारांचें वर्णन राष्ट्रीयांच्या व्हर्शनमध्यें आलें आहे. राष्ट्रीयसभा उधळली गेल्यावर लागलीच ऑफिशियल व्हर्शन प्रसिद्ध केला आहे त्यावर डॉ. घोस, मि. माळवी, मि. वाच्छा आणि मी, यांच्या सह्या आहेत. मि. माळवी, डॉ. घोस आणि मि. टिळक यांच्यांतील भाषणाचा प्रत्येक शब्द आह्मी ऐकलेला आहे. राष्ट्रीय व्हर्शनवर पांच सद्गृहस्थांच्या सह्या आहेत; परंतु त्यांतले चौघे गृहस्थ व्यासपीठावर मुळींच नव्हते; त्यांना या भाषणांतले एक अक्षरहि ऐकूं येणें शक्य नव्हतें, हें लक्षांत ठेवलें, ह्मणजे दोघांच्या हकीकतींतील सत्यपणा अजमावणें कठीण नाहीं. आज बावीस वर्षांची काम करण्याची जी रूढी आहे तिला सुरतेच्या स्वागत मंडळानें, काडीइतकाहि बाध आणलेला नाहीं.

गेल्या वर्षी राष्ट्रीय सभेनें केलेल्या नियमांप्रमाणेंच अध्यक्षांची निवड झाली होती. सर्व गैरसमज आणि घोटाळा माजविला मि. टिळकांनीं. ”

या सर्वांवरून सुरतेची राष्ट्रीय सभा उधळून लावण्यांत लो. टिळकांकडे पुढारीपण येत असलें, तरी सभा उधळली जावी अशी त्यांची इच्छा मात्र नव्हती, किंवा ती उधळली जाईल अशी त्यांची कल्पनाहि नव्हती. राष्ट्रीय सभेची बैठक नागपूराहून सुरतेस नेण्यासंबंधीं, अध्यक्षासंबंधीं किंवा ज्यांना अवास्तव महत्व दिलें जाऊन सभा उधळल्याचें प्रत्यक्ष खापर ज्यांच्या डोक्यावर फोडलें जातें, त्या कलकत्त्याच्या चार ठरावांसंबधीं; लो. टिळकांचा व्यक्तिशः जितका विरोध दिसला किंवा दाखविला गेला तितका त्यांचा मनापासून नव्हता असें मानण्यास जागा आहे. घटकाभर गंमत होत असेल तर जमलेल्या चार टवाळ बघ्यांप्रमाणें त्यांत आपलाहि हुर्योचा स्वर मिसळून हिंदी राजकारणाची गंमत करणाऱ्या, तेल्या न्हाव्यासारखी हीन वृत्ति लो. टिळकांची नव्हती, हें कोणालाहि कबूल करावें लागेल. सुरतेचा बखेडा विकोपाला जाऊन हिंदी राजकारणांतील पुढाऱ्यांच्या बेबनावाचें प्रदर्शन राष्ट्रीय सभा उधळण्यांत झालें, ही राष्ट्राची मानहानि पाहून हिंदी राष्ट्र पुरुषांच्या अंतःकरणाला जितका पीळ पडला असेल तितका, किंबहुना एका दृष्टीनें अधिकच लो. टिळकांच्याहि अंतःकरणाला निःसंशय पडला असला पाहिजे. आपल्या हातांत सत्ता असावी, आपल्या शब्दांना सामान्य जनांहून आधिक किंमत असावी, आपला दर्जा आहे, याहून अधिक वाढावा; किंवा लोकांवर आपली हुकमत चालावी ही कर्तृत्ववान पुरुषांची सहज प्रवृत्ति लो. टिळकांच्या बाबतींत याहि वेळीं, कमी जास्त प्रमाणांत आडवी आली असेल, नाहीं असें नाहीं, परंतु राष्ट्रीय सभेची, खासगी मतभेदांसाठीं वाताहात करून राष्ट्राच्या वेअकूबपणाचा डंका जगभर पिटण्याइतकी ती अतिरेकाला पोंचली नव्हती, खास. कलकत्त्यासहि लोकमान्यांचा हट्टच होता, परंतु तेथें जशी तडजोड झाली तशीच येथेंहि होणें अशक्य नव्हतें. परंतु लो. टिळक सुरतेस आले त्या वेळीं गोष्टी इतक्या आटोक्याबाहेर गेल्या होत्या कीं, लो. टिळकांना त्या आवरणें अगदीं अशक्य झालें होतें. मतभेदाची ठिणगी, द्वेषाची आग

2398



डॉ. सर राशबिहारी घोस.

अध्यक्ष २३ वी राष्ट्रीय सभा सुरत सन १९०७ व मद्रास सन १९०८.



मि. अरविन्द घोष.

सुरतेच्या सभेच्यावेळीं राष्ट्रीय पक्षाचे तर्फे कामकरणारे

लावण्याइतकी फुलेल अशी त्यांची कल्पनाहि नव्हती. परंतु ती फुलल्यावर मात्र आपल्या अनुयायांना तोंडघशी पाडूं नये म्हणून आपल्याहि हातांत एक पलिता घेऊन राष्ट्रीय सभेच्या मंडपांत, त्यांच्याबरोबर आगीचा खेळ खेळणें लो. टिळकांनाहि भाग पडलें. मि. नेव्हिनसन् हे सुरतेच्या बखेड्याचे वेळीं प्रत्यक्ष हजर होते. पुढें त्यांनीं लो. टिळकांची गाठ घेऊन यासंबंधीं त्यांचें स्वतःचे म्हणणें समजून घेतलें, त्याचा त्यांनीं आपल्या New spirit in India पुस्तकांत उल्लेख केला आहे कीं, सुरतेचें प्रकरण इतके विकोपाला कसें गेलें हें लो. टिळकांनाचा नीट माहीत नाहीं. तसा त्यांचा उद्देश नव्हता व फट् ह्मणतां ब्रम्हहत्या होईल अशी त्यांची कल्पनाहि नव्हती. लोक सुरत प्रकरणाचें खापर लो. टिळकांच्या डोक्यावरच फोडतात हें बाबू मोतीलाल घोसनीं त्यांना सांगितल्यावर, समेट होत असेल तर सुरतेच्या घडून आलेल्या प्रकारांबद्दल क्षमा मागण्यास त्यांची एका पायावर तयार होती, असा मोतीलाल घोसनी A step in the steamer पुस्तकाच्या प्रस्तावनेंत उल्लेख केला आहे. लो. टिळकांना मनुष्यांची पारख नव्हती, वाटेल त्या स्वभावाच्या मनुष्याला ते जवळ करीत, व ज्यांना एकदां जवळ केलें असेल, त्यांच्यासाठीं, त्यांचा बोज राखण्यासाठीं, किंवा त्यांना सावरून धरण्यासाठीं ते स्वतःचीहि आहुति देण्यास सदैव तत्पर असत हा मित्रप्रेमाच्या सद्गुणाचा अतिरेक म्हणजे एक मोठा दुर्गूण त्यांच्या ठिकाणीं होता, हे त्यांच्या आजपर्यंतच्या लहानमोठ्या अनेक चरित्रकारांनीं प्रामुख्यानें सांगितलें आहे. तोच दुर्गूण, किंवा लो. टिळकांचा तोच साधाभोळा स्वभाव त्यांना अनेक ठिकाणीं नडला, तसाच सुरत प्रकरणांतहि भोंवला, असें ह्मणणें भाग आहे.

# प्रकरण ८ वें.

## कलकत्त्याचे चार ठराव.

भव्य आणि मनोहर दिसणारा डोलारा सोनेरी कागदानें मढविलेल्या बांबूच्या चार निःसत्व खांबांवर उभारलेला असतो, त्याप्रमाणें सुरतेच्या भांडणाचा, म्हणजे राष्ट्रांतल्या यादवीचा टोलेजंग डोलारा, कलकत्त्याच्या चार ठरावांच्या लटपटीत खांबांवर उभारलेलाहोता. (१) स्वराज्य, (२) स्वदेशी, (३) बहिष्कार आणि (४) राष्ट्रीय शिक्षण; हेच या डोलाऱ्याचे आधारस्तंभ होत. राष्ट्रीय सभेची पिछेहाट करण्याचा मवाळ पक्षाकडून कसा प्रयत्न केला जात आहे, हें लोकांना समजावून देतांना, किंवा समजावून देण्याच्या निमित्तानें, त्यांच्या डोळ्यांत धूळ फेकतांना राष्ट्रीय पक्षानें कलकत्त्याच्या ठरावांची आणि सुरतेस होणाऱ्या ठरावांची तुलना केली आहे. परंतु कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनें पास केलेल्या ठरावाची ज्यांच्याशीं तुलना केली आहे, ते सुरतेच्या राष्ट्रीय सभेचे 'ठराव' नसून स्वागत मंडळानें तयार केलेला ठरावांचा तो 'सांगाडा' होता व विषय-नियामक कमेटींत तो कदाचित् सगळाच्या सगळा बदलणें शक्य होतें, हें लक्षांत घेतलें ह्मणजे डोळे दिपवणारी या खांबांवरील सोनेरी झळाळी लागलीच नाहींशीं होते आणि किंचित् खोल पाण्यांत शिरलें कीं, हे लटपटीत खांबहि ढासळून सगळा डोलाराच्या डोलारा खालीं येतो.

( १ ) पहिली महत्वाची गोष्ट ह्मणजे, कलकत्त्यास दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या राष्ट्रीय सभेंत "स्वराज्या" चा ठरावच झालेला नाहीं. ज्यावर स्वराज्याचा आरोप केला आहे, तो ठराव आहे स्वयंसत्ताक राज्यपद्धतींतील प्रास्ताविक 'सुधारणां'चा. "स्वराज्य" हा शब्द दादाभाईंच्या भाषणांतला आहे. आह्मी ब्रिटिश नागरिक आहोंत व ब्रिटिश नागरिकत्वाचे हक्क मागण्याचा आह्माला अधिकार आहे, असें अध्यक्ष दादाभाईनीं सांगून जे ब्रिटिश हक्क मागण्याचा आह्माला अधिकार पोंचतो त्यांची सर्वसाधारण रूपरेषा लोकांपुढें मांडतांना ते ह्मणतात—

All financial relations between England and India must be just on a footing of equality i. e. whatever money India may find towards expenditure in any departement Civil, or Military or Naval to the extent of that share should Indians share in all the benifits of that expenditure in salaries, pensions, emoluments, materials etc. as a partner in Empire as she always declared to be.........The whole matter can be compromised in one word Self Goverument or *Swaraj* like that of the United Kingdom or the Colonies.

याच ठरावाला अनुलक्षून या वेळीं राष्ट्रीय सभेनें स्वराज्य हें आपलें 'ध्येय' ठरविलें. हाहि एक भ्रम राष्ट्रीय पक्षानें लोकांच्या डोक्यांत कोंबला. यालाहि ठरावांत आधार नाहीं. कलकत्त्यास झालेला ठराव असा आहे.

This Congress is of *Opinion* that the system of Government obtaining in the Self-Governing British Colonies should be extended to India and that as *steps leading to it,* urges that the following *reforms* should be immediately carrie' out.........etc.

ब्रिटिश वसाहतींतील स्वयंसत्ताक राज्यपद्धती हिंदुस्थानांतहि सुरू करावी, अशी या ठरावांत राष्ट्रीय सभेनें आपली मनीषा व्यक्त करून ती पद्धति स्वीकारल्याचें द्योतक म्हणून खालील ( समकालीन परिक्षा; एक्झिक्यूटिव्ह आणि लेजिस्लेटिव कौन्सिलांत हिंदी लोकांची योजना; लोकल आणि म्युनिसिपल बोर्डस् वगैरे ) सुधारणा तात्काळ अमलांत आणाव्यात असा आपला आग्रह दाखविला होता. लो० टिळकांनीं या ठरावाची ज्यांच्याशीं तुलना करून, कलकत्त्यानें ठरविलेल्या स्वराज्याच्या ध्येयाला लाथाडून ( Tamper ) राष्ट्रीय सभेचा पाय मागें ओढण्याचा सुरतेच्या स्वागत मंडळाचा उघड उघड प्रयत्न ( direct attempt ) आहे असा लोकांत भ्रम उत्पन्न केला, तो ठराव असा आहे.

The Indian National Congress has for its ultimate goal the atainment by India of Self-Government similar to that enjoyed by other members of the British Empire and a partici-

pation by her in the privileges and responsibilities of the Empire on equal terms with the other members.. ......

( ब्रिटिश साम्राज्याचे इतर घटकावयव भोगीत आहेत तशी स्वयंसत्ताक राज्यपद्धति हिंदुस्थानानें मिळविणें आणि साम्राज्याच्या हक्कांत व जबाबदारींत इतर घटकावयवांप्रमाणेंच समान दर्जा मिळविणें हें हिंदी राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे. ) परंतु हा ठराव-ह्मणजे सुरतेच्या स्वागत मंडळानें तयार केलेल्या ठरावाचा मसुदा—स्वयंसत्ताक राज्यपद्धतीवरील नसून राष्ट्रीय सभेच्या घटनेवरील ठरावाच्या मसुद्याचा 'थोडासा भाग' आहे. स्वागतमंडळानें तयार केलेल्या त्याच ठरावाच्या मसुद्याशीं तुलना न करितां वडाची साल पिंपळाला लावून राष्ट्रीय पक्षानें विपर्यास केला आहे. स्टेट सेक्रेटरींच्या कौन्सिलमध्यें दोन हिंदी गृहस्थांची नेमणूक झाल्यामुळें किंचित् फरक करून गेल्या वर्षीचा Self Governmentचा ठराव प्रास्ताविक मागण्यांसुद्धां जसाच्या तसाच सुरतेच्या स्वागत मंडळानें ऍजेंडा पेपरवर ठेविला होता असें ना. गोखले ह्मणतात. 'घटकावयव' या मोघम शब्दानें ते स्वयंसत्ताक असतीलच असा अर्थ निघत नाहीं, असा लो० टिळकांनीं काढलेला आक्षेप गोखल्यांना समजतांच, संशयाला अगदीं जागा राहूं नये ह्मणून " इतर घटकावयवाप्रमाणें " हा शब्दप्रयोग बदलून त्या ठिकाणीं " स्वयंसत्ताक राज्यपद्धति भोगणाऱ्या घटकावयवांप्रमाणें " ( self governing members ) असा शब्दप्रयोग घातला, असा ना. गोखल्यांनीं खुलासा केला आहे.

कलकत्त्यानें पास केलेल्या ठरावांत " स्वराज्य"हि नाहीं आणि " ध्येय" हि नाहीं,हें स्पष्टच आहे;परंतु Self-Government याचा अर्थ मात्र "स्वराज्य" होतो यांत शंका नाहीं. यूरोपीय राजकारणांत येणाऱ्या, किंवा चळवळींत वापरल्या जाणाऱ्या या शब्दाचा अर्थ स्वराज्य असा आहे; परंतु तें साम्राज्यांतर्गत स्वराज्य आहे. स्वराज्य या मराठी शब्दाचा अर्थ मात्र " निर्भेळ स्वराज्य " असाहि होऊं शकतो, किंबहुना " स्वराज्य " ह्मटल्याबरोबर याच निर्भेळ स्वराज्याची कल्पना येते. कलकत्त्यास ना. दादाभाईंच्या तोंडून निघालेल्या स्वराज्य शब्दांतल्या याच जादूनें राष्ट्राला भारून टाकलें. लॉर्ड कर्झनसाहेब, आणि कर्झ-

नी प्रकृतीची नोकरशाही यांच्या लोकक्षोभकारी राज्यपद्धतीमुळें हिंदी प्रजेंतील असंतोष आणि अशी, बंगालच्या फाळणीनंतर अधिकच वाढीला लागली; लोकांच्या प्रक्षुब्ध मनावर स्वराज्याच्या जादूनें मोहिनी घातली आणि स्वराज्याखेरीज हिंदी राष्ट्राचा तरणोपाय नाहीं, ही भावना दृढमूल झाली. सेल्फ गव्हर्नमेंट ह्मणजे स्वराज्य. अर्थात् साम्राज्यांतर्गत स्वराज्य होतें, तोपर्यंत तें ठीक होतें, व कायदेशीरहि होतें; परंतु स्वराज्य ह्मणजे निर्भेळ ( Absolute ) स्वराज्य या कल्पनेनें लोकांच्या डोक्यांत जेव्हां थारा दिला, त्याचा उच्चार होऊं लागला, व असलेंच स्वराज्य मिळविण्याचें राष्ट्राचें ध्येय आहे असा बंगाल्यांतील जहाल लोकांकडून ध्वनि निघूं लागला, तेव्हां स्वराज्याची व्याख्या करण्याची आवश्यकता भासूं लागली. महाराष्ट्रांतील जहाल आणि बंगाल्यांतील जहाल यांचें पहिल्यापासूनच पुष्कळसें पटत असे; परंतु बंगाली जहाल ह्मणतात तें निर्भेळ स्वराज्याचे ध्येय उच्चतम असलें, तरी तें कायदेशीर नसल्यामुळें व्यक्तिशः लो० टिळकांनाहि मान्य नव्हतें, असें ह्मणण्यास आधार आहे. लो० टिळक मंडालेहून परत आल्यावर त्यांनीं हा संदिग्ध शब्द टाकून होमरूल Home Rule हा कायदेशीर स्वराज्याचा स्पष्टार्थी शब्द घेतला, हें येथें अवश्य ध्यानांत धरलें पाहिजे. परंतु महाराष्ट्र आणि बंगाल यांची गट्टी कायम ठेवावयाची तर लो० टिळकांना आपलें हें खासगी मत मनांतच ठेवणें भाग होतें. त्या वेळीं त्यांच्या मनाची झालेली चलबिचल त्यांच्या केसरी मराठा पत्रांतील लेखांवरून चांगलीच जाणवणारी आहे. याच स्वराज्याच्या ध्येयाला कलकत्त्याच्या स्वराज्य चतुष्टीचा आधार घेऊन व्यवस्थित स्वरूप देतां यावें ह्मणून त्या वर्षी, लो० टिळकांनाच राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष करण्याचा नागपूरास प्रयत्न झाला. राष्ट्रीय सभेच्या ध्येयाची व्याख्या करतांना स्वराज्य ह्मणजे साम्राज्यांतर्गत स्वराज्य अशी स्पष्ट शब्दयोजना केली पाहिजे; असें ना. गोखल्यांचें ह्मणणें व स्वराज्य हा शब्द मोघमच ठेवावा असें लो० टिळकांचें म्हणणें; स्वराज्य ध्येयाला कुंपण घालून त्याला वाटेल तिकडे भरकण्याची मुभा ठेवूं नये, हा गोखल्यांचा हेका आणि स्वैर वागडणाऱ्या स्वराज्य

ध्येयाला एका विशिष्ट कुंपणांत डांबून ठेवूं नये हा टिळकांचा हेका; हें सुरतेच्या बखेडयाचें एक प्रमुख कारण आहे.

२ स्वदेशीबद्दल कोणाचाच वाद असणें शक्य नाहीं; व नव्हताहि. राष्ट्राची खरी उन्नती होण्यास, किंवा जगांतल्या इतर राष्ट्राच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त करून घेण्यास निव्वळ राजकीय सुधारणा बस्स आहेत असें कोणाहि राष्ट्रभक्ताला किंवा राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना मुळींच वाटत नव्हतें. राजकीय, सामाजिक, औद्योगिक या चळवळी एक समयावच्छेदेंकरून हातांत हात घालून तितक्याच झपाट्यानें आणि तितक्याच उत्साहानें यशस्वी करणें अत्यंत जरूरीचें आहे, ही जाणीव सर्वांना होती; व तसा थोडाबहुत उपक्रम झालाहि होता. मनुष्याला दोन हात आणि दोन पाय असतात. जगांतले साधारण व्यवहार पार पाडून जीवित कंठण्यास एक हात आणि एक पायदेखिल पुरेसा असतो ह्मणून लुळा पांगळा मनुष्य पूर्ण आहे असें होत नाहीं. राष्ट्रीय प्रगतीला राजकीय चळवळ जितकी अवश्य तितकीच सामाजिक आणि औद्योगिक अवश्य होय. पायाचें काम हातानें करतां येणार नाहीं, त्याप्रमाणें राजकीय कार्य समाजसुधारणेनें होणार नाहीं, किंवा समाजकार्य, धार्मिक सुधारणेनें होणार नाहीं. औद्योगिक सुधारणा पूर्ण यशस्वी झाली तरी राष्ट्राची सुधारणा लुली पांगळीच हें सर्वांना समजत होतें. पुण्यास भरलेल्या औद्योगिक परिषदेच्या वेळीं न्या. रानडे ह्मणतात—

The political domination of one Country by another attracts far more attention than the more formidabale, though unfelt domination which the Capital enterprise and skill of one country exercise over the trade and manufactures of another. This latter domination has an insidious influence which paralizes the springs of all the varied activities which *together make up the life of a nation.*

ना. गोखल्यांनीं बनारसच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत या प्रश्नाला अग्रस्थान दिलें आहे ( The problem is indeed one of the first magnitude) ज्या कलकत्त्यानें स्वदेशी-

चा ठराव पास केला त्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या भाषणांत " हेंच हिंदुस्थानच्या सर्व दुःस्थितीचें बीज आहे " असे स्पष्ट ह्मटलें आहे ( Meddling wrongly with economic things is the whole evil from which India suffers ) आणि सुरतेस उधळलेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष डॉ. रासबिहारी घोस तर याला राजकीय सुधारणांपेक्षांहि अधिक महत्व देतात. ( Even deeper necessity of Industrial development than Political reforms.)

परंतु सर्वच गोष्टी एकस्थानेंच करणें शक्यहि नाहीं व इष्टहि नाहीं. टोलेजंग इमारत उठवितांना, गवंडी, सुतार, लोहार, कामकरी हे सर्व वेगवेगळे व त्या त्या कामाला वाहिलेले दर्दीच असले पाहिजत. हिंदी राष्ट्राची रचना, किंवा श्रम-विभाग पद्धति, सर्वच दृष्टींनी हिंदी राष्ट्रीय सभा, ही निव्वळ राजकारणालाच--राज्यकारभारविषयक (Administrative) राजकीय सुधारणेचींच पावलें झपाट्यानें टाकण्यास—वाहिलेली असावी असा तिच्या उत्पादकांचा, चालकांचा व पुरस्कर्त्यांचा उद्देश होता व आहे. त्यांतच औद्योगिक, सामाजिक, धार्मिक नैतिक वगैरे चळवळींचा समावेश करून सगळाच गोंधळ उडवावा, व एक धड ना भाराभर चिंध्या अशी राष्ट्रीय सभेची दैना करावी हें कोणाला संमत नव्हतें. कलकत्त्यास अध्यक्ष दादाभाईनीं हेंच सांगितलें. The question of social reforms and Industrial progress—each of them needs its *own earnest body of workers* Each requires for it *separate devoted attention.* All the three *great* purposes *Political Social* and *Industrial* must be set working *side by side.* अर्थात कलकत्त्यास राष्ट्रीय सभेनें स्वदेशीचा ठराव पास केला, तो, तिनें अंगिकारलेल्या किंवा त्यासाठींच निर्माण झालेल्या राजकीय चळवळींत औद्योगिक प्रश्नाला प्राधान्य द्यावें ह्मणून नव्हे, तर राष्ट्रीय सभा दुभंगली जाऊं नये, राष्ट्राचीं दोन तोंडें दोन बाजला होऊं नयेत आणि दोघांच्या भांडणांत

तिसऱ्याचा लाभ होऊं नये अशासाठीं तडजोड ह्मणून पास केला होता. या दृष्टीनें पाहिल्यास, ह्मणजे औद्योगिक प्रश्नाला राष्ट्रीय सभेची सहानुभूति आहे, नव्हे पूर्ण पाठबळ आहे अशा दृष्टीनें त्या ठरावाचा विचार केल्यास ठरावांतील "थोडी झीज सोसूनहि "( Even at some sacrifice) अशासारखा एखादा शब्दप्रयोग चुकून गळाला ह्मणून त्याला जितकें महत्व दिलें गेलें तितकें देण्याची अवश्यकता नव्हती. शिवाय तो शब्दप्रयोग मसुद्यांत गळला ह्मणून विषय नियामक कमेटींत त्यावर होणाऱ्या वादविवादांत तो गळला असता असें मुळींच नाहीं. १९०८ सालीं मद्रासेस झालेल्या राष्ट्रीय सभेनें, व पुढील सर्व सभांनीं या ठरावांतील हा शब्दप्रयोग कायम ठेविला आहे. ठरावांचे मसूदे केले त्या वेळीं कलकत्ता राष्ट्रीय सभेचा रिपोर्ट प्रसिद्ध नव्हता. त्या सभेनें पास केलेले ठराव " इंडिया " पत्रानें प्रसिद्ध केलेले होते. स्वदेशीच्या ठरावांत कांहींच फरक करावयाचा नसल्यामुळें त्या पत्रांतील त्या ठरावाची नुसती नक्कल केली होती. "इंडिया"नें हा ठराव देतांनाच Even at some sacrifice हे शब्द गाळले असल्यामुळें अर्थातच त्याच्या नक्कलेंतहि ते गळले गेले. हा ना. गोखल्यांनीं केलेला खुलासाहि येथें लक्षांत घेतला पाहिजे.

२. बंगाल्याचे जहाल, Self Government or Swaraj या शब्दाचा अर्थ, त्याच्या अंतर्भूत अर्थाहून भिन्न करूं लागले, त्याचप्रमाणें बहिष्कार (Boycott Movement) याहि मोघम शब्दाचा अर्थ भिन्न, व्यापक किंवा विपरीत करूं लागले. बंगालच्याच नव्हे, तर बंगालच्या पाठीमागें असलेल्या सर्व हिंदी राष्ट्राच्या मताला आणि विरोधाला धाब्यावर बसवून लॉर्ड कर्झन साहेबांनीं बंगालची फाळणी केली. सत्तेच्या जोरावर त्यांनीं राष्ट्राच्या केलेल्या या उपमर्दाचा तीव्र निषेध व्यक्त करण्याकरितांच बंगालनें बहिष्कार पुकारला होता; व सर्व हिंद राष्ट्रानें त्याला पाठिंबा दिला होता. १९०५ च्या जुलैमध्यें बंगालच्या फाळणीला स्टेट सेक्रेटरीनीं मंजुरी दिली असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केल्यावर, प्रांतांत उत्पन्न झालेल्या या आणिबाणीच्या प्रसंगाचा विचार करण्यासाठीं बंगाल्याचे प्रमुख पुढारी इंडियन असोसिएशनमध्यें जमले होते; त्यांनीहि सरकारच्या या अक्षम्य अन्यायाचा निषेध व्यक्त

करण्याकरितां "परदेशी मालावर" बहिष्कार घालण्याचें ठरविलें होतें. (After solemn deliberation resolved to boycott all *foreign goods* as a protest against this act of flagrant injustice) ५ साली राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून बंगालच्या बहिष्कार चळवळीला राष्ट्राचा पाठिंबा देतांना व तिला निर्वाणीच्या राजकीय अस्त्राचें स्वरूप देऊन कायदेशीर ठरवितांना ना. गोखल्यांनीं, या चळवळीच्या मुळाशीं, लोकमताला पूर्ण तिरस्कारानें वागविण्याच्या अधिकाऱ्यांच्या प्रवृत्तीला आळा घालण्यास आपल्या हातांत दुसरें कोणतेंहि साधन शिल्लक राहिलें नसल्यामुळें अगदीं अखेरचा उपाय (in the extremity) म्हणजे त्यांच्या कृत्याच्या निषेध करणें आणि हिंदुस्थानांतील या अस्वस्थतेकडे इंग्लंडच्या लोकांचे लक्ष जोरानें वेधणें हे दोन उद्देश आहेत असें स्पष्ट सांगितलें होतें. ज्याला अन्यायानें थप्पड लगावली असेल त्यानेंच त्या थप्पड लगावणाराच्या अंगावर धांवून गुद्यावर गुद्दे चढविणें रास्त आहे; व शक्य आहे. इतरांनीं त्याची पाठच राखणें योग्य. अन्यायानें चिडून किंवा संतापून इतरेजनांनीं न्यायाच्या गुद्दागुद्दींत भाग घेतला, तरी त्यांची प्रासंगिक उकळी फार काळ टिकत नाहीं व ते हलकें हलके मागे पाय घेतात. परंतु ज्याच्या गालावर बोटें उठलीं आहेत, किंवा अपमानाची ज्याच्या अंतःकरणाला प्रत्यक्ष घरें पडलीं आहेत, तो तीं बुझेतों अखेरपर्यंत त्याच्याशीं झुंजत राहतो, हा सार्वत्रिक अनुभवाचा व्यवहार आणि मनुष्य स्वभाव लक्षांत घेऊन थप्पड दिलेला बंगालच सरकारशीं बहिष्काराची गुद्दागुद्दी करण्यास योग्य आहे; व त्याच्याच बाबतींत तें न्याय्य आहे असें ना. गोखल्यांनीं बजाविलें होतें. ( A Political weapon used for a definite political purpose......and in the circumstances of their (Bengalees) position they had every justification for the step they took. ) कलत्त्यानें केलेला बहिष्काराचा ठराव देखिल वरील तत्वाचा आणि अर्थाचाच होता; परंतु सरकारच्या या कृत्यानें संताप आणि चीड यांनीं साहजिकच बेभान झालेल्या बंगालच्या, बाबू

अरविंद घोस, बाबू बिपिन चंद्रपाल, आश्विनीकुमार दत्त प्रभृति ज्वलज्जहाल मंडळींनीं "बहिष्कार" या मोघम शब्दाची अतिव्याप्ति करून आजच्या असहकारितेचेंच स्वरूप त्याला दिलें. असहकारितेंतला बारीकसारीक कार्यक्रम वगळला तर "बहिष्कार" आणि "असहकारिता" यांत निव्वळ शब्दाखेरीज त्यांनीं कांहीं फरक ठेविला नव्हता. ही असहकारिता किंवा बहिष्कार सगळ्या राष्ट्रानें पुकारण्यासारख्या गोष्टी विकोपाला गेल्या नाहींत, असें राष्ट्रीय सभेच्या बहुतेक पुढाऱ्यांना वाटत होतें. शिवाय बंगालच्या जहालांनी कल्पिलेला बहिष्कार किंवा असहकारिता हें शस्त्र होतें आयर्लंडचें. आयर्लंडची पूर्व तयारी त्याची परिस्थिति किंवा तें शस्त्र पेलण्यास कांहीं विशिष्ट गोष्टींनीं स्वभावतःच त्याच्यांत असलेलें सामर्थ्य, हीं हिंदुस्थानांत नव्हतीं. तीक्ष्ण आणि पल्लेदार शस्त्राचा प्रहार वर्मी लागला तर शत्रू चीत होतो हें माहीत असलें व प्रत्यक्ष घडत असलें तरी परिस्थितीची अनुकूलता आणि तें पेलण्याचें सामर्थ्य नसलें तर तें स्वतःच्याच नाशाला कारण होतें. आयर्लंडचा व्यापक बहिष्कार स्वीकारण्याइतकी हिंदुस्थानची तयाराहि नाहीं, व त्याला परिस्थितीची अनुकूलताहि नाहीं अशी त्या वेळच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांची खात्री होती. पुढें १२।१३ वर्षांनीं देखिल म. गांधींनीं आफ्रिकेंत यशस्वी करून दाखविलेला सत्याग्रह हिंदुस्थानच्या मैदानांत अयशस्वीच ठरला, ही गोष्ट त्या वेळच्या 'मवाळ' म्हटल्या जाणाऱ्या पुढाऱ्यांच्या दूरदर्शित्वाची चांगलीच द्योतक आहे.

"बहिष्कार" या मोघम शब्दाचा फायदा घेऊन राष्ट्रीय सभेच्या नांवावर सामान्य जनसमूहाची दिशाभूल केली जाऊं नये एवढयाच उद्देशानें बंगाल्यांतील बहिष्काराच्या चळवळीचा उद्देश आणि अर्थ स्पष्ट करण्यासाठीं "परदेशी मालावर बहिष्कार" ( Boycott of foreign goods ) शब्द घालावे लागले होते.

४ कलकत्त्यानें पास केलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावांत 'राष्ट्रीय' हा शब्द तीन ठिकाणीं आला आहे. "'राष्ट्रीय' शिक्षण 'राष्ट्रीय' पद्धतीवर आणि 'राष्ट्रीय' हुकमतीखालीं ( National education, on national lines and under national control ). यांत शब्दलालित्या-

खेरीज विशेष कार्योद्बोधक कांहीं आहे असें नाहीं. तरुण पिढींत राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभावना उद्दीपित होतील व राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला साहाय्यभूत, किंबहुना मूलभूत होईल तें राष्ट्रीय शिक्षण, ही सर्वसंमत व्याख्या ग्राह्य धरली व याच पायावर शिक्षण संस्थांची उभारणी झाली ह्मणजे "राष्ट्रीय पद्धति" याला कांहींच अर्थ रहात नाहीं. कलकत्याच्या ठरावांतून Under national control हे शब्द गाळल्याबद्दल राष्ट्रीय पक्षाची विशेष तक्रार आहे. या शब्दाचा दोन तऱ्हेनें अर्थ होऊं शकतो. राष्ट्रीय हुकमतीखालीं ह्मणजे देशी किंवा राष्ट्रीय सरकारच्या हुकमतीखालीं; किंवा राष्ट्रीय सभेच्या प्रत्यक्ष हुकमतीखालीं. आज हिंदुस्थानचें सरकार राष्ट्रीय सरकार नसल्यामुळें पहिला अर्थ शक्यच नाहीं. आणि राष्ट्रीय सभेनें राजकारणांतच शिक्षणाच्या व्यवस्थेचा अव्यापारेषु व्यापार करून गोंधळ करणें राष्ट्रीय सभेला शक्य नव्हतें; व इष्टहि नव्हतें. पूर्वीच्या ठरावाला बाध न आणतां हा सगळा घोंटाळा काढून टाकावा एवढ्याच हेतूनें Independent system of education हे शब्द घातले होते. वेळेच्या अभावामुळें कलकत्यास या ठरावाच्या भाषेवर विषयनियामक कमिटीला चर्चा करण्यास सवड सांपडली नाहीं, नाहीं तर कदाचित कलकत्याच्याच ठरावांत असा फरक झाला असता असें मानण्यास जागा आहे.

येथें हेंहि एक लक्षांत घेणें जरूर आहे कीं, दुरभिमान आणि स्वतःच्या निर्बलतेची खात्री झाल्यावर निराशयुक्त संतापाच्या भरांत निकरानें तुटून पडतांना निघालेल्या आवेशी उद्गारांवर फाजील विश्वास ठेवावयाचा नसेल तर, हिंदुस्थान हें 'राष्ट्र' नाहीं हें कोणालाहि कबूल करावें लागेल. नाना जाति, नाना धर्म, आणि नाना भाषादिकांचें, हिंदुस्थान हें एक प्रचंड कोडबोळें आहे. ब्रिटिशांच्या एकछत्रि राज्याखालीं असलेल्या या कोडबोळ्याला 'राष्ट्र' ह्मणणें ह्मणजे पाण्याच्या बुडबुड्याला पाणी ह्मणून आत्मवंचनेबरोबर लोकांचाहि बुद्धिभ्रंश करण्यासारखेंच आहे. हिंदुस्थान 'राष्ट्र' नाहीं हें विधान कटु, किंबहुना संतापजनक असलें तरी दुर्दैवानें सत्य आहे. 'राष्ट्र' असल्याखेरीज वास्तविक 'राष्ट्रीय' शिक्षणाला अर्थ नाहीं. हल्लींची शिक्षणपद्धति दोषपूर्ण आहे यांत शंका नाहीं. त्यांतील दोष

काढून ती प्रगमनशील आणि अधिक श्रेयस्कर करणें एवढाच सध्यां 'राष्ट्रीय' शिक्षणाचा व्यवहार्य अर्थ घ्यावयाचा. तो अर्थ आणि उद्देश Independent system of education यानें स्पष्ट होतो,'राष्ट्रीय शिक्षण राष्ट्रीय पद्धतीवर, आणि राष्ट्रीय हुकमतीखालीं' या अनुरोधानें आजपर्यंत निरनिराळ्या अधिकारी लोकांकडून झालेला विचार पाहिला तर वरील शब्दप्रयोगाचा फोलपणा सहज लक्षांत येण्यासारखा आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा कार्यक्रम(Programme) किंवा पद्धति (Line) आखण्यांत सर्वांचीं कशी धांदल उडाली आहे हें येथें लक्षांत घेण्यासारखें आहे.

या प्रकरणाची समाप्ति करण्यापूर्वीं एका गोष्टीचा खुलासा करणें अवश्य आहे. कलकत्त्याच्या चार ठरावांनीं राष्ट्रीय सभेच्या स्वरूपांत क्रांति घडवून आणली. कलकत्त्यास झालेल्या ठरावांची भाषा अतिशय गुळमुळीत असल्यानें त्यांचा विपर्यास, राष्ट्रीय सभा मोडणाऱ्या पक्षाला वर्षभर करावयास सांपडला. राष्ट्रीय सभेच्या घटनेंतील न्यूनांचा फायदाहि त्यांनीं यथेच्छ, किंबहुना स्वैरपणें घेतला आणि ती मोडल्यानंतर देखिल त्यांनीं स्वसमर्थनार्थ या चार ठरावांची महती गाण्यास सोडलें नाहीं. अद्यापिहि राष्ट्रीय सभेबद्दल लोकांत चर्चा निघाली ह्मणजे लोक विपर्यासाचीं एकतर्फी विधानें करतांना आढळतात, पण वास्तविक प्रकार निराळा होता, हें निदान तिच्या कामगिरीची माहिती, शांत चित्तानें नजरेखालीं घालीत असतां, समजून यावें ह्मणून त्याचा सविस्तर पाढा या स्थळीं वाचला आहे. त्या योगानें कोणाचा अंध पक्षाभिमान जागृत होणार नाहीं, किंवा खवळणार नाहीं असें नाहीं. पक्षाभिमान अंध असो वा डोळस असो; तो खवळून वस्तुस्थितीचें मूळच्या कागदपत्रावरून यथार्थ ज्ञान संपादन करण्याची एखाद्याला इच्छा झाली तरी या ठराव चौकडीची सांगोपांग माहिती देण्याचा हेतु सिद्धीस जाईल व तेवढ्याचसाठीं हा प्रयत्न आहे. सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर जी घटना तयार करण्यांत आली तिला नाकें मुरडणारे लोक पुष्कळ होते, पण त्यांना अखेरीस याच घटनेस शरण जावें लागलें, हें मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखें आहे, ज्या परिस्थितीला आळा घालण्याकरितां ही घटना उत्पन्न झाली त्या परिस्थितीच्या जनकांनीं देखिल या घटनेचा आदर केला यावरून त्या

परिस्थितीचें, तिच्या जनकांनीं चार ठरावांच्या नांवाखालीं चालविलेलें तत्कालीन समर्थन किती खोडसाळपणाचें होतें हें समजण्यास हरकत नाहीं. या संबंधींचे बाबू अंबिकाचरण मुझुमदाराचे उद्गार मननीय आहेत व तसेंच करणें त्यांना अधिक भूषणावह झालें असतें.

ते ह्मणतात If the separatists at Surat had, instead of attempting to wreck the Congress, st3rted the counter organisation with a definite policy and programme, they might well have established their position either as progressives or conservatives in Indian Politics, and if, even after the rgrettable insident, they had openly and earnestly placed a legitimate scheme before the coutry instad of sulkily retiring to their tents dissociating themselves from all practical politics, they would not have been charged with commetting political suicide, and they could have, in all probability gained and not lost by their opposition.

# प्रकरण ९ वें.

## घटना आणि ध्येय

### घटना.

कोणतीहि संस्था चिरंतन होण्यास व ती सुरळीत चालण्यास तिला पोषक व जरूर त्या नियमांची अवश्यकता असते. सरकाराला आपलें राज्य व्यवस्थित चालण्यास कायदे जितके अवश्य तितकीच एखाद्या संस्थेला घटनेची अवश्यकता असते. घटना आणि कायदा यांत शब्दभिन्नतेखेरीज कांहीं फरक नाहीं. घटना ह्मणजे संस्थेचे पंचप्राण आणि ध्येय ह्मणजे आत्माच होय. अर्थात् घटना आणि ध्येय हीं संस्थेच्या जन्माबरोबरच निश्चित झालीं पाहिजेत, हें ओघप्राप्तच आहे. किंबहुना घटना आणि ध्येय ठरल्याखेरीज संस्था असली नसली सारखीच—कुचाळक्या करण्यास जमलेल्या चार मंडळीच्या "क्लबा" सारखीच ती ह्मणावयाची. "राष्ट्रीय सभेची घटना आणि ध्येय तिच्या जन्माबरोबर निश्चित झालें नव्हतें." वस्तुस्थितीची बरोबर कल्पना द्यावयाची किंवा, लोकभ्रमाचा झिरझिरीत बुरखा काढून हेंच सत्य निराळ्या शब्दात सांगावयाचें तर, राष्ट्रीय सभेनें आपली घटना आणि ध्येय शब्दशः आणि अक्षरशः लिहून ठेविलें नव्हतें, एवढेंच ह्मणतां येईल. राष्ट्रीय सभेसारखी संस्था आणि तिच्याकडून करून घ्यावयाचें कार्य, हीं दोन्हींहि हिंदुस्थानाला अपरिचित, अर्थात अपूर्व असल्यामुळें तिने आपल्या साध्याचा सनदशीर मार्ग, घटनेच्या वांगिकसारीक नियमांनीं फरसबंदी केला नव्हता, तरी ती वाटेल तशी वाहवत नव्हती. इतिहासप्रसिद्ध संस्थांनीं पाडलेल्या चाकोऱ्यावरूनच राष्ट्रीय सभेनें आपली गाडी चालविली होती. आपल्याला मानवेल व पोषक होईल अशा तऱ्हेचा जरूर तो फेरफार करून परंपरेच्या किंवा रूढीच्या धोपट मार्गानें ती चालली होती सर सुरेंद्रांच्या शब्दांत There has grown around us a body of usages, the unwritten Customary law of the Congress, which govern our movement असें सांगतां येईल तरी तिनें लिखित कायदा अस्तित्वांत आणून नियमावलीच ।

चिरेबंदीनें आपला मार्ग आखण्याचें काम, हळू हळू चालूंच ठेविलें होतें. राष्ट्रीय सभेच्या पहिल्याच वर्षी ( १८८५ ) फक्त सभेनें खल केलेल्या प्रश्नांचा लोकांत फैलाव करून लोकमत जागृत करावें, एवढेंच ठरविलें होतें. १८८६ सालीं निरनिराळ्या प्रांतांतून स्टँडिंग कॉंग्रेस कमिट्या स्थापन कराव्यात असें ठरलें. १८८७ सालीं राष्ट्रीय सभेची घटना तयार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली. १८८८ सालीं घटनेचा विचार झाला नाहीं; परंतु " राष्ट्रीय सभेपुढें विचाराकरितां ठेविल्या जाणाऱ्या कोणत्याहि प्रश्नासंबंधीं हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींची एक विचारानें, सर्वांशीं, किंवा बहुतांशीं हरकत असेल तर विषय नियामक कमेटीनें तो प्रश्न सुचवूं नये; असा एखादा प्रश्न सभेपुढें आलाच व त्यावरील वादविवादांत हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींचा तीव्र मतभेद दिसून येऊं लागला तर तो वगळला जावा " हा एक महत्वाचा ठराव पास केला. १८८९ सालीं राष्ट्रीय सभेला १८८८ चेच प्रतिनिधि हजर होते. हा योगायोग मजेचा आहे. इतकी मोठी संख्या पूर्वी कधीं झाली नव्हती. या प्रतिवर्षी वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठीं, प्रत्येक स्टँडिंग कॉंग्रेस कमेटीला १० लाखाला पांच प्रतिनिधींचीच सवड ठेवणारा ठराव झाला. घटनेचा विचार करण्यासाठीं ८७ सालीं नेमलेल्या कमिटीच्या रिपोर्टाचा विचार, स्टँडिंग कॉंग्रेस कमेट्यांनीं करावा व पुढील ह्मणजे ९० सालीं तो राष्ट्रीय सभेपुढें मांडण्यांत यावा असा एक ठराव झाला. मि. ह्यूमसाहेब हे राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरीचें काम पाहत असत. त्यांना या वर्षी पं. अयोध्यानाथांना जॉइंट जनरल सेक्रेटरी दिलें. राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरींना कायदेशीर सल्लागार ह्मणून बंगाल, मुंबई, आणि मद्रास यांच्यातर्फें अनुक्रमें मि. बानर्जी, मि. मेथा, आणि मि. आनंदाचार्लू यांची नेमणूक झाली. इंग्लडांत स्थापन झालेल्या नॅशनल कॉंग्रेस एजन्सी या संस्थेचे नियमन करण्यासाठीं एक कमेटी नेमली गेली. आणि इंग्लंडांतील लोकांना राष्ट्रीय सभेचे हेतु कळविण्यासाठीं एक शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरलें. सभेचा एक कायम निधी उभारण्याचा विचारहि याच वर्षी झाला.

१८९१ सालीं राष्ट्रीय सभेची बैठक प्रत्येक वर्षी भरवावी कीं नाहीं; प्रतिनिधींची संख्या व सभेची जागा वगैरे गोष्टींचा विचार करण्यासाठीं कमिटी

नेमली होती. तिनें पूर्व वहिवाटीप्रमाणेंच प्रत्येक वर्षी सभा भरविण्याचा सल्ला दिला, व तशाच आशयाचा एक ठराव राष्ट्रीय सभेनें पास केला. या घटनेच्या प्रश्नाला पुन्हां ९४ सालीं चालन मिळालें. १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीय सभा भरावयाची असल्यामुळें पुण्याच्या स्टँडिंग कॉंग्रेस कमेटीनें या संबंधाचे नियम करून राष्ट्रीय सभेपुढें मांडावेत असें त्या वर्षी ठरलें. पुण्याच्या कमेटीनें तयार केलले नियम देशांतल्या सगळ्या स्टँडिंग कॉंग्रेस कमेटयाकडे पाठवावेत व त्यांनीं आपले अभिप्राय ९६ सालच्या बैठकीपूर्वी सेक्रेटरींना कळवावेत, एवढेंच ९५ सालीं पुण्यास ठरलें. याच सालीं कामाच्या सोईसाठीं जॉइंट सेक्रेटरीची आणखी एक जागा करून तीवर सर दि. ए. वाच्छा यांची योजना केली. ९६ आणि ९७ या दोनहि वर्षी हा घटनेचा प्रश्न तसाच पडला. ९८ सालीं देखिल घटनेचा प्रश्न विचारांत घेतला नाहीं. फक्त " सर्व स्टँडिंग कॉंग्रेस कमिटयांनीं ठिकठिकाणीं मध्यवर्ती संस्था स्थापून राष्ट्रीय सभेच्या उद्देशांचा प्रचार करावा; व आपल्या कामाचा रिपोर्ट राष्ट्रीय सभेकडे प्रतिवर्षी पाठवावा. अध्यक्ष, सर्व माजी अध्यक्ष आणि चालू सालीं नेमलेले नऊ गृहस्थ या सर्वांनीं मिळून राष्ट्रीय सभेची घटना तयार करावी, व पुढील वर्षी तिचा प्रामुख्यानें विचार करण्यांत यावा " असा एक ठराव मात्र पास झाला. या ठरावानुरूप वरील गृहस्थांनीं घटनेसंबंधीं कांहीं नियम केले व ९९ सालच्या राष्ट्रीय सभेने ते मंजूरहि केले.

१९०० सालीं इंडियन कॉंग्रेस कमिटींत एक्स ऑफिशिओ ह्मणून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, सर्व माजी अध्यक्ष, सभेचे सेक्रेटरी आणि असिस्टंट सेक्रेटरी, स्वागत मंडळाचे अध्यक्ष आणि सेक्रेटरी यांचा समावेश करण्यांत आला. १९०१ सालीं; इंग्लंडांतले " इंडिया " पत्र राष्ट्रीय सभेच्याच विद्यमानें चालविण्याचें व प्रांतिक कॉंग्रेस कमिटयांनीं त्याच्या प्रति खपविण्याची जबाबदारी घेण्याचें ठरलें. तरीहि ' इंडिया ' पत्राला वर्गणीदार मिळण्याची मुष्कील पडली; ती इतकी कीं, पत्रच बंद करण्याचा प्रसंग आला होता. परंतु ना. गोखल्यांनीं तें जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली. १९०२-३ सालीं ' इंडिया ' पत्राच्या प्रति खपविण्याकरितां देशांत निरनिराळ्या ठिकाणी राष्ट्रीय सभेतर्फे सेक्रेटरी नेमण्यांत आले, व ना. गोखल्यांना जॉइंट सेक्रेटरी

ह्मणून सर वाच्छांच्या मदतीला दिलें. १९०४ सालीं पुन्हा घटनेच्या प्रश्नाला चालन मिळून पुन्हा घटना तयार करण्यासाठीं ६ प्रांतांतील २० लोकांची एक कमिटी निवडली. १९०५ सालीं राष्ट्रीय सभेची एक स्टँडिंग कमिटी नेमली गेली त्या कमेटींत १५ सभासद असून दोनहि जॉइंट सेक्रेटरींचा त्यांतच समावेश केला. त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या ठरावांची अमलबजावणी करण्याचा कसून प्रयत्न करावा असेंहि ठरविलें गेलें. या कमेटीनें केलेले नियम ६ सालच्या राष्ट्रीय सभेनें तात्पुरते मंजूर केले. या नियमान्वयें ( १ ) प्रत्येक प्रांतांत एक प्रांतिक कॉंग्रेस कमेटी असावी; प्रत्येक प्रांतानें जिल्हा सभा स्थापाव्यात ( २ ) राष्ट्रीय सभेची व्यवस्था करण्याकरितां एक सेंट्रल स्टँडिंग कमेटी निवडली जावी; तींत ५० सभासद, आणि अध्यक्ष, व जनरल सेक्रेटरी यांचा एक्स ऑफिशिओ ह्मणून समावेश करावा (३) ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरावयाची असेल त्यानें एक स्वागत मंडळ स्थापावें, त्यानें बाकीच्या प्रांतांतील प्रांतिक कॉंग्रेस कमिटयांचें मत घेऊन कमिटीच्या $\frac{2}{3}$ सभासदांनीं अध्यक्षांची निवड करावी. स्वागत कमिटींत अध्यक्षांच्या निवडणुकीस $\frac{2}{3}$ मतें मिळालीं नाहींत तर हा निवडणुकीचा प्रश्न सेंट्रल स्टँडिंग कॉंग्रेस कमिटीकडे सोंपवावा. तिनें दिलेला निर्णय अखेरचा समजण्यांत येईल. ( ४ ) विषय निर्णायक कमिटींतील सभासदांची संख्या प्रांतवारीनें ठरवून एकंदर ८५ केली. ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभेची बैठक भरणार असेल त्यानें १० सभासद अधिक निवडून द्यावेत, खेरीज अध्यक्ष, कमेटीचे चेअरमन, सर्व माजी अध्यक्ष, सर्व माजी चेअरमन, जनरल सेक्रेटरी आणि स्थानिक सेक्रेटरी यांचाहि विषय नियामक कमिटींत समावेश केला गेला.

ह्मणजे या नियमांनीं अध्यक्ष निवडण्याचा हक्क आणि विषय नियामक कमिटीचे सभासद निवडण्याचा हक्क यांना पूर्वीच्या पद्धतीहून नियमित केलें. असें नियमन करण्यास कारणहि तसेंच झालें आहे. ४ सालापासून राष्ट्रीय सभेत जो एक जहाल पक्ष निर्माण झाला होता, त्याचीं मतें आणि उद्देश यांचें दिग्दर्शन वर आलें आहेच. या पक्षाला राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष, आपल्या मताचा असावा व सभेपुढें चर्चेकरितां येणारे विषयहि आपल्याच मतानुरोधानें असावेत असें वाटणें स्वाभाविक होतें व त्याचा तसा प्रयत्नहि होता. हाच कोटीक्रम उलट बाजूलाहि

लावतां येणें अगदीं सुलभ आहे. या लढाईंत एकमेकांनी एकमेकावर दांत ओंठ खात बसण्यापेक्षां राष्ट्रीय सभेनें या बाबतींत नियमच व लून देणें शहाणपणाचें होतें.

१९०७ साल हें हिंदी राजकारणांत सर्वच दृष्टीनीं अपूर्व आहे. या सालीं सर्वच घडी पार विसकटून गेली, राज्य कर्त्यांनींहि आपल्या राज्यव्यवस्थेची पूर्वीची घडी साफसूफ करण्यास आरंभ केला होता सुरतेनें तर राष्ट्रीय सभा मोडूनच टाकल्यासारखी केली होती. त्या वेळीं सर सुरेंद्रनाथ बानर्जींनीं Congress is dead long live the Congress हे काढलेले उद्गार किती मार्मिक आणि अर्थपूर्ण होते, हें तिच्या नतरच्या अस्तित्वावरून आणि तिनें केलेल्या कार्यावरून उघड होत आहे. सुरतेच्या बखेड्यानें, राष्ट्रीय सभला आपली कायमची घटना आणि निश्चित व स्पष्ट ध्येय ठरविणें अत्यंत जरूरीचें आहे हें सिद्ध केलें. हा घटनेचा प्रश्न पहिल्यानदा ८७ सालीं मद्रासेस निघाला आणि १९०३ सालीं मद्रासेसच विषय नियामक कमेटींत यावर खडाजंगीं वाद झाला. सभेची घटना अस्तित्वांत आलीच पाहिजे असा मद्रासचा आग्रह–हट्टहि म्हणण्यास हरकत नाहीं–फार होता. मद्रासप्रमाणें पंजाबालाहि घटनेची आत्यंतिक जरूर भासत होती. या दोन प्रांतांनीं घटनेविषयीं जितका उतावीळपणा दाखविला आहे तितका कोणत्याहि प्रांतानें दाखविला नाहीं. परंतु सर फेरोजशहा प्रभृति राष्ट्रीय सभेच्या प्रागतिक पुढाऱ्यांना, एका विशिष्ट प्रसंगाला अनुलक्षून केलेल्या नियमांनीं राष्ट्रीय सभेला कायमचेंच जखडून टाकणें पसंत नव्हतें. हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा हें नुकतेंच जन्म पावलेलें कोंवळें बालक आहे, इंडो-ब्रिटिश राजकारणाच्या आखाड्यांत उतरून येईल त्या प्रसंगाला तोंड देऊन स्वतःचे अंग राखण्याइतकी त्याच्यांत अद्याप ताकत नाही. तेव्हां त्याच्या स्वैर वाढीला नियमांनीं जखडून टाकणें सध्यां योग्य होणार नाहीं असें त्यांचें मत होतें. जरूर भासेल त्या वेळीं, व तेवढ्या पुरते नियम करावेत, व स्वानुभवाचें पाठबळ देऊन रूढीचीच कांस धरावी अशी त्यांची विचारसरणी होती. आपल्या वुद्धीचा जस जसा विकास होईल, व वयोमानानें आणि व्यावहारिक अनुभवानें दृष्टी विशाल होईल, त्याप्रमाणें, आमच्या आजच्या महत्वाकांक्षा आणि उद्देश यांचीहि मर्यादा, आहे याहून अनेक पटींनीं वाढणार; तेव्हां

आजच त्यांना आजच्या कोत्या दृष्टीनें बांधणें ह्मणजे एक प्रकारचा आत्मघा-तच करण्यासारखें आहे, अशी त्यांची खात्री होती. ८७ सालीं उत्पन्न झालेला हा प्रश्न इतके दिवस लोळत पडण्याचें मुख्य कारण हेंच आहे. एक दोन, फार तर दोन तीन वर्षांनीं हा प्रश्न राष्ट्रीय सभेपुढे यावा, त्यावर वादविवाद व्हावा, एखादी कमिटी नेमावी, जरूर तर तात्पुरते कांहीं नियम करावेत, परंतु कायमची घटना करण्याचा प्रश्न मात्र, या नाहीं त्या सबबीवर लांबणीवर टाकावा असा प्रकार चालला होता. परंतु १९०४ सालीं राष्ट्रीय सभेंत एक नवीन पक्ष निर्माण झाल्यापासून, विशेषतः त्यांचे मार्ग राष्ट्रीय सभेच्या परं-परेला सुटून आहेत असें दिसूं लागल्यापासून कायमच्या घटनेची आवश्यकता थोडथोडी भासूं लागली. ५ सालीं त्याला बरेंच स्वरूप आलें, आणि ६ सालीं, स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, आणि राष्ट्रीय शिक्षण या संबंधांतील दोन्ही पक्षांची खडाजंगी, विशेषतः ठरावांचा विपर्यास, यांनीं त्याला कायमचें स्वरूप दिलें तरी देखिल सर फेरोजशहादि मंडळींना सभेची कायमची घटना, किंवा तिच्या ध्येयाची स्पष्ट व्याख्या करावी असें मनापासून वाटत नव्हतें. किंबहुना ती करूं नये असाच त्यांचा हट्ट होता असेंहि म्हणतां येईल. परंतु या नवीन परिस्थितींत घटना आणि व्याख्या हीं झालींच पाहिजेत असें ना. गोखल्यांचें ठाम मत किंवा हट्टच होता. १८९३ सालीं हिंदुमुसलमानांच्या मारामारींतील सभेच्या प्रकरणानें पुण्याची सार्वजनिक सभा दुभंगली. लो. टिळक आणि त्यांचे अनुयायी एका बाजूला आणि न्या. रानडे, सर फेरोजशहा व गोखले एका बाजूला असे तट पडून सभेच्या गुळमुळीत आणि असंदिग्ध नियमांचा फायदा घेऊन लो. टिळकांनी ९६ सालीं आपली सरशी करून घेतली. हाच डेक्कन सभेचा जन्म होय. असंदिग्ध नियमांचा फायदा घेऊन सार्वजनिक सभेवर कुरघोडी करणारी मंडळीच आज राष्ट्रीय सभेंत घुसली होतीं. त्यानीं ९६ सालीं जशी सार्वजनिक सभेची दैना उडविली तशी राष्ट्रीय सभेचीहि उडवि-ण्यास त्यांना अवसर मिळूं नये म्हणून राष्ट्रीय सभेची घटना आणि व्याख्या हीं निश्चित आणि स्पष्ट झालीच पाहिजेत असा ना. गोखल्यांच्या हट्ट होता व तोच अखेर पुरा झाला. सुरतेची राष्ट्रीय सभा उधळल्यावर ता. २८ दिसेंबर १९०७

रोजीं राष्ट्रीय सभेची परंपरा पुढें चालविण्यास सुमारें ८०० प्रतिनिधींनी त्याच सभेच्या मंडपांत " कन्व्हेन्शन " ची बैठक बोलाविली होती. पुढें कधीं काळीं राष्ट्रीय सभेच्या संबंधांत सुरतेची पुनरावृत्ति घडूं नये म्हणून तिच्या कार्याचा रस्ता नियमांनीं आंखून टाकण्याकरितां, म्हणजे निश्चित घटना तयार करण्याकरितां या बैठकींत एक १०० लोकांची कमिटी नेमिली. ही कमिटी ( अलाहाबाद कन्व्हेन्शन ) अलाहाबादेस १९०८ एप्रीलच्या १८ आणि १९ तारखांना भरून तिनें सभेची घटना निश्चित केली आणि त्याच सालच्या मद्रासच्या राष्ट्रीय सभेनें ती मंजूरहि केली. ही घटना कित्येकांना पसंत नव्हती, व याच सबबीवर ती मंडळी राष्ट्रीय सभेंत येण्यास कबूल नव्हती. पण घटना कबूल नाहीं म्हणून ती दुरुस्त करण्याच्या भरीस न पडतां राष्ट्रीय सभेंतूनच बाहेर निघणें, हें आजच्या असहकारितेनें सरकारला वठणीला आणण्यासारखेंच होतें. ही घटना पसंत नसणारी अशी मंडळी अगदींच थोडी होती. त्या वेळ-पर्यंत राष्ट्रीय सभेच्या कामांत नेहमीं पुढाकार घेणाऱ्या बहुतेक सर्व मंडळींची या घटनेबद्दल मुळींच तक्रार नव्हती. आणि ज्यांना ही घटना पसंत नव्हती त्यांनीं त्यांतील दोषहि कधीं दाखविले नाहींत, किंवा तिच्यापेक्षां चांगलीहि घटना कधीं सुचविली नाहीं हें येथें लक्षांत ठविलें पाहिजे.

अलाहाबादच्या या घटनेंत दुरुस्ती करण्यासाठीं बंगाल प्रांतिक काँग्रेस कमेटीनें १९१० सालीं सूचना केली होती. त्याचा विचार करण्याकरितां त्याच सालच्या अलाहाबादच्या राष्ट्रीय सभेनें एक कमेटी नेमिली. या कमेटीनें सुच-विलेली दुरुस्ती ११ सालच्या कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनें मंजूर केली आणि हाच प्रश्न ऑल इंडिया काँग्रेस कमेटीकडे आणखी विशेष विचाराकरितां सोंपविला. १२ सालच्या बंकीपूरच्या राष्ट्रीय सभेनें, या १९०८ च्या आणि ११ च्या घटनेंत आणखी थोडी दुरुस्ती केली. या दुरुस्तीनें, काँग्रेस कमि-ट्यांना, किंवा राष्ट्रीय सभेशीं संलग्न असलेल्या दुसऱ्या संस्थांना जाहीर सभा भरवून प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क मिळाला. पूर्वीप्रमाणें जाहीर सभांत-नहि प्रतिनिधी निवडण्याची सवलत ठेविली गेली; परंतु सभा बोलावणें त्या मात्र जबाबदार संस्थांनीं बोलावाव्यात असा निर्बंध घातला. याच राष्ट्रीय

सभेनें प्रतिनिधींची फी २० रु. होती ती १० रु. केली. याच घटनेनुसार राष्ट्रीय सभेच्या बैठकी १९२० च्या राष्ट्रीय सभेपर्यंत भरत होत्या. त्यावर्षी घटनेंत आणखी थोडी दुरुस्ती झाली.

## ध्येय.

राष्ट्रीय सभेच्या ध्येयाची होत गेलेली उत्क्रांति मननपूर्वक पाहिली ह्मणजे यूरोपीय लोकसत्ताक राज्यपद्धतींत हिंदुस्थान त्या वेळीं किती बाल्यावस्थेंत होता हें चांगलें ध्यानांत येतें, आणि इतक्या अल्पावधींत त्यानें केलेली प्रगति पाहिली ह्मणजे कौतुकहि वाटतें. राष्ट्रीय सभेच्या जन्माबरोबर तिची घटना निश्चित नव्हती; त्याचप्रमाणें तिचें ध्येयहि निश्चित नव्हतें, तरी त्याची ढोबळ कल्पना मात्र होती हें खरें आहे. १८८५ सालीं पहिल्याच राष्ट्रीय सभेच्या वेळीं; राष्ट्रभक्तांमधील स्नेह वाढविणें; परम्परांतील धर्म किंवा पंथ यांचे भेदाभेद न मानतां एकराष्ट्रीयत्वाची भावना वृद्धिंगत करणें; सामाजिक ऐक्य घडवून आणणें आणि राष्ट्रकार्याची दिशा ठरविणें; हे सभेचे उद्देश सांगून हिंदुस्थानांतील राजसत्तेचा पाया यूरोपीय राज्य पद्धतीप्रमाणें विस्तीर्ण करावा, ( Their. ( Indians ) desire to be Governed according to the ideas of Government prevelent in Europe ) राज्यकारभारांत हिंदींना योग्य भाग द्यावा ही हिंदुस्थानची महत्वाकांक्षा बाबू उमेशचंद्र बानर्जींनी बोलून दाखविली होती. परंतु हे सर्व कालावधीवर आणि लोकांनीं आपल्या अंगीं आणावयाच्या पात्रतेवर अवलंबून आहे असेंहि त्यांनीं बजावून ठेविलें होतें. ही पात्रता हिंदी लोकांच्या अंगीं आणण्यासाठींच हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म आहे, असें तिचे जनक मि. ह्यूम साहेब यांनीं एका जाहीर व्याख्यानांत सांगितलें होतें. बाबू उमेशचंद्र बानर्जींनीं हिंदुस्थानची महत्वाकांक्षा जाहीर केल्यापासून पुढें तीनच वर्षांनीं, ह्मणजे १८८८ च्या अलाहाबादच्या ४ थ्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष मि. जॉर्ज यूल यांनीं, लोकसत्ताक राज्य पद्धतींत एक पाऊल पुढें टाकण्याची हिंदुस्थानची तयारी झाली आहे, असें अध्यक्षपदावरून जाहीर केलें. हिंदुस्थानाला, कौन्सिलांत निम्मे लोकनियुक्त सभासद निवडून देण्याचा अधिकार आणि प्रश्न विचारण्याचा हक्क देण्याची, ह्मणजे प्रगतिप्रिय

आणि लोकसत्ताप्रिय ब्रिटिश सरकारनें, हिंदुस्थानांतील आजपर्यंतची एकसत्ताक ( kingship ) पद्धति टाकून अल्पसत्ताक ( Aristocracy ) पद्धति बिनधोक स्वीकारण्याची आतां वेळ आली आहे, व हिंदुस्थानांत तितकी पात्रता आली आहे असें स्पष्ट शब्दांनीं सांगितलें. १८९२ सालीं अलाहाबादेसच भरणार्‍या ८ व्या राष्ट्रीय सभेचे दुसर्‍यांदा झालेले अध्यक्ष बाबू उमेशचंद्र बानर्जी यांनीं मि. ह्यूमसाहेबांच्याच मागणीचा जोरानें पुरस्कार केला. लॉर्ड क्रॉस साहेबांचें लोळत पडलेलें इंडिया बिल एकदांचें पार्लमेंटनें पास करून या वेळीं बादशहांची देखिल त्याला मंजुरी मिळाली होती; तरी अप्रतिहत सत्तेला चटावलेली येथील नोकरशाही देहस्वभावानुरूप पास झालेल्या त्या बिलाचा कायदा आणि बारीकसारीक नियम करतांना मनाची उदारता दाखवील अशी कोणालाच आशा नव्हती. नोकरशाहीचा हा चिरपरिचित स्वभाव लक्षांत घेऊन बाबू उमेशचंद्र लोकांना बजावतात, " नोकरशाईनें हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीला प्रतिबंधक नियम करण्याची अनुदारता दाखविली तर आपण आपले "हक्क" मिळवींपर्यंत ही चळवळ अशीच चालू ठेविली पाहिजे. (We must go on with our agitation and not stop untile we get what we all think......we have a *right* to get)" ८५ सालची हिंदुस्थानची महत्वाकांक्षा ( desire ) आणि ९२ सालचा हक्क ( Right ) हा त्याच गृहस्थांच्या शब्दप्रयोगांतील फरक लक्षांत घेतला म्हणजे सात वर्षांतील हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीची कल्पना येण्यास कांहीं हरकत नाहीं. १८८७ सालीं ना. शंकरन् नायर यांनीं हिंदुस्थानाला पाहिजे असलेल्या हक्कांची रूपरेषा अधिक स्पष्ट आखली. ब्रिटिशांच्या बरोबरीचे हक्क मिळविणें आणि वर्णभेद दूर करण्यास लावणें हे आपले उद्देश आहेत असें ते म्हणाले We may be admitted as equal sharers in this great inheritance......we shall have all the civil rights, associated with the English government...we must insist on perfect equality. Acquisition therefore of all civil rights conferred on English men' removal of all disabilities on Indians as such these must be our amis.

१८९८ सालीं हिंदुस्थानच्या वाढत्या महत्वाकांक्षेवरील बाव आनंद मोहन बोस यांनीं आणखी एक झिरझिरीत पापुद्रा काढून तिचें तेज खुलविलें. अफाट हिंदुस्थानच्या कारभाराचीं सूत्रें, एकाहि हिंदी मनुष्याला न विचारतां गुप्त खलबतें करून आपल्या इच्छेप्रमाणें, व आपल्याच सोईप्रमाणें हलविण्याची वेळ आतां निघून गेली; सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत हिंदी लोकांचा प्रवेश करणें अत्यंत जरूर आहे असें त्यांनीं सांगितलें. एवढेंच नव्हे, तर हिंदुस्थानच्या नशीबाची रूपरेषा आंखून त्याची मान सर्वस्वी नोकरशाहीच्या हवाली करणाऱ्या हौस ऑफ कॉमन्समध्यें देखिल हिंदी प्रतिनिधी मागून घेण्याच्या आपल्या हक्काची त्यांनीं लोकांना जाणीव दिली.

१८९९ सालच्या लखनौस भरलेल्या १५ व्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष रमेशचंद्र दत्त यांनीं हिंदी लोकांच्या महत्वाकांक्षेंत किंवा ती विशद करण्याच्या पद्धतींत किंवा भाषेंत सर्वांहून अधिक स्पष्टपणा किंवा जोरदारपणा आणला असें म्हटलें पाहिजे. सर्वांच्या मुळाशीं वसत असलेली स्वराज्याची अंधुक कल्पना रमेशचंद्र दत्तांनीं उघड केली. हिंदी लोकांच्या अंतःकरणांत असलेल्या स्वराज्यविषयक भावनेच्या निखाऱ्यावरील अस्पष्टतेची राख रमेशचंद्रानीं झाडून तो निखारा प्रज्वलीत केला. स्वराज्याशिवाय देशाचा तरणोपाय नाहीं; हें खणखणींत स्वरांत अगदीं पहिल्यानदां सांगितलें रमेशचंद्र दत्तांनीं.

It is possible to prevent distress and deaths from famine, to spread prosperity and contentment, and to evoke the zelous and loyal support of a grateful nation only by conceding to the people, in so far as is safely possible, the *blessings of self Government.* It is not *without* this concession, without admitting the people to a *real share in the control of their concerns* to save India from distress and discountent and deaths from famine.

हिंदुस्थानच्या अंतःकरणांतील हा स्वराज्याच्या भावनेचा निखारा रमेश-चंद्रांनीं धगधगीत केल्यावर त्याला वारा घालून फुलविण्याचें काम पुढें अव्याहत सुरू होतें. हा निखारा १९०४ सालीं चांगलाच प्रज्वलीत झाला होता. त्या वर्षीं मुंबईस भरलेल्या २० व्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सर हेन्री कॉटन यांच्या उद्गारांवरून वरील विधानाची सत्यता पटेल.

The *ideal* of an Indian patriot is the establishment of a federation of free and separate states, *the United States of India* placed on fraternal footing with the *self governing colonies* each with its local autonomy cemented together under the ægis of Great Britain that is a forelast of a future, dim and distant, though it be a, gradual realisation of which it is a previlege of Government to regulate and the *aim* and hope and *aspiration* of the Indian people to attain.

१८८५ सालीं हिंदी राष्ट्रीय सभेला काँग्रेस नांव देण्यांत न्या. महादेव गोविंद रानडे यांनीं अमेरिकेचेंच उदाहरण घेतलें होतें. आणि सर हेन्री कॉटन यांनीं हिंदुस्थानच्या स्वराज्याचें चित्र रेखाटतांना अमेरिकेचीच नक्कल केली. अमेरिकेप्रमाणें स्वतंत्र आणि संयुक्त राज्यव्यवस्था अस्तित्वांत आणणें हें हिंदी लोकांच्या महत्वाकांक्षेचे सारसरस्व सर हेन्रीनीं सांगितलें. याच कल्पनेचा अनुवाद पुढें जोरानें होऊं लागला. कर्झनशाहीनें हिंदुस्थानाला लाविलेली आणि सारखी फैलावतच जाणारी असंतोषाची आग विझविण्यास हिंदुस्थानाला स्वयंसत्ताक वसाहतीचें राज्य देण्याखेरीज, ह्मणजे हिंदुस्थानच्या महत्वाकांक्षेला मूर्तस्वरूप देण्याखेरीज दुसरा कोणताहि उपाय यशस्वी होणार नाहीं असें ना. गोखल्यांनीं, १९०५ सालीं विलायतेस न्यू रिफॉर्म क्लबांत त्यांना दिलेल्या मेजवानीच्या वेळीं ब्रिटिश लोकांना स्पष्ट बजावलें. त्याच सालीं बनारस येथें भरलेल्या २१ व्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून हेंच राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे असें ना. गोखल्यांनीं उघडच सांगितलें:--

The goal of congress is that India *should be* governed in the interests of Indians themselves and that *in course of time* a form of Goverment should be attained in this country similer to what exdists in *the self governing colonies* of the British Empire.

हीच पक्क झालेली कल्पना आणि जवळ जवळ निश्चित केलेलें ध्येय ६ सालीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत दादाभाई नवरोजींनीं Self Government याला 'स्वराज्य' हा पर्याय योजून एकाच शब्दांत त्याचें सार सांगितलें. स्वराज्य शब्दानें सर्व हिंदुस्थान भारून गेला. हिंदुस्थानच्या अंतःकरणांतील पारतंत्र्यानें पौरुषाच्या गंजून गेलेल्या तारांवर 'स्वराज्य' या चिरपरिचित आणि विशिष्ट भावनोद्दीपक व भावनोद्बोधक शब्दांचा आघात होतांच त्यांतून जो झणत्कार निघाला त्यानें सर्व हिंदुस्थान हादरून सोडला. मेंढवाड्यांत वाढलेल्या सिंहाच्या बच्चाला, दुसऱ्या एका सिंहानें पाण्यांत त्याचें प्रतिबिंब पाडून त्याला त्याच्या खऱ्या स्वरूपाची ओळख दिल्यावर त्या बच्चानें आकाशभेदी गर्जना करावी, व मेंढवाडा हादरून सोडावा; त्याप्रमाणेंच दादाभाई-च्या 'स्वराज्य' या शब्दानें हिंदुस्थानची स्थिति केली. स्वराज्याच्या गर्जनेनें सर्व हिंदुस्थान इतका दणाणून गेला कीं, नेहमीं शस्त्रांनीं सज्ज असलेली आणि

( हा मजकूर पृष्ठ १२५ च्या शेवटीं वाचावा )

परंतु आत्मप्रत्यय झालेल्या सिंहाच्या बच्यानें चवताळून टाकलेली झांप सुरतेस कांहींशीं अंगलट येऊन त्याचें स्वतःचेंच अंग खरचटलें. त्या खरचटण्यानें निघालेलें रक्त आणि जखम बरी होण्याकरितांच १९०८ च्या एप्रिलमध्यें अलाहाबाद कन्व्हेन्शननें औषधयोजना केली. ती औषधयोजना म्हणजे राष्ट्रीय सभेची घटना आणि ध्येय निश्चित करणें हीच होय. आतां-पर्यंत विकास पावलेली आणि पक्क झालेली हिंदी महत्त्वाकांक्षाच अलाहाबाद कन्व्हेन्शननें ध्येय म्हणून ठरविली

The objects of the Indian National Congress are the attainment by the people of India of a system of Government similar to that enjoyed by the self-governing member of the British Empire and a participation by them in the rights and responsibilities of the Empire on equal terms with those members. These objects are to be achieved by constitutional means by bringing about a steady reform of the existing system of administration and by promoting national unity, fostering public spirit and developing and organising the intellectual, moral, economic, and industrial resourses of the country.

हें ध्येय मान्य आहे असें लिहून दिल्याखेरीज कोणालाहि राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी होतां येत नाहीं. २० सालच्या नागपूरच्या सभेनें हें ध्येय बदलून टाकलें.

# प्रकरण १० वें.

## उत्क्रांतीची दुसरी अवस्था.

सात समुद्रांपलीकडे एक आटपाट नगर आहे, तेथल्या बलाढ्य राजानें तुझ्या विपत्कालीं तुझें राज्य हरण केलें आहे, तें, तूं आपल्या शौर्यबलावर परत जिंकून घे; असें वनवासी राजपुत्राला सांगून त्याचा पालनकर्ता इहलोक सोडून गेला. हीच आजीबाईची जुनी पुराणी गोष्ट आमच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं हिंदुस्थानाला अगदीं पहिल्यापासून अनेकवार सांगितली आहे. इंग्लंडच्या राजाला आंदण मिळालेलें मुंबई बेट, ईस्ट इंडिया कंपनीला १६६९ सालीं भाडेपट्टीनें देतांनाच करारांत चार्लसनें कंपनीकडून कबूल करून घेतलें आहे कीं, And it is declared that all presons being His Majesty's subjects inhabiting within the said Island, (Bombay) and their children, and their posterity born within the limits thereof shall be deemed free denizens and *natural subjects as if living and born in England*. ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य मिळविण्याचा हिंदी लोकांचा हक्क त्यांच्या कर्तबगारीवर आणि राष्ट्रीय शक्तीवर सर्वस्वी अवलंबून ठेवला आहे, याची अधीक स्पष्ट जाणीव देणारे उद्गार महाराणीनें ५८ च्या आपल्या प्रसिद्ध जाहीरनाम्यांत काढले आहेत. परंतु राज्यकर्त्यांचे वरील सारखे उद्गार आणि अप्रतिहत सत्तालोभी नोकरशाहीची कृत्यें ह्मणजे स्त्रैण बनलेल्या बापाचें प्रेम, आणि सावत्र आईचा मत्सरच होत.

ब्रिटिशांच्या एकमुखी, किंवा अप्रतिहत सत्तेला खरा आरंभ १८५८ पासूनच झाला ह्मणावयाचा. तोपर्यंत कंपनी सरकारावर कंपनीच्या डायरेक्टरांचा बोर्ड आणि १७८४ पासून पिटच्या कायद्यानें निर्माण झालेला पार्लमेंटचा बोर्ड ऑफ कंट्रोल या दोघांची नजर असे. १८३३ च्या कायद्यानें हिंदुस्थानाकरितां केले जाणारे कायदे आणि नुकत्याच स्थापलेल्या लॉ-कमिशनरांचे रिपोर्ट, कंप-

नीला पार्लमेंटपुढें ठेवावे लागत असत. यानें ह्मणजे हिंदुस्थानला कांहीं अपूर्व फायदा होत होता असें नाहीं; तरी कंपनीला पार्लमेंटचा थोडा ना थोडा वचक होता हें खरें. परंतु ५८ सालीं कंपनीच्या हातांतील राज्यसूत्रें राणीनें आपल्या हातीं घेतलीं तेव्हां बोर्ड ऑफ डायरेक्टर आणि बोर्ड ऑफ कंट्रोल या दोघांची सत्ता फक्त हिंदुस्थानाकरितां नेमलेल्या स्टेट सेक्रेटरीच्या हातांत दिली गेली. या स्टेट सेक्रेटरीला ९ सभासदांचें एक कौन्सिल दिलें. हे सर्व सभासद हिंदुस्थानांत बरेच दिवस नोकरी केलेले सिव्हिलियन्स असत. बऱ्याच दिवसांच्या नोकरीनें, मनुष्याचें रक्त पिण्यास चटावलेल्या वाघाप्रमाणे या सिव्हिलियन्सची स्थिति झालेली असे. हातांतला अधिकाराचा काटेरी चाबूक टाकण्यास त्यांची नाखुषी असल्यामुळें हिंदुस्थानाविषयीं—अर्थात् हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतिविषयीं—त्यांची काम करण्याची प्रवृत्ति कशी असे हें आतां जगजाहीर आहे. शिवाय स्टेट सेक्रेटरी हा इंग्लंडच्या प्रधानमंडळाचा सभासद आणि पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळें त्याला आपल्या कौन्सिलावर देखिल कुरघोडी करण्यास पूर्ण मुभा होती. ह्मणजे ५८ सालापासून हिंदुस्थानाच्या बाबतींत स्टेट सेक्रेटरीसाहेब आणि त्यांचें कौन्सिल हेंच कर्तुमकर्तुम अन्यथाकर्तुम झालें होतें "आमच्यावर महाराणी राज्य करीत नसून येथूनच गेलेले आणि हिंदुस्थानचे पेन्शन खात बसलेले गोरे सिव्हिलियन्स राज्य करीत आहेत" हा, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यास रॉयल कमिशन मागतांना राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून अनेकांनीं काढलेल्या उद्गारांचा सरळ अर्थ आहे. स्टेट सेक्रेटरीवर किंवा त्यांच्या कौन्सिलवर पार्लमेंटांचा अगदींच ताबा नव्हता असें नाहीं. हिंदी राज्यकारभारासंबंधीं स्टेट सेक्रेटरीला जाब विचारण्यासहि पार्लमेंटला अधिकार होता. परंतु पार्लमेंटनें आपला कोणत्याही प्रकारचा राखून ठेवलेला हा अधिकार स्वतःच्याच हिताहिताच्या प्रश्नाखेरीज कधीं गाजविला नाहीं. हिंदी राज्यघटनेंतच कांहीं फेरफार करावयाचा असेल तर, आणि स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं कर्ज काढावयाचें असेल तर, या दोन गोष्टींखेरीज पार्लमेंट, स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या कारभारांत कधीं ढवळाढवळ करीत नसे. कौन्सिलचे सभासद निवडणें, नेमणें किंवा अधिक करणें, यासंबंधींचे

नियम; इंडियन सिव्हिल सर्व्हिसवरील नेमणुका; वरिष्ठ प्रतीच्या जागांकरितां नेमल्या जाणाऱ्या लोकांच्या योग्यतेची व्याख्या करणें; किंवा ले. गव्हर्नरांना दिलेलीं कार्यकारी कौन्सिलें जाहीर ( notifications ) करणें वगैरेसारख्या किरकोळ बाबींत पार्लमेंटची संमति घेतली म्हणजे झालें. या वेळीं हिंदुस्थानचा सर्व कारभार स्टेट सेक्रेटरीसाहेबांच्या प्रत्यक्ष हुकमतीखालीं हिंदुस्थान सरकार सहा इंग्लिश सभासदांच्या कौन्सिलाच्या साहाय्यानें चालवीत असे.

परंतु राज्यकारभारांत प्रत्यक्ष हिंदी लोकमताची जरूर दिवसेंदिवस अधिक भासूं लागली व १८६० सालीं सर बार्टल फ्रीयर यांनीं एक मिनीट लिहून हिंदी कायदे कौन्सिलांत हिंदींचा प्रवेश केला पाहिजे असें जोरानें सांगितलें. याच कौन्सिलांत सभासदांची अधिक भर घालण्यापेक्षां मुंबई आणि मद्रास यांना स्वतंत्र कौन्सिलें द्यावीत; बंगाल, वायव्य प्रांत आणि पंजाब यांना ले. गव्हर्नर्स देऊन त्यांनाहि स्वतंत्र कौन्सिलें द्यावीत; प्रत्येक कौन्सिलमध्ये तीन बिनसरकारी—युरोपियन, किंवा हिंदी सभासद नेमावेत आणि उत्पन्नाच्या बाबीखेरीज स्थानिक प्रश्नांचे निकाल स्थानिक कौन्सिलांनींच लावावेत; अशी लॉर्ड कॅनिंगसाहेबांनीं आपली योजनाहि मांडली होती.

१८६१ सालीं जो इंडियन कौन्सिल्स आक्ट पास झाला त्यानें लॉर्ड कॅनिंगसाहेबांची योजना बरीच अमलांत आणिली. मुंबई आणि मद्रास यांना कार्यकारी कौन्सिलांसह स्वतंत्र कौन्सिलें मिळालीं. कांहीं विशिष्ट बाबींखेरीज स्थानिक प्रश्नांचा निर्णय करण्याचा या कौन्सिलांना अधिकार मिळाला. या कौन्सिलांनीं पास केलेल्या कायद्यांना मात्र गव्हर्नर जनरलची अगाऊ संमति मिळविली पाहिजे असा निर्बंध होता. गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्येंहि सहांहून कमी नाहींत व बारांहून अधिक नाहींत इतक्या सभासदांची संख्या निश्चित करून त्यांतील निम्मे तरी बिनसरकारी असले पाहिजेत असें ठरविलें. आणीबाणीच्या वेळीं, कौन्सिलच्या संमतीशिवाय एखादा कायदा करण्याचा गव्हर्नर जनरलला अधिकार होता; परंतु अशा कायद्याची आयुर्मर्यादा सहा महिन्यांहून अधिक ठेविली नव्हती. हिंदुस्थान सरकार म्हणजे गव्हर्नर जनरल सर्व हिंदुस्थानाकरितां कायदे करी; व प्रांतिक सरकार म्हणजे गव्हर्नर फक्त

आपापल्या प्रांतांपुरते कायदे करीत. १८८६ साली बंगालला हि कायदे कौन्सिल मिळालें. १८९७ सालीं वायव्यप्रांत आणि पंजाब याला कायदे कौन्सिल मिळालें.

परंतु हीं कौन्सिलें ह्मणजे चकचकीत सोनेरी कागदानें मढविलेलीं यात्रेतील शेणामातीचीं कौन्सिलांची निर्जीव बाहुलीं, विलायत सरकारनें हिंदुस्थानच्या गळयांत बांधली होतीं. लॉर्ड मॅकडोनेलच्या शब्दांत या कौन्सिलाना कायदे करणाऱ्या ' कमिट्यां"पेक्षां फारशी किंमत नव्हती.

The character of the lagistative councils established by the act of 1861 is simply this, that they are *committees* for the purpose of making laws—committees by means of which the excutive Government obtains advice and assistance in their legislation, and the public derive the advantage of full publicity being ensured at every stage of the law—making process.

हिंदुस्थान सरकार या कौन्सिलांच्या यंत्रांतून कायदे काढीत असे ह्मणून ते कौन्सिलांच्या संमतानें तयार होत असत असें मात्र नाहीं (Private lagislation being unknown) सरकारनें तयार केलेला कायदा, तो पास होण्यापूर्वी समजून घेण्याचा लोकांना अधिकार मिळाला होता; व तो असा लोकांच्या कानांवर घालतांना सरकारला स्वतःचें समर्थन करावें लागत असे एवढेंच. सरकार पुढें मांडील तो कायदा, आणि त्याचें करील तें समर्थन निव्वळ या कानानें ऐकून त्या कानानें सोडण्यापेक्षां कौन्सिलर्सना कांहींच करण्याचा अधिकार नव्हता. १८७८ सालीं मद्रासच्या कार्यकारी कौन्सिलच्या एका सभासदानें बिलाला एक उपसूचना आणिली होती, ती हिंदुस्थानसरकारनें नाकारली; आणि स्टेट सेक्रेटरीसाहेबांनीं तर अशी उपसूचना आणणें बेकायदा ठरवून टाकलें ( Constitutionally improper ). खुद्द सरकार देखिल या कौन्सिलांना " कौन्सिलें " ह्मणण्यास तयार नव्हतें. (It has been expressly declared that the Councils are mere lagislatives *committees* of the Government and *are not the germ of responsible Institutions*

नंतर लवकरच लॉर्ड लिटनसाहेबांची कारकीर्द सुरू झाली. त्यांनीं आपल्या प्रतिगामी राज्यपद्धतीनें, आजीबाईनें आपल्या नातवांना सांगितलेली राज्यभ्रष्ट वनवासी राजपुत्राची गोष्ट, अधिकाऱ्याच्या मूक पण बऱ्याच कडक भाषेंत हिंदी लोकांना सांगितली. लिटनसाहेबांची ही मूक भाषा हिंदुस्थानच्या प्राकृत जनांच्या मनावर प्राकृत भाषेंत ठसविण्यासाठींच ७६ सालीं कलकत्याला " इंडियन असोसिएशन " नें जन्म घेतला. ८० सालीं इंग्लंडांतील लिटन कर्झनी प्रकृतीचा साम्राज्यवादी पक्ष, उदार मतवादी पक्षानें दडपून टाकला. लिटनसाहेबांनीं हिंदुस्थानांत पेटविलेला असंतोषाचा अग्नि विझविण्यासाठीं लॉर्ड रिपनसाहेब व्हाइसराय होऊन आले; त्यांनीं स्थानिक स्वराज्याची स्थापना करून, आणि इल्बर्ट बिलानें वर्णभेद नाहींसा करण्याचा प्रयत्न करून, त्या गोष्टींतील सत्यता, खरेपणा व अवश्यकता हिंदी लोकांना पटवून त्यांचें हरण केलें गेलेलें राज्य परत मिळविण्यासाठीं एक व्हा, राष्ट्रैक्याचें अजिंक्य शौर्य व बल अगोदर अंगीं आणा असा उपदेश केला. त्या उपदेशाचें तात्कालिक फल ह्मणजे, लॉर्ड रिपनसाहेबांचा उपदेश, कृतींत प्रत्यक्ष उतरविण्यासाठीं ८५ सालीं भक्कम पायावर उभारलेली " **हिंदी राष्ट्रीय सभा** " होय. तिनें—ह्मणजे सुशिक्षीत हिंदी राष्ट्रानें—आपल्या जन्माच्या पहिल्या घटकेपासून, किंबहुना पहिल्या श्वासापासून आपलें हें हिरावून घेतलेलें राज्य मागण्याची व सनदशीर मार्गांनीं तें मिळविण्याची चळवळ चालू केली. या चळवळीनें हिंदी राष्ट्राच्या अंगीं येऊं लागलेल्या शक्तीची प्रत्यक्ष प्रतीति ह्मणजेच सभेच्या जन्मानंतर सात वर्षांनीं १८९२ सालीं पास झालेला इंडियन कौन्सिलस आक्ट होय.

६१ सालीं दिलेल्या कौन्सिलांच्या बाहुल्यांबरोबर विलायत सरकारनें हिंदुस्थानाला भरपूर तीस वर्षें खेळविलें. ब्रिटिश राज्य पद्धतींत हिंदुस्थानच्या रांगत्या बाळाला कौन्सिलांच्या धुरळ्यांत पुरेपूर तीस वर्षें लोळवून देखिल गुडघ्यावरच उभें राहून आपल्या राज्यकारभारांत "बाबा, काका" ह्मणण्यापुरतीच त्याच्या अंगांत ताकत आली आहे, किंवा पाटीपेन्सील घेऊन कौन्सिलांच्या शाळेंत तीस वर्षें घालविलीं तरी पाटीवर गिरगटण्यापेक्षां हिंदुस्थानची फारशी प्रगति झाली नाहीं, अशीच फाजील प्रेमळ बापासारखी साम्राज्यसरकारची असलेली दृढ समजूत, या ९२ च्या कायद्यावरून स्पष्ट झाली.

हा कायदा पास करून घेण्याचें श्रेय लॉर्ड डफरीनसाहेबांना विशेष आहे. सर जार्ज चेस्नी, सर चार्लस अचिसन, मि. बेरटलंड आणि लॉर्ड डफरीनसाहेबानंतरचे व्हाइसराय लॉर्ड लॅन्सडौन हेहि त्या श्रेयांत बरेचसे भागीदार आहेत. राज्यकारभारांत प्रमुख आणि महत्वाचा भाग उचलण्याची हिंदुस्थानची लायकी आहे, असें लॉर्ड डफरीनसाहेबांनीं त्याच वेळीं विलायतसरकारला अगदीं स्पष्ट स्पष्ट शब्दांत सांगितलें होतें. कोणत्या स्वरूपाच्या सुधारणा पचविण्याची हिंदुस्थानची पात्रता आहे हें ठरविण्याकरितां लॉर्ड डफरीनसाहेबांनीं नेमलेल्या चौकशी कमिटीनें जो रिपोर्ट केला त्यांत आज मिळालेल्या मॉटर्डफ सुधारणांची बरीच छाया पडली आहे. परंतु विलायतसरकारनें मात्र हिंदुस्थानची तितकी योग्यता ठरविली नाहीं.

या कायद्यानें एका विशिष्ट मर्यादेपर्यंत निवडणुकीचें तत्व कबूल केलें; परंतु तेंहि अमलांत आणलें गेलें नाहीं. अंदाजपत्रकावर प्रश्न विचारण्याचा आणि वादविवाद करण्याचा अधिकार कौन्सिलांना मिळाला. कौन्सिलाचे सभासद नेमणुकीनें किंवा इतर तऱ्हेनें वाढविण्यासंबंधींचे नियम, ज्या त्या सरकारनें करावेत असें ठरलें.

म्हणजे सरकारला कौन्सिलें देण्याचा जो आद्य उद्देश कीं, राज्यकारभार देशांतील लोकांच्या कल्याणाला आणि सर्वांगीण प्रगतीला पोषक होईल असाच करावा तो या ९२ च्या कायद्यानें मुळींच सफल झाला नाहीं. जुनाट आणि खवले गेलेल्या भिंतीवर नुसता चुना फासून (White wash) तिला शोभा आणण्याचा प्रकार या कायद्यानें केला.

नंतर लॉर्ड कर्झन साहेब सिंहासनारूढ झाले. त्यांनीं, स्थानिक, स्वराज्य, युनिव्हर्सिटी आक्ट; बंगालची फाळणी वगैरेसारख्या तिरमिरी आणणाऱ्या थपडा लगावून वनवासी राजपुत्राची गोष्ट, हिंदुस्थानाला कान उपटून उपटून सांगितली. आपलें हरण झालेलें स्वराज्य परत मिळविल्याशिवाय हिंदुस्थानचा

तरणोपाय नाहीं. (Self-Government is the only and chief remedy. In Self-Goveurment lies our hope, strength and greatness) असा हिंदुस्थानच्या आजोबांनीहि १९०६ सालीं कलकत्यास अध्यक्षपदावरून निकराचा उपदेश केला. हिंदुस्थानच्या सुदैवानें याच सुमाराला विलायतेंत उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ होऊन, लॉर्ड कर्झनसाहेबांच्या भपडांनीं हिंदुस्थानच्या डोळ्यांत आलेले पाणी पुसून त्याची थोडीशी तरी समजूत घालणारे लॉर्ड मोर्ले, स्टेट सेक्रेटरी; आणि लॉर्ड मिंटो व्हाइसराय हिंदुस्थानाला लाभले. हिंदुस्थानच्या मनःस्थितीची, त्याच्या आकांक्षांची, आणि त्यानें आज धरलेल्या इच्छेची, हिंदुस्थानाविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या ब्रिटिश प्रजाजनांला विशेषतः नवीन ब्रिटिश प्रधान मंडळाला बरोबर कल्पना देण्याकरितां बनारसच्या राष्ट्रीय सभेनें ना. गोखल्यांना इंग्लंडला आपल्या तर्फे शिष्ट म्हणून पाठविलें होतें. त्यांची यशस्वी शिष्टाई, आणि लॉर्ड कर्झनसाहेबांनीं खवळून सोडलेला हिंदुस्थान थोडा शांत करण्यासाठीं कोणत्या स्वरूपाचा उपाय योजला पाहिजे हें ठरविण्यास लॉर्ड मिंटोसाहेबांनीं नेमलेलें "अधिकार विभागणी" चें (Decentralisation) कमिशन यांचें प्रत्यक्ष फळ म्हणजे, २७ नव्हेंबर १९०८ चा मोर्लेसाहेबांचा सुधारणांचा खलिता होय.

येथें एका खेदकारक—विशेषतः हिंदुमुसलमानांची एकी भासविणाऱ्या आजच्या दिवसांत विशेषच खेदकारक वाटणाऱ्या एका गोष्टीचा उल्लेख होणें जरूर आहे. दुसऱ्यांच्या ओंजळीनें पाणी न पिणाऱ्या कांहीं विशिष्ट समजूतदार मुसलमानांखेरीज सर्व हिंदी मुसलमानांना राष्ट्रीय सभा आणि तिचें कार्य यांची मुळींच पर्वा नव्हती. इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेच्या जन्मापासून तिच्या कार्याला विरोध करून नोकरशाहीला त्यांनीं चांगला हातभारहि लावला होता. याच कार्याला प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहाय्य करून सरकारच्या इतराजीपासून आपलें अंग शाबूत राखणारा आमच्यांतला आणखी एक वर्ग म्हणजे जमीनदार होत. हिंदीमुसलमान आणि हे जमीनदार यांना १९०८ च्या आक्टोबरपर्यंत हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कोणत्याहि प्रकारची सुधारणा नको होती. परंतु या पैगंबर राज्यांतून सुधारणा चळवळीच्या खाईत उडी टाकण्यास हिंदीमुसलमानांच्या अंगांत

तसाच एक जबरदस्त पीरहि संचारला होता. सुशिक्षित लोकांनीं राष्ट्रीय सभेतर्फे चालविलेल्या चळवळीच्या स्वरूपाला हिंदुस्थानांत लॉर्ड मिंटो आणि इंग्लंडांत लॉर्ड मोर्ले हें भेदरून गेले आहेत, कांहीं तरी भरीव सुधारणा देऊन हिंदुस्थानचा समजी काढण्याचा त्यांचा विचार जारी चालला आहे, व त्याचें रसदार फळ इकडे लवकरच येणार; अशी येथील नोकरशाहीची पूर्ण खात्री होतांच, आपल्यावर कोसळणाऱ्या या विलायतेंतील कुऱ्हाडीला प्रतिकार ह्मणून हिंदी मुसलमानांची ढाल तिनें पुढें केली. जादूगारानें मातीचा रुपया करावा त्याप्रमाणें, हिंदी राजकारणाला, आणि राज्य सुधारणांला मातीमोल समजणाऱ्या मुसलमानांनीं जादुगार नोकरशाहीच्या कारवाईनें राज्य सुधारणांच्या चळवळींत जोराची उसळी मारली. अंगावर रखरखींत इंगळ पडतांच तारून फोड उठावा त्याप्रमाणें, अलीगड तालमींतील अलीबंधु प्रकृतीच्या मुसलमानांचें एक वजनदार शिष्टमंडळ, निमिषार्धांत निर्माण होऊन, नवीन होऊं घातलेल्या सुधारणांत आपल्यासाठीं प्रतिनिधींच्या खास हक्कांची मागणी करण्यास व्हाइ-सरायकडे गेलें. आगापिछा नसतांना म. गांधींच्या प्रयत्नांनीं खुद्द तुर्कदेखिल ज्याची पर्वा करीत नाहींत तो 'खिलफती'चा प्रश्न आज हिंदी राजकारणांत मुकुटमणी होऊन बसला (आतां तर केमालपाशांनीं या खिलाफतीच्या भुताला राजकारणांतून कायमचेंच गाडलें आहे ) त्याप्रमाणें नोकरशाहीच्या कारवाईनें त्या वेळीं राज्य सुधारणांत मुसलमानांच्या प्रतिनिधींच्या खास हक्कांना प्रमूख स्थान मिळालें होतें. सर हेरल्ड स्टूअर्ट यांच्या २७ आगस्ट १९०७ ला प्रसिद्ध झालेल्या सुधारणा योजनेच्या पत्रकांत हिंदी राजकारणांतील या तृतीय पुरुषी शिखंडीला पुढें करून नोकरशाहीनें मुसलमानांच्या खास हक्कांचा सोडलेला बाण, राष्ट्रीय सभेच्या सुधारणा योजनांच्या वर्मीं लागलाच. मुसलमानांना खास अधिकार देऊन ह्मणजे हिंदु-मुसलमानांना परस्पर झुंजवून मजा पाहणाऱ्या सर हेरल्ड स्टूअर्ट यांच्या योजनेंत जमीनदारांनाहि मुसलमानांप्रमाणें प्रतिनिधींचे खास अधिकार दिले होते. जमीनदारांनीं असे खास अधिकार कधींहि मागितले नव्हते हें येथें लक्षांत ठेविलें; ह्मणजे, त्यांचें पळीनें तोंड उघडून हें खास हक्कांचें दूध पाजण्याच्या पुतनावात्सल्यानें नोकरशाहीच्या अंगांत कां संचार केला हें सहज

समजण्यासारखें आहे. वरिष्ठ आणि प्रांतिक कौन्सिलें सल्लागार (Advisary) कौन्सिलें करणें हाहि सर हेरल्डसाहेबांच्या योजनेंतील एक विशेष आहे. या योजनेनें देशांत बरीच खळबळ उडवून कांहीं मुसलमान व कांहीं जमीनदार यांखेरीज सर्वांनीं या योजनेचा निषेध केला. या निषेधाचा सरकारवर परिणामहि झाला. हिंदुस्थान सरकारनें या पत्रकांत लोकांनीं केलेल्या टीकानुरोधानं कांहीं महत्वाच्या सुधारणा करून मग ती योजना स्टेट सेक्रेटरीसाहेबांकडे रवाना केली.

हिंदी सुशिक्षितांविषयीं, येथली अधिकारलोलुप नोकरशाही जितका अनुदारपणा आणि तिरस्कार व्यक्त करते, तितका लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं व्यक्त केला नाहीं; इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या कौन्सिलामध्यें दोन हिंदी गृहस्थांना सभासद नेमून त्यांचा दर्जा वाढविला योजनेचा विचार करतांना देखिल त्यांच्या विचारसरणीला आणि न्याय्य आकांक्षांना प्रमुख स्थान दिलें; आणि हिंदुस्थान सरकारच्या योजनेत महत्वाचे फेरफार करून २७ नोव्हेंबरचा खलिता रवाना केला. या मोर्ले-मिंटो सुधारणांनीं प्रांतिक कौन्सिलांत बिनसरकारी—आणि तेहि निवडून दिलेल्या—सभासदांचें बहुमत ठेविलें. हिंदुस्थान सरकार, मुंबई सरकार आणि मद्रास सरकार यांच्या कार्यकारी कौन्सिलांत हिंदी लोकांचा प्रवेश झाला. दुसऱ्याहि ले. गव्हर्नरांच्या हाताखालील मोठ्या प्रांतांना एक किंवा अधिक हिंदी मनुष्यें असलेलें कार्यकारी कौन्सिल देण्याचें ठरलें. म्युनिसिपल आणि डिस्ट्रिक्ट बोर्डस् यांचे अधिकार आणि जबाबदारी वाढवून त्यांच्यावरील सरकारी दांत दूर केला. स्थानिक स्वराज्याचीं मुळें खेड्यापाड्यांतहि पसरविलीं आजपर्यंत कौन्सिलांत अंदाज पत्रकावर होणारा वादविवाद नांवाचाच होता. परंतु आतां त्यांत अधिक भरीवपणा आला. सरकारनें निश्चित केलेल्या अंदाजपत्रकावर सभासदांनीं कंठशोष करावयाचा म्हणजे मेलेल्या माणसाबद्दल शोक करण्यासारखेंच होतें. मोर्ले-मिंटो सुधारणांनीं अंदाजपत्रक कायम होण्यापूर्वीं कौन्सिलांत वादविवाद होऊन त्यावर ठराव आणण्याचाहि अधिकार मिळाला होता. कोणत्याहि सार्वजनिक महत्वाच्या प्रश्नावर कौन्सिलमध्यें ठराव आणतां येऊं लागला. सभासदांना उपप्रश्नहि विचारण्याचा अधिकार मिळाला.

परंतु विलायतेंत तयार झालेलें यंत्र, येथें इतक्या दूरदेशी आल्यावर तें बसवितांना, यंत्र बसविण्यासंबंधींच्या त्याच्याबरोबरच आलेल्या बिनचुक सूचनांकडे दुर्लक्ष करून किंवा त्या सूचनांना कपटयाचीच किंमत देऊन एखाद्या फाजील हुषार एंजिनियरनें स्वतःचें डोकें खर्च करावें व स्क्रूना वाजवीपेक्षां फाजील वेढे देऊन यंत्र अगदीं घट्ट बसवावें, अर्थातच यंत्राची काम करण्याची शक्ति कमी होऊन तें लवकरच निकामी व्हावें, त्याप्रमाणें या सुधारणांचा प्रकार झाला. लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं ज्या उदार तत्वांवर सुधारणांचें यंत्र तयार करून इकडे पाठविलें होतें, तें येथें बसवितांना येथल्या नोकरशाहीनें नियमांचे स्क्रू इतके फाजील आवळले कीं, त्याची शक्ति निम्याहून अधिक नाहींशी केली. हिंदुस्थान सरकारच्या योजनेंत मुसलमानांना अधिक प्रतिनिधी देण्याचा खास अधिकार दिला होता, त्याला मोर्लेसाहेबांनीं लोक संख्येच्या प्रमाणावर प्रतिनिधींचें तत्व अंमलांत आणून बराच आळा घातला होता; परंतु मुसलमान समाजाला अवास्तव राजकोय महत्व देऊन पार्लमेंटांत बिलावरील वादविवादाच्या वेळीं, मुसलमान समाजाला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणावर प्रतिनिधी देण्याचें तत्व, येथील नोकरशाहीनें कबूल करून घेतलेंच व नियमांच्या वेळीं तर तिनें आपला मूळ हेतु सिद्धीलाहि नेला. मि. फुलरनी मुसलमानांना सरकारची लाडकी राणी झटल्याचें खरें प्रत्यंतर व त्याची यथार्थता या वेळीं सिद्ध झाली.

या सुधारणांनी १।२ पावलें पुढें टाकलीं असलीं, तरी त्या असमाधानकारक आणि हिंदी लोकांची राजकीय भूक भागविण्यास अगदींच असमर्थ आहेत, असें हिंदी सुशिक्षित लोकांनांच वाटलें असें नाहीं, तर मांटेग्युचेम्सफोर्ड सुधारणाच्या वेळीं या सुधारणांचे सिंहावलोकन करतांना ते ह्मणतात,

But the reforms of 1909 afforded no answer, and could afford no answer to Indian Political problems. Narrow franchises and indirect elections faild to encourage a sense of responsibility to the people

generally, and made it impossible, except in special constituencies, for those who had votes to use them with perception and effect.

यांचा हाहि एक शेरा लक्षांत घेण्यासारखा आहे.

We have at present in India neither the best of the old system nor the best of the new. Responsibility is the savour of popular government, and that savour the present Councils wholly lack.

१८९० सालीं राष्ट्रीय सभा अवघी सहा वर्षांची होती. तिच्या बाल्यावस्थेंतच तिला नाहींशी करण्यास, निदान असून मेल्यासारखी करण्यास अधिकारी वर्ग आपल्या प्रयत्नांची आणि अधिकाराची अगदीं शिकस्त करीत होता; परंतु त्या वेळीं लोकांची चिकाटी, आणि एकजात हिंदी लोकांच्या संघशक्तीचें तिला मिळालेलें पाठबळ यांनीं तिचा अपमृत्यु टाळला आतां राष्ट्रीय सभा पूर्ण वयांत आली होती. अधिकाऱ्यांनीं कपाळाला कितीहि आठ्या पाडून मुठी वळल्या तरी त्यांच्याकडे तुच्छतेनेंच पाहण्याइतका बेफिकीरपणा आणि कार्यक्षमता तिच्या अंगी आली होती. परंतु सगळ्या जगाला कर्दनकाळ भासणारा पुरुष देखिल घरच्या, भाऊबंदकीमुळें, हतबल व मेल्याहून मेला होतो; तशीच स्थिति राष्ट्रीय-सभेची झाली. अधिकाऱ्यांच्या सत्तेपुढें कायदेशीर लढाईंत अजिक्य ठरून विलायतेंतहि दरारा बसवलेली राष्ट्रीय सभा, घरचींच भांडणें विकोपाला जाऊन सुरतेस उधळली गेल्यावर ती मृतप्रायच झाली होती. राष्ट्राची ही एक प्रचंड शक्ति गाडून टाकावी अशी त्या वेळीं कोणत्याहि पक्षाची इच्छा नसेल; पण दोघांच्याहि कृतींचा परिणाम मात्र तसा घडून आला हें खरें आहे. सुरतेच्या भांडणानें तिच्या डोक्यावर बसलेला घाव, आणि त्यामुळें तिला आलली मूर्च्छा तात्पुरती आहे कीं, कायमची आहे हें समजणें बरेंच मुष्कीलीचें होतें. ९० सालीं एका बाजूला अधिकारी वर्ग आणि एका बाजूला संघटीत लोक-पक्ष होता; या वेळीं संघटित लोकपक्षाचे दोन तुकडे होऊन तेच आपापसांत

भांडत होते, व अधिकारी वर्ग मजा पाहत होता. या आपापसांतील णांतून राष्ट्रीय सभा वर डोकें काढील कीं नाहीं, आणि काढलें तर तें राहील कीं नाहीं ही भीति, आणि राष्ट्रीय सभेच्या, दोन्ही पक्षांतील हितचिंतकांच्या अंतःकरणांतील दुगदुग मद्रासची सभा पार पडेपर्यंत दिवसेंदिवस दुणावतच होती. ९० सालापेक्षांहि भयकर आणि कठीण प्रसंगांतून राष्ट्रीय-सभेनें आपलें अस्तित्व कायम ठेविलें, एवढेंच नव्हे; तर मोर्ले—मिंटो सुधारणांनीं, जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला दगड बराच घट्ट बसवून, आप उत्क्रांतीची दुसरी अवस्था, पहिल्यापेक्षांहि अधिक यशस्वितेनें पार केली.

क्र. २३९८

REFBK-0002314

REFBK-0002314